# आश्रम-संगीत : सरलार्थ

१५६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९३०४

कुंदर दिवाण

REFBK-0009301

परंधाम प्रकाशन, पवनार

# आश्रम-संगीत : सरलार्थ

कुंदर दिवाण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक 22760 दि:
93064 नों. दि: 15.7.64

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8301
ग्रंथ

REFBK-0009301

प्र ... मार

ऑगस्ट १९६०]

[मूल्य रु. १.७५

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन,
पो. पवनार, जि. वर्धा.

प्रथमावृत्ति : २०००
सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम मुद्रणालय,
पो. पवनार, जि. वर्धा.

# निवेदन

आमची सगळी ज्ञानोपासना वेदमूलक आहे. जो विद्या-कला-कुशलता-विस्तार झाला आहे तो वेदोपासनेसाठीं झाला आहे. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द आणि ज्योतिष हीं वेदाङ्गें त्याचप्रमाणें आयुर्वेद, गान्धर्व-वेद, इतिहास, पुराण, काव्य इत्यादि वाङ्मय हि त्यांतून त्याच्या च अर्थाचें विशदीकरण करण्यासाठीं निर्माण झालें आहे, असें दिसून येतें. तसा च कांहींसा प्रकार आश्रम-शिक्षणांत हि झालेला आहे. प्रार्थना हें त्याचें मूल आहे. आणि तिच्या आकलनासाठीं अनेक विद्या कला आणि कुशलता आश्रमजीवनांत व शिक्षणांत विकसित झाल्या आहेत.

आश्रमप्रार्थनेच्या अभ्यासाची माझी परिकल्पना चतुर्विध आहे. प्रथम विधा म्हणजे भजनसंग्रह, दुसरी विधा म्हणजे भजनांचा सरल अर्थ, तिसरी विधा म्हणजे त्या भजनांचें स्वरलेखन आणि चौथी विधा म्हणजे स्वरमुद्रण. पैकीं पहिल्या दोन विधा मी यथाशक्ति संपादिल्या आहेत. उरलेल्या दोन तज्ज्ञांच्या व उपकरणवन्तांच्या साहाय्यानें हरीची इच्छा असल्यास यथाकाळ होतील. आश्रमसंगीताच्या पहिल्या आवृत्तींत कांहीं भजनांचें स्वर-लेखन दिलेलें आहे. त्याचप्रमाणें कांहीं भजनें हि स्वर-मुद्रित झालेलीं आहेत. परंतु सामग्र्यानें व अधिकृत रीतीनें हें अद्याप व्हावयाचें आहे.

जें भजन म्हणावयाचें तें अर्थबोधपूर्वक म्हटलें गेलें पाहिजे हें उघड आहे. परंतु भजनें अनेक भाषांतलीं आहेत. मातृभाषेंतील हि भजनें समजायला नेहमीं च सोपीं नसतात. त्यामुळें त्यांचा हि अर्थ देण्याची गरज उत्पन्न होते. या हेतूनें भजनांच्या संग्रहानंतर त्यांचा सरलार्थ लिहायला घेतला. एकदा मौज अशी झाली कीं संध्याकाळच्या प्रार्थनेंत गायकानें 'जागिये रघुनाथ कुंवर पंछी वन बोले' ही तुलसीदासांची भूपाळी वा प्रभाती गाइली. आध्यात्मिक रूपक कल्पून कदाचित् ह्या घटनेचें समर्थन हि होऊ शकेल. परंतु गायकाला अर्थज्ञान असतें तर त्यानें तें सायंकाळीं केव्हां हि म्हटलें नसतें. त्यांत रागांच्या गायनकालाचें अज्ञान हि आहे च. या हि पेक्षां

चमत्कारिक प्रकार अर्थज्ञानाच्या अभावीं झालेले आहेत. ह्या घटना हि सरल अर्थाच्या लेखनाला प्रोत्साहक झाल्या आहेत.

सकाळच्या प्रार्थनेनंतर रोज एक-दोन भजनांचा अर्थ मी सांगत असें आणि गणपतराव बोरेकर हे भाविक गृहस्थ लिहून घेत असत. असा क्रम कैक वर्षे सावकाश चालत राहिला. तत्परिणामीं हा सरलार्थ तयार झाला आहे. या क्रमामुळें वेळ जरी बरा च लागला तरी लेखनाचें ओझें कधीं च झालें नाहीं. जें कार्य नियमित नित्यशः केलें जातें तें देवाला आवडतें. आणि मी म्हणेन, तें च मानवाला हि मानवतें. 'दिसामाजीं कांहीं तरी तें लिहावें,' ही समर्थांची आज्ञा हि आहे. तदनुसार च हा सरलार्थ तयार झाला आहे, याचा संतोष मला होत आहे. या रीतीनें संतवाणीचें नित्य चिंतन-मनन होत गेलें; एकप्रकारें त्यांची संगति च लाभली. हा महा लाभ होय.

मराठीतर भजनांचा प्रायः सरळ शब्दार्थ देण्याची दृष्टि राखली आहे. मराठी भजनांचा नुसता शब्दार्थ देणें नेहमीं च गरजेचें नाहीं, त्यांत स्वारस्य हि नाहीं, असें समजून त्यांचा यथामति विशद अर्थ देण्याचा यत्न केला आहे. शब्दार्थ आणि भावार्थ देण्याच्या बाबतींत कुठें अज्ञानामुळें वा अनवधानामुळें चूक झालेली आढळून आल्यास ती मला कळविण्याची कृपा करावी म्हणजे तो मनांत तावडतोब, जनांत यथावकाश दुरुस्त करतां येईल.

मुखीं नाम मनीं भाव नयनीं लय-लीनता ।
अंगाअंगांत आवेश गीतरूपास त्या नमो ॥

हें आहे प्रार्थनेचें स्वरूप. अशी प्रार्थना करण्याचा माझा नम्र प्रयत्न आहे. त्याचा एक अंश म्हणून मी हा सरल अर्थ तयार केला आहे. सारें जीवन च तन्मय व्हावें अशी आकांक्षा आहे. परंतु ही आकांक्षा पूर्ण व्हावी कशी ? भक्ति हृदयांत उचंबळून यावी कशी ? हृदय च भक्तिमय होऊन राहील असें कशानें घडेल? याचें उत्तर महाभागवत च देऊं शकेल. मला तरी त्याचा एखादा विधि वा प्रक्रिया सांगतां येत नाहीं. पण मला वाटतें दीन आणि दुःखी जनांची सेवा हें त्याचें एक साधन होऊं शकेल. ही सेवा हि निष्काम आणि रागद्वेष-रहित होऊन करावी लागेल आणि उल्लासानें व उत्साहानें करावी लागेल. गांधी-विनोबांच्या जीवनसरणीवरून 'अंगा-

अंगांत आवेश' चा असा अर्थ मला लागतो. बाकी केवळ सुराच्या व तालाच्या नादांत आलेले डोल फोल च म्हणावे लागतील, पण हृदय भक्ति-भावानें ओथंवलें नाहीं, तरी सेवा वायां जाणार नाहीं. म्हणून दु:खितांची सेवा करीत करीत च श्रद्धामय व भक्तिपूर्ण बनण्याचा प्रयत्न करावा, हें च योग्य. अखेर 'यहि पथ रहि अविचल हरिभक्ति लहूंगो' असें च मी तुलसीदासांच्या शब्दांत म्हणेन. दु:खितांची प्रत्यक्ष सेवा, नीतिधर्माचें परि-पालन आणि भक्ति अशी ही परमार्थाची प्रस्तानत्रयी आहे. या त्रिपथगेचें सेवन जे करूं इच्छितात त्यांना ही कृति समर्पण करतों आणि आशा करतों कीं त्यांना ती उपयुक्त वाटेल.

पुण्यनगरी
१-५-१९६०

—कुन्दर दिवाण

# भजनांची सूचि

## अंक भजनांचे आहेत


| | | | |
|---|---|---|---|
| अँखियाँ हरि-दरसनकी | ४८ | आतां कैसेनि पुजूं | २१३ |
| अकल कला खेलत | १४० | आतां विश्वात्मकें | १५९ |
| अगर है शौक | १४९ | आपनो कबहुँ | ८१ |
| अजहुँ न निकसै प्रान | १३७ | आपुलें मरण पाहिलें | २३८ |
| अजि म्यां ब्रह्म पाहिलें | २९२ | आम्हां वैष्णवांचा | १८२ |
| अठ्ठावीस युगें | १७९ | आम्ही काय कुणाचें | २७८ |
| अनुदिन अनुतापें | २७७ | आरंभीं आवडी | १६० |
| अन्तर मम विकसित | ३७४ | आरंभीं देवाचें नाम | ३०४ |
| अपूर्व अवसर | ३२९ | आरती ज्ञानराजा | २३४ |
| अबकी टेक हमारी | ४९ | आसनीं शयनीं | १८३ |
| अब कैसे छूटै | ४३ | आहा आहा रे भाई | २३९ |
| अब मैं नाच्यों बहुत | ५२ | इस तन-धनकी | ३ |
| अब लौं नसानी | ७९ | उठ जाग मुसाफिर | १५८ |
| अभ्यासिले वेद | १८० | उदासीन हे वृत्ति | २७९ |
| अवघ्या वाटा झाल्या | २३५ | ऊठ गोपाळजी | ३०२ |
| अवीट हें क्षीर | २३६ | ऊंस डोंगा परि | २१२ |
| अशाश्वत संग्रह | २९२ | एकज दे चिनगारी | ३३३ |
| अस कछु समुझि | ८० | एक नाम हरि | १६१ |
| अहिंसा ही नव्हे | ३०३ | एक वेळ करीं | २४० |
| आकल्प आयुष्य व्हावें | १८१ | ऐक बा रामराया | २९८ |
| आज दिवस लेऊँ | ४४ | ऐसी मूढता या | ८२ |
| आजि प्रणमि तोमारे | ३३५ | ऐसे ऐसियानें | २४१ |
| आजि सोनियाचा दिनु | १५८ | ऐसे भाग्य कई | २४२. |
| आणिक दुसरें | २३७ | ऐसे राम दीन हितकारी | ८३ |

ऐसेहि जनम-समूह ८४
ऐसो को उदार ८५
कत अजानारे ३३६
कनक कांता न २१४
कबहुंक हौं यहि ८६
कर ले सिंगार ४
कर्माचिया रेखा १६२
कलि नाम काम ८७
कल्याण करीं देवराया २८०
काम क्रोध आम्हीं २४३
काय गुण-दोष माझे १८४
काय मी उद्धार २४४
काय सांगों आतां २४५
काया ही पंढरी २१५
काळ देहासी आला १८५
काहे न रसना ८८
काहे रे वन खोजन ३१
कुटुंब तजि शरण ८९
कृष्णा धांव रे लवकरीं २१६
(मैं) केहि कहौं विपति १२२
कैसे देऊँ नाथहिं ९०
कौन जतन बिनती ९१
क्षरला सागर २७५
गगनमैं थाल ३२
गरब न कीजै १४३
गाइ गाइ अब ४५
गुरु-कृपांजन पायो १४१
गुरुबिन कौन ५
गुरु लिंग जंगम १६३
गोपाळा रे तुझें १६४
गोविंद गोविंद मना २४६
ग्रह चंद्र तपन ६
घालीन लोटांगण १८६
घूंगटका पट ७
घे रे घे रे नाम्या १८७
चरण कमल बंदौं ५०
चेतन अब मोहि १५१
चौक भरियेला आसनीं २४७
छांडि मन हरि ५१
जगत जुडे उदार ३३७
जगते जा किछु ३३८
जग-मंगल गुन– ९२
जननिये जिवलगे १८८
जन भजन विना ८
जय जय जग-जननि ९३
जय जय सुर-नायक ९४
जय देव जय देव २१७
जय राम रमा-रमनं ९५
जयास वाटे शीण २८८
जाउँ कहाँ तजि ९६
जाके प्रिय न राम ९७
जागिये रघुनाथ ९८
जाणीव शाहणीव १८९
जाणोनि नेणतें २४८
जाणोनियां नेणपण १६५
जानत प्रीत-रीत ९९
जिन्ह हरिकथा सुनी १००
जीव विठ्ठल आत्मा १९०

जीवाचें जीवन २४९
जूंनुं थयुं रे देवळ ३१६
जे गमे जगतगुरु ३११
जेणें हा जीव दिला २५०
जेथाय थाके सबार ३३९
जेथें जेथें मन २१८
जो अनुराग न १०१
जोगी मत जा मत जा ६५
जो धुनियाँ ती भी १४८
जो पै जिय जानकी– १०२
जो पै रहनि रामसों १०३
जो पै राम-चरन– १०४
ज्याचिया रे मनें १९१
ज्यां लगी आतमा ३१२
ज्यों त्यों राम-नाम १५२
झाली संध्या संदेह २१९
झीनी झीनी झीनी ९
टाळ दिंडी हातीं १९२
टेक माय लाइफ ३४५
टेर सुनो व्रजराज ५३
ठाकुर तुव ३३
तव हम एक भये १३८
ताहितें आयो सरन १०५
तुझी सेवा करीन १६६
तुझे थोर थोर २५१
तुझें नित्य सुख १९३
तुझें यश चि तारितें २९७
तुम मेरी राखो ५४
तुमि बंधु तुमि ३४०
तूं ऐसा तैं होसी १७७
तूं तों माझें मी तों १६७
तूं माउलीहून २५२
तूं माझी माउली १९४
तू ठाकुर तुम ३४
तू तो राम सुमर १०
तू दयालु दीन हों १०६
तें मन निष्ठुर २२०
तैं नर का पुरान १५३
तोरि गठरिमें ११
त्याग न टके रे ३२१
दधीचि प्रह्लाद ३०५
दिलमां दीवो करो ३२८
दीनको दयालु १०७
दीनन-दुख-हरन ५५
दीन-बन्धु दुसरो १०८
दुर्लभ नरदेह १९५
देव जवळीं अंतरीं २८१
देवादि तूं तूं चि ३०६
देह असे यंत्र ३०७
देह जावो अथवा १९६
धन्य तो चि जगीं २२१
धर्म जागो निवृत्तीचा १६८
धांव रे रामराया २८२
धीर तो कारण २५३
ध्यानीं ध्यातां मनीं १९७
नंद-भवनको भूखन १४२
नको सांडूं अन्न २५४
नर नारी बाळें २५५

नरहरि चंचल है ४६
नसे भक्ति ना ज्ञान २८३
नहिं ऐसो जन्म ६६
नहिं छोडुं रे बाबा १२
नहिं रे विसारुं ३१७
नाथ जू अबकें ५६
नाम-अमल उतरै १३
नाम आठवितां २५६
नामयाचें प्रेम १९८
नाम राम रावरोइ १०९
नाहिंन आवत ११०
नाहिंनै नाथ अवलम्ब १११
निअरर माय गॉड ३४८
नित्य पुरवूनि ३०८
निंदक बाबा बीर १३९
निर्गुणीचें वैभव १९९
निश्चे करो रामनुं ३२६
नीर मंथूनि मंथन २२२
पंढरीचें सुख २००
पकड समसेर १४
पक्षी अंगणीं उतरती २२३
पग घुंगरु रे ६७
पतित-पावन नाम २०१
परदारा परधन २०२
परसत पद पावन ११२
पादप्रान्ते राखो ३४१
पायो जी म्हें तो राम ६८
पायो सत-नाम १५
पावलें पावलें तुझें २५७
पाहें पां ध्वजेचें १६९
पिकलिया सेंद २५८
पुढें गेले त्यांचा २५९
प्रभुजी तुम चंदन ४३
प्रभु मेरे औगुन ५७
प्रभु मेरे प्रीतम ३५
प्रेम मुदित मनसे १
प्रेमळ ज्योति तारो ३३१
फागुनके दिन चार ६९
बडी है रामनामकी ५८
बल दाओ मोरे ३४२
बहु पुण्यकेरा ३३०
बहे निरंतर आनंद ३४३
बिसर गई सब ३६
बिसर न जाओ १४५
बिस्वास एक राम– ११३
बोलणें चि नाहीं २६०
बोल मा बोल मा ३१८
बोलवरी बोलती २०३
बोलूं ऐसे बोल २०४
ब्रह्मचर्य हें पाळावें ३०९
भक्त ऐसे जाणा २६१
भक्तांचिया काजासाठीं २९३
भक्ति-प्रेमाविण २२४
भक्तीं आकळिला २८९
भगवद्भावो सर्वांभूतीं २२५
भज भज भव ३००
भज मन राम-चरन ११४
भजो रे भैया राम १६

| | | | |
|---|---|---|---|
| भरोसो जाहि दूसरो | ११५ | मेरो मन हरिजू | १२१ |
| भलो भली भाँति | ११६ | मैं केहि कहौं | १२२ |
| भाव धरा रे, आपुलासा | २९० | मैं जानी हरिपद | १२३ |
| भावें गावें गीत | २६२ | मैं तो गिरिधरके | ७४ |
| भूतळ भक्ति पदारथ | ३१३ | मैं तो दरद-दिवानी | ७५ |
| भूतीं देव म्हणोनि | २६३ | मैं तो बिरद-भरोसे | १५४ |
| मंगल मंदिर | ३३२ | मैं हरि पतित-पावन | १२४ |
| मत कर मोह | १७ | मो सम कौन कुटिल | ५९ |
| मनकी मनही | ३७ | मोह-जनित मल | १२५ |
| मन तोहे किहिबिध | १८ | मोहि लागी लगन | ७६ |
| मन पछितैहै | ११७ | म्हणसी होऊनि | २६६ |
| मन मस्त हुआ | १९ | म्हांने चाकर राखो | ७२ |
| मन रामीं रंगलें | २२६ | म्हें गोविंद-गुण | ७७ |
| मन रे परस | ७० | यह बिनती रघुवीर | १२६ |
| मन लागो मेरो | २० | याती मति हीन | २६७ |
| मनीं लोचनीं श्रीहरी | २८४ | युगें अठ्ठावीस | २०५ |
| मनुआ राम-नाम | ७१ | येईं गा तूं माय-बापा | २६८ |
| मनु मेरो गजु | २ | ये ग ये ग विठाबाई | २११ |
| मनो-भाव जाणोनि | २२७ | योगियां दुर्लभ तो | १७१ |
| माझिये जातीचें | २६४ | योगी पावन मनाचा | १७८ |
| माझे मनोरथ | २६५ | रघुकुल-रीत सदा | १३६ |
| माधव अब न द्रवहु | ११८ | रघुपति-भगति करत | १२७ |
| माधव मोह-पास क्यों | ११९ | रघुवर तुमको मेरी | १२८ |
| मारी नाड तमारे | ३२३ | रसने न राघवाच्या | २९९ |
| माथळवीत विश्वाभासु | १७० | रहना नहिं देस | २१ |
| मुखडानी माया | ३१९ | रहि रहि आनंद-तरंग | ३४४ |
| मुरसिद मेरा | ३८ | रॉक ऑव्ह एजेस | ३४९ |
| मेरे तो गिरिधर | ७३ | राम कहो रहमान | १४४ |
| मेरो भलो कियो | १२० | राम कृष्ण नामें | १७२ |

| | |
|---|---|
| राम जपु, राम जपु | १२९ |
| राम-बाण वाग्या | ३२५ |
| राम, मैं पूजा कहा | ४७ |
| राम राम जपु जिय | १३० |
| राम राम राम जीह | १३१ |
| रे मन, कृष्ण-नाम | ६० |
| रे मन, राम सों | ३९ |
| रे शिर साटे | ३२२ |
| लपालासी तरी | २०६ |
| लाज न लागत | १३२ |
| लाज मेरी राखौ | ६१ |
| लीड काइंडली लाइट | ३४६ |
| लोका जानि न भूलौ | २२ |
| वंदीन मी भूतें | २६९ |
| वदनीं तुझें नाम | २०७ |
| विठ्ठल टाळ विठ्ठल | २७० |
| विठ्ठल माउली कृपेची | २०८ |
| विषयाचे अभिलाषे | २२८ |
| विषयीं विसर | २७१ |
| विष्णुमय जग | २७२ |
| वेद जयालागीं | २२९ |
| वे दिन कब आवैंगे | २३ |
| वैष्णव जन तो | ३१४ |
| व्हेन आय सर्व्हें | ३५० |
| व्हेन द मिस्ट्स् | ३४७ |
| शिरीं आहे रामराज | २८५ |
| श्रीरंगा, दे मजला | ३०१ |
| श्रीहरिचे चरण– | २८६ |
| संत-चरण-रज | २०९ |
| संत-पदाची जोड | २९४ |
| संत परम हितकारी | १५५ |
| संतांचें लक्षण | २१० |
| सकळ नेणोनियां | १७३ |
| सखिये वो आहेती | २८७ |
| सगुण-चरित्रें परम | २३० |
| सतगुरु सोइ | २४ |
| सद्गुरु-शरण | ३२४ |
| सब दुनि सयानी | २५ |
| सबसों ऊँची प्रेम | ६२ |
| समझ देख मन | २६ |
| समरने श्रीहरी | ३१५ |
| सर्वादि सर्व-साक्षी | १७४ |
| सहज सहज ऐशा | २३१ |
| सांगड बांधा रे | २७६ |
| साकर दिसे परी | २३२ |
| सादर सहन | ३१० |
| साधु बोध जाला | १७५ |
| साधो मनका मान | ४० |
| साधो सहज-समाधि | २७ |
| सुनु मन मूढ | १३३ |
| सुने री मैंने निर्बलके | ६३ |
| सुमिरन कर ले | ४१ |
| सुमिर सनेहसों | १३४ |
| सूर-परकास | २८ |
| सूर संग्रामको | १४ |
| सोच समुझ अभिमानी | २९ |
| सोचै सोचिन होवई | ४२ |
| स्मरतां नित्य हरि | २९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| हमकाँ ओढावै | ३० | हरीचिया दासा | २३३ |
| हम तो आतम– | १४७ | हें चि दान दे गा देवा | २७४ |
| हम भक्तनके | ६४ | हे चि थोर भक्ति | २७३ |
| हरि आला रे हरि | १७६ | हे जग-त्राता विश्व– | १५३ |
| हरि तुम हरो | ७८ | हे हरि, कवन जतन | १३५ |
| हरिने भजतां | ३२७ | है बहारे-बाग दुनिया | १५७ |
| हरिनो मारग | ३२० | हो रसिया, मैं तो | १४६ |
| हरि-भजनावीण | २९६ | | |

e309...

# आश्रम-संगीत : सरलार्थ

## १ प्रेम-मुदित मनसे कहो राम राम राम

१ प्रेम-मुदित मनानें, भक्तिपूर्ण हृदयाने, रामनामाचें गायन करा कीर्तन करा.

२ या नामसंकीर्तनानें पापाचा नाश होतो आणि दुःखाचा लोप होतो. संसार-सागर तरून जायला राम-नाम ही एक च सुखकर अशी नाव आहे.

३ परम सुख आणि परम शांति यांचें अक्षय निधान, अक्षय भांडार च आहे रामनाम.

४ रामनाम परमहितकर आणि अत्यंत रहस्यमय असा मंत्र आहे. असें हें रामनाम संतांच्या हृदयांत निरंतर जागतें असतें.

५ आणि भगवान् शंकर तर हें दिव्य रामनाम अखंड जपत च असतात. या रामनामाच्या उच्चारानें जीवन भक्तिप्रेमानें बहरून येतें.

६ आईबाप, भाऊ आणि जिवलग मित्र हीं सारीं नातीं मनुष्याचें जितकें हित करूं शकतात तें सारें एक रामनाम करतें. आणि म्हणून भक्तजनांचें जीवनसर्वस्व म्हणजे एक रामनाम च होय.

## २ मनु मेरो गजु जिह्वा मेरी काती

१ मन ही माझी वारपट्टी आहे आणि जिह्वा ही माझी कात्री आहे. या दोन साधनांनीं मापून मापून यमाचा फासा मी कापून टाकीत आहें.

२ जात कांय करायची नि पांत काय करायची ? रात्रंदिवस मी आपलें रामाचें नाम घेत आहें.

३ कापड रंगवीत आहें, कपडे शिवीत आहें. आणि रामनामा-वांचून घटकाभर हि जगत नाहीं.

४ भक्ति करतों, हरीचे गुण गातों. अष्टौ प्रहर आपल्या पतीचें, स्वामीचें, ध्यान करतों.

५ नामदेव म्हणतात, निर्मल आणि एकाग्र मन ही माझी सोन्याची सुई आहे. आणि हरिमय झालेली वाणी हा माझा रुप्याचा धागा आहे. या दोहोंच्या योगें माझा हरि-सेवेचा धंदा चालला आहे. माझें जीवन हरिमय झालें आहे.

## ३ इस तन धन की कौन बड़ाई

१ या शरीराची आणि या संपत्तीची कितीशी किंमत आहे ? काल जे डोळे पहात होते ते आज मातींत मिसळले !

२ आपल्यासाठीं म्हणून सुंदर महाल तयार केला आणि एक दिवस आपणच वस्तीबाहेर जाऊन पडला !

३ हाडें हीं लाकडाच्या मोळीप्रमाणें धीमें धीमें जळतात, आणि केस गवताच्या पेंडीप्रमाणें भुर्रकन जळून जातात .

४ कबीरसाहेब म्हणतात, हे माझ्या गुणी जीवा, आपण मेल्यानंतर ही सारी दुनिया आपल्यासाठीं नाहींशी च झाली, बुडून च गेली, म्हणावयाची !

## ४ कर ले सिंगार चतुर अलबेली

१ हे माझ्या जीवरूपी चतुर सुंदरी ! नटून-थटून घे. तुला आपल्या प्रियकराच्या घरीं जावें लागणार आहे.

२ न्हाऊन घे. वेणी-फणी करून घे. तुला आपल्या प्रियकराच्या घरीं जावें लागणार आहे.

३ त्या ठिकाणीं तुला आंथरायला माती, पांघरायला माती आणि मातीची च उशी करावी लागेल.

४ कबीरसाहेब म्हणतात, हे माझे प्रेमिके, ध्यानांत ठेव. तेथें गेल्यावर मग फिरून येथें येणें होणार नाहीं.

## ५ गुरु बिन कौन बतावे बाट ?

१ गुरुशिवाय, मार्गदर्शकाशिवाय, मार्ग कोण दाखवणार ? यमाचा, मृत्यचा, घाट-रस्ता अत्यंत विकट आहे.

२ दरम्यान भ्रांतिरूपी डोंगरीनदी वहात असून तिच्यामध्यें अहंकार-रूपी लाटा सारख्या उसळत आहेत.

३ त्या मार्गांत काम आणि क्रोध हे दोन पर्वत आडवे आहेत. त्यांतच लोभरूपी वाटमाऱ्यांची टोळीहि टपून बसलेली आहे.

४ मद-मत्सराचा मेघ मुसळधार बरसत आहे आणि त्यातच मायेचे सोसाटयाचे वारे हि वाहत आहेत.

५ कबीरसाहेब म्हणतात, हे भल्या गृहस्था, असा हा अति बिकट रस्ता कसा काय पार करावयाचा ?

## ६ ग्रह चंद्र तपन ज्योत बरत हैं

१ चंद्र-सूर्य आणि ग्रह तारे यांच्या ज्योति पाजळल्या आहेत. भावमय संगीत चाललें आहे. आकाशांत रात्रि-दिवसांचे चौघडे दुमदुमत आहेत. कबीरसाहेब म्हणतात, विश्वांत विश्वनाथ गाजून राहिला आहे.

२ क्षणभर आणि निमिषभर चालणारी आरती कितीशी बापडी ! सबंध विश्व रात्रंदिवस आरती करीत आहे. या विश्वरूप आरतीमध्यें अव्यक्ताचे नगारे, झांजा आणि घंटा निनादत आहेत.

३ कबीरसाहेब म्हणतात, जगताच्या सिंहासनावर जगत्पति विराजमान आहे आणि रात्रंदिवस त्याची आरती होत आहे. कर्मधर्म, पूजा-अर्चेचा कर्मठपणा, जगभर चालला आहे, पण भगवंताची ओळख कोणा विरळा प्रेमी भक्ताला च होते.

## ७ घुंघट का पट खोल री

१ हे जीवरूपी स्त्रिये, आपला बुरखा दूर सार. तुला पतीचें दर्शन होईल.

२ व्यक्तीव्यक्तीमध्यें तो स्वामी रमून राहिला आहे, म्हणून कोणाला हि कटु वचन बोलूं नकोस.

३ आपल्या हृदयाच्या महालांत दिवा लावून ठेव आणि आशा सोडूं नकोस.

४ मोठ्या युक्तीनें या हृदयाच्या प्रेममंदिरांत माझी प्रभूशीं अमोल भेट झाली.

५ कबीरसाहेब म्हणतात, मला अतिशय हर्ष झाला आहे. अनाहताचा चौघडा वाजत आहे.

## ८ जन भजनबिना, जैसो जल जलजबिना

१ कमळावांचून तळें शोभा पावत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्य हरिभजना-शिवाय शोभत नाहीं.

२ एका झाडावांचून पर्वत सुना होय. एका पानावांचून झाड सुनें होय.

३ एका दिव्यावांचून घर सुनें होय. एका तेलावांचून दिवा सुना होय.

४ एका राजावाचून नगर सुनें होय. एका न्यायावांचून राजा सुना होय.

५ कबीरसाहेब म्हणतात, हे भाई, त्याप्रमाणें एका रामावांचून हें सारें जग शून्य होय.

## ९ झीनी झीनी झीनी झीनी बिनी चदरिया

१ ही शरीर-रूपी चादर अतिशय तलम विणलेली आहे.

२ हा शरीर-रूपी अष्टदल चरखा घुमत आहे. पांच तत्त्वें पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश आणि तीन गुण सत्त्व, रज, तम हीं तीं अष्टदलें होत.

३ ईश्वराला ही चादर विणण्यासाठीं दहा महिने लागले. त्यानें ही चादर चांगली ठोकून ठोकून घट्ट विणली आहे.

४ अशी ही चादर तिन्ही लोकांनीं, देव-मुनि-मनुष्यांनीं, पांघरली आहे. पण पांघरून त्यांनीं ती मळवली च आहे.

५ कबीरसाहेब म्हणतात, या दासानें ही चादर फार जपून पांघरली आहे. आणि जशीची तशी, न मळवतां, ईश्वराच्या हवालीं केली आहे.

## १० तू तो राम सुमर जग लडवा दे

१ तूं तर आपलें एक रामनाम घेत रहा. लोक स्वार्थासाठीं झगडतात, त्यांना झगडूं दे. त्यांत तुला पडण्याचें कारण नाहीं

२ कोरा कागद आणि काळी शाई घेऊन जे व्यर्थ लिहीत बसतात आणि लिहिलेलें वाचीत बसतात, त्यांना जाऊं दे. त्या शास्त्रि-पंडितांच्या शास्त्रार्थाच्या भानगडींत पडूं नकोस.

३ कुत्रीं भुंकत असतात पण हत्ती हा आपल्या डौलांत रस्त्यानें जात असतो. तसेंच तूं कर. निंदकांच्या टवाळीला भिऊं नकोस.

४ कबीरसाहेब म्हणतात : हे भाई, जे लोक हरिभजन सोडून नरकाची वाट धरतात त्यांच्या वाटेस तूं जाऊं नकोस. तूं तर आपलें एक राम नाम घे.

## ११ तोरि गठरिमें लागे चोर

१ वाटसरा, अरे असा झोंपलास काय ? तुझ्या आयुष्यरूपी धनाची चोरी होत आहे ना !

२ ऊठ, सकाळ झाली. रस्ता विकट आहे. ऊन पडल्यावर मग चालणे कठिण होईल.

३ कबीरसाहेब म्हणतात, हे भल्या गृहस्था ! उजेडेपर्यंत झोंपू नकोस रात्र जागून काढ.

## १२ नहिं छोडुं रे बाबा राम-नाम

१ प्रह्लाद म्हणतो आहे, मी नाहीं बाबा रामनाम सोडणार, मला दुसरें शिकून करायचें काय ?

२ प्रह्लादाला शिकविण्यासाठीं पुष्कळशा मुलांच्यामोबत शाळेंत पाठविलें. तो म्हणाला, गुरुजी मला कढईचा 'क' आणि खटाऱ्याचा 'ख' हें काय लिहून देतां ? माझ्या पाटीवर 'नारायण' लिहून द्या.

३ ही गोष्ट गुरुजींनीं विद्याधिकारी, शक्राचार्यांचे पुत्र, षड आणि अमर्क ह्यांच्या कानावर घातली. तेव्हां त्यांनी त्याला तावडतोब आपल्याकडे बोलाविलें आणि म्हटलें, 'तूं रामाचें नांव घेण्याचा हट्ट सोडून दे. तुला राजदंडांतून सोडवतों. सांगितलेलें ऐक.'

४ प्रह्लाद म्हणाला, 'तुम्ही मला कां उगीच वारवार छळत आहां ? ईश्वर जळीं, स्थळीं, आकाशीं सर्वत्र भरला आहे. हवें तर तुम्ही मला हाणा, मारा, जाळा, अथवा ठार करा. मी त्याला मात्र सोडणार नाहीं.' हें ऐकून गुरु तर अगदीं गार झाले.

५ राजाकडे तकरार गेली. ती ऐकून हिरण्यकशिपु रागानें जळूं लागला. त्यानें तलवार उपसली आणि म्हणाला, 'कोठें आहे तुझा रक्षण-कर्ता, दाखीव मला.' तेव्हां भक्त-रक्षणासाठीं ईश्वर खांब फोडून प्रगट झाला आणि हिरण्यकशिपूला त्या नरसिंहानें नखांनीं फाडून ठार केलें.

६ अशाप्रकारें देवाधिदेव परमात्म्यानें भक्तासाठीं नरसिंहाचें रूप धारण केलें. कबीरसाहेब म्हणतात, त्यानें प्रह्लादाचें वारंवार रक्षण केलें. त्याचा महिमा अपरंपार आहे. त्याचा अंत कोणाला लागणार आहे ?

## १३ नाम-अमल उतरै ना भाई

१ भाई, रामनामाचा कैफ उतरत नाहीं. दुसरे कैफ क्षणोक्षण चढून उतरतात, पण रामनामाचा कैफ दिवसेंदिवस सवाईच होत जातो.

२ हा रामनामाचा कैफ पहातां पहातां चढतो. ऐकतां ऐकतां मनांत भरतो. आणि त्याचें स्मरण केलें असतां अंगांत येतो. जे रामनामाचा प्याला प्याले, ते झिंगले. नाम मिळालें आणि संदेह मावळला.

३ ज्यांनीं ज्यांनीं नामाची मदिरा चाखली, ते ते तरून गेले' उदाहरणार्थ, पिंगला वेश्या, सजन कसाई इत्यादि. कबीरसाहेब म्हणतात मुक्यानें गूळ खाल्ला, तो वाणीशिवाय त्याची गोडी कशी वाखाणणार ?

## १४ पकड समसेर संग्राममें पैसिये

१ हातांत समशेर घेऊन समरांगणांत उतर आणि देह पडेपर्यंत युद्ध कर. तेथें शत्रूंचीं मुंडकीं उडव. त्यांना जागच्या जागीं नेस्तनाबूद कर. आणि दरबारांत येऊन बादशहास लवून मुजरा कर.

२ शूर पुरुष संग्राम पाहून पळ काढत नाहीं. जो कोणी पळ काढतो तो खरा शूरच नव्हे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे शत्रु आहेत. यांच्याशीं झुंज आहे. शरीररूपी रणांगणांत घनघोर युद्ध पेटलें आहे.

३ शील, संतोष आणि शौच (पवित्रता) हे त्या वीराचे रणांगणांतील साथी होत. आणि राम-नाम ही त्याची समशेर होय. ती त्या रणांगणात सारखी गाजत असते. कबीरसाहेब म्हणतात, अशा प्रकारें कोणी विरळाच शूर-वीर तोंड देत असतो. भित्र्यांची गर्दी तेथून लवकरच पळ काढते.

## १५ पायो सत-नाम गरेकै हरवा

१ हरिनामरूपी, गळ्यांतील हार (कंठी) मला मिळाला आहे.

२ ही छोटीसी खटोली (कुडी) ही आमची पालखी आणि हाडकुळे हाडकुळे पांच भोई (पांच प्राण) हे आमचे वाहणारे होत.

३ गुरूनें आम्हांला किल्ली देऊन ठेविली आहे. पाहिजे तेव्हां आम्ही दार उघडूं शकतों (आणि गुरूपाशीं जाऊं शकतों).

४ प्रेमानें रंगलेली ही आमची साडी (शरीर) आहे . ती नेसून हवें तेव्हां आम्ही शहरांत (जगांत)नाचूं खेळूं.

५ कबीरसाहेब म्हणतात, अरे भाई, पण आम्ही आतां पुन्हां या शहरांत येणार नाहीं.

## १६ भजो रे भैय्या राम गोविंद हरि

१ बाबा रे 'राम, कृष्ण, हरि' म्हण. हरिभजन कर.

२ त्यासाठीं जप-तपांतल्याप्रमाणें शरीर कष्टविणें किंवा यज्ञादि-कांतल्याप्रमाणें पदरमोड करणें, हें कांहींच नको.

३ संतति आणि संपत्ति, मनुष्य सुखासाठींच मिळवीत असतो खरा पण ह्या कामिनी-कांचनांमुळेंच तर त्याला भूल पडली आहे आणि तो आपलें खरें हित विसरून गेला आहे!

४ कबीरसाहेब म्हणतात, ज्याच्या मुखांत राम नाहीं त्याच्या मुखांत माती पडलीच, यमाच्या घरीं तो गेलाच. असें समज.

## १७ मत कर मोह तू, हरि-भजनको मान रे

१ हे जीवा, गफलतींत राहूं नकोस. हरि-भजनाचा आदर कर.

२ तुला डोळे दिले आहेत; हरिदर्शन कर. तुला कान दिले आहेत, हरिकथा ऐक.

३ तुला तोंड दिलें आहे, हरीचे गुण गा. तुला हात दिले आहेत, सत्पात्रीं दान कर.

४ कबीरसाहेब म्हणतात, अरे भल्या गृहस्था! हरिभजनरूपी सोनें हें मनुष्यदेहरूपी खाणींतच निपजत असतें. तुला मनुष्यदेह मिळाला आहे; त्याचा लाभ घे. गफलतींत राहूं नकोस.

## १८ मन, तोकि केहिबिध मैं समझाऊँ

१ हे मना, तुझी मी कशाप्रकारें समजूत घालूं ?

२ तूं सोनें असशील, तर सुहागी आणून तीसह तुला मुशींत घालतों आणि ज्ञानाची फुंकर घालून तुझें पाणी करतों.

३ तूं घोडा असशील, तर तुला लगाम घालतों, खोगीर कसतों. तुझ्यावर स्वार होतों, हातांत चाबूक घेतों आणि तुला चालवतों.

४ तूं हत्ती असशील, तर साखळदंड तयार करवतों; तुझे चारी पाय जखडून टाकतों; माहूत बनून तुझ्यावर स्वार होतों, हातांत अंकुश घेतों आणि तुला चालवतों.

५ तूं लोखंड असशील, तर ऐरण मागवतों, हातांत घण घेतों, घणांचा नुसता वर्षाव करतों आणि यंत्रांत घालून तुझा तार खेंचतों.

६ आणि तूं ज्ञानी असशील, तर तुला ज्ञान शिकवतों, सत्याच्या मार्गानें चालवतों. आणि, कबीरसाहेब म्हणतात बाबा रे, तुला अमरपदाला पोंचवतों.

## १९ मन मस्त हुआ तब क्यों बोलै

१ तुझें मन निर्भर झालें आहे. आतां तोंड कां उघतोस ?

२ हिरा मिळाला, पदरीं बांधलास, आतां तो वारंवार कां सोडतोस ?

३ रिकामें होतें तेव्हां तराजू वर चढलें, आतां भरल्यावर तें कां हेलकावतें ?

४ स्मृति-रूपी कलारीण भ्रमिष्ट झाली. ती आतां बेमाप दारू पिऊन बसली आहे.

५ मानस-सरोवर गांठल्यानंतर हंस आतां क्षुद्र तळयाकडे धांव कां घेतो ?

६ तुझा स्वामी अंतर्यामीं बसला आहे. बाहेर दृष्टि कां टाकतोस ?

७ कबीरसाहेब म्हणतात, हे भल्या गृहस्था, मला प्रभूचें दर्शन तिळाच्या पोटीं झालें आहे. सर्वांतर्यामिरूपानें झालें आहे.

## २० मन लागो मेरो यार फकीरीमें

१ गड्या, माझें मन फकीरीवर बसलें आहे.

२ जें सुख मला हरिभजनांत मिळतें, तें सुख अमीरींत कांहीं नाहीं !

३ बरे-वाईट बोल सर्वांचे ऐकून घ्यावे आणि गरीबीनें जगावें.

४ भक्तीच्या नगरींत आम्ही राहतों. संतोषांत आमचें ठीक जमलें आहे.

५ अखेरीस शरीराची राख च व्हायची आहे. मगरूरींत कुठें चालला आहेस ?

६ कबीरसाहेब म्हणतात, हे भल्या गृहस्था, प्रभु सबूरींत, धीरांत, सतोषांत च मिळत असतो.

## २१ रहना नहिं देस बिराना है

१ आम्हांला येथें रहायचें नाहीं आहे. हा तर परदेश आहे !

२ हा संसार म्हणजे कागदाची पुडी होय. पाण्याचा थेंब पडला कीं खलास, विरलीच !

३ हा संसार म्हणजे कांटयांचा बगीचा आहे. ह्यांत अडकून अडकून च मरावयाचें आहे.

४ हा संसार म्हणजे गवतकांडीचें वन च होय. आग लागली की जळून राख होणार.

५ कबीरसाहेब म्हणतात, ऐक साधका! आमचें वास्तव्य तर सद्गुरूचें नाम च होय. संसार हा आमचा वनवास आहे.

## २२ लोका जानि न भूलौ भाई

१ बाबांनो, जाणून घ्या, आणि पुन्हां विसरूं नका. विश्वेश्वरच विश्व होय. विश्वांत तोच आहे. तो घटन् घट भरून राहिला आहे.

२ परमात्म्यानें एक ज्योति, एक जीवकला, निर्माण केली. तिची निंदा कशी करावयाची ? आणि त्याच जीव-कलेंतून सर्व जग निर्माण केलेलें आहे. तेथें कोण चांगला आणि कोण वाईट म्हणावयाचा ?

३ त्या प्रभूचें ज्ञान मला संपूर्ण झालेलें नाहीं, परंतु गुरुकृपेनें 'त्या गुळाची' गोडी मी चाखली आहे. कबीरसाहेब म्हणतात, एवढयानें मी कृतकृत्य झालों आहें, कारण भूतमात्रांत मला प्रभुदर्शन झालें आहे.

## २३ वे दिन कब आवैंगे भाई

१ ज्या साठी आम्हीं देहधारण केला आहे, तो अंगोअंगी कडकडून भेटण्याचा दिवस केव्हां बरें येईल ?

२ त्या दिवशीं मग तना-मनानें एकजीव होऊन आपण खेळूं बागडूं. माझी ही कामना, हे रामराया, आपण पूर्ण करावी. हें सामर्थ्य आपलेंच आहे.

३ ही माझी दासाची एवढी विनंति ऐकावी. माझ्या शरीराला लागलेली आग विझवावी. कबीरसाहेब म्हणतात, स्वामीचीं भेट झाली म्हणजे मग स्वामीला आलिंगून आम्ही आनंद करूं.

## २४ सतगुरु सोइ दया करि दीन्हा

१ सद्गुरूनें कृपा करून मला अशी दृष्टि दिली आहे कीं जिच्या योगें मीं अलक्ष वस्तु लक्षिली आहे.

२ पायाशिवायचें चालणें, पंखाशिवायचें उडणें, चोंचीशिवायचें दाणे टिपणें, डोळ्याशिवायचें पाहणें आणि कानाशिवायचें ऐकणें असें अद्‌भुत जीवन त्यामुळें मला लाभलें आहे.

३ त्या ठिकाणीं चंद्र नाहीं, सूर्य नाहीं; तेथें दिवस नाहीं, रात्र नाहीं. त्या ठिकाणीं आमचें ध्यान लागलें आहे. तेथें अन्नाशिवाय आणि पाण्या-शिवायच तहान-भूक भागते असें अमृतरसाचें भोजन मिळत असतें.

४ जेथें हर्ष असतो, तेथेंच पूर्ण सुख असतें. असें हें हर्षनिर्भर सुख कोणाला सांगायचें ? कबीरसाहेब म्हणतात, ज्याच्या कृपाप्रसादानें असें पूर्ण सुख लाभतें त्या सद्‌गुरूची धन्य होय आणि अशा सद्‌गुरूचा शिष्य होणें धन्य धन्य होय.

## २५ सब दुनि सयानी, मैं बौरा

१ सर्व दुनिया शहाणी आहे, मी मात्र वेडा आहें. आम्ही तर बिघडून. चुकलों. आतां दुसऱ्यांनीं बिघडूं नये म्हणजे झालें ।

२ मी नाहीं वेडा. रामानें मला वेड लावलें आहे. सद्‌गुरूनें माझा भ्रम पार नाहींसा केला आहे.

३ मी विद्या शिकत नाहीं, किंवा वाद-विवाद हि मला करायला येत नाहीं. मी तर हरीचे गुण गात आणि ऐकत वेड्यासारखा हिंडतों आहें.

४ काम आणि क्रोध या दोन विकारांची होळी पेटली आहे आणि सारें जग आपखुषीनें त्यांत पडून होरपळत आहे.

५ गोड कशाला म्हणावयाचें ? ज्याला जें भावतें, आवडतें, तेंच त्याला गोड ! कबीरसाहेब म्हणतात, मला तर राम च गोड आहे आणि रामाचे च गुण मी गात असतों.

## २६ समझ देख मन मीत पियारे

१ प्रिय मित्रा मना ! पहा, विचार कर. तूं प्रेमी भक्त होऊन असें हें घोरत पडावें का ?

२ ओला कोरडा भिकेचा तुकडा ! तो चवदार कीं बेचव आहे हें पाहण्यांत अर्थ काय?

३ तुला जर ( भक्तिप्रेम )कांहीं मिळालें असेल तर करून घे त्याचा दानधर्म. मिळविलें, पुन्हां गमावलें, ह्यांत काय अर्थ आहे ?

४ ज्या डोळ्यांत झोंप भरली आहे त्यांना मग झोंपेसाठीं गादीची आणि गिर्दीची पर्वा च काय ?

५ कबीरसाहेब म्हणतात, भल्या माणसा, एकदा डोकें दिलें, आतां रडण्यांत काय अर्थ ?

## २७ साधो सहज-समाध भली

१ भल्या माणसा सहज समाधि ही च चांगली. गुरुकृपा झाली त्या दिवसापासून ती अधिकाधिक च वाढत आहे !

२ जें कांहीं फिरणें होतें ती च माझी प्रदक्षिणा होय, जें कांहीं करतों ती च माझी सेवा-अर्चा होय, आणि झोंपतों तो च माझा देवाला दंडवत. ह्या बेगळी पूजा मी करीत नाहीं .

३ बोलतों तें माझें नाम घेणें होय, ऐकतों तें च नाम-स्मरण होय आणि खातों पितों तो च देवाला माझा नैवेद्य. जन आणि विजन मी समान च मानतों. हा च माझा भक्तिभाव. दुसरा कांहीं मी राखत नाहीं.

४ मी आपले डोळे मिटत नाहीं, कान बंद करीत नाहीं आणि कसले हि प्राणायामादिकांचे कष्ट मी करीत नाहीं. उघड्या डोळ्यांनीं मोठ्या आनंदांत आपल्यासमोर मी प्रभु पाहत आहें.

५ कायमचा बोध चित्तांत जागला आहे . मलिन वासना निमाली आहे. आणि उठतां बसतां केव्हां हि जी सोडून जात नाहीं अशी समाधि आतां माझी लागली आहे.

६ कबीरसाहेब म्हणतात, ही उन्मनी अवस्था मी शब्दांनी वर्णून प्रगट केली आहे. सुखदु:खाच्या पलीकडे असलेलें जें अनिर्वचनीय परमपद तेथें आतां मी समाविष्ट झालों आहें. पूर्ण विश्राम पावलों आहें.

## २८ सूर-परकास तहँ रैन कहँ पाइये

१ जेथें सूर्यप्रकाश आहे तेथें रात्र कोठून असणार? उलट, रात्रींच्या वेळीं सूर्य असत नाहीं. त्याप्रमाणें ज्ञानोदय झाला असतां अज्ञान कोठून राहणार? अज्ञान आहे म्हणजे ज्ञान नाहीं च.

२ जेथें कामवासना प्रबल आहे, तेथें प्रेम भक्ति कोठून असणार? जेथें प्रेम असतें, भक्ति असते. तेथें कामवासना नाहीं राहूं शकत. कबीर-साहेब म्हणतात अशी ही वस्तुस्थिति आहे. तूं आपल्याच मनांत शोध करून पहा.

## २९ सोच समुझ अभिमानी

१ हे गर्विष्ठ जीवा, विचार कर, लक्षांत घ. तुझी ही शरीररूपी चादर जीर्ण झाली आहे ना!

२ जगापासून चिरगुट-चिंध्या मिळवून तूं ही चादर शिवून टिपून पांघरला आहेस. ती ही चादर पापाचरणानें तूं मळवून टाकली आहेस. लोभ आणि मोह ह्यांनीं बरबटून टाकली आहेस.

३ ही चादर ज्ञानाच्या साबणानें आणि सदाचाराच्या पाण्यानें तू कधीं धुतली नाहींस. जन्मभर तूं ही पांघरलीस पण ओळखली नाहीं कीं ही चांगली आहे कीं वाईट!

४ अरे भय धर, लक्षांत घे. ही दुसऱ्याची वस्तु आहे. कबीर-साहेब म्हणतात, ही चादर प्रयत्नपूर्वक रक्षण कर. गेल्यावर मग ती फिरून हातीं लागावयाची नाहीं.

## ३० हमकाँ ओढावे चलती बिरिया

१ आतां प्रयाणाच्या वेळेला आम्हांला काय पांघरवतां ?

२ प्राणराम जेव्हां जाऊ लागले, तेव्हां डोळयांतील बाहुल्या उलटया झाल्या .

३ जेव्हां घरांतून आम्हांला बाहेर काढलें, तेव्हां सर्व महाल आणि वाडे जेथच्या तेथें च राहिले.

४ चौघा जणांनीं आमची तिरडी उचलली आणि अश्रु गाळत ते स्मशानाची वाट चालूं लागले.

५ कबीरसाहेब म्हणतात, भल्या माणसा! अखेर आमच्याबरोबर तीं वाळकीं लाकडें तेवढीं आलीं .

## ३१ काहे रे बन खोजन जाई

१ कशाला रे वनांत शोध करायला जातोस ? सर्वत्र भरून सर्वदा अलिप्त असणारा परमात्मा तुझ्या ठिकाणीं च राहिला आहे !

२ पुष्पांत जसा सुगंध आणि आरशांत जसें प्रतिबिंब असतें, त्याप्रमाणें परमात्मा शरीररूपी घटामध्यें निरंतर निवास करीत आहे. त्यांत च बाबा रे, त्याचा शोध घे.

३ आंत बाहेर सर्वत्र तो एकच परमात्मा भरून राहिला आहे. गुरूनें असें तत्त्व उपदेशिलें आहे. नानकसाहेब म्हणतात, लोक हो ! आपली ओळख करून घेतल्याशिवाय भ्रमाचा केर, शेवाळ, फिटणार नाहीं.

## ३२ गगनमैं थालु रवि चंदु दीपक बने

१ गगन हें च एक आरतीचें तबक आहे आणि त्यांत रवि व चंद्र ह्या दोन वाती आहेत. एक फुलवात व दुसरी कापूर-वात. तारकांचे मुक्तामणि ह्या च तेथील अक्षता.

२ मलयानिल हा च धूप. वाऱ्याच्या झुळकी हीं च डुलतीं चामरें, आणि सगळी वनराजी ही च पुष्पांची आरास.

३ हे भवखंडना, हे संसारभयभंजना परमेश्वरा ! पहा कशी ही तुझी आरती चालली आहे. अनाहत शब्दाची भेरी, वाजते आहे.

४ हे प्रभो, तूं सहस्रमूर्ति आहेस. आणि त्याचबरोबर तू अमूर्ति आहेस. तूं सहस्राक्ष आहेस आणि त्याचबरोबर तूं अक्ष-रहित आहेस, अचक्षु आहेस.

५ तूं सहस्रपाद आहेस, आणि त्याचबरोबर अपाद आहेस. तूं सहस्रगध आहेस, आणि त्याचबरोबर अगंध आहेस.

६ सर्वांच्या ठाई जें तेज आहे, तें ईश्वरी तेज आहे. त्याच्या च दीप्तीनें सर्वांच्या ठाईं ज्योत तेवत असते.

७ गुरूच्या साक्षीनें ही ज्योति प्रगटत असते, आणि तिचें ध्यान करणें म्हणजे च आरती करणें होय

८ श्रीहरीच्या चरणकमलांतील मकरंदावर, मधूवर, माझा मनोमधुप लुब्ध झाला आहे. त्याची त्याला निरंतर तृषा लागली आहे.

९ नानक म्हणतात, हे प्रभो ! या चातकाला, मला, तुझ्या कृपेचें जल दे. म्हणजे तुझ्या नामाच्या ठाईं मी घर करून राहीन.

## ३३ ठाकुर तुव शरणागत आया

१ हे प्रभो, तुला मी शरण आलों आहें. तुझें दर्शन झालें तेव्हांपासून अंतरांतील सर्व संशय पार निघून गेला.

२ न सांगतां माझी व्यथा तूं ओळखलीस आणि आपलें नांव मला जपायला लावलेंस, ह्यामुळें दुःख संपलें आणि सहज सुखाचा लाभ झाला. मी आतां मोठ्या आनंदानें तुझें गुण गात आहें.

३ हे प्रभो गृहरूपी मायेच्या अंधकूपांतून मला तूं बाहेर काढलेंस. नानकसाहेब म्हणतात, माझी सर्व बंधनें तोडून मला मोकळें केलेंस आणि ताटातूट झालेल्या मला आणून आपली भेट करविलीस.

## ३४ तू ठाकुर तुमपहि अरदासि

१ हे प्रभो, तूं सर्वांचा स्वामी आहेस. आणि तुझ्या च चरणीं विनंती करावयाची. जड-चेतन, शरीर आणि शरीरी, दोन्ही एक तुझी च रास आहे, तुझी च प्रकृति आहे.

२ तूं या विश्वाचा मायबाप आहेस. आम्ही सारे तुझे बालक आहोंत. तुझ्या कृपेंत उदंड सुखें भरलीं आहेत.

३ हे प्रभो, तुझा अंत कोणी हि जाणत नाहीं. तूं परात्पर आहेस.

४ या विश्वनाटकाचा सूत्रधार तूं आहेस. तुझ्या च आज्ञेनें, तुझ्या सूत्रानुसार जड-चेतन सारें चलन-वलन अथवा त्याचा निरोध म्हणजे च स्थिति-गति करीत असतें

५ हे प्रभो, तुझा महिमा तूं च जाणतोस. हा दास नानक सदैव तुला समर्पण आहे.

## ३५ प्रभु मेरे प्रीतम प्रान-पियारे

१ हे प्रिय प्रभो, तूं माझा प्राणसखा आहेस. हे दयाळा, हे कृपाळा, मला प्रेम-भक्ति दे . आपल्या नामाची आवड दे.

२ हे प्रियतमा , तुझे चरण मी आठवून आहें, हृदयांत तुझी च ओढ आहे. संतजनांना मी विनवीत आहें , माझें मन दर्शनाला आतुर झालें आहे.

३ हे प्रभो, तुझा वियोग म्हणजे माझें मरण, तुझी भेट हें च माझें जीवन; मला तुझ्या भक्ताला दर्शन दे. नानकसाहेब म्हणतात , हे माझ्या प्रभो , तुझें नांव हा च माझा आधार, हें च माझें जीवन-धन, हे कृपाळा, माझ्यावर दया कर.

## ३६ बिसर गई सब तात पराई

१ बाबा रे, जेव्हांपासून साधूंची संगति मला लाभली, तेव्हांपासून परकेपणा पार लोपून गेला आहे.

२ आमचा कोणी वैरी नाहीं, आणि आम्हांला कोणी परका नाहीं. सर्वांशीं च आमचें सख्य आहे.

३ जें प्रभूनें केलें, जसें ठेवलें, तें च श्रेयस्कर, त्यांत च संतोष मानावा ही सुबुद्धि, ही संतोषवृत्ति, साधु-संतांपासून मला लाभली आहे.

४ सर्वांच्या अंतर्यामीं एक प्रभु च रममाण झाला आहे, तो च खेळ करीत आहे. त्याला ठाईं ठाईं पाहून नानकसाहेब म्हणतात, मी प्रसन्न होत राहतों, सुखानें फुलत राहतों.

## ३७ मनकी मनहीमाँहि रही

१ हरिभजन हि घडलें नाहीं अथवा तीर्थयात्रा हि केली नाहीं. आणि काळानें झडप घालून शेंडी पकडली. मनांतले मनसुबे मनांत च राहिले.

२ स्त्री, पुत्र, मित्र, रथ, संपत्ति, दासदासी, धनपूर्ण अशी भूमि वगैरे सर्व मिथ्या आहे असें समज. एक रामभजन च सत्य होय.

३ चौऱ्यांशी लक्ष योनींत फिरफिरून हा काळ पावेतों युगानुयुगें गमावत च गेलों. अखेर मनुष्यदेहाचा लाभ झाला. नानकसाहेब म्हणतात, आतां ही संधि मिळाली आहे तर रामस्मरण, हरिभजन, कां रे नाहींस करीत ?

## ३८ मुरसिद मेरा महरमी

१ माझा गुरु परम सखा आहे. त्यानें रहस्य सांगितलें आहे कीं हृदयांत तो हृदय-नाथ बसला आहे. ज्यांनीं शोध केला त्यांना तो मिळाला आहे.

२ एक अद्भुत स्मरणी आहे. तिच्यांत प्रत्येक श्वास हा च मणि आहे. एकांतांत बसून ज्यांनीं ही माला फिरविली त्यांनीं च जाणायचें जाणलें आहे.

३ काय गाय आणि काय बकरी, अथवा आपला पोटचा मुलगा काय? सर्वांचें रक्त एक च आहे. प्रभूनें असें बजावलें आहे.

४ पीर, पैगंबर, औलिया सर्व च मरायला जन्मले आहेत. म्हणून नाहक कुठल्या हि जीवाची हत्या करूं नये. सर्व जीवांची काया पालन-पोषण करण्यासाठीं च आहे.

५ हृदयांतील क्रोध हा च हैवान म्हणजे पशु आहे. त्याला, बाबा रे ! काबूंत ठेव. नानकसाहेब म्हणतात, हा ईश्वरी न्याय आहे. हें जाणतो तो च ईश्वररूप बनतो.

## ३९ रे मन, रामसों कर प्रीत

१ अरे माझ्या मना, रामाच्या चरणी प्रीति धर.

२ हे कानांनो, तुम्ही गोविंदाचे गुण ऐका. आणि हे रसने, तूं हरीची गीतें गा.

३ साधूंच्या संगतींत रहा. माधवाचें स्मरण कर. म्हणजे अरे पतित हि पावन होतो कीं !

४ काळ सर्पाप्रमाणें तोंड वासून गिळायला टपून बसला आहे. रे मित्रा ! सावध हो .

५ आज-उद्यां तुला तो ग्रासणार आहे. अरे मित्रा, हें ध्यानांत असूं दे.

६ नानकसाहेब म्हणतात , जोंपर्यंत काल-सर्पानें ग्रास केला नाहीं तोंपर्यंत च रामभजन करून घे; नाहींतर आलेली संधि चालली आहे पहा!

## ४० साधो मनका मान त्यागो

१ हे भल्या माणसा, मनांतील अभिमान टाक. काम क्रोध हे च दुर्जन होत. ह्यांच्या वाऱ्यास हि राहू नकोस. त्यांच्यापासून सदासर्वदा दूर च रहा.

२ जे सुख आणि दु:ख त्या च प्रमाणें मान आणि अपमान समान लेखतात, हर्षशोकांपासून जे अलिप्त आहेत, त्यांनी च जगांत तत्त्व ओळखलें आहे. सत्य जाणलें आहे.

३ स्तुति आणि निंदा दोहींचा हि त्याग करून ते निर्वाणपदाचा शोध घेतात. नानकसाहेब म्हणतात, बाबा रे, हा खेळ फार कठिण आहे. कोणी सद्गुरूचा शिष्य च ह्यांत फावतो.

## ४१ सुमिरन कर ले मेरे मना

१ अरे माझ्या मना, हरि-स्मरण करून घे. तुझें आयुष्य हरिनामावांचून चाललें आहे कीं !

२ कुवा पाण्याशिवाय, गाय दुधाशिवाय, घर दिव्याशिवाय आणि वृक्ष पानाशिवाय जसे व्यर्थ होत, त्याप्रमाणें प्राणी हे हरिनामाशिवाय व्यर्थ होत

३ शरीर नेत्रांशिवाय, रात्र चंद्राशिवाय, भूमि मेघाशिवाय आणि पंडित वेदाध्ययनाशिवाय ज्याप्रमाणें निष्फळ होत, त्याप्रमाणें प्राणी हे हरिनामाशिवाय निष्फळ होत.

४ काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांना, भल्या माणसा, दे सोडून. कारण, नानकसाहेब म्हणतात, अरे शहाण्या ! या जगांत आपलें असें कांहीं च नाहीं.

## ४२ सोचै सोचि न होवई

१ आपण एखादी गोष्ट लाख चिंतिली तरी ती होत नाहीं. तसें च एखाद्या गोष्टीविषयीं अगदीं स्वस्थ बसायचें ठरवलें तरी ती घडून आल्याशिवाय राहत नाहीं. कारण कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं शक्ति परमेश्वराची आहे.

२ एखाद्या भुकेल्या भिकाऱ्यासमोर हलवायाच्या दुकानांत लाडू-पुऱ्यांचा ढीग पडलेला दिसतो. परंतु तेवढ्यानें त्याचें पोट भरत नाहीं. हजारों शहाणे गोळा झाले तरी त्यांचें एक चालत नाहीं. प्रभूच्या आज्ञेवांचून कांहीं च होत नाही .

३ काय खरें आहे, काय खोटें आहे, हरि च जाणे. नानक म्हणतो, प्रभूच्या आज्ञेप्रमाणे चालावें हा च माझा सिद्धान्त.

## ४३ अब कैसे छूटै नाम-रट लागी

१ नामाची धुन लागली आहे, आतां ती कसची सुटते ?

२ हे प्रभो, ज्याच्या रेषारेषांत सुगंध भरला आहे असें चंदन तूं आहेस, तर आम्ही पाणी आहों.

३ हे प्रभो तूं मेघ असशील, तर आम्ही मोर बनलों आहों. चंद्राकडे चकोर त्याप्रमाणें तुझ्याकडे आम्ही दृष्टि लावून बसलों आहों.

४ हे प्रभो, ज्याची ज्योत रात्रंदिवस तेवत आहे असा दिवा, तूं आहेस, तर आम्ही त्याची वात आहों.

५ हे प्रभो, तूं मोती आहेस, तर आम्ही धागा आहों. सोन्यास ज्याप्रमाणें सुहागा स्वात्मार्पण करतो, त्याप्रमाणें आम्हीं तुला स्वात्मार्पण केलें आहे.

६ हे प्रभो, तूं स्वामी आहेस, आम्ही तुझे दास आहों. भक्त रइदास (रविदास) म्हणतात, मी ही अशी भक्ति करीत असतों.

## ४४ आज दिवस लेऊँ बलिहारा

१ माझ्या घरीं रामाचा प्यारा, भक्त, आला आहे. आजचा दिवस धन्य होय.

२ घर आणि आंगण पावन झालें आहे. कारण हरीचे भक्त हरियश गायला येथें बसले आहेत.

३ मी त्यांना दंडवत प्रणाम करतों. त्यांचे पाय मी प्रक्षाळितों. तन, मन आणि धन मी त्यांच्यावरून ओंवाळून टाकतों.

४ हे हरिभक्त हरिकथा करतात आणि तिच्या अर्थाचें विवरण करतात अशाप्रकारें स्वतः तरतात आणि इतरांना हि तारतात.

५ भक्त रइदास म्हणतात, हरिभक्तांची भेट झाली म्हणजे ते आपले जन्मजन्मांतराचे बंध तोडून टाकतात.

## ४५ गाइ गाइ अब का कहि गाऊँ

१ गाऊन गाऊन आतां काय बरें गाऊं ? गाणारा हि जवळ च बसला आहे, पहा !

२ जोंपर्यंत मध्यंतरीं हा शरीर-भाव कायम आहे, तोंपर्यंत हरि-यशाचें गान हें चालणार च जेव्हां मन हरींत मिसळून जातें आणि शरीर-भाव नाहींसा होतो, तेव्हां मग कोण गाणार ?

३ जोंपर्यंत नदी समुद्रास मिळत नाहीं, तोंपर्यंत नदीची खळखळ वाढत च जाते. जेव्हां मनाची नदी रामसागरांत जाऊन मिळते, तेव्हां च ही खळखळ थांबते

४ जेव्हां मन किमपि आशा करीत नाहीं, आत्मन्येवात्मना तुष्ट राहतें, तेव्हां च खरें सुख लाभतें. तें च परमपद होय. भक्त रइदास म्हणतात, ज्याचें कारण वेगळें च आहे तें च परमतत्त्व होय.

## ४६ नरहरि, चंचल है मति मेरी

१ हे देवा, माझें मन चंचल आहे. मी तुझी भक्ति कशी बरें करूं ?

२ तूं मला पाहतोस आणि मी तुला पाहतों असें झालें तर आपली परस्पराशीं प्रीति जडेल. परतु तूं मला पाहतोस, तुला मात्र मी पाहत नाहीं. त्यामुळें माझें मन हतबुद्ध झालें आहे.

३ हे देवा, सर्व घटांमध्यें तूं निरंतर निवास करतोस, असें असून तुझें दर्शन घ्यायला मी शिकलों नाहीं. गुण सर्व तुझे आहेत. अवगुण सर्व माझे आहेत. मी कृतघ्न आहें. तूं मजवर केलेल्या उपकारांचे हि मला स्मरण नाहीं.

४ मी आणि तूं, तुझें आणि माझें ही सर्व अविद्या आहे. हिच्यांतून आपली सुटका कशी बरें करून घेऊं ? भक्त रइदास म्हणतात, हे करुणाकर कृष्णा, हे जगदाधारा, तुझा जयजयकार असो.

## ४७ राम मैं पूजा कहा चढाऊं

१ हे रामा, मी तुझी पूजा कशी काय करूं? फूल फल इत्यादि पाहिजे तसें मला मिळत च नाहीं.

२ दूध जें आहे तें वासराचें उष्टें आहे. फूल भुंग्यानें आणि पाणी माशानें बिघडविलें आहे.

३ चंदन सर्पानें वेढलें आहे. जणूं विष आणि अमृत दोन्ही एकत्र आलीं आहेत.

४ म्हणून मी आपली मनोमन च पूजा करतों. धूपादि पूजेचीं सर्व द्रव्यें मानसिक च कल्पितों. आणि हे रामा, तुझ्या सहज-स्वरूपाची मनोमन च मी सेवा करतों.

५ भक्त रइदास म्हणतात, हे रामा, तुझी दुसरी पूजा-अर्चा मला कळत नाहीं. माझी कोण बरें गति होईल ?

## ४८ अँखियाँ हरि-दरसनकी प्यासी

१ एक गोपी म्हणते : माझे डोळे हरिदर्शनासाठीं तहानेले झाले आहेत.

२ कमलनयन कृष्णाला मी पाहूं इच्छितें. रात्रंदिवस मला सारें उदास वाटतें आहे.

३ आधीं प्रेम दाखवून मला ते तृणाप्रमाणें टाकून निघून गेले. माझ्या गळ्यास ते फांस लावून गेले.

४ कोणाच्या मनांत काय जळत आहे हें दुसऱ्या कोणाला कळत नसतें. त्यामुळें ते मनांत हंसत असतात.

५ सूरदास म्हणतात, हे प्रभो, तुझें दर्शन जर मला झालें नाहीं, तर मी काशींत आपला हा देह करवतून घेईन.

## ४९ अबको टेक हमारी

१ हे गिरिधारी कृष्णा, हा एवढा पण तूं चालव. आमची लाज राख.

२ भारतीय युद्धांत तूं अर्जुनाची लाज राखली आहेस. अर्जुनाचा सारथि होऊन तूं त्याचा रथ हाकलास. सुदर्शन-चक्राआड सूर्याला झांकून तूं आपल्या भक्ताचा पण भंगूं दिला नाहींस.

३ तूं द्रौपदीची लाज राखलीस. तिला उघडें पडूं दिलें नाहींस. द्रौपदीचें वस्त्र खेंचतां खेंचतां दुःशासनाचे दोन्ही हात थकून गेले. त्याची फटफट फजिती झाली. अशाप्रकारें तूं हे देवा, द्रौपदीला वस्त्र पुरवून तिची लाज राखलीस.

४ भक्त सूरदास म्हणतात, त्याच प्रमाणें हे देवा, माझी लाज राख. आतां माझा दुसरा कोण बरें रक्षक आहे? हे भक्त-शिरोमणे, हे वृषभानुपुत्री राधे, तुला देखील मी शरण आलों आहें. माझी लाज राख.

## ५० चरण-कमल बन्दौं हरिराइ

१ हे हरिराया, तुझ्या चरणकमलांना मी वंदन करतों. त्या चरण-कमलांच्या कृपेनें

पांगळा हि डोंगर पार करतो आणि आंधळा हि सर्व कांहीं पाहूं शकतो.

२ बहिरा ऐकूं लागतो आणि मुका बोलूं लागतो. त्याच प्रमाणें एखादा रंक मनुष्य हि राजछत्रानें मिरवतो.

सूरदास म्हणतात, हे दयाळु प्रभो, त्या तुझ्या चरणांना मी वारंवार वंदन करतों.

## ५१ छाँडि मन, हरिबिमुखनको संग

१ हे मना हरिविमुख जनांची, अभक्तांची, संगति सोडून दे. त्यांच्या संगतीनें आपल्या ठाईं कुबुद्धि उत्पन्न होते, आणि भजनांत विक्षेप होतो.

२ सापाला दूध पाजण्यांत काय लाभ ? तो आपलें विष सोडायचा नाहींच. कावळ्यापुढें कापूर टाकण्यांत आणि कुत्र्याला गंगेचें स्नान घालण्यांत काय लाभ? (कावळा सडकें मांस खाल्ल्याशिवाय आणि कुत्रा हाडूक चघळल्याशिवाय थोडा च रहावयाचा आहे ?)

३ गाढवाला सुगंधी उटणीं लावण्यांत आणि माकडाच्या अंगावर आभूषणें घालण्यांत काय लाभ? (गाढव धुळींत लोळल्याशिवाय आणि माकड आभूषणें फेंकून देऊन माकड-चेष्टा केल्याशिवाय थोडें च रहावयाचें आहे ?)हत्तीला नदींत स्नान घालण्यांत काय लाभ? तो फिरून धूळ अंगावर घेणार च.

४ दगडावर सोडलेला बाण त्याला छेदूं शकत नाहीं. दगडावर बाण सोडण्यानें भाता मात्र रिकामा व्हायचा ! सूरदास म्हणतात, दुष्ट जन, खलजन हे काळ्या कांबळीप्रमाणें होत. त्यांच्यावर दुसरा कोणताच रंग चढत नाहीं. (म्हणून बाबा रे, त्यांच्या नादीं तूं लागूं नको, त्यांना उपदेश करण्याच्या भरीस तूं पडूं नको. तूं आपलें हरिभजन कर.)

## ५२ अब मैं नाच्यो बहुत गोपाल

१ हे गोपाळा, बस झाला माझा नाच आतां. काम-क्रोधांची विजार घातली विषयांची माला गळ्यांत ल्यालों.

२ महामोहाचीं. निंदेचा मधुर ध्वनि करणारीं, नूपुरें मीं पायांत घातलीं. भ्रमानें भ्रांत झालेलें माझें मन पखवाज बनलें. आणि मी दुष्ट संगतीची चाल चाललों.

३ ह्या घटांत खळबळ करणाऱ्या तृष्णेनें नानाप्रकारें ताल धरला. मायेचा मीं फेटा बांधला आणि लोभाचा कपाळीं टिळा लावला.

४ अशा प्रकारें नटून हजारों प्रकारचा नाच मी नाचलों. त्यांत मी इतका रंगून गेलों कीं मला जल, स्थल, काल ह्यांतून कशाची च शुद्ध राहिली नाहीं. सूरदास म्हणतात, हे नंदनंदना माझी ही सर्व अविद्या आतां दूर कर. ( हा नाच आतां पुरें झाला. )

## ५३ टेर सुनो ब्रजराज-दुलारे

१ ब्रजराज नंदाच्या हे लाडक्या, माझी हांक ऐक. दीन, मलिन, आणि सर्व शुभ गुणांनीं हीन असा हा मी तुझ्या दाराशीं येऊन पडलों आहें.

२ काम, क्रोध, लोभ, आणि कपट व मद हे च माझे प्राणप्रिय आहेत. ह्यांच्या संगतींत, विषयांत मी भटकत राहिलों आणि सूरदास म्हणतात, तुझ्या चरणांचा मला विसर पडला.

## ५४ तुम मेरी राखो लाज हरि

१ हे देवा, आतां माझी लाज तूं च राख. तूं अंतर्यामी आहेस. सर्व कांहीं तुला ठाऊक आहे. मीं कुठला हि पुरुषार्थ केला नाहीं!

२ पळभर, घटकाभर, नव्हे क्षणभर देखील, अवगुण मला सोडवत नाहींत. सर्व दोषांचें गांठोडें बांधून तें मीं आपल्या डोक्यावर घेतलें आहे.

३ स्त्री, मुलें-बाळें आणि धन-संपत्ति ह्यांनीं मला पूर्णपणें मोहून टाकलें आहे. त्यामुळें माझी शुद्ध बुद्ध नाहींशी झाली आहे. सूरदास म्हणतात, मज पतिताचा तात्रडतोब उद्धार कर. आतां माझी नाव भरून चुकली आहे, अगदीं बुडायला आली आहे.

## ५५ दीनन दुख-हरन देव सन्तन सुख-कारी

१ देव हा दीनांचें दुःख दूर करणारा आणि साधुसतांना सुखविणारा आहे.

२ भ्रष्ट अजामिल, मृतमांस-भक्षक गृध्र जटायु आणि निरपराध जीवांची पारध करणारा व्याध ह्यांच्यापैकीं कोण मोठा साधु लागन राहिला आहे ? पण ह्यांचा सुद्धां देवानें उद्धार केला आहे. इतकेंच नव्हे, तर पोपटाला शिकविण्याच्या निमित्तानें हरिनाम घेणाऱ्या वेश्येसारख्या पातकिनीला हि देवानें उद्धरिलें आहे; असा तो दीन-दयाळु आहे.

३ त्यानें ध्रुवाला राज्य दिलें, प्रह्लादाला अनेक संकटांतून वांचविलें आणि आपली अनन्य-भक्त जी सीता, तिच्यासाठीं समुद्रावर सेतु बांधून लंकेची राखरांगोळी केली. असा तो भक्त-कैवारी आहे.

४ सुदामाच्या मूठभर पोह्यानें तो संतुष्ट झाला. द्रोपदीच्या भाजीच्या दोन पानांनीं तृप्त झाला. शबरीचीं बोरें त्यानें उष्टीं मानिलीं नाहींत. आंबट तुरट गोड कशीं हि बोरें आवडीनें भक्षिलीं. असा तो भक्तीचा भुकेला आहे.

५ गजेन्द्राचा नक्रानें जेव्हां पाय धरला आणि तो गजेन्द्र 'देवा धांव, तुला मी शरण आलों आहें.' असें म्हणाला, तेव्हां तो त्याच्या सुटकेस धांवून गेला आणि त्यानें नक्रापासून त्याची सुटका केली. त्याचप्रमाणें दुःशासनानें द्रौपदीचें वस्त्र खेंचलें आणि ती सभेंत 'कृष्णा कृष्णा' म्हणून धांवा करिती झाली.

६ तेव्हां तत्काळ तो वस्त्र होऊन आला आणि तिची लाज राखली. असा तो देव दीनांचें दुःख दूर करणारा आणि सज्जनांना सुखविणारा आहे. सूरदास म्हणतात, हे देवा, तुझ्या दारीं हा आंधळा भिकारी उभा आहे· मला तुझ्या दयेची भीक घाल.

## ५६ नाथ जू अबकैं मोहिं उबारो

१ हे प्रभो ! आतां तरी माझा उद्धार करावा. पतितांत मी प्रसिद्ध, अग्रगण्य, पतित आहें. आणि तुझें नांव पावनांत पावन आहे.

२ मोठमोठे पातकी माझ्या पासंगाला हि पुरायचे नाहींत. बिचाऱ्या अजामिळाची काय कथा ? माझें नांव च ऐकून नरक पळ काढतो. आणि यम देखील आपलें दार तालाबंद करून घेतो.

३ हे श्रीपते ! किरकोळ पतितांचा आजवर तूं उद्धार केलास परंतु आतां ती तुझी पतित-पावनतेची बढाई टाकून दे. सूरदास म्हणतात, तुझी पावनतेची ख्याति मी तेव्हांच खरी समजेन, कीं जेव्हां माझा उद्धार होईल.

## ५७ प्रभु मेरे अवगुण चित न धरो

१ माझे अवगुण चित्तांत आणूं नको. कारण, हे प्रभो, तुझें नांव सम-दर्शी असें आहे. ती आपली प्रतिज्ञा आतां राख.

२ एक स्वच्छ नदी असते; आणि एक गढूळ नाला असतो. पण तीं दोघें हि गंगेस मिळालीं कीं त्यांना देव-नदी असें च नांव मिळतें.

३ एक लोखंडाचा तुकडा देव-मूर्ति म्हणून पूजेंत असतो आणि एक असतो खाटकाच्या घरीं सुरी म्हणून; परंतु हा भेद परिस जाणत नाहीं. तो तर दोहोंना हि खरेंखुरें सोनें च बनवतो.

४ एकाला जीव, एकाला ब्रह्म, एकाला सूरदास आणि एकाला कृष्णनाथ म्हटलें जातें; असा हा भेदाचा झगडा आहे. ह्या वेळेस, हे प्रभो ! माझा उद्धार कर, नाहींतर तुझी प्रतिज्ञा मोडते आहे पहा !

## ५८ बडी है रामनामकी ओट

१ रामनामाचा आश्रय महान् आहे. रामरायाला शरण गेलें असतां तो काढून लावत नाहीं. तो त्याच्याभोंवतीं आपल्या कृपेचा कोट करतो.

२ हरीच्या समोर, त्याच्या दरबारांत, कोण उंच आणि कोण नीच ? सूरदास म्हणतात, परिसाचा स्पर्श झाला कीं लोहाचें हीनपण नाहींसें च होतें.

## ५९ मोसम कौन कुटिल खल कामी

१ माझ्या सारखा कपटी, कृतघ्न आणि विषयलंपट दुसरा कोण आहे ? ज्या प्रभूनें हा देह मला दिला त्याला विसरून गेलों, असा निमकहराम आहें मी !

२ गांव-डुकराप्रमाणें सदा-सर्वदा पोट भरीत विषय-सेवनाच्या मागें लागलों आहें. हरिभक्तांना सोडून हरिविमुख विषयी लोकांचें मी रात्रंदिवस दास्य करीत आहें.

३ माझ्याहून मोठा दुसरा पापी कोण आहे ? सर्व पाप्यांमध्यें मी अग्रगण्य आहें. हे प्रभो, हे श्रीपते, तुझ्याशिवाय ह्या पतित सूरदासाला दुसरा आश्रय कोठें आहे ?

## ६० रे मन, कृष्ण-नाम कहि लीजै

१ हे मना, कृष्ण-नाम घे. गुरूच्या आज्ञेवर अढळ विश्वास ठेव. साधूंचा समागम कर.

२ प्रेमपूर्वक भागवताचें पठन कर, मनन कर. दुसरी कथा करून काय करायचें ? कृष्ण-नामाशिवाय जन्म फुकट आहे. व्यर्थ कशासाठीं जगायचें ?

३ कृष्ण-नामाच्या रसाचा पाट वाहतो आहे. तहानेलें होऊन पी सूरदास म्हणतात, हरीला शरण जा आणि आपल्या जन्माचें सार्थक करा.

## ६१ लाज मेरी राखौ स्याम हरि

१ 'हे हरे, हे कृष्णा, माझी लाज राख.' हाय हाय असा आक्रांत करून द्रौपदीनें धांवा केला. 'आतां क्षणाचा हि विलंब करूं नको. दुःशासनानें कोपाविष्ट होऊन मला केसांनीं धरलें आहे. दुष्टांच्या सभेंत पिशाच दुर्योधन मला नग्न करूं पहात आहे !'

२ 'भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादि वृद्ध मुकाट्याने पहात आहेत. त्यांच्यानें कांहीं होत नाहीं. अर्जुन, भीम हे महाबलशाली योद्धे, पण त्यांनीं हि मूग गिळले आहेत.'

३ आतां मला कांहीं च आधार उरला नाहीं; त्यामुळें मी आतां नाश पावत आहें. हे हरे, तूं च माझी माता, तूं च माझा पिता, तूं च माझा भ्राता आहेस. तुझा च एक मला आधार आहे.'

४ जेव्हां द्रौपदीचा संकटांतून उद्धार झाला, तेव्हां तिन्ही लोकांत जयजयकार झाला. सूरदास म्हणतात, सिंहाचा आश्रय केल्यानंतर मग कोल्ह्यांची भीति कसली?

## ६२ सबसों उँची प्रेम-सगाई

१ प्रेमाचा संबंध सर्वांहून श्रेष्ठ आहे. दुर्योधनाची मेजवानी सोडली आणि विदुराच्या घरीं देव भाजी-भाकर जेवला !

२ शबरीचीं उष्टीं बोरें 'फार उत्तम, किती मधुर' अशा प्रकारें वाखाणणी करून खाल्लीं. प्रेमास्तव धर्मराजाच्या घरीं सेवा केली. हरि स्वतः न्हावी बनले.

३ धर्मराजानें राजसूय यज्ञ केला त्यांत उष्टीं काढलीं. प्रेमास्तव अर्जुनाचें सारथ्य केलें. आपलें थोरपण विसरून गेला.

४ वृंदावनांत इतकी कांही प्रीति जमली कीं गोपींच्या तालावर तो नाच-नाचला. सूरदास म्हणतात, मी अगदीं प्रेमशून्य आहें. माझी ती योग्यता नाहीं. कोठवर त्या हरीच्या प्रेमाधीनतेचें वर्णन करूं ?

## ६३ सुने री मैंने निर्बलके बल राम

१ मीं असें ऐकिलें आहे बाई, कीं राम च निर्बलांचें बल होय. संतांची जुनी साक्ष देतें. संकटांत देवानें त्यांना पार पाडलें.

२ जोंपर्यंत गजेंद्रानें आपल्या बळाचा उपयोग केला, तोंपर्यंत उद्देश थोडा हि सिद्धीस गेला नाहीं. परंतु जेव्हां आपल्या सर्व बलांचा भरोसा सोडून हे देवा! म्हणून गजेंद्रानें धांवा केला, तेव्हां अर्ध्या नामासरशी हरि धांवून आला.

३ ज्या दिवशीं द्रौपदी अगदीं असहाय झाली, तिला कोणत्या हि बलाचा आधार उरला नाहीं, तेव्हां देव द्वारकेस आपल्या घरीं गहिंवरला. देवानें वस्त्राचें रूप धारण केलें. वस्त्र खेंचतां खेंचतां दुःशाशनाचे बाहु थकून गेले.

४ आप्तांचें बल, तपश्चर्येचें बल, बाहूंचें बल आणि चौथें बल धनाचें. सूरदास म्हणतात, हरीच्या कृपेनें जो सर्व बळें हरून बसला, त्याला बळ एक हरिनाम च. आणि एक त्याचें च बळ हरि-नाम.

## ६४ हम भक्तनके, भक्त हमारे

१ मी भक्तांचा आहें, भक्त माझे आहेत. अर्जुना, हें माझें ब्रिरुद च आहे. हें व्रत टाळतां टळत नाहीं.

२ भक्तांच्या कार्यासाठीं मनांत खंत बाळगून मी पाईच धांवलों. जेथें-जेथें भक्तांच्यावर संकट कोसळतें, तेथें-तेथें भक्तांना मी साहाय्य करतों.

३ जो माझ्या भक्तांशीं वैर करतो तो माझा च वैरी होय. तूं च पहा, भक्त-कार्यासाठी मी तुझा रथ हांकत आहें.

४ आपले भक्त जिकले कीं मी आपली जीत आणि ते हरले कीं हार मानतों. देव म्हणतो—सूरदास सांगतात— जो माझ्या भक्तांच्या वाटेस जातो त्यावर मी आपलें सुदर्शन चक्र घालतों.

## ६५ जोगी मत जा, मत जा, मत जा

१ हे जोग्या, नको रे जाऊं, नको रे जाऊं, नको रे जाऊं. मी तुझ्या पायां पडतें. मला सोडून जाऊं नको.

२ प्रेम-भक्तीचा मार्ग च न्यारा आहे. तूं आपली वाट मला दाखवून जा.

३ अगरु आणि चंदन ह्यांची मी चिता रचतें. आपल्या हातानें च ती शिलगवून जा.

४ ती जळून तिचा राखेचा ढिगारा झाला म्हणजे आपल्या अंगाला तिची राख फांसून जा.

५ मीराबाई म्हणते, हे गिरिधरा, सजणा, आपल्या ज्योतींत माझी ज्योत मिळवून घे आणि मग जा.

## ६६ नहिं ऐसो जन्म बारंबार

१ हा असा जन्म वारंवार मिळत नसतो. कोण जाणे, कोणत्या पुण्याई-मुळें हा नरदेह मिळाला आहे !

२ हा देह पळापळानें वाढतो आणि क्षणाक्षणानें घटतो. हा नाहींसा व्हायला वेळ लागत नाहीं. वृक्षाचीं पानें गळालीं कीं तीं जशीं परत फांदीला जोडतां येत नाहींत, त्याप्रमाणें गेला क्षण पुन्हां येत नाहीं.

३ संसार-सिंधु अतिशय प्रबल आहे. त्याचा प्रवाह अखंड असून तो अथांग आहे. हे माणसा, नामस्मरणाची नाव करून पैल तीरास लाग.

४ साधु-संत, महंत आणि ज्ञानी पुढें जात आहेत आणि मागें राहिलेल्यांस हांक देत आहेत. दासी मीराबाई म्हणते, चार दिवसांचें आयुष्य आहे, तें सरण्यापूर्वी आपलें स्वहित साधून घ्या.

## ६७ पग घुंगरु बाँध मीरा नाची रे

१ पायांत घुंगरें बांधून मीरा नाचली, असें लोक म्हणतात. पण खरें म्हणजे मी तर आपल्या देवाची स्वभावत: च दासी बनलें आहें.

२ लोक म्हणतात, मीरा वेडी झाली आहे; आणि नात्या-गोत्याचे लोक म्हणतात, ही घर-बुडवी आहे.

३ विषाचा प्याला राणाजीनें पाठविला, पण तो मी हंसत हंसत पीत आहें.

४ दासी मीरा म्हणते, अविनाशी परमात्मा मला अशा प्रकारें सहज च मिळतो आहे.

## ६८ पायो जी म्हें तो राम-रतन धन पायो

१ अहो, मला तर राम-रत्न, रामरूप महाधन मिळालें आहे. सद्-गुरूनें मला अमोलिक वस्तु दिली आहे; त्यांनीं माझा अंगीकार केला आहे.

२ जन्मोजन्मींचें माझें मुद्दल मला मिळालें आहे आणि म्हणून जगांतील सर्व कांही मीं टाकून दिलें आहे.

३ हें धन खर्च होत नाहीं, हें धन कोणी चोर हिरावून घेत नाही. उलट दिवसेंदिवस हें सवाई वाढत जातें.

४ सत्य ही नाव आहे आणि सद्-गुरु तिचा नावाडी आहे. ह्यांच्या आश्रयानें मीं भवसागर पार केला आहे.

५ दासी मीरा म्हणते, म्हणून मीं कृतज्ञतेनें हरीचें यश वारंवार हर्ष-निर्भर होऊन गाइलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम २२
अनुक्रम ...२६१६० ... दि: ...
क्रमांक ...१३०५ ... नों: दि: ...

## ६९ फागुन के दिन चार

१ हे माझ्या मना, शिमग्याचे चार दिवस आहेत, होळी खेळून घे.

२ झांजा पखवाज ह्यांच्या तालावांचून च अनाहताचा झंकार चालला आहे. त्याचप्रमाणें सप्त स्वरावांचून छत्तीस हि राग गाइले जात आहेत. आणि रोमरोम निनादून गेला आहे.

३ शील आणि संतोष ह्यांचें केशर घोळून रंग बनविला आहे आणि तो उडवायला भक्ति-प्रेमाची पिचकारी आहे. गुलाल उधळत आहे. आकाश लाल झालें आहे. आणि सर्वत्र रंगाचा सडा होत आहे.

४ लोकलज्जा सारी सोडून देऊन सर्व आवरणें दूर केलीं आहेत. मीराबाई म्हणते, माझा स्वामी गिरिधर रसिक आहे. त्याच्या चरणकमलीं मीं आपणांस वाहिलें आहे.

## ७० मन रे! परस हरिके चरन

१ हे माझ्या मना, हरीच्या चरणांना स्पर्श कर. ते सुंदर, शीतल, कमलासारखे कोमल, त्रिविध ताप हरण करणारे आहेत.

२ ज्या चरणांच्या स्पर्शानें प्रह्लाद इंद्र-पदवीस प्राप्त झाला;

३ ज्या चरणांनीं शरण आलेल्या ध्रुवाला अढळ केलें;

४ ज्या चरणांना ब्रह्मांड लागलें आणि ज्याच्या नखाग्रामुळें फुटून त्यांतून गंगा प्रवाहित झाली;

५ ज्या चरणांनीं प्रभु रामचंद्रानें स्पर्श केला असतां गौतम-पत्नी अहल्या तरून गेली;

६ ज्या चरणांनीं गोपवेषांत कालिया नाग वठणीवर आणला;

७ ज्या चरणांनीं इंद्राचा गर्व हरण करण्यासाठीं गोवर्धन धारण केला; ( त्या श्रीहरीच्या चरणकमलांना स्पर्श कर. )

८ दासी मीरा म्हणते, हे प्रभो! तूं तारक असून तुझी तारण्याची रीत अगम्य आहे.

## ७१ मनुआ राम-नाम-रस पीजै

१ बा मना, रामनामाचा रस पी. कुसंगति सोड. सज्जनांच्या संगतींत बसत जा आणि नित्य हरिकथा ऐकत जा.

२ काम, क्रोध, लोभ, मोह, मद इत्यादि विकारांना चित्तांतून धुऊन टाक. आणि, मीराबाई म्हणतें, हरीच्या रंगांत रंगून जा, भिजून जा.

## ७२ म्हांने चाकर राखो जी

१ हे गिरिधारी कृष्णजी, मला चाकरीस ठेवा.

२ मी चाकर राहीन, बाग लावीन आणि नित्य उठून आपलें दर्शन घेईन. आणि वृंदावनाच्या कुंजाकुंजांत आणि गल्लीगल्लींत आपले गुण गात हिंडेन.

३ वेतन म्हणून मला आपलें दर्शन मिळेल. आपलें स्मरण माझा भत्ता होईल आणि भावभक्तीची जहागीर मला बक्षीस मिळेल. तिन्ही गोष्टी नामी आहेत.

४ मुरलीधर मोहन वृंदावनांत धेनू चारतो. त्याच्या डोक्यावर मोरपिसांचा मुगुट आहे. त्याच्या गळ्यांत वनमाळा आहे आणि कमरेला तो पीतांबर नेसला आहे.

५ हिरवे हिरवे मी सदा बाग लावीन. मधें मधें त्यांत वाफे ठेवीन. आणि तो आपल्या गाईंसह तेथें आला म्हणजे कुसुम्बी रंगाची साडी नेसून त्याचें दर्शन घेईन.

६ या ठिकाणीं योग-साधना करावयाला योगी, तप करावयाला तपस्वी आणि हरिभजनासाठीं साधु आले आहेत. सगळे वृंदावनवासी आहेत.

७ मीराबाई म्हणते, प्रभु अत्यंत गूढ आहे. त्याच्या दर्शनासाठीं निरंतर धैर्य पाहिजे. प्रभूनें मला प्रेमभक्तीच्या नदीकांठीं अर्धरात्रीं दर्शन दिलें.

## ७३ मेरे तो गिरिधर गोपाल दूसरो न कोई

१ माझा तर एक गिरिधर गोपाळ च स्वामी आहे. दुसरा कोणी नाहीं.

२ ज्याच्या डोक्यावर मोर-मुगुट आहे तो कृष्ण माझा पति होय. आई बाप भाऊ बंधु कोणी च माझे नाहींत.

३ मीं कुळाची लाज सोडून दिली आहे. कोण काय करतील ? संतांच्या पाशीं नित्य बसून लोक-लज्जा मीं घालविली आहे.

४ नित्य अश्रूंचे जल शिपून मीं प्रेमाची वेल लावली आहे. आतां तर ती वेल वाढून चुकली आहे. व्हायचें असेल तें होवो.

५ दुधाची माथण मोठ्या प्रेमानें मीं घुसळली नि लोणी काढून घेतलें. आतां उरलेलें ताक कोणी हि पिवो.

६ भक्तांना पाहून मला आनंद झाला. जगताला पाहून मला रडूं आलें. दासी मीरा म्हणते, हे गिरिधर गोपाल, आतां माझा उद्धार कर.

## ७४ मैं तो गिरिधरके रँग राती

१ मी तर हरीच्या रंगांत रंगलें आहें.

२ एखादीचा प्रियकर पति परदेशीं राहतो; आणि त्याला त्याची प्रिया वारंवार पत्र लिहून पाठविते. परंतु माझा प्रियकर तर माझ्या हृदयांत च वसत आहे. त्यामुळें माझें कोठें च येणें नाहीं नि जाणें नाहीं.

३ दुसऱ्या मैत्रिणी मद्य पिऊन पिऊन मत्त झाल्यात. परंतु मी तर न पितां च धुंद झालें आहें. प्रेमाच्या गुत्त्यावरील दारू मी प्यालें आहें. त्यामुळें मी रात्रंदिवस बेशुद्धाप्रमाणें फिरत आहें.

४ मी सासरीं जात नाहीं आणि माहेरीं हि नाहीं. माझी तर हरीशीं गांठ पडली आहे. मीराबाई म्हणते, माझा प्रभु तो गिरिधर रसिक आहे. त्या हरीच्या चरणीं माझें चित्त जडलें आहे.

## ७५ मैं तो दरद-दिवानी

१ मी तर दुःखानें पिशी झालें आहें माझी व्यथा कोणी जाणत नाहीं.

२ घायाळाची गति जो कोणी घायाळ झाला असेल त्याला च ठाऊक ! जोहार करणाराची गति ज्यानें जोहार केला असेल त्याला च माहीत !

३ सुळावर आमची सेज आहे. तिथें शयन कशाप्रकारें होणार ? प्रियाची सेज आकाश मंडपावर आहे. त्याशीं भेट कशी होणार?

४ दु:खानें वेडी, मी वणवण हिंडतें आहें. कोणी वैद्य मला मिळाला नाहीं. मीराबाई म्हणते, माझी व्यथा तेव्हां च मिटेल जेव्हां सांवळा मला वैद्य मिळेल.

## ७६ मोहि लागी लगन गुरु-चरननकी

१ मला गुरुचरणांचा छंद लागला आहे.

२ चरणांवांचून दुसरें कांहीं माझ्या मनास येत नाहीं. हें सर्व जग स्वप्नांतील आभास झालें आहे.

३ संसार-सागर सर्व आटून गेला आहे. मला तो तरून जाण्याची चिंता नाहीं.

४ मीराबाई म्हणते, रसिक गिरिधर हा माझा स्वामी आहे. मी त्या च गुरूच्या आसऱ्याची आस धरून आहें.

## ७७ म्हें गोविंद-गुण गाना

१ मी तर आपले हरि-गुण गाणार !

२ राजा रागावला तर तो आपली नगरी राखील (मला बाहेर हांकलून देईल), पण हरि रागावला तर कुठें जावें ?

३ राणाजीनें विषाचा प्याला पाठविला. मी तो अमृत म्हणून पिऊन गेलें.

४ डब्यांत राणाजीनें काळा नाग पाठविला. मी तो शालग्राम म्हणून समजलें.

५ मीराबाई म्हणते, मी तर आतां प्रेम-पिशी झालें आहें. सांवळ्या वर मला भेटला आहे.

## ७८ हरि ! तुम हरो जनकी भीर

१ हे हरि, या भक्ताचें संकट निवारण कर !

२ द्रौपदीची तूं लाज राखलीस. लगेंच वस्त्र पुरवलेंस;

३ बाळ प्रह्लादासाठीं तूं नरसिंहाचें रूप धारण केलेंस;

४ आणि हिरण्यकशिपूला ठार केलेंस. वेळ नाहीं लावला.

५ बुडत्या गजराजाला वांचविलेंस. नक्राला मारून पाण्यांतून वर काढलेंस.

६ मीराबाई म्हणते, हे गिरिधर कृष्णजी, तुझ्या चरणीं हें माझें मस्तक मीं वाहिलें आहे.

## ७९ अबलौं नसानी, अब न नसैहौं

१ आतांपर्यंत मीं आपलें आयुष्य वायां घालवलें. यापुढें वायां जाऊं देणार नाहीं. रामकृपेनें संसार-रात्र संपली. आतां जागृत झाल्यावर परत आंथरूण घालणार नाहीं.

२ मला सुंदर नाम हा चिंतामणि मिळाला आहे. आतां तो हृदयरूपी हातांतून पडूं देणार नाहीं. रामाचें सांवळें रूप म्हणजे स्वच्छ सुंदर कसोटी-दगड होय. त्यावर चित्तरूप सोन्याला मी कसणार आहें.

३ पराधीन पाहून ह्या इंद्रियांनीं माझें हंसें केलें. स्वाधीन होऊन मी आतां आपलें हंसें करून घेणार नाहीं. तुलसीदास म्हणतात, प्रतिज्ञापूर्वक मी आपल्या मनोरूप मधुपाला रघुपतीच्या चरण-कमलीं बसवीन च.

## ८० अस कछु समुझि परत रघुराया

१ हे रघुराया! मला असें कांहीं समजून येत आहे : हे दयालो, हे दासहितकारी, तुझ्या कृपेशिवाय मोह आणि माया सुटत च नाहीं.

२ शब्दज्ञानांत अत्यंत प्रवीण असा कोणी पंडित, संसार-पार नाहीं पावूं शकत. रात्रीं घरांत दिव्याची गोष्ट केल्यानें अंधार दूर होत नाहीं.

३ कोणी एखादा रात्रंदिवस षड्-रस-युक्त नाना प्रकारचें भोजन वाखाणीत बसो. परंतु तसें कांहीं एक न बोलतां जो प्रत्यक्ष खातो त्याला च खरें समाधानाचें सुख मिळतें.

४ जोंपर्यंत हृदयांत ज्ञानाचा प्रकाश नाहीं आणि जोंपर्यंत मनांत विषयाचा अभिलाष आहे तोंपर्यंत, तुलसीदास म्हणतात, जगांत नाना योनींत भ्रमण करीत स्वप्नांत देखील सुख म्हणून मिळावयाचें नाहीं.

## ८१ आपनो कबहुँ करि जानिहौं

१ हे रामा, मला आपला म्हणून केव्हां बरें जाणशील? हे दीनदयालो, हे राजशिरोमणे, आपल्या ब्रीदाची लाज मनांत केव्हां आणणार ?

२ तूं शीलाचा सागर, सुंदर, सर्वोत्तम, समर्थ, सद्-गुणांचें आगर आहेस. हे प्रभो, तूं शरण आलेल्यास पाळलें आहे, पाळत आहेस, पाळणार आहेस. प्रणत-जनांचें प्रेम तूं ओळखतोस.

३ वेद-पुराणें सांगतात, सर्व जग जाणतें कीं तूं दीन-दयाळु आणि गरिबांचा पोशिंदा आहेस. परंतु म्हणायला होतें, जणूं माझ्या च वेळीं तूं आपलें ब्रीद विसरून गेलास !

४ आर्त, दीन, ह्यांच्यासाठीं तूं लोक-लाज धरतोस. तुलसीदासाचा शेंवट भला च होणार आहे. तूं शरण आलेल्यांचें भय दूर करणार च.

## ८२ अैसी मूढता या मनकी

१ हें मन असें मूढ आहे; रामभक्तीची देवनदी सोडून देऊन दंवबिंदूं-साठीं लाळ घोटत आहे !

२ ज्याप्रमाणें धुराचा लोट पाहून तहानेला चातक त्याला मेघ समजून त्याकडे जातो,परंतु त्या ठिकाणीं थंडावा असत नाहीं आणि पाणी हि असत नाहीं. डोळ्यांची मात्र आग होते.

३ ज्याप्रमाणें गच्चीच्या भिंतींतील कांचेंत आपलें प्रतिबिंब पाहून मूर्ख बहिरी ससाणा त्यावर, आपल्याला लागेल हें विसरून भुकेनें व्याकुळ होऊन झडप घालतो;

४ त्याप्रमाणें, हे प्रभो ! हे कृपानिधे ! माझे चाळे आहेत. ते कुठवर सांगावे ? दासांची मनोगति तूं जाणतोस च. तुलसीदास म्हणतात, हे प्रभो, (विषयाभिलाष-रूप हें माझें) दु:सह दु:ख हरण कर. आणि (दु:खहर्ता म्हणून असलेल्या) आपल्या प्रतिज्ञेची लाज धर.

## ८३ ऐसे राम दीन-हितकारी

१ प्रभु राम असा दीन-हितकारी आहे. तो अत्यंत कोमल हृदयाचा, करुणेचा सांठा च असा अकारण म्हणजे स्वभावत: च हितकर्ता आहे.

२ पहा ! ऋषि-पत्नी अहल्या ही आपल्या दुराचारामुळें ज्ञानसाधन-हीन आणि दीन अशी शिळा होऊन पडली होती. तिला आपल्या चरण-स्पर्शानें पावन केलें आणि घोर शापांतून तिचा उद्धार केला.

३ गुह हा निषाद, सदा हिंसा-परायण, तामस-शरीरी, पशूंप्रमाणें जंगली. पण त्याला प्रेमास्तव हृदयाशीं कवटाळलेंस. त्याचे जात-गोत कांहीं पाहिलें नाहीं.

४ जटायु एक गिधाड. तो कोण मोठा व्रतधारी मुनि होता ? पक्ष्याच्या योनींत जन्मलेला आणि मांसाहारी असाच तो होता. परंतु त्याची उत्तरक्रिया पित्याप्रमाणें आपल्या हातानें सर्व गोष्टी विधिपूर्वक करून केली.

५ शबरी अधम जातीची आणि मूढ स्त्री. लौकिक वैदिक सर्व संस्कारांस मुकलेली. परंतु कृपानिधि रामानें तिची भक्ति जाणून तिला दर्शन दिलें आणि तिचा हि उद्धार केला.

६ ज्यांचें स्मरण केलें असतां अशुभ होतें अशीं विकारानें भरलेलीं वानरें आणि अस्वलें त्यांना हे रामा, हे स्वामी, तूं वेदप्रसिद्ध आणि पावन केलेंस. हा सर्व तुझाच महिमा आहे.

७ हे प्रभो, कुठवर सांगावें. असे दीन अगणित आहेत, कीं ज्यांचें संकट तूं निवारलें आहेस. असें असतां कलिमलानें ग्रासलेल्या या तुलसी–दासावर च कां बरें तूं कृपा करायचें विसरला आहेस?

## ८४ ऐसेहि जनम-समूह सिराने

१ असेच जन्मामागून जन्म गेले. प्राणपति रघुपतीसारखे स्वामी सोडून मी इतरांची च चरण-सेवा करीत राहिलों !

२ जे ज्ञानहीन, कुटिल, भित्रे, दुष्ट (थोडक्यांत म्हणजे) कलिमलानें बरबटलेले जीव त्यांची तोंड कोरडे पडेपर्यंत प्रशंसा केली. त्यांना हरीहून मोठें मानलें.

३ सुखासाठीं कोटि उपाय निरंतर करीत असतां पाय दमले नाहींत. पण रस्त्यांतील गढूळ पाण्याप्रमाणें ते हृदयांत कधीं च स्थिरावले नाहींत.

४ ही दीनता दूर करण्यासाठीं असंख्य उपाय मनांत आणले. परंतु तुलसीदास म्हणतात, चित्तांतील चिंता चिंतामणि ओळखल्याशिवाय मिटावयाची नाहीं च.

## ८५ ऐसो को उदार जगमाहीं

१ या जगांत असा उदार कोण आहे, जो दीनांवर सेवेवांचून च कृपा करतो ? असा रामासारखा दुसरा कोणी च नाहीं.

२ जी गति योग वैराग्य आदि नाना प्रयत्न करून मोठमोठ्या ज्ञानी मुनींना मिळाली नाहीं, ती गति फार न मानतां प्रभूनें जटायु आणि शबरी यांना दिली.

३ जी संपत्ति रावणानें आपलीं दाही शिरें अर्पण करून शिवापासून मिळविली, ती संपत्ति प्रभूनें बिभीषणाला मोठ्या संकोचानें दिली.

४ तुलसीदास म्हणतात, हे माझ्या मना, सर्वतोपरी, सर्वविध सुख तुला हवें असेल तर रामाचें भजन कर. तो कृपानिधि तुझे सर्व मनोरथ पूर्ण करील.

## ८६ कबहुँक हौं यहि रहनि रहौंगो

१ केव्हां बरें ही राहणी मी राहूं लागेन ? केव्हां बरें श्रीरघुनाथाच्या कृपाळु कृपेनें, परम कृपेनें, संतांचा स्वभाव ग्रहण करीन ?

२ जें-काय मिळेल त्यावर संतुष्ट राहीन. कोणापासून कांहीं मागणार नाहीं. कशाची अपेक्षा राखणार नाहीं. निरंतर परोपकार-रत राहीन. हा नेम काया-वाचा-मनें पाळीन.

३ अत्यंत दु:सह असें कठोर वचन कानानें ऐकून त्याच्या आगीनें जळणार नाहीं. मान सोडून देईन. मन समान आणि शीतल ठेवीन. दुसऱ्यांचे, गुण बोलेन, दोष बोलणार नाहीं.

४ आपल्या देहाची चिंता सोडून सुख-दुःख समबुद्धीनें साहीन. तुलसीदास म्हणतात, हे प्रभो, या मार्गावर राहून मी तुझी अविचल भक्ति प्राप्त करून घेईन.

## ८७ कलि नाम काम-तरु रामको

१ रामाचें नांव कलिकालांत कल्पवृक्ष होय. तें दारिद्र्य, दुष्काळ, दुःख, दोष, अति भयंकर ताप ह्यांना नाहींसें करणारें आहे.

२ रामाचें नांव घेतलें असतां प्रतिकूल दैवाचें वांकडें मन सरळ होतें. असें थोर मुनि नारद, भगवान् शंकर आणि महात्मा वाल्मीकि म्हणतात. मग तें नाम उलटें सरळ कसें हि घ्या.

३ ललित-ललाम म्हणजे सुंदरातिसुंदर जो प्रभु रामचंद्र, त्याचा ज्याला आधार आहे त्याला इहलोक आणि परलोक दोन्ही चांगले च होतात. तुलसीदास म्हणतात, या जगांत मी नामाच्या बळें कूच आणि मुक्काम म्हणजे जीवन आणि मरण वा भोग आणि मोक्ष कशाची च चिंता जाणत नाहीं.

## ८८ काहे न रसना रामहिं गावहि

१ हे रसने, कां बरें रामाचें गुण-गान करीत नाहींस ? रात्रंदिवस परनिंदा रटून रटून कां वृथा आसक्ति वाढवीत आहेस ?

२ मनुष्याचें मुख एक सुंदर आणि पवित्र मंदिर आहे. त्यांत राहून त्याला लाजवूं नकोस. चंद्राजवळ राहून तेथील अमृताचा त्याग करून मृगजळाच्या पाठीस कां धांवतेस ?

३ कलिदोषरूप चंद्रविकासी कमलांना विषयसुखवार्ता ही चांदण्याप्रमाणें होय. ती ऐकतांच मनुष्य कान तिकडे देतो. त्यांना ती आवडते. त्या कानांना हटकून हरीची मंजुळ कीर्ति वर्णून कानांचा कलंक नाहींसा कर.

४ बुद्धीचें सुवर्ण-सूत्र आणि युक्तीचे सुंदर मणि ह्यांचे नाना हार तयार कर. शरण आलेल्यांना सुखदायक आणि सूर्यवंशरूप कमलाला सूर्याप्रमाणें असलेल्या रामराजाला ते लेवव.

५ वादविवादाचा स्वाद सोडून देऊन हरिभजन कर. त्याचें स्वादिष्ट चरित्र आठव. असें तूं करशील तर तुलसीदास म्हणतात, संसार तरून जाशील आणि त्रिभुवनांत तुझी पवित्र कीर्ति पसरेल.

## ८९ कुटुंब तजि शरण राम तेरी आयो

१ बिभीषण म्हणतो, हे रामा, कुटुंब सोडून देऊन मी तुझ्या आश्रयास आलों आहें. लंकेचा किल्ला, तेथील राजवाडा आणि घर सोडून तुझें नांव ऐकतां च मी उठून धांवत आलों आहें.

२ दरबार भरवून रावण बसला होता. भर दरबारांत त्यानें मला लत्ताप्रहार केला मीं त्याला वारंवार समजावून सांगितलें; पण त्या मूर्ख आणि अंध रावणानें माझी गोष्ट ऐकिली नाहीं.

३ प्रभु रामचंद्रानें बिभीषण आल्याबरोबर त्याला लंकेचा राजा केलें. प्रभूनें हंसत हंसत त्याला आलिंगन दिलें. रामाचें दर्शन झालें तेव्हां त्याचे जन्मोजन्मींचे अपमान आणि पराभव नाहीसे झाले.

४ तो म्हणाला, हे रघुपते, हे अनाथ-बंधो! दीन जाणून मला तूं आपलेंसें केलेंस. तुलसीदास म्हणतात, रामाला शरण गेल्यामुळें त्याला भक्तिरूप अभयपद मिळालें.

## ९० कैसे देऊँ नाथहिं खोरि

१ मी देवाला दोष कसा देऊं? हे देवा ! तुझी भक्ति सोडून देऊन काम-लोलुप माझें मन भटकत आहे.

२ स्वत:ची पूजा करून घेण्याची मला आवड फार, दुसऱ्याची पूजा करण्याची मात्र थोडी! दुसऱ्यांना मी शिकवण देतों; स्वत: मात्र शिकवण मानत नाहीं; अशी माझी मूढता आहे.

३ मोठ्या प्रेमानें जीं पापें मीं केलीं तीं मनांत चोरून ठेविलीं; परंतु संगतीमुळें जीं पुण्यकर्में घडलीं तीं मात्र सर्व लोक पाहून मीं जाहीर केलीं !

४ पुण्यरूप जे थोडे बहुत धान्य-कण मी मोठ्या कष्टानें वेंचतों आणि सांठवतों ते सर्व, हे दयानिधे, हा दंभ बळजबरीनें हृदयांत शिरून हिरावून घेतो.

५ लोभ गळ्यांत आशारूपी दोरी बांधून माझ्या मनाला माकडा-प्रमाणें नाचवत आहे. परंतु मोठें वैराग्य आणून पंडिताप्रमाणें मी गोष्टी बोलतों!

६ इतक्या हि उपर लाज कोळून पिऊन मी तुझा म्हणवून घेत आहें. माझ्या या निर्लज्जतेवर प्रसन्न होऊन हे रामा, ह्या तुलसीदासाला सोडव.

## ९१ कौन जतन बिनती करिये

१ कशाप्रकारें विनंती करावी? आपलें आचरण विचारांत घेतां मन कच खातें. त्यामुळें मी जाणून बुझून भितों.

२ ज्या साधनास्तव, हे प्रभो! तुम्ही भक्तांवर कृपा करतां, तें मी हटकून टाळतों. ज्यामुळें संकट-परंपरा लागून रात्रंदिवस दुःख होतें, तो च मार्ग मी अनुसरतों.

३ काया-वाचा-मनें परहित केलें असतां मनुष्य तरतो, असें जाणत असून हि त्याच्या उलट दुसऱ्याचें सुख पाहून मी विनाकारण मनांत जळतों.

४ वेद पुराणें सर्वांचें मत असें, कीं सत्संगति दृढ धरावी; परंतु मी अभिमान, मोह, ईर्षा यांना वश होऊन त्या संतांचा आदर करीत नाहीं.

५ ज्यामुळें मनुष्य संसार-सागरांत पडतो, ती च गोष्ट मला सर्वदा प्रिय होते. प्रभो! मग सांगा बरें, कशाच्या बळावर संसार-दुःख दूर व्हावें?

६ जर कधीं काळीं आपल्या कनवाळू स्वभावामुळें तुम्हांला माझी दया आली, तर च माझा निस्तार होईल; तुलसीदास म्हणतात, असा माझा अनन्य विश्वास आहे. कां उगीच खटपटींत पडावें?

## ९२ जगमंगल गुनग्राम रामके

१ जगमंगल असा रामाचा गुणसमूह धर्मार्थकाममोक्षाचा दाता आहे.

२ तो ज्ञान-वैराग्य-योगांचा सद्गुरु असून भवरूप भयंकर रोगाचा अश्विनीकुमार होय. तो सीतारामासंबंधीं प्रेमाचें उत्पत्तिस्थान असून सर्व व्रतें, धर्म आणि नियम यांचें बीज होय.

३ तो पाप, संताप आणि शोक यांचें शमन करणारा असून इह-लोकींचा आणि परलोकींचा प्रिय पालक आहे. तो गुणसमूह विचाररूप

राजाचा सुभट आणि सचिव असून अपार लोभरूप समुद्राचा ऋषि अगस्त्य होय.

४ तो कामक्रोधादि कलिमलरूप गजसमूहाचा भक्तमनोरूप वनांतील बालकेसरी आहे. तो त्रिपुरारि महादेवाचा अत्यंत पूज्य आणि प्रिय असा अतिथि असून दारिद्र्यरूप दावानलावर यथेष्ट वर्षाव करणारा मेघ च होय.

५ तो विषयरूप सर्पाचा मंत्रसिद्ध महामणि असून प्रारब्धाची दुष्ट आणि दुर्धर रेषा नष्ट करणारा आहे. ते रामाचे गुण मोहरूप अंधकारास सूर्यकिरणाप्रमाणें असून सेवकरूप शालिधान्याचें पोषण करण्यांत मेघाप्रमाणें होत.

६ ते कल्पवृक्षाप्रमाणें वांछित वस्तु देणारे असून हरिहरासारखे सेवकांस सुलभ आणि सुखद होत. ते सत्कवीच्या मनोरूप शरदाकाशांत पक्षिगणासारखे असून रामभक्तांना जीवनधनासारखे आहेत.

७ ते सर्व सुकृताचीं फळें जे उत्तम भोग त्यांच्या सारखे असून जगाच्या हितास्तव उपाधि-रहित संतजनाप्रमाणें होत. ते सेवकांच्या मनोरूप मानस-सरोवरांतील हंसासारखे असून गंगेच्या तरंग-मालिकेसारखे पावन आहेत.

८ रामगुणग्राम हा कुपंथ, कुतर्क, दुर्वृत्तता, कलह, कपट, दंभ आणि पाखंड ह्या इंधनाला दहन करणारा प्रचंड अग्नि च आहे.

[रामचरितमानस, बालकांड, दोहा ३२ क]

## ९३ जय जय जग-जननि देवि

१ हे जगत्-जननी देवी कालिके! तुझा जयजयकार असो. देव, ऋषि-मनुष्य आणि असुर सर्व तुझी सेवा करतात. तूं मुक्ति आणि भुक्ति देतेस. तूं भय दूर करतेस .

२ तूं मंगल, आनंद, सिद्धि ह्यांची खाण आहेस. पूर्णचंद्राप्रमाणें तुझें मुख आहे. तूं त्रिविध-तापरूप अंधाराला प्रखर सूर्याच्या किरण-मालेप्रमाणें नाहींसें करणारी आहेस.

३ हे शंकर-पत्नी, तुला अनेक रूपें आणि अनेक नांवें आहेत. सर्व लोकांची तूं स्वामिनी आहेस. तूं हिमालयाची कन्यका आहेस तुझा जय असो.

४ हे देवी! तूं नम्रजनांचें पालन करतेस. मी तुला नमस्कार करतों. माझें पालन कर आणि प्रसन्न होऊन या तुलसीदासाला रामपदीं परम-प्रेमाचा अढळ नेम दे.

## ९४ जय जय सुर-नायक जन-सुखदायक प्रनत-पाल भगवंता

१ हे भगवंता, तुझा जयजयकार असो. तूं देवांचा स्वामी, भक्तांना सुखविणारा, शरण आलेल्यांचें पालन करणारा, गाय आणि ब्राह्मण यांचें हित करणारा, असुरांचा वैरी आणि लक्ष्मीचा प्रिय कांत आहेस. देव आणि पृथ्वी यांचें तूं पालन करतोस. तुझी करणी अद्‌भुत आहे. तुझें रहस्य कोणाला च कळत नाहीं. जो सहज-कृपाळु आणि दीनदयालु आहे तो च आमच्यावर कृपा करो.

२ हे भगवंता, तुझा जयजयकार असो. तूं अविनाशी, सर्व देहांमध्यें वास करणारा, सर्वव्यापक, परमानंदरूप आहेस. तूं अगम्य, अतींद्रिय आहेस. तुझें चरित्र पावन आहे. हे मुकुंदा तूं मायेच्या पलीकडे आहेस. हे सच्चिदानंदा! तुझा विजय असो. तुजविषयीं विरागी पुरुष अत्यंत अनुरागी बनतात. निर्मोह मुनिजन रात्रंदिवस तुझें ध्यान धरतात, तुझें गुणगान करतात.

३ ज्यानें दुसऱ्या कोणाच्या साहाय्यावांचून ही त्रिविध सृष्टि निर्मिली तो पापनाशन आमची चिंता करो. तुझें भजन पूजन कांहीं च आम्ही जाणत नाहीं. जो भवभयाचें भंजन करतो, मुनिमनाचें रंजन करतो आणि संकट मालिकेचें गंजन करतो म्हणजे निर्दलन करतो त्या भगवंतास आम्ही सर्व देव-समूह अभिमान सोडून काया, वाचा, मनें शरण जात आहों.

४ सरस्वती, वेद, शेष आणि सर्व ऋषि ह्यांपैकीं कोणी च ज्याला जाणूं शकले नाहींत, ज्याला दीन प्यारे आहेत असें वेद गर्जून सांगतात, तो श्रीभगवान् कृपा करो. संसार-सागराला मंदर पर्वताप्रमाणें असणारा सर्व-तोपरी सुंदर, गुणांचे मंदिर असा आणि सुखाचें आगर अशा हे भगवंता !

तुझ्या चरणकमलांना अत्यंत भयभीत झालेले हे सर्व देव, सिद्ध आणि मुनि नमस्कार करीत आहेत.

[रामचरितमानस, बालकांड, दोहा १८६]

## ९५ जय राम रमा-रमनं समनं

[शिवकृत भगवत्-स्तुति]

१ हे रमा-रमण तापत्रय-शमन रामा! आपला विजय असो. ह्या भव-दुःखभयग्रस्त दासाचें रक्षण करा. हे अयोध्येश सुरेश लक्ष्मीपति विभो ! हा दास आपणांस शरणागत असून याचें पालन करा, ही च याचना प्रभूजवळ करीत आहें.

२ रावणाच्या दशशिरांचें आणि वीस भुजांचें निकृंतन करून आपण ह्या विशाल पृथ्वीचें महद्दुःख निवारण केलें आहे. राक्षसवृंदरूप जेवढे म्हणून पतंग होते ते सर्व आपण आपल्या बाणाग्नीच्या प्रखर तेजानें भस्मसात् करून टाकले.

३ हे भूमंडल-भूषणा ! सौंदर्याग्रणे, धृत-धनुर्बाणनिषंग, सुंदरा ! महामद-मोह-ममतारूप रजनीच्या निबिडांधकाराचे आपण तेजःपुंज दिवाकर आहांत.

४ ह्या मदनरूपी किरातानें जीवरूप मृगाचें हृदय कुभोगरूप शरानें व्याप्त केलें आहे. त्याचा निःपात करून ह्या अनाथ जीवांचें रक्षण करावें. हे हरे! हे पामर जीव विषयाटवींत भ्रांत होऊन पडले आहेत.

५ नाना आधींनीं व व्याधींनीं जनतेचा जो विनाश होत आहे तो केवळ आपल्या पदकमलांचा अनादर (अनाश्रय) करण्याचें च फळ आहे. आपल्या पदपंकजाचे ठाईं जे अनुरक्त होत नाहींत ते नर ह्या अगाध संसार-सागरांत बुडूं लागतात.

६ जे आपल्या पदांबुजांवर प्रेम करीत नाहींत ते महान् पापी होत. ते सर्वदा च अत्यंत दरिद्री व दुःखी राहणार. ज्यांना आपल्या लीला-चरित्रांचा अवलंब असतो त्यांस अनंत असे आपण आणि संत निरंतर प्रिय च वाटतात.

७ ज्यांच्यांत राग, लोभ, मान आणि मद यांचा संपर्क उरत नाहीं, त्यांना वैभव आणि विपत्ति समान भासतात. ह्याच कारणास्तव मुनिजन योग-निरोधाचा भरोसा धरीत नाहींत.

८ ते तर निरंतर प्रेम करून आपल्या पदपंकजांची च शुद्धांतः-करणानें सेवा करीत राहतात. असे ते सर्व संतजन मान आणि अपमान समान मानून सर्व पृथ्वीवर खुशाल संचार करीत राहतात.

९ अशा त्या मुनींच्या मनोरूप कमलांमध्यें आपला वास भृंगवत् होत असतो, म्हणून हे महारणधीरा, हे अजेय रघुवीरा! मला हि आपलें भजन घडो. हे भवरोग-निकृंतना ! हे महामदमान-रिपो! मी आपणांस वंदन करितों. मला आपलें नामस्मरण घडो.

१० गुण, शील व कृपा यांचें आपण महान् भांडार आहांत. हे लक्ष्मी-रमणा ! मी आपणांस निरंतर प्रणाम करतों. हे जगत्पालका रघु-नंदना ! मज दीनजनाकडे अवलोकन करावें आणि माझें महत् द्वैत निःशेष नाहींसें करावें.

११ हे श्रीरंगा! मी वारंवार ह्याच वराची प्रार्थना करतों कीं आपल्या पदकमलाचे ठाईं माझी अनन्य भक्ति जडावी आणि मला निरंतर सत्संग घडावा. हें एवढें आपण संतुष्ट होऊन मला द्यावें.

[रामचरितमानस, उत्तर-कांड, दोहा १४ क]

## ९६ जाऊँ कहाँ तजि चरन तुम्हारे

१ तुझे चरण सोडून कुठें जाऊं? जगांत कोणाचें नाम पतितांना पावन करणारें आहे? कोणाला दीन अत्यंत प्यारे आहेत?

२ कोणत्या देवानें आपल्या प्रतिष्ठेखातर आणि ब्रीदाखातर मुद्दामहून अधमांचा उद्धार केला आहे? कोणात्या देवानें व्याध, पशु, पक्षी आणि जड वृक्ष, पाषाण त्याचप्रमाणें यवन ह्यांचा उद्धार केला आहे ?

३ देव, दानव, ऋषि, मुनि, नाग आणि मनुष्य हे सारे स्वतःच बिचारे मायेंत सांपडलेले आहेत. ते दुसऱ्याचा उद्धार काय बरें करणार? तुलसीदास म्हणतात, हे प्रभो! अशांच्या आश्रयास जाऊन काय लाभ ?

## ९७ जाके प्रिय न राम-बैदेही

१ ज्याला राम आणि सीता प्रिय नाहींत, तो जरी आपला परम स्नेही असला तरी त्याचा कोटि वैऱ्यांप्रमाणें त्याग करावा.

२ पहा ! प्रह्लादानें पित्याचा, बिभीषणानें भावाचा, भरतानें आईचा, बलिराजानें गुरूचा, व्रजस्त्रियांनीं पतींचा त्याग केला. आणि तीं सर्व पावन झालीं.

३ जे कोणी सखे सोयरे पूज्य मानले जातात ते सर्व रामाच्या च संबंधामुळें, रामाच्या च प्रेमामुळें होत. फार काय सांगायचें ? ज्यानें डोळे जातात असलें अंजन काय कामाचें ?

४ तुलसीदास म्हणतात, ज्याच्या योगें रामपदीं स्नेह जडतो तो च सर्वतोपरी परमहितकर्ता पूज्य आणि प्राणाहून प्यारा होय. एवढें च आमचें मत आहे.

## ९८ जागिये रघुनाथ कुँवर, पंछी बन बोले

१ कौसल्या माता बाळ रामचंद्राला उठवते आहे : बाळा रघुनाथा ! जागा हो. पहा ! रानांत पक्षी किलबिलाट करीत आहेत.

२ चांदणें फिकें झालें आहे. चक्रवाकी आपल्या प्रियाला भेटायला नदीपार गेली आहे. मंद सुगंध आणि शीतल वारा वाहत आहे. झाडांची पालवी हालत आहे.

३ बालरवि उगवला आहे. रात्रींचा अंधकार मावळला आहे. भृंगे गुंजारव करीत आहेत. कमलें फुललीं आहेत.

४ ब्रह्मादिक देव ध्यानास बसले आहेत. सुर, नर, मुनि गान करीत आहेत. उठायची वेळ झाली आहे. रामा, डोळे उघड.

५ हे ऐकून बाळ राम उठला आणि आपल्या अंगावरील बहुमोल वासे दागिने गरिबांना दान देत बसला. तुलसीदास म्हणतात, त्या भिक्षुकांच्या गर्दीतून रामाचें मुखारविंद पाहून मला अति आनंद झाला आहे.

## ९९ जानत प्रीत-रीत रघुराई

१ रघुपति प्रीतीची रीत जाणतो. राम भक्तीप्रीतीपुढें इतर नातीं बाजूस ठेवतो.

२ दशरथ राजानें देहाची पर्वा न करतां प्रेमाचें पालन केलें, आणि अशाप्रकारें अढळ कीर्ति संपादिली. परंतु अशा प्रेमळ पित्याहून हि जटायूवर अधिक प्रीति रामानें राखिली आणि त्याचें गुण-गौरव गाइलें.

३ आपला मित्र सुग्रीव प्रियावियोगी पाहून प्राणाप्रमाणें प्रिय असलेल्या सीतेस राम विसरून गेला. रणांगणामध्यें पडला बिभीषणाचा भाऊ, पण रामाला त्याबद्दल अधिक शोक झाला.

४ घरीं, गुरु वसिष्ठांच्याकडे, मित्रांच्याकडे आणि सासुरवाडीस जेथें जेथें म्हणून पाहुणचार झाला तेथें तेथें 'शबरीच्या बोरांची सर कांहीं आली नाहीं' असे रामानें उद्‌गार काढले.

५ जेव्हां वसिष्ठमुनि रामाचें चरित्र सांगत, तेव्हां राम संकोचानें मान खालीं घालीत. निषादाला मित्र म्हणण्यांत आणि माकडांना बंधु म्हणण्यांत रामाला धन्यता वाटे. तुलसीदास म्हणतात, रामाची प्रेमळ वृत्ति आणि चारित्र पाहून जर हृदयांत भक्तिभाव उठला नाहीं, तर हे जीवा ! तुला जन्म देऊन आईनें व्यर्थ च आपलें शरीराचें तारुण्य गमावलें !

## १०० जिन्ह हरिकथा सुनी नहिं काना

१ ज्या कानांनीं हरिकथा श्रवण केली नाहीं, ते वारुळाच्या छिद्राप्रमाणें होत.

२ ज्या डोळ्यांनीं संतांचीं दर्शनें घेतलीं नाहींत, ते मयूरपिच्छावरील नेत्राकृतीप्रमाणें होत. जें हरि व गुरुजन यांच्या चरणीं नम्र होत नाहीं त्या मस्तकाची कडू भोपळ्याइतकी च योग्यता आहे.

३ ज्यांनीं हरिभक्ति हृदयांत आणिली नाहीं, ते प्राणी जिवंत असून हि प्रेताप्रमाणें होत. जी जिह्वा रामगुणांचें गान करीत नाहीं, ती बेडकाच्या जिभेप्रमाणें च समजावी.

(रामचरितमानस, बालकांड, दोहा ११३)

## १०१ जो अनुराग न राम सनेही सों

१ सर्व जीवांचा परम स्नेही जो राम त्या विषयीं जर आसक्ति, जिव्हाळा, नसेल तर हा नरदेह मिळवून काय लाभ साधला ?

२ जो नरदेह धारण करून सुबुद्ध पुरुषांनीं सर्व सुखोपभोगांचा परित्याग केला आणि रामचरणाची प्रेमासक्ति जोडली, तोच देह धारण करून मूढजनांनीं, अवगुणांचा समुद्रच अशा करंट्यांनीं, अरेरे यथेच्छ पापें आचरिलीं !

३ कल्याणाचे मार्ग–ज्ञान, वैराग्य, योग, जप, तप, यज्ञ आदि, जगांत थोडे थोडके नाहींत; परंतु रामाच्या प्रेमासक्तीशिवाय ते सारे व्रत-नियम म्हणजे मृगजळाच्या समुद्रांतील तरंगांप्रमाणें केवळ निःसार होत.

४ सर्व जगाचें अवलोकन करून आणि वेद-पुराणादि सर्व शास्त्रांचें श्रवण करून, त्याचप्रमाणें तत्त्वज्ञ गुरूंच्यापासून नीट समजावून घेऊन माझा असा ठाम निश्चय झाला आहे कीं रामचरणीं प्रीति आणि प्रतीति, भक्ति आणि भाव, हीच सर्व मंगलांची, कल्याणांची खाण होय.

५ अद्याप वेळ गेलेली नाहीं; तूं जर आज हि मनोमन ओळखशील आणि अनन्य-शरण होशील, तर तुझें एका क्षणांत सारें नीट होऊं शकतें. बस, त्यासाठीं सर्व जीवांचा परमहित-कर्ता जो प्रभु राम त्याचें अत्यंत प्रेमपूर्वक नामस्मरण मात्र करीत चल. तुलसीदासाचें हें म्हणणें ऐक.

## १०२ जो पै जिय जानकीनाथ न जाने

१ आपण मनोमन बुद्धिपति प्रभु रामचंद्राला ओळखत नाहीं तर आपलें सर्व कर्मधर्म म्हणजे व्यर्थ श्रमच होत; अनुभवी असेंच सांगतात.

२ वेद, पुराणें आदि शास्त्रांत जे अनेकानेक देव, सिद्ध मुनि आणि योगी वर्णिले आहेत ते सगळे पूजा घेऊन तिच्या बदल्यांत लाभालाभ जोखून म्हणजेंच जसें कर्म तसें फळ देणारे आहेत.

३ परंतु प्रभु रामचंद्राशिवाय असा दुसरा कोण आहे, कीं चुकून हि ज्याचें नांव घेतलें असतां पातकांचे ढेरचे ढेर पार उडून जातात? कोणाच्या

e 309

बरें पोटांत अजामिळ, व्याध, गजेंद्र, जटायु यांच्या सारखे कोट्यवधि पापी सामावले आहेत? (अर्थात् असा एक प्रभु रामचंद्रच आहे.)

४ भक्ताचे मेरूसारखे भारी भारी दोष तो मनावर घेत नाहीं, पण त्याचे कणासारखे लघु लघु गुण मात्र तो मोठ्या आवडीनें ग्रहण करतो. तुलसीदास म्हणतात, हे अडाणी जीवा! अशा त्या प्रभूला सर्व आशा सोडून देऊन अजून देखील तूं भजत नाहींस?

## १०३ जो पै रहनि रामसों नाहीं

१ जर प्रभु रामचंद्राकडे जीवाची ओढ नसेल तर माणसाचें तें जिणें गाढव, कुत्रें आणि डुक्कर यांच्याप्रमाणें असून या जगांत व्यर्थ होय.

२ काम, क्रोध, मद, लोभ आणि भय त्याचप्रमाणें निद्रा, क्षुधा, तृषा आदि देह-धर्म हे सर्वच प्राण्यांना समान लागले आहेत. यांत मानवाचा कांहीं विशेष नाहीं. तो तर प्रभु रामचंद्राची प्रीति, भक्ति हाच आहे. आणि त्या भक्तीसाठीं च देव आणि सत्पुरुष नरदेहाचें गौरव गात असतात.

३ शूर, विद्वान्, आज्ञाधारक, सुलक्षण आदि म्हणून गुणगौरव करण्यांत येतो. परंतु हें सारें गुणगौरव इंद्रावणाच्या फळासारखें वरून दिसायला सुरम्य परंतु आंतून कडू-विख होय. ही कटुता हरिभजनाशिवाय जात नाहीं.

४ कीर्ति, कुलीनता, कर्तृत्व, वैभव, शील, स्वरूप हें सारें विलोभनीय आहे. परंतु तुलसीदास म्हणतात, प्रभु रामचंद्राच्या प्रीति-भक्तीवांचून तें अळणी भाजीसारखें बेचव होय.

## १०४ जो पै रामचरन-रति होती

१ जर प्रभु-रामचरणीं प्रेम भक्ति असती, तर रात्रंदिवस आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक असें त्रिविध दुःख, केवळ दैन्यच दैन्य, कां बरें सहन करावें लागलें असतें?

२ जर अखंड संतोषाचें अमृत, स्वप्नांत कां होईना, कधीं तरी मिळालें असतें, तर विषयांचें मृगजळ पाहून हें मन हरिणाप्रमाणें कां धांवत सुटलें असतें ?

३ जर श्री-पति नारायणाचा महिमा लक्षांत आणून हृदयांत भक्ति-भावाचें भरतें आलें असतें, तर दारोदार कुत्र्याप्रमाणें पोट दाखवीत कां बरें फिरलों असतों ?

४ जे भोग-लोलुप लोक आशेचे दास झाले, ते सगळ्यांचेच गुलाम होत. परंतु ज्यांनीं प्रभूच्या विश्वासावर आशा जिंकली, ते खरे हरीचे सेवक होत.

५ माझ्या ठिकाणीं भक्तिभावाचें एक हि आचरण नाहीं. त्यामुळें मी याचना करीत आहें, प्रार्थना करीत आहें, हे स्वामी! आपल्या नाथ नांवाच्या नात्यानें या दासावर, अनाथ तुलसीवर, कृपा करा.

## १०५ ताहितें आयो सरन सबेरे

१ हे प्रभो ! ज्ञान, वैराग्य, भक्ति आदि कुठलेंहि परमार्थाचें साधन माझ्याकडून घडत नाहीं, म्हणूनच सकाळ-सकाळींच तुला शरण आलों आहें.

२ काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपु रात्रंदिवस माझ्याभोंवतीं पिंगा घालीत बसले आहेत; आणि त्यांची सोबत करून माझें मन कुमार्गांत रमलें आहे. आतां तूंच तें परत वळवशील तरच वळेल.

३ वेद आणि सत्पुरुष कंठरवानें सांगत आहेत कीं हे विषय दोषास्पद असून शोकप्रदहि आहेत. आणि मी देखील हें जाणतों, तरी त्यांची भारी आवड आहेच ती हे प्रभो, तुझ्याच प्रेरणेनें होय.

४ तूं विष अमृतासारखें जीवनदायी, अग्नि हिमासारखा शीतल करूं शकतोस. तूं नावेवांचून तारूं शकतोस. तुझ्यासारखा परम समर्थ आणि परम हितकर्ता कृपावंत दुसरा कोणी शोधून हि मिळत नाहीं.

५ हें मनोमन ओळखून दुसरे सारे सोडून देऊन मीं केवळ तुझाच विश्वास धरला आहे. तुलसीदास म्हणतात, हे प्रभो ! हें विपत्तीचें जाळें तुझ्याकडूनच निवारण होणार. तेथें आमचा कांहीं पाड नाहीं.

## १०६ तू दयालु दीन हौं

१ हे प्रभो! तूं दयाळु तर मी दयनीय आहें. तूं दाता, तर मी दानपात्र भिकारी आहें. तूं पापराशि-नाशक परमपावन आहेस, तर मी प्रसिद्ध महापातकी आहें.

२ तूं अनाथांचा नाथ आहेस. आणि माझ्यासारखा अनाथ दुसरा कोण बरें आहे ? माझ्यासारखा कोणी दुःखी नाहीं आणि तुझ्यासारखा दुःख-हर्ता हि कोणी नाहीं.

३ तूं ब्रह्म, तर मी जीव आहें. तूं गुरु तर मी शिष्य आहें. आई बाप, गुरु, मित्र आदि सर्व प्रकारें तूंच माझा हितकर्ता आहेस.

४ अशीं तुझीं माझीं नातीं अनेक आहेत. आवडेल तें नातें तूं मान. परंतु, तुलसीदास म्हणतात, हे दयाळु प्रभो ! तुझ्या चरणीं मला ठाव मिळेल असें कर.

## १०७ दीनको दयालु दानि दूसरो न कोऊ

१ हे प्रभो ! दीनांचा सदय दाता दुसरा कोणी मला दिसत नाहीं. ज्याच्यापुढें आपलें दैन्य सांगावें तो च मी दीन पाहत आहें.

२ देव, मनुष्य, मुनि, असुर, नाग इत्यादि स्वामी तर पुष्कळ आहेत, परंतु तोंपर्यंत च त्यांचें स्वामित्व कीं जोंपर्यंत तुझी दृष्टि त्यांच्याकडे वळत नाहीं.

३ तिन्ही लोकांत तिन्ही काळीं हें प्रसिद्ध आहे आणि चारी वेद हि सांगत आहेत, कीं आदौ, मध्यें आणि अंतीं सर्वत्र एक तुझी च सत्ता आहे.

४ तुझ्यापाशीं याचना करणारा याचक, याचक म्हणजे भिकारी म्हटला जात नाहीं. आणि म्हणून हा दास, तुझा स्वभाव, शील, सुयश ऐकून याचना करायला आला आहे.

५ हे प्रभो ! शिला, (अहल्या) वृक्ष, (यमलार्जुन) पशु, (गजेंद्र) पक्षी, (जटायु) यांना हि तूं आपले म्हटलेंस. हे दाशरथि रामा, तूं ( सुग्रीव बिभीषण यांच्यासारखे) रंकाचे राव बनविलेस.

६ हे प्रभो ! तूं दीनांचा दाता आहेस. आणि मी तुझा एक दीन याचक आहें. हे कृपावंता ! "तुलसीदास माझा आहे", असें एक वेळ म्हण; एवढें च माझें तुझ्या पायांपाशीं मागणें आहे.

## १०८ दीन-बंधु दुसरो कहँ पावौं

१ हे प्रभो ! तुमच्याहून वेगळा दीनांचा बंधु दुसरा मला कुठें मिळेल? तुमच्यावांचून दुसऱ्याचें दुःख दुसरा कोण जाणेल? कोणापुढें मी आपला दैन्याचा पाढा वाचूं?

२ जिथें जिथें मी आपलें हें मन दौडवतों तिथें तिथें मला हें च दिसून येतें कीं कोणी समर्थ आहे तर तो दयारहित आहे. आणि कोणी दयावंत आढळला तर तो असमर्थ आहे. हें स्वतः समजून उमजून आणि शास्त्रें गुरु यांच्या मुखांतून ऐकून चूप बसतों. बोलून उगाच पोल कशास खोला?

३ कर्म तर गोष्पदांत बुडण्याजोगें करतों आहें; आणि गोष्टींनीं मात्र समुद्राचा ठाव घेत आहें ! मन माझें अत्यंत लालची आहे. काम-वासनेचें केवळ गुलाम ! आणि मुखानें मात्र मी तुझा भक्त म्हणवतों आहें.

४ तुलसीदास म्हणतात, हे प्रभो ! तूं अंतर्यामी, तुला सगळें माझ्या मनांतलें कळत च आहे. तरी मी आपल्या मनाचें कांहीं निवेदन करीत आहें. हे प्रभो ! जेणेंकरून सर्व मिथ्याचार सोडून देऊन केवळ निष्कपटपणें तुझ्या दारीं पडलेला राहून तुझे गुण गात राहीन असें कर.

## १०९ नाम राम ! रावरोइ हित मेरे

१ हे प्रभो रामचंद्रा ! तुझें नांव च मला हितकर बंधु झालें आहे. हें मी स्वार्थांतल्या आणि परमार्थांतल्या आपल्या साथीदारांना हात उभारून कंठरवानें सांगत आहें.

२ जन्मल्यावर आईबापांनीं माझा त्याग केला. सुकृत हि कांहीं माझ्या गांठीं नव्हतें; त्यामुळें माझा जन्म हि वाईट घरीं च झाला. इतक्या हि उपर माझ्यासारख्याला कोणी कोणी रामाचा दास म्हणतात. हा बनाव कुणामुळें बरें घडून आला ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ......... विः .........

३ पोटासाठीं लाजिरवाणेपणें भीक मागत फिरलो. माझी दशा पाहून दु:खाला देखील दु:ख झालें असेल. परंतु तुझ्या नामाच्या कृपा–प्रसादानें बाभूळ आणि बेहडा यांच्यासारख्या जंगली झाडांपासून मला आंब्याचें अमृत-फळ मिळत आहे.

४ साधुलोक चिंतन, मनन आणि नाना तऱ्हेचे प्रयास करून इहलोक आणि परलोक प्राप्त करून घेत असतात. परंतु या तुलसीदासाला तर तुझ्या एका नांवाचा च आधार आहे. ही गोष्ट सत्य सत्य आणि सत्य होय.

## ११० नाहिन आवत आन भरोसो

१ हे प्रभो रामचंद्रा ! तुझ्या नामाशिवाय दुसऱ्या कशाचा हि मला भरवसा नाहीं, विश्वास नाहीं. या कलिकालांत सर्व साधनांचे वृक्ष बहुतेक श्रमाच्या, कष्टाच्या फळांनीं च फळलेले आहेत.

२ तपश्चर्या, तीर्थयात्रा, उपवास, दानधर्म, यज्ञयाग ज्याला जें रुचेल त्यानें तें खुशाल करावें. वेदांनीं कर्माचीं फळें भरभरून वाढून ठेवलीं आहेत. पण तें फळ मिळाल्यावर च कळायचें.

३ शास्त्रानुसार जपजाप्य यज्ञयाग मनुष्य करतो; पण त्याच्यायोगें माणसाचें खरें कर्तव्य पुरें होत नाहीं, काम भागत नाहीं. योग-सिद्धींच्या मागें लागून स्वप्नांत देखील सुख मिळत नाहीं. तो मार्ग देह-रोगांनीं आणि आणि स्वजन-वियोगांनीं ग्रासलेला आहे.

४ काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंच्या योगें ज्ञान आणि वैराग्य हीं तर जणूं कांहीं पिटाळून लावलीं आहेत. आणि संन्यास घेतला असतां तर मन असें कांहीं गळून जातें कीं जसें कच्चें मडकें पाण्यांत पडलें !

५ पुष्कळ मुनि आहेत आणि त्यांचीं मतें हि तशीं च पुष्कळ आहत. नाना पुराणें आहेत आणि त्यांत नाना पंथ सांगितले आहेत. अशा प्रकारें जिकडे तिकडे झगड्याचा च प्रकार आहे. गुरूनें मला सुयोग्य असें रामभजन उपदेशिलें आहे. मला तर तो राजमार्ग च वाटतो.

६ तुलसीदास म्हणतात, प्रभु रामचरणीं प्रतीति आणि प्रीति म्हणजे भाव आणि भक्ति न ठेवतां ज्याला या संसारांत फिरफिरून यातना भोगत मरायचें आहे त्यानें खुशाल मरावें. हा संसार सागर आहे आणि रामनाम ही नाव आहे; तरायचें असेल त्यानें तरून जावें, पार उतरावें.

## १११ नाहिनै नाथ ! अवलंब मोहिं आनकी

१ हे प्रभो रामचन्द्रा ! मला दुसऱ्या कोणाचा च आधार नाहीं. हे करुणासागरा ! काया-वाचा-मनें प्रतिज्ञापूर्वक मी सांगतों कीं खरोखर तुमच्या पायतणांचा च एक अंतिम आधार मला आहे.

२ मन हें काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांचें माहेर च आहे; हें पाहतां ज्ञान आणि विज्ञान, शास्त्र आणि प्रत्यय यांचें तर नांव घेण्याची च सोय नाहीं. त्याच प्रमाणें हृदयांतील मूल काम-संकल्प आणि तज्जन्य नाना वासना लक्षांत घेतां मोक्षाचीएक देखील शक्यता मला दिसत नाहीं.

३ ही झाली मोक्षाची गोष्ट. दुसरें श्रेय म्हणून स्वर्गाची आशा धरावी तर तो देखील, मनांत त्याच्या प्राप्तीची पुष्कळ लालसा असली तरी, वेदांनीं सांगितलेलें कर्म-धर्म आचरल्याशिवाय अति दुष्प्राप्य आहे.

४ बरें मोक्ष आणि स्वर्ग दोहोंची हि आशा सोडून दिली आणि सिद्ध, देव, मनुष्य, असुर इत्यादींची कृपा संपादन करून कांहीं लाभ याच जगांत करून घ्यावा म्हटलें तर तें देखील सोपें नाहीं; कारण खडतर योग-साधन करावें, नाना भोग द्यावे आणि प्राण हि अर्पावे, तेव्हां कोठें ते द्रवतात, प्रसन्न होतात.

५ भक्ति परम दुर्लभ वस्तु होय. भगवान् शंकर, शुकाचार्य आणि मुनिजन हे तुझ्या चरणकमलाचें मधुपान करणारे भृंग होत. तुझ्या चरण-कमलांचा मकरंद पान करण्याची मला तृषा लागलेली आहे. तुझें नांव पतितांना पावन करणारें आणि संसारांत भ्रमून भ्रमून थकलेल्या भागलेल्या जीवांना विश्राम देणारें आहे खरें ! परंतु चित्तांतील अभिमानाचा पीळ पाहतां तुझ्या नामस्मरणाचा हा भक्तिमार्ग हि हातीं लागेलसें दिसत नाहीं.

६ एवंच कुठलें हि साधन माझ्याकडून होण्याची शक्यता दिसत नसल्यामुळें माझा अधिकार, नरकास च जाण्याचा आहे, या संसाररूप घोर अशा अंधकूपांत च रहायचा आहे, यांत शंका नाहीं. तथापि इतक्या हि उपर मला तुमचा च आधार आहे, बळ आहे. कारण तुलसीदास म्हणतात, हे प्रभो! गुह, जटायु, गजेंद्र आणि हनुमान् यांच्या जातीचा विचार करतां मला त्या घोर संसाराचें हि भय वाटत नाहीं.

## ११२ परसत पद पावन शोक नसावन

१ शोकाचा विनाश करणारे असे प्रभु रामचंद्राचे चरण लागतां च शिळेंतून तपःपुंज अशी अहल्या प्रगट झाली. सर्व जनांस सुखविणाऱ्या प्रभु रामचंद्रास पाहून ती सामोरी होऊन हात जोडून उभी राहिली.

२ प्रेमातिशयानें ती गोंधळून गेली. तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले आणि तोंडांतून शब्द फुटेना. ती परम भाग्यशाली रामचंद्राच्या पायां पडली. तिच्या डोळ्यांतून अश्रूंची धार वाहत होती.

३ तिनें आपलें मन आवरलें, प्रभूला ओळखलें. त्याच्या कृपेनें तिला भक्ति प्राप्त झाली आणि तिनें अत्यंत निर्मळ वाणीनें भगवंताची स्तुति आरंभिली :

४ "हे ज्ञानानें च प्राप्त होणाऱ्या रघुराया! तुझा जयजयकार असो. मी स्त्री अपवित्र आणि प्रभु तुम्ही सर्व जगाला पवित्र करणारे आहांत. तुम्ही रावणाचे शत्रु आणि प्रजाजनांना सुखविणारे आहां. हे कमलनयना! हे भवभयमोचना! मी तुम्हांला शरण आलें आहें. मला रक्ष रक्ष.

५ मुनींनी मला जो शाप दिला तें खरोखर च फार चांगलें केलें. तो मी मजवर त्यांचा मोठा अनुग्रह च समजतें. कारण त्यामुळें मी तुमचें दर्शन डोळे भरून करीत आहें. शंकरानें देखील जन्मून हा च लाभ मानलेला आहे.

६ आणि माझी विनंति हि हीच आहे. मी तर अज्ञान, मी दुसरा वर कांहीं मागत नाहीं. तुमच्या चरण-कमलाच्या ठायीं परम आसक्त होऊन माझा मनोभृंग सदैव रसपान करीत राहो एवढें च माझें मागणें आहे.

७ ज्या चरणापासून देव-नदी गंगा प्रगट झाली आहे आणि जी भगवान् शंकरानें आपल्या मस्तकावर धारण केली आहे, तें चरण-कमल हे प्रभो ! तुम्हीं माझ्या मस्तकावर ठेवलें !"

८ अशा प्रकारें गौतम-पत्नी अहल्या भगवंताचा स्तव करून पुनः पुनः त्याच्या चरणीं लागली आणि आपल्याला हवा असलेला वर मिळवून मोठ्या आनंदानें पतिलोकाला गेली.

[रामचरितमानस, बालकांड, दोहा २११]

## ११३ बिस्वास एक राम-नाम को

१ माझा एक रामनामावर च विश्वास आहे. माझें मन असें विलक्षण आहे कीं दुसरीकडे कुठें त्याचा विश्वास बसत च नाहीं. असा च त्याचा स्वभाव आहे.

२ माझ्या नशिबीं ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्ववेद यांचें अध्ययन नाहीं. आणि व्रतें, तीर्थें, तपें यांचें नांव ऐकून तर धसका च भरतो. कोण रे बाबा त्या क्लेशांत पचत पडतो आणि आपलें शरीर क्षीण करून घेतो ?

३ या कलियुगांत तीं यज्ञयागादि कर्में दुष्कर, त्या साऱ्या पैशाच्या स्वाधीनच्या गोष्टी. ज्ञान आणि वैराग्य त्याच प्रमाणें त्यांचीं साधनें जीं मनः-प्रधान योग, वाक्प्रधान जप, आणि शरीरप्रधान तप हीं हि सुलभ नाहींत च. तिथें काम, क्रोध, मोह, लोभ इत्यादींचें मोठें भय, अटकाव आहे.

४ म्हणून सर्वकाळीं आणि सर्वांना सुलभ असें जें रामभजन—नामस्मरण आणि गुणगान— तें च करीत चलावें. नामाच्या कल्पवृक्षाखालीं बसल्यावर भयंकर उन्हाची हि काय भीति ?

५ कोणास ठाऊक कोण यमलोकाला जातो, कोण देवलोकाला जातो, आणि कोण परलोक वैकुंठाला जातो ? मला तुलसीदासाला तर या जगांत राम-दासाचें जीवन च अति गोड वाटतें !

## ११४ भज मन रामचरन सुखदाई

१ हे माझ्या जीवा ! सुखदायक अशा रामचरणांचें भजन कर.

२ त्याच चरणांपासून देव-नदी मंदाकिनी निघाली आहे. ती शंकराच्या जटाजूटांत गडप झाली, तेव्हां तिला 'जटा शंकरी' असें नांव मिळालें. अशी ती तिन्ही लोकांना तारण्यासाठीं अवतरली आहे.

३ त्याच चरणांच्या पादुका घेऊन भरत तन्मय होऊन राहिला, आणि ते च चरण धुऊन मग च गुहानें नाव हांकारली.

४ ते च चरण संतजन सदा सेवन करीत आले आहेत आणि संतुष्ट झाले आहेत. त्या च चरणांना स्पर्श करून गौतमपत्नी अहल्या हिनें परम-पद प्राप्त करून घेतलें.

५ त्या च चरणांनीं प्रभूनें दंडकवन पावन केलें आणि ऋषींचें भय दूर केलें. त्या च चरणांनीं त्रिभुवन-नाथ प्रभु रामचंद्रांनीं सुवर्ण-मृगाचा पाठलाग केला.

६ त्या च चरणांच्या आश्रयानें आपला बंधु वाली याच्या भयानें सदा संत्रस्त असलेल्या सुग्रीवानें विजय मिळवून राजछत्र धारण केलें. आणि त्याच चरणांच्या आश्रयानें शत्रु जो रावण त्याचा भाऊ बिभीषण राक्षस तो देखील लंकाधीश झाला.

७ त्या च चरणांचें शिव-सनकादि योगिजन ध्यान करतात आणि सहस्र-मुख शेष यांच्यासारखे वाग्मी सतत गुणानुवाद करीत असतात. त्या च चरणांच्या दास्यामुळें तुलसीदास म्हणतात, अरे जीवा ! साक्षात् प्रभु रामचंद्र, मारुत-सुत हनुमंताचें आपल्या मुखानें गौरव गात असतात.

## ११५ भरोसो जाहि दूसरो सो करो

१ ज्याला दुसऱ्या कुठल्या साधनाचा भरवसा असेल त्यानें खुशाल तें साधन करावें. मला तर या कलिकालांत रामाचें नाम च कल्प-तरु झालें आहे. आणि तें च कल्याण-फळांनीं फळलें आहे, कल्याण-प्रद झालें आहे.

२ यज्ञयागादि कर्म-मार्ग, योगादि उपासन-मार्ग तसा च सांख्य-वेदांतादि ज्ञान-मार्ग हें जें वेद-प्रतिपादित त्रिविध साधन तें सगळें खरें च आहे. परंतु श्रावण मासामध्यें अंधत्व पावलेल्या पुरुषाच्या मनःचक्षूंसमोर हिरवळीशिवाय दुसरें कांहीं येत नाहीं, त्याला हिरवा च हिरवा रंग सुचतो, त्याप्रमाणें मला दूर्वादल-श्याम राम च सुचतो. दुसरें कांहीं सुचूंच शकत नाहीं.

३ नाना साधनरूप पत्रावळी कुत्र्याप्रमाणें चाटत राहिलों, कधीं च पोट भरलें नाहीं; परंतु अशा मला रामनामाचें स्मरण करतां च सुधारसाचें ताट समोर दिसत आहे.

४ स्वार्थामध्यें काय किंवा परमार्थामध्यें काय नरो वा कुंजरो वा ला, साशंकतेला, अर्धवटपणाला स्थान नाहीं; तिथें पक्का विश्वास च हवा. समुद्रावर दगडाचा पूल बांधून वानर-सैन्य समुद्र उतरून गेलें असें पुराणांतरीं ऐकतों. हें विश्वासाशिवाय थोडें च झालें ?

५ एखाद्याचा एखाद्याच्या ठायीं विश्वास आणि भक्ति जडली कीं त्याचें तेथें काम संपलें. 'रा' आणि 'म' हीं दोन अक्षरें हे च माझे माय-बाप होत आणि त्यांच्यापाशीं मी बाळहट्ट घेऊन अडून बसलों आहें.

६ भगवान् शंकर साक्षी आहेत, मी कांहींएक लपवून ठेवीत नाहीं. जर कांहीं मी लपवून ठेवीत असेन तर माझी जीभ गळून पडो. माझें कल्याण रामनामानें च व्हायचें, तुलसीदासाला हें पुरतें समजून चुकलें आहे.

## ११६ भलो भली भांति है जो

१ हे जीवा ! तूं माझें ऐकशील, स्वरसपूर्वक रामनामावर प्रेम करशील, तर तुझें सर्वतोपरी भलें होईल.

२ अरे रामनामाच्या प्रभावानें आगीसमोर जशी थंडी तसा डरपोक कलिकाल आपल्या सेनेसह पार पळ काढतो.

३ रामनामाच्या योगें विषय-वैतृष्ण्यरूप वैराग्य, अनुसंधानरूप योग आणि निदिध्यास रूप जप आपल्या ठायीं जागृत होतो आणि ब्रह्मा देखील आपल्या कपाळावर कर्माचा छाप मारूं शकत नाहीं.

४ रामनामाचा मोदक भक्तीच्या सुधारसांत पकवून जर तूं सेवन करशील, तर परितुष्ट होऊन तुला आतांच्याप्रमाणें दारोदार भीक मागत फिरावें लागणार नाहीं.

५ रामनाम म्हणजे कल्पवृक्ष च होय. त्याच्यापाशीं स्वार्थाचें वा परमार्थाचें जें कांहीं मागशील तें सारें, हे तुलसीदासा ! तुला मिळेल; कशाची ददात राहणार नाहीं.

## ११७ मन पछितैहै अवसर बीते

१ हे माझ्या जीवा ! वेळ निघून गेल्यावर तुला पस्तावा करीत बसावें लागेल. म्हणून तुला हा दुर्लभ नरदेह मिळाला आहे, तोंवर काया वाचा, मनें, सर्व भावें हरिभजन करून घे.

२ सहस्र-बाहु हैहय-वंशीय अर्जुन, दशमुख रावण इत्यादि महादर्प-शाली राजे देखील बलवान् कालाच्या पुढें टिकाव धरूं शकले नाहींत ! मी मी म्हणून त्यांनीं धन-संपत्ति आणि घर-दार केलें. पण शेवटीं त्यांना रिकाम्या हातानेंच जावें लागलें !

३ स्त्री-पुत्रादि सारे स्वार्थी, आप-मतलबी, आहेत. यांची कोणाचीच ममता, आसक्ति, ठेवूं नकोस. बापड्या, शेवटीं हे तुला सोडणारच. मग तूं च आधीं आतांपासून यांना कां सोडीत नाहींस ?

४ हे जडजीवा ! जागा हो. सावध हो. आतांच प्रभूची प्रीति आसक्ति धर. आणि मनांतील सर्व दुर्वासना टाकून दे. तुलसीदास म्हणतात, बाबा रे ! ऐक, कामरूप अग्नि विषय-भोगरूप तुपाच्या आहुतीवर आहुति देऊन कधीं विझत नसतो. (तो तर निरिंधन झाल्यानेंच शांत होतो)

## ११८ माधव ! अब न द्रवहु केहि लेखे

१ हे प्रभो ! कां बरें तूं अजून माझ्यावर कृपा करीत नाहींस ? तुझी प्रतिज्ञा आपल्याला जे शरण आले त्यांचा प्रतिपाल करण्याची आहे; तर माझी प्रतिज्ञा तुझें चरणकमल पाहूनच जगण्याची आहे.

२ जोंपर्यंत मी दीन होत नाहीं, तुला अनन्य भावें शरण येत नाहीं आणि तूं मजवर दया करीत नाहींस; त्याचप्रमाणें जोंपर्यंत मी तुझा दास होत नाहीं आणि तूं माझा स्वामी होत नाहींस, तोंपर्यंत, जरी तू अंतर्यामी आहेस तरी तुला, ज्या यातना मला होतात त्या, सांगतां सोय नाहीं.

३ मी जीव कृपण आहें, दीन आहें, दयनीय आहें, तर तूं अुदार आहेस; मी जीव पतित आहें, तर तूं परमात्मा पावन आहेस; वेद असें सांगतात. हे रघुराया ! अशीं तुझीं माझीं नातीं कैक आहेत; आणि तीं आतां सोडणें शक्य नाहीं.

४ तूंच आईबाप, गुरु, तूंच मित्र आणि बंधु आणि तूं च स्वामी आहेस. तूंच सर्व प्रकारें हितकर्ता आहेस. तेव्हां मी जेणें करून द्वैतरूप, अज्ञानरूप, अंधकूपांत पडणार नाहीं अशी कांहीं खटपट कर.

५ हे करुणानिधे ! हे महाभय-निवारणा, कमलनयना ! प्रभो ! तुझ्या प्रकाशाशिवाय, तुलसीदास म्हणतात, मोहाचें, संशयाचें, अज्ञानाचें अंधकार-पटल किती हि टाळलें तरी टळत नाहीं. तूं प्रकाशशील तेव्हांच तो निबिड अंधकार दूर होईल.

## ११९ माधव ! मोहपास क्यों टूटै

१ हे प्रभो! मोहाचा, भ्रांतीचा पाश कसा बरें सुटणार? बाह्य उपाय तुम्ही किती का कराना त्यामुळें आंतील अभिमानाची गांठ सुटायची नाहीं.

२ कढई तुपानें भरलेली आहे. तिच्यांत चंद्राचें प्रतिबिंब दिसतें आहे. आतां त्या कढईच्या-खालीं शेंकडों कल्प जरी जाळ केला आणि कढवलें तरी तें बिंब का नाश पावणार आहे ? नाहींच !

३ झाडाच्या ढोलींत पक्षी राहतो. झाड पाडलें, पण त्यामुळें पक्षी कांहीं मरत नाहीं; त्याप्रमाणें बाह्य साधनें केलीं पण विचारानें मनावर कांहीं संस्कारच केले नाहींत, तर तें शुद्ध कसें होणार ? तें अशुद्धच राहणार !

४ बुद्धींत ज्ञानाचा प्रकाश नाहीं, मनांत विषयभोगाची अपार आसक्ति भरली आहे, आणि इकडे शरीर मात्र नानाप्रकारें धू धू धूत आहे ! बाबा रे !

वारुळावर सोट्यावर सोटे मारले म्हणून कांहीं वारुळांतील नाग मरत नसतो !

५ तुलसीदास म्हणतात, हरिरूप गुरूच्या करुणेवांचून जीवाला विमल विवेक, विशुद्ध ज्ञान होत नाहीं; आणि त्या विवेकावांचून ह्या घोर संसार-सागराच्या परतीराला हि कोणी पोंचत नाहीं.

## १२० मेरो भलो कियो राम आपनो भलाई

१ हे प्रभो ! तूं माझें भलें केलेंस, तें केवळ तुझ्या भलेपणामुळें—माझ्या नव्हे. मी तर स्वामि-द्रोही आहें, पण तूं स्वामी मात्र सेवक-हितैषी च आहेस.

२ रामासारखा थोर कोण आहे ? उलट माझ्यासारखा पोर कोण आहे ? रामासारखा खरा कोण आहे ? उलट माझ्यासारखा खोटा कोण आहे ?

३ लोक मला रामाचा गुलाम, 'राम-दास' म्हणतात; आणि मी हि म्हणवून घेतों. हा खरोखर माझा मोठा अपराध होय. परंतु, प्रभो, तें तुम्हीं मनावर नाहीं घेतलें.

४ पाण्याच्या डोक्यावर तुलसीदासासारखें नीच, हलकट गवत चढून बसतें. पण पाणी याला आपण च शिंपलें आहे, पाजलें आहे, हें लक्षांत घेऊन बुडवत नाहीं.

## १२१ मेरो मन हरिजू ! हठ न तजै

१ हे प्रभो! माझें मन कांहीं केल्या आपला हट्ट सोडीत नाहीं. रात्रंदिवस मी त्याला नाना प्रकारें शिकवण देतों पण, तरी सुद्धां तें आपला स्वभाव कांहीं केल्या सोडीत नाहीं.

२ स्त्रीला प्रसवाच्या दुःसह वेदना सहन कराव्या लागतात, पण तरी सुद्धां आपलें तें सारें दुःख विसरून ती मूढ पुन्हां दुःखद पति-सेवेस तयार होते च.

३ कुत्रा लालचीनें जेथें तेथें भटकतो, तोंड घालतो. परिणामीं जोडे खातो. तरी पुन्हां तिथें च जाऊन मरतो. मूर्खाला लाज वाटत नाहीं.

४ त्याप्रमाणें माझ्या मनाला संयमांत ठेवण्याचा मी परोपरीनें प्रयत्न करून शेंवटीं हरलों आहें. तें फारच अनावर आणि अजिक्य आहे. तुलसीदास म्हणतात, त्या मनाचे चालक मालकच जेव्हां त्याला मना करतील तेव्हां च तें कह्यांत राहील, दुसऱ्याला तें दाद द्यायचें नाहीं.

## १२२ (मैं) केहि कहौं बिपति अति भारी

१ हे परमहितकारी महावीर प्रभु रामचंद्रा ! मी आपली दारुण विपत्ति, दैन्य कुणाला सांगूं ?

२ हे प्रभो ! माझें हृदय म्हणजे तुझें घर होय. पण तिथें असंख्य चोरांनीं येऊन वस्ती केली आहे. ते भयंकर जबरदस्ती करतात आणि विनंती-अर्जांना धुडकावून लावतात.

३ तमोदोष आणि मोह, लोभ, अहंकार, मद, क्रोध, काम आदि रजोदोष यांच्या योगें मी सर्वतोपरी संत्रस्त झालों आहें, हे प्रभो ! हे अति च सतावतात, आणि अनाथ समजून मला छळतात.

४ मी एकटा आहें. आणि हे वाटमारे अगणित आहेत. माझी हांक कोणी ऐकत नाहीं. पळ काढून हि कांहीं बचाव नाहीं, तेव्हां हे रघुनाथा ! तुम्हीच माझा संभाळ करा.

५ तुलसीदास म्हणतात, हे रामा ! तुमचें घर, हे चोर लुटताहेत हो ! तुझी अपकीर्ति होऊं नये याची मला मोठी चिंता वाटते.

## १२३ मैं जानी हरिपद-रति नाहीं

१ मला हरिपद-भजन म्हणजे काय तें मुळीं कळलें च नाहीं. त्याचें अचूक चिह्न जें वैराग्य तें स्वप्नांत देखील माझ्या मनांत येत नाहीं.

२ जे जे रामचरणीं अनुरक्त झाले त्यांनीं त्यांनीं रोगवत् सर्व भोगांचा त्याग च केलेला आहे.

३ जेव्हां एखाद्याला कामरूप भुजंग दंश करतो, तेव्हां त्याला विषयरूप निंब कडू च लागत नाहीं.

४ ही अगतिकता पाहतां नित्य नवीन मोठीच चिंता उत्पन्न होते.

५ जेव्हां केव्हां रामाची कृपा होईल तेव्हां च ही व्यथा नाहींशी होईल. तुलसीदास म्हणतात, दुसरा उपायच नाहीं.

## १२४ मैं हरि पतित-पावन सुने

१ हे प्रभो! तूं पतित-पावन आहेस, असें मीं शास्त्रांच्या अणि संतांच्या मुखानें ऐकिलें आहे. मी पतित आणि तूं पतितपावन; हा आपला बाणा ठरला.

२ व्याध, गणिका, गज, अजामिल इत्यादींची साक्ष शास्त्रांनीं दिली आहे. आणखी हि किती तरी अधम तूं तारले आहेस. कुठवर त्यांची गणति करणार ?

३ कळत अथवा न कळत तुझें नांव घेतलें असतां नरक आणि यमपुर यांचें दार बंद होतें. हा दास तुलसी तुला शरण आला आहे; त्याला आपल्या चरणीं ठाव दे. त्याचा अंगीकार कर.

## १२५ मोहजनित मल लागि बिबिध बिधि

१ मोहामुळें चिकटलेला मळ परोपरीनें करोडों प्रयत्न करून हि सुटत नाहीं, उलट जन्मजन्मांतरी चित्तानें त्या मोहाचा च अभ्यास केलेला असल्यामुळें तो मळ अधिकाधिक चढत जातो.

२ तुलसीदास म्हणतात, शुद्धीसाठीं वेदांनीं व्रतोपवास, दान, तप इत्यादि अनेकानेक उपाय सांगितले आहेत खरे, परंतु केवळ ह्यांच्या योगें, रामचरणीं परम प्रेमाच्या भक्तीच्या जलाशिवाय च, मल निःशेष धुतला जात नाहीं.

## १२६ यह बिनती रघुवीर गुसाईं

१ हे प्रभो रामचंद्रा! तुझ्याव्यतिरिक्त इतर कोणाची आशा आणि विश्वास बाळगणें ही जी या जीवाची जडता आहे, अज्ञान आहे, तें तूं दूर कर. तुला माझी ही प्रार्थना आहे.

२ मला पुण्य लोकाची अथवा इहलोकींची संपत्ति, ऋद्धिसिद्धि, मान मरातब, विद्या या कशाची च चाड नाहीं. माझी तुझ्या चरणीं निष्काम भक्ति, दिवसेंदिवस सारखो वाढत जावो एवढें च मागणें आहे.

३ माझें प्रतिकूल कर्म, माझें दुरदृष्ट, मला ज्या कोणत्या लोकाला वळजोरीनें ओढून घेऊन जाणार असेल तिथें तिथें हे प्रभो! तुझी कृपा-दृष्टि जशी कासवीची आपल्या अंडावर तशी सदैव मजवर कायम राहो, एवढें च मागणें आहे.

४ या जगांत या जीवाचे जितके कांहीं प्रेमसंबंध आहेत, प्रेम विश्वास सख्य ते सारे, तुलसीदास म्हणतात, हे प्रभो! तुझ्या ठायीं एकवटोत.

## १२७ रघुपति-भगति करत कठिनाई

१ रामभक्ति करायला फार कठिण! बोलायला सोपी आहे पण करायला अतिशय अवघड. ज्याला जमली त्याला च कळली.

२ जो ज्या कलेंत कुशल असतो त्याला ती नेहमीं च सोपी आणि सुखाची वाटते. प्रवाहाच्या विरुद्ध शफरीसारखी मासोळी पोहते आणि प्रचंड हत्ती वाहून जातो.

३ साखर वाळूंत मिसळली, तर ती बल-प्रयोगानें कोणी अलग करूं शकत नाहीं. परंतु अतिशय रसिक असलेली लहानशी मुंगी ती अनायास अलग करते.

४ त्या ठिकाणीं, शोक, मोह, भय, हर्ष, दिवसरात्र थोडक्यांत देश काल निमित्त कांहीं एक नाहीं, अशी ती ब्राह्मी स्थिति प्राप्त झाल्यावांचून तुलसीदास म्हणतात, हा संशय अर्थात् हें सारें प्रपंच-भान निःशेष दूर होऊं शकत नाहीं.

## १२८ रघुवर तुमको मेरि लाज

१ हे प्रभो ! तुम्हांला च माझी लाज आहे. मी सदासर्वदा तुमचा शरणागत आहें. तुम्हीं गरिबांचे मोठे कैवारी आहांत.

२ पतितांचा उद्धार करणें हें तुमचें ब्रीद आहे, असा घोष या कानांनीं ऐकला आहे. आणि मी तर फार जुना च पतित म्हटला पाहिजे. आतां ही नौका परतीराला लावणें तुमच्या च कडे आहे.

३ जनतेच्या पापांचें खंडन आणि तज्जनित दुःखांचें भजन करणें हें च तुमचें कार्य आहे. तुलसीदास म्हणतात, आतां मजवर कृपा करा, आणि मला भक्तीचें दान द्या.

## १२९ राम जपु राम जपु राम जपु बावरे

१ अरे बावळ्या ! राम जप, राम जप, राम जप,
हा संसार-सागर भयंकर आहे आणि रामनाम ही च आपली नौका आहे.

२ या एका च साधनानें सगळ्या ऋद्धि सिद्धि साधतात. योग, संयम, समाधि इत्यादि अन्य सारीं साधनें कलिरूप रोगानें ग्रासलेलीं आहेत.

३ सज्जन असो, दुर्जन असो, अनुकूल असो प्रतिकूल असो, शेंवटीं सर्वांना रामनामाला च शरण जावें लागतें.

४ जग म्हणजे एक वैभवशाली गंधर्व-नगरी च आहे. तिच्यांतील टोलेजंग चुनेगच्ची हवेल्या पाहून तूं भूलून जाऊं नकोस.

५ रामनाम सोडून जो दुसऱ्या साधनांचा विश्वास धरतो, तुलसीदास म्हणतात, तो समोर वाढलेलें ताट दूर लोटून उष्टेंमाष्टें मागतो आहे !

## १३० राम राम जपु जिय सदा सानुराग रे

१ बाबा रे ! तू सदासर्वदा प्रेमपूर्वक आपल्या हृदयांत राम राम असा जप करीत चल. या कलिकालांत संन्यास, योग, यज्ञ, दान, तप इत्यादि साधनें कांहीं चालत नाहींत.

२ रामाचें स्मरण सर्व विधींचा, कर्तव्यांचा, राजा होय. आणि राम-विस्मरण हें च सर्व निषेधांचा, अकर्तव्यांचा, मुकुटमणि होय.

३ हा सारा जगत्-प्रपंच म्हणजे कोणी नाग होय आणि रामनाम हें त्या नागाच्या मस्तकावरील मणि होय; त्याचें प्राणतत्त्व होय तो मणि काढून घेतला तर त्याचा जीव कासावीस होतो, तो त्यासाठीं तडफडतो.

४ रामनाम म्हणजे कल्पवृक्ष च होय. तो चारी पुरुषार्थांचीं फळें देतो. वेद, शास्त्रें आणि पुराणें, भगवान् शंकर आणि विद्वान् मंडळी असें सांगतात.

५ रामनाम हें भक्ति-मार्गाचें सार होय आणि तुलसीदासाचें तर तें जीवनाधारच आहे.

## १३१ राम राम राम जीह जौलौं तू न जपिहै

१ हे माझ्या जिह्वे ! जोंपर्यंत तूं राम, राम, राम असा निरंतर जप करीत नाहींस तोंपर्यंत कुठें हि जा, त्रिविध तापांतून तुझी सुटका नाहीं.

२ (रामनामाशिवाय) तूं गंगेच्या कांठीं तहानेनें व्याकुळ होशील आणि कल्पतरूच्या छायेंत तुला दारिद्रच सतावील.

३ (रामनामाशिवाय) जागेपणीं काय किंवा स्वप्नांत काय, सुख म्हणून मिळणार नाहीं. जन्मोजन्मीं आणि युगोयुगीं जगांत तूं रडत च राहशील.

४ (रामनामाशिवाय) सुटकेसाठीं केलेल्या तुझ्या प्रयत्नामुळें तूं आणखी च आवळला जाशील आणि अमृताचें भोजन तुला विषवत् होईल.

५ हे तुलसीदासा ! तिन्ही लोकांत आणि तिन्ही काळीं, तुझ्या-सारख्या दीनाला एक रामनामाचा च आधार आहे; जसा माशाला पाण्याचा असतो.

## १३२ लाज न लागत दास कहावत

१ मला दास म्हणून घ्यायला लाज नाहीं वाटत! हे हरे! जें आचरण आणि जो विचार तुला आवडतो तो सोडून देऊन मी वागतों आहें!

२ सर्व आसक्ति सोडून देऊन ऋषि, मुनि ज्याचें भजन करतात, सेवन करतात, जप, तप, यज्ञ इत्यादि साधना करतात, त्याची प्राप्ति माझ्यासारख्या ज्ञान-हीन, अत्यंत दुराचारी पामर माणसाला कशा प्रकारें बरें होणार!

३ हरि तर निर्मल आणि माझें हृदय तर मलानें भरलेलें आहे. अशी ही माझी विपरीत दशा आहे. ज्या तलावावर कावळे, बगळे, करकोचे आणि डुकरे राहतात तेथें हंस कसा बरें येणार?

४ ज्याला शरण जाऊन सुजाण लोक आपले तिन्ही ताप शांत करून घेतात, तेथें हि आम्ही मद, मोह, लोभ यांचा सोस सोडीत नाहीं; स्वर्गात देखील ईर्षा सुटत नाहीं.

५ संसाररूप नदी पार करायला संत ही नाव होय असें आम्ही मारे इतरांना समजावून सांगतों, परंतु त्यांच्याशीं चहाडवैर करून हे हरे! तुझ्याशीं मात्र मी सख्य साधूं पाहत आहें!

६ मला दुसरीकडे कोठें हि ठाव नाहीं म्हणून मी तुझ्याशीं जबरदस्तीनें नातें जोडीत आहें. हे उदारांच्या शिरोमणे! मला आश्रय दे. हा तुलसीदास तुझे गुण गात आहे.

## १३३ सुनु मन मूढ सिखावन मेरो

१ अरे हे माझ्या मूढ जीवा! माझी शिकवण ऐक. जो कोणी हरिचरण-विमुख झाला त्याला म्हणून सुख कसें तें कधीं लाभलें नाहीं. अद्याप वेळ गेली नाहीं, शठा, हें समजून घे.

२ जेव्हांपासून चंद्र आणि सूर्य देवाच्या मनापासून आणि डोळ्या-पासून दूर झाले तेव्हांपासून ते अधिक च दुःख पावत आहेत. रात्रंदिवस

आकाशांत फिरफिरून हैराण झाले आहेत. आणि पुन्हां तिथें त्यांची हाड-वैरी राहूशीं गांठ आहे.

३ यद्यपि देवनदी गंगा अत्यंत पवित्र आहे आणि तिन्ही लोकांत तिची सुकीर्ति दुमदुमते आहे, तथापि जेव्हांपासून तिनें देवाचे चरण सोडले तेव्हांपासून आजवर तिची अधोगति कशी ती संपत च नाहीं.

४ प्रभु रामचंद्राच्या भक्तिविना विपत्तींतून सुटका नाहीं. या विषयीं वेदांनीं सारा संशय दूर केला आहे. म्हणून तुलसीदास म्हणतात, हे माझ्या मना! सर्व आशा सोडून देऊन एक रामाचा सेवक होऊन रहा!

## १३४ सुमिर सनेहसों तू नाम रामरायको

१ तूं रामनामाचें प्रेमपूर्वक स्मरण करीत जा. तें निराधाराचा आधार आणि असहाय अनाथाचा सखा आहे.

२ तें भाग्यहीनाचें भाग्य आहे आणि गुणहीनाचा गुण आहे. तें गरीबांचा आपंगिता आप्त आणि दीनांचा दयाळु दाता आहे.

३ तें कुलहीनाचें कुल आहे असें मीं ऐकिलें आहे. आणि वेदांची हि तशी साक्ष आहे. तें पांगळ्याचें हातपाय आणि आंधळ्याचे डोळे आहे.

४ तें भुकेल्याचा मायबाप आणि अनाथाचा नाथ आहे. तें संसार-सागरावरील सेतु आहे. तें सुखसाराचें म्हणजे परमानंदाचें मूळ आहे.

५ पतिताला पावन करणारें रामनामासारखें दुसरें कांहीं च नाहीं. त्याचें स्मरण करून या तुलसीदासासारखी बरड जमीन पहा सुपीक बनली!

## १३५ हे हरि! कवन जतन सुख मानहुँ

१ हे प्रभो! कशाप्रकारें बरें मी सुख मानूं, आनंद करूं? कारण माझी करणी हत्तीच्या दांतांसारखी दुटप्पी आहे. हें तुम्हांला पुरेपूर माहीत आहे.

२ जें कांहीं बोलतों त्याप्रमाणें जर आचरण केलें तर हा संसार-सागर वासराच्या पावलासारखा लीलेनें ओलांडतां येईल. पण करणें वेगळें आणि बोलणें वेगळें ! मग हरिपद-सुख कसें मिळणार ?

३ पहायला मोर किती सुंदर आणि त्याची वाणी तरी किती मिठ्ठास ! जशी अमृतांत घोळलेली. परंतु त्याचा आहार काय ? तर विषारी साप. असा निष्ठुर ! ही करणी आणि ती वाणी !

४ जे निर्मत्सर म्हणजे परदोषदर्शन-विमुख आहेत, जे जीवमात्रा-विषयीं वात्सल्यानें भरलेले आहेत, जे तुझ्या चरणकमलीं मिलिंदायमान झाले आहेत, हा आपला हा परका असा भेद स्वप्नांत हि न करणारे, जे धीर पुरुष तेच हे प्रभो ! तुला प्रिय होतात.

५ हे प्रभो ! यद्यपि माझे अवगुण अपार च आहेत आणि त्यामुळें या संसारांत, या जन्ममरण-परंपरेंत, पचण्यास च मी योग्य आहें; तथापि तुलसीदास म्हणतात, तूं आपल्या गुणांचा, दीनबंधुता पतितपावनता इत्यादि गुणांचा, विचार करून हे करुणासागरा ! मजवर दया कर. अर्थात् मला या संसारांतून सोडव

## १३६ मानस-मुक्ता

१ रघुकुलाची ही पूर्वापार चालत आलेली रीत च आहे कीं प्राण भले हि जावोत पण दिलेलें वचन कधीं खोटें व्हायचें नाहीं. खरोखर असत्या-सारखें पाप नाहीं. गुंजभर असत्य डोंगराएवढें पाप होतें.

* * *

२ सद्बुद्धि आणि दुर्बुद्धि सर्वांच्या हृदयांत वास करीत असतात. वेद पुराणें सांगतात कीं जिथें सद्बुद्धि वास करते तिथें नाना संपत्ति नांदतात आणि जिथें दुर्बुद्धि वास करते तिथें विपत्तीचें माहेर असतें.

* * *

३ संतांची आणि असंतांची करणी चंदन आणि कुऱ्हाड यांच्या सारखी असते. कुऱ्हाड चंदनास तोडते पण चंदन कुऱ्हाडीला सुगंधित च करतें.

* * *

४ संत आणि असंत दोहोंना हि नमस्कार. दोघे हि दुःखदायी होतात. फरक इतका च कीं संत दूर होतांना दुःख देतात, तर असंत भेटले असतां दुःख देतात.

* * *

५ दया च धर्माचें मूळ आहे. अभिमान च पापाचें कारण आहे. म्हणून तुलसीदास म्हणतात, जोंवर कुडींत प्राण आहे, तोंवर दया कधीं सोडूं नये.

## १३७ अजहूं न निकसे प्राण कठोर

१ किती कठोर आहेत हे माझे प्राण ! अद्याप कांहीं ते गेले नाहींत ना ? हे माझ्या परम सुंदर प्रियकरा, तुझ्या भेटीवांचून किती दिवस गेलेत हे !

२ चार प्रहर हे चार युगासारखे लोटले. रात्र सरून पहाट झाली. येण्याची वेळ टळून गेली. हे चित्तचोरा ! कुठवर तुझी वाट पाहूं ?

३ एकदां हि तुला कधीं मीं डोळे भरून पाहिलें नाहीं. हे चित्तचोरा, तुझी मी सारखी वाट पाहत बसलें आहें.

४ दादू म्हणतात, चंद्रावांचून चकोर तसा मी देवा, तुझी आतुर विरहिणी झालों आहें.

## १३८ तब हम एक भये रे भाई

१ बाबा रे ! तेव्हां आम्ही एक होऊन गेलों. जेव्हां प्रभूची भेट झाली तेव्हां च आम्हांला खरें ज्ञान झालें.

२ परिसाच्या स्पर्शानें सोनें झालों. दुनियेच्या दुर्मताचें हीण दूर झालें.

३ मलय-गिरीचें मर्म मिळालें. आणि वंश-वर्ण-कुल हा भ्रम पळाला. आम्ही चंदन च होऊन गेलों.

४ हरिभक्तांच्या गंगेच्या भेटीला आलों आणि अनायास थेंब थेंब मिसळून गंगा च होऊन ठेलों.

५ नाना प्रकारच्या भेदांचा भ्रम पळाला आणि दादू म्हणतात, एका च रंगानें रंगून गेलों एकमय होऊन गेलों.

## १३९ निंदक बाबा बीर हमारा

१ निंदक हा आमचा भाई आहे. बिचारा फुकट ओझें वाहतो.

२ कोटयवधि कर्मांचे पाप तो नाहींसें करतो; बिना मोबदला काम करतो.

३ तो स्वत: बुडतो, पण दुसऱ्यांना मात्र तारतो. असा हा आमचा परम सुहृद् आम्हांला पैलथडीला पोंचवतो.

४ असा हा माझा निंदक युग युग जगो, चिरंजीव होवो. प्रभो ! एवढी कृपा मजवर कर.

५ माझा निंदक मोठा परोपकारी आहे. दादू म्हणतात, तो आमची निंदा करीत राहो.

## १४० अकलकला खेलत तर ज्ञानी

१ ज्ञानी पुरुष अकलकला म्हणजे अनाकलनीय असे खेळ खेळत असतो. अफाट सागरांत नाव दाही दिशांत हिंडत फिरत असते; पण तिची नजर सतत ध्रुव ताऱ्यावर असते.

२ त्याप्रमाणें ज्ञानी पुरुष या पृथ्वीवर सर्व प्रकारची हालचाल करीत असतो खरा, परंतु त्याच्या मनाची लगन, गोडी, आकाशांत म्हणजे परमात्म्याच्या ठायीं जडलेली असते. त्याचा हा पंचभूतांचा गोळा, हा देह,

हा जीव वेगळा दिसतो खरा, तथापि तो परमात्मरूप च असतो. जसें हिम हें वेगळें दिसलें तरी तें वस्तुतः पाणी च असतें, त्याप्रमाणें.

३ श्रुतींना म्हणजे वेदोपनिषदांना ज्याचा आदि-अंत, थांग-पत्ता लागला नाहीं, ज्या ठिकाणीं मन आणि वाणी पोंचूं शकत नाहींत, तिथें ज्यांनीं आपलें घर केलें आहे, त्यांची गोष्ट काय सांगायची ? ती तर अकथ कहाणी च आहे. अनिर्वचनीय आहे तें !

४ ज्याला ती पुराणी जान-पछान झाली आहे, त्याचा खेळ अजब असतो. तें सारें च अद्‌भुत आणि अनुपम ! त्याची स्थिति पाहून आकाश च गिळलें असें म्हणून मनुष्य तोंडांत बोटें घालील. अखा म्हणतो, हें कोणी विरळा च ज्ञानी पुरुष जाणतो.

## १४१ गुरुकृपांजन पायो मेरे भाई

१ बाबा रे ! गुरुकृपेचें अंजन मी डोळ्यांत ल्यालों आहें. त्यामुळें सर्वत्र मला रामरूप दिसत आहे. त्यावांचून कांहीं मी जाणत च नाहीं.

२ आंत राम, बाहेर राम, जिथें पहावें तिथें राम च राम दिसतो आहे.

३ जागेपणीं राम, निजलेपणीं राम, आणि स्वप्नांत हि तो राजाराम च मी पाहतों.

४ जनार्दनाचा बंदा एकनाथ म्हणतो भाव म्हणजे विश्वास च उत्तम. त्यामुळें जो पाहतों तो राम च पाहतों !

## १४२ नंदभवनको भूखन

१ नंदाच्या घराचें भूषण, यशोदामाईचा लाडका, बलरामाचा भाऊ आणि राधेचा खेळगडी भगवान् कृष्ण परमसुखदायक होय.

२ शिवाचें धन आणि संतांचें सर्वस्व होय. त्याचा महिमा वेदांनीं आणि पुराणांनीं परोपरीनें गाइला आहे. तो इंद्राचा इंद्र आणि देवांचा देव, किंबहुना ब्रह्माचें ब्रह्म तो आहे. तो परात्पर आहे.

३ तो काळाचा काळ, प्रभूंचा प्रभु आहे. त्याच्या बरोबरीचा कोणी च नाहीं, त्यामुळें त्याची तुलना च करतां येत नाहीं. नंददास म्हणतो, तो गिरिधर माझें जीवन च होय. पण गोकुळगांवाला तर तो कुमर कान्हा आहे सवंगडी कन्हैया आहे.

## १४३ गरब न कीजै बावरे

१ अरे मूर्खा, गर्व करूं नको. देव गर्व मोडून काढतो. पहा ! गर्वामुळें च रावण गेला; अत्यंत दुःख पावला.

२ अहंमन्यता देवाला पसंत पडत नाहीं. ज्याच्या अंतःकरणांत अभिमान आहे, त्याची तो छाती फोडतो.

३ बाबा रे ! माणसानें एक दया आणि दीनता तेवढी घेऊन रहावें. संतांकडे जाऊन त्यांचे चरण धर, तेणें करून देव तुझ्यावर प्रसन्न होईल.

४ हा च मोठा उपदेश आहे—परद्रोह करूं नये. मलूक म्हणतो, अशा हरिस्मरणानें मनुष्य संसार-सागर तरून जातो.

## १४४ राम कहो रहमान कहो

१ राम म्हणा, रहमान म्हणा अथवा कोणी कृष्ण म्हणा, महादेव म्हणा; कोणी पारसनाथ म्हणा किंवा ब्रह्मा म्हणा. बाबा रे, हें सारें विश्व ब्रह्म च आहे स्वतः.

२ घट, शराव इत्यादि भांड्यांचीं निरनिराळीं नांवें आपण घेतों; पण तीं सर्व मृत्तिकारूप च होत. त्याप्रमाणें हे सारे खंड, हे तुकडे कल्पनेनें केलेले आहेत. वस्तुतः आपण अखंड एकरूप च आहोंत; ब्रह्मरूप आहोंत.

३ जो स्वरूपांत रमतो तो राम, जो रहम(दया) करतो तो रहमान, जो कर्माचें कर्षण करतो, कर्म,—समर्पण मागतो, तो कृष्ण आणि जो शम् करतो, निर्वाण देतो, तो शंकर म्हणजे महादेव म्हणावयाचा.

४ जो आत्मरूपाला चोहों बाजूंनीं स्पर्श करून, कवटाळून बसला तो पारस म्हणजे पार्श्वनाथ आणि जो ब्रह्म ओळखतो तो ब्रह्म म्हणावयाचा

अशा प्रकारें आनंदघन म्हणतात, हे साधो ! आपण कर्ममुक्त असें चेतनमय ब्रह्म आहोंत.

## १४५ विसर न जाओ मेरे मीत

१ हे सख्या प्रभो ! मला विसरून जाऊं नकोस. हा च वर मी तुला नित्य मागतें आहें.

२ मी मंदमति आहें. मला कांहीं कळत नाहीं. तुमच्याशीं माझा विशेष स्नेह नाहीं; सलगी नाहीं. तथापि ज्याचा हात तुम्हीं एकदां धरलां त्या आश्रिताची तुम्हांला च लाज आहे. तुमच्या बरोबर च माझी जीत व्हायची आहे.

३ तुम्ही प्रसन्न व्हाल असा गुण माझ्या जवळ कांहीं च नाहीं. मी म्हणजे अवगुणांची भिंत च आहें. माझे अवगुण मनांत आणून जर तुम्ही हे प्राणनाथ ! मला विसरून जाल तर मी फार फजीत होईन.

४ मला असा दृढविश्वास आहे, हे मोहना ! तूं प्रीति सोडून देणार नाहींस. प्रभु आपल्या भक्तजनांचें अवगुण, दोष, मानत नाहीं, मनांत आणीत नाहीं, अशी जुनी च रीत आहे.

५ प्रभु दीनबंधु आहे. त्याचा स्वभाव अत्यंत मृदु आहे, कोमल आहे. त्याचें गीत मी रात्रंदिवस गातें. प्रेमसखी म्हणते, मला अधिक समजत नाहीं. पण देवाचा एक भरोसा मात्र, एक विश्वास मात्र, चित्तांत आहे. एवढें च माझें ज्ञान.

## १४६ हो रसिया मैं तो शरण तिहारो

१ हे प्रभो ! हे रसिक-शिरोमणे ! मी तुम्हांला शरण आलें आहें. माझ्यापाशीं योगादि साधन, कर्मकलापाचें बल, किंवा वाक्चातुर्य कांहींच नाहीं; म्हणून मला तुमच्या चरणांचा च एक आधार, भरोसा आहे.

२ मी नीच भूमीची कडू दुधी आहें. आणि तुम्ही, हे प्रिया! गुणसागर आहां. तुम्हींच माझा सांभाळ केला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 21920 दि: 17-9-67
नों. दि.

३ मी अत्यंत दीन असें बालक तुला शरण आलें आहे. हे नाथ ! या अनाथाला विसरूं नका, वाटेस लावूं नका.

४ हे प्रियतमा ! आपली दासी जाणून तुम्ही माझा सांभाळच कराल. प्रेमसखी म्हणते, नित्य तुमच्यावरून हा देह मीं ओवाळून टाकला आहे.

## १४७ हम तो आतम-पूजा-धारी

१ आम्ही तर आत्मदेवाचे पुजारी आहोंत. भल्याप्रकारें समजून उमजून आम्हीं निश्चय केला आहे. आणि आम्ही सर्वांना भारी आहोंत.

२ इतर देवालयामधली पूजा अस्पष्ट आहे. तिथें देवच दृष्टीला पडत नाहीं. पण आमचा देव असा आहे कीं तो स्पष्ट दिसतो, तो बोलतो, चालतो, खातो.

३ जिकडे पहावें तिकडे देवालयें, प्रभुमंदिरें, पाहतों आम्ही. तिथें आम्ही नित्य सेवा चाकरी करतों. आम्हांला पूजेची पद्धति चांगली ठाऊक आहे. तींत देवाचा स्पर्श होतों आम्हांला.

४ त्या देवाचा सन्मान करून आम्ही त्याला स्नान घालतों आणि तेल लावून त्याला चंदनाचा टिळा लावतों. मधुर वचन हींच फुलें आणि तीं आम्ही लीन होऊन त्या देवाला वाहतों.

५ देवाचें स्पर्शनपूर्वक आम्हांला नित्यशः दर्शन मिळतें आणि आम्ही त्या देवावरून वारंवार आपल्याला ओंवाळून टाकतों. हे चरणदासा, शुकदेव सांगताहेत, अष्टौप्रहर अशा प्रकारें आम्ही सुख भोगीत असतों, प्रसन्नता अनुभवीत असतों.

## १४८ जो धुनियां तौ भी राम तुम्हारा

१ हे प्रभो रामचंद्रा ! मी जरी पिंजारी असलों तरी तुमचा दास आहें. मी जन्मानें नीच जातींत जन्मलेला आणि बुद्धिहीन असा अधम आहें. आणि तुम्ही तर मुकुटमणि आहांत, शिरोधार्य आहांत.

२ हें शरीर पिंजण आहे. वाणी आणि मन हा धोका आहे. आणि पिंजणावर सुषुम्नेची तांत चढवली आहे. आकाशाच्या खोलींत पिंजारी बसला आहे. सद्गुरूनें पिंजायची कला मला शिकवली आहे.

३ पापाचा पत्तीकचरा आणि कुबुद्धीचे धूळकण अनायास झडून जातात. गांठी आणि कण्या राहत नाहींत. आणि अशाप्रकारें मग एकरंगी पिंजाई होते.

४ एकरंगी झाल्यानंतर देवाची खोळ भरली. देव म्हणाला "काय देऊं मजुरी?" पण मी मेहनतान्याचा लोभी नाहीं. मला आपलें प्रेम आणि भक्ति तेवढी द्या.

५ कृपा करून देव बोलले, "तूं तर माझा दास आहेस." दरिया म्हणतो, माझ्या हृदयांत रामभक्ति आणि विश्वास भरून द्या.

## १४९ अगर है शौक मिलनेका

१ प्रभूच्या भेटीची जर लालसा असेल तर नित्य निरंतर ध्यान धरीत जा. आणि अहंकाराला जाळून त्याचें भस्म अंगाला फाशीत जा.

२ प्रेमाची मार्जनी घेऊन हृदयांतील द्वैतरूप केर काढून टाक. द्वैताची धूळ घेऊन तो नमाजीच्या चटईवर–प्रार्थनेच्या आसनावर फेकीत जा.

३ प्रार्थनेचें आसन दूर फेंक. स्मरणी तोडून टाक. पुस्तकें पाण्यांत फेकून दे; आणि फरिश्त्यांचा, अवधूतांचा हात धर, साथ धर आणि त्यांचा दास म्हणवून घे.

४ उपाशीं मरूं नकोस. रोजे उपवास करूं नकोस. मशीद मंदिरास जाऊं नकोस आणि सिजदा-दंडवत करूं नकोस. वजू-प्रक्षालनाचा कूजा-कमंडलू फोडून टाक आणि भक्ति प्रेमाची मदिरापान करीत चल.

५ सदा सर्वदा खात जा; पीत जा. क्षणभरहि गाफिल, निरनुसंधान राहूं नकोस. भावावस्थेंत आपली प्रदक्षिणा करीत आपला अहंकार तूं जाळून टाकीत जा.

६ तूं मुल्लाहि होऊं नकोस आणि बडवाहि होऊं नकोस. द्वैत सोडून देऊन पूजा करीत चल. शाह कलंदराचा आदेश आहे की तूं 'अनल्हक', 'अहं ब्रह्मास्मि' घोकीत चल.

७ मस्ताना मन्सूर म्हणतो कीं मी आपल्या हृदयांत सत्याची ओळख केली आहे. तोच मस्तांचा मैखाना, गुत्ता, आहे. आणि त्यांत च येत चला.

## १५० उठ जाग मुसाफिर भोर भई

१ हे वाटसरा! ऊठ. पहांट झाली आहे. आतां रात्र कुठली? आणि तूं तर झोंप काढीत आहेस!

२ जो निजतो तो गमावतो, जो जागतो तो कमावतो.

३ जरा डोळे झोंपेंतून तर उघड. अरे गाफिल प्राण्या! जरा प्रभूचें ध्यान कर. प्रीति करण्याची ही रीति नव्हे. प्रभु जागत आहे आणि तूं मात्र झोंपत आहेस!

४ हे जीवा! आपल्या करणीचें फळ भोग. अरे पाप्या! पापांत सुख कुठलें? पापाचें गाठोडें तूं डोक्यावर घेतलें आहेस. मग डोकें धरून कां रडतोस?

५ जें उद्यां करायचें तें आज कर. जें आज करायचें तें आत्तां कर. चिमण्यांनीं शेत फस्त केल्यानंतर मग पस्तावा करून काय होणार!

## १५१ चेतन अब मोहि दर्शन दीजे

१ हे चेतना, हे आत्मरूपा! आतां मला दर्शन दे. तुझ्या दर्शनानें सदाशिव सुखी झाला. तुझ्या दर्शनानें हा संसार क्षेम पावतो.

२ तुझ्यासाठीं तप, संगम, कर्म, धर्म कुठवर बरें करूं? तुझ्या दर्शना-शिवाय ही सारी साधना व्यर्थ होय. आंतील चित्त तिनें भिजत नाहीं, विरघळत नाहीं.

३ कोणी अडाणी कर्म-धर्म, क्रिया-कलाप हेंच मुक्तीचें साधन होय असें म्हणतात, तर कोणी ज्ञान च आम्हांला प्यारें आहे, म्हणतात. परंतु दोहोंचा हि उच्चार करून भाव अथवा रस कांहींच पदरांत पडत नाहीं. तूं त्या दोहोंहूनहि वेगळाच आहेस.

४ हे प्रभो ! तूं अनाकलनीय, अनिर्देश्य तूं सर्वात्मक. तूं च तुला जाणतोस. वेदशास्त्रानुसार तूं निर्गुण निराकार अनिर्देश्य आहेस, अक्षर आहेस, अनिर्वचनीय आहेस. आणि हा सेवक सुजस तुझें वर्णन करीत आहे !

## १५२ ज्यौं त्यौं रामनाम ही तारै

१ रामनाम कसेंहि घ्या, तेंच तारतें. कळत न कळत, कसाहि अग्नीचा स्पर्श झाला तरी तो भाजतोच भाजतो.

२ सरळ अथवा उलटें, कसेंहि पडलें तरी बीज हें भूमीमध्यें उगवल्या-खेरीज राहत नाहीं, हें निर्विवाद. हरिस्मरण हें असेंच आहे.

३ वेदांचें आणि पुराणांचें मंथन करून जें तत्त्वसार काढलें तें हें रामनाम होय. कर्म उपासना आणि ज्ञान या तिन्ही परमार्थाच्या शाखांमध्यें आगळें, पापमात्र भस्म करणारें, असें हें रामनाम आहे.

४ हें रामनाम हृदय निर्वासन करतें, बुद्धि सतेज करतें आणि परम पदवी प्राप्त करून देतें. सहजोबाई म्हणते, चरणदास सांगताहेत, कीं हें हरिनाम सर्व रोग हरण करतें.

## १५३ तैं नर, का पुरान सुनि कीन्हा

१ हे मानवा! तूं शास्त्रपुराण ऐकून काय जोडलेंस ? तुझ्या ठायीं अनपायिनी, अव्यभिचारिणी, निष्ठावंत भक्ति उत्पन्न झाली नाहीं. भुकेल्यांना तूं दानधर्महि केला नाहींस.

२ तूं काम विसरला नाहींस, क्रोध विसरला नाहींस आणि लोभहि तुझा कायमच आहे. तृष्णा तर मनांत ठाणेंच देऊन बसली आहे. अशाप्रकारें तुझी सारी सेवा व्यर्थ झाली !

३ वाट पाडून, घरफोडी करून गुन्हेगार पोट भरतो. ज्या योगें सद्गति दुरावते, लोकांत अपकीर्ति होते तीच अविद्या कमावली त्यानें !

४ मनांतून हिंसा गेली नाहीं. जीव-दया संवर्धिली नाहीं आणि परमानंद म्हणतात, संतांच्या संगतींत बसून पवित्र कथाहि सेविली नाहीं ! ( हें का मानवजीवन म्हणावयाचें ? )

## १५४ मैं तो बिरद-भरोसे बहुनामी

१ हे बहुनामी ! हे अनंत नामें धारण करणाऱ्या प्रभो ! मी तर तुझ्या दीनबंधु, पतितपावन, जडजीवोद्धरण अशा नामांच्या भरोशावर बसलों आहें. मी सेवा किंवा भक्ति कांहीं च जाणत नाहीं. हे परम गुरो ! हे स्वामी !

२ तुम्हीं गज आणि गृध्र या पशुपक्ष्यांना, या जडजीवांना, तारिलें आहे. तुम्हीं नष्ट गणिका आणि भ्रष्ट अजामिल या पापी पतितांना तारिलें आहे.

३ अशी ही पुराणांतरींची साक्ष कानांवर असल्यामुळें हे सुखधाम! तुमच्या चरणाला शरण आलों आहें मी.

४ प्रेमानंद म्हणतो, हे अंतर्यामी ! तुम्ही आतां मला तारा अथवा मारा. सर्वस्वी मी तुमच्या अधीन आहें.

## १५५ संत परम हितकारी

१ या जगांत संत हे परम हितकर्ते होत.

२ कारण भगवच्चरणीं ते भक्तिप्रेम उत्पन्न करतात आणि महान् भ्रम दूर करतात.

३ ते प्राणिमात्रांविषयीं परम कृपालु असतात. देवाप्रमाणें ते दुःखमात्र दूर करतात.

४ ते त्रिगुणातीत देहभावाविषयीं पूर्ण उदासीन होऊन फिरत असतात. अशी त्यांची जगावेगळी रीत आहे.

५ ब्रह्मानंद म्हणतात, संतांच्या संगतींत देवाची साक्षात् भेट होते.

## १५६ हे जगत्राता विश्वविधाता

१ हे प्रभो ! तूं च जगाचें त्राण करणारा आहेस. तूं च जगाचे विधान करणारा आहेस. तूं च सुखाचें आणि शांतीचें निधान आहेस. तूं प्रेमाचा सिंधु, दीनांचा बंधु असून दुःख आणि दैन्य यांचा तूं विनाशक आहेस.

२ हे प्रभो ! तूं नित्य आणि अखंड अर्थात् काल आणि दिक् यांनीं

अपरिच्छिन्न असा आहेस. तूं अनादि आणि अनंत आहेस. अर्थात् तूं कार्य-कारण-भावातीत आहेस. तूं सनातन आहेस. पूर्ण ब्रह्म आहेस.

३ तूं ह्या जगाचा पालक, जगाचा नियंता आणि ह्या जगाचा पूजनीय पिता आहेस. तूं तुझ्या च सारखा असा अनुपम आहेस; एकमेवाद्वितीय आहेस. तूं अनिर्देश्य आहेस, तूं सर्व वर्णातीत आहेस; रक्तश्वेतकृष्णप्रभा-भिन्न आहेस, अर्थात् तूं रंगरूपरहित आहेस.

४ तूं प्राणांचा प्राण, त्रिभुवनाचा प्रतिपालक, जीवनाचा मूलाधार आहेस.

## १५७ हैं बहारे बाग दुनिया चंदरोज

१ जगाच्या बगीच्याची ही शोभा थोडक्या दिवसांची आहे. तिची मौज पाहून घ्या थोडे दिवस !

२ हे वाटसरा ! प्रवासाची तयारी कर. या जगांत वास्तव्य थोडक्या च दिवसांचे आहे !

३ सहस्रंजीव लुकमान हकीमाला विचारलें, बाबारे ! तुला किती वर्षें झालीं ? तेव्हां त्यानें दुःखानें हात चोळून म्हटलें, 'थोडे दिवस' !

४ कबरेंत दफन केल्यानंतर मृत्यु म्हणाला, आतां येथें पडून रहा, थोडे दिवस !

५ मग हे मित्रांनो ! तुम्ही कोठें आणि मी कोठें ? तुमचा आमचा सहवास बस थोडे च दिवस आहे !

६ हृदयानें निरपराध असलेल्याला कां उगी च सतावतां ? हे जुलम करणाऱ्या जालिमांनो ! अरे हा जमाना, हा काळ, थोडे च दिवस आहे !

७ हे नजीर ! कबरेच्या दिवशीं, दफनाच्या दिवशीं, तूं आठव कीं या जिंदगीचा, या जीवनाचा, भरोसा काय थोडे च दिवस आहे !

## १५८ आजि सोनियाचा दिनु

१ आज सोन्याचा दिवस आहे. परम भाग्याचा दिवस आहे. मेघ नव्हे, हें सारें आकाश अमृताची वृष्टि करीत आहे.

२ बाह्य विश्वासकट अंतराला व्यापून एक च एक परमात्मा संचला आहे.

३ हृदयाच्या इष्टिकेवर, श्रद्धेच्या पादपीठावर, आणि मनाच्या कल्प-द्रुमाखालीं वनमाळीची ती मोहन मूर्ति विराजमान आहे.

४ खरोखर संतसमागम फार भला आहे. त्याच्यायोगें च तर हा आत्माराम प्रगट झाला आहे.

५ आणि हा संतसमागम लाभला ही सारी त्या रुक्मिणी-रमणाची, विठ्ठलाची कृपा होय, करुणा होय.

## १५९ आतां विश्वात्मकें देवें

१ आतां विश्वरूप देवानें माझ्या या वाग्यज्ञानें संतुष्ट व्हावें आणि संतुष्ट होऊन मला हें प्रसाद-दान द्यावें :

२ दुष्टांचा वांकडेपणा दूर होवो, त्यांना सत्कर्माची गोडी लागो आणि एकूण सर्व च जीवांमध्यें परस्परांशीं जिव्हाळ्याची मैत्री होवो.

३ पापाचा अंधार फिटो आणि विश्वांत स्वधर्मरूप सूर्य तळपो. तत्परिणामीं सर्व जीवांचे सर्व मनोरथ सफल होवोत.

४ सर्व मंगळांचा वर्षाव करणारी ईश्वरनिष्ठ संतांची मंडळी या भूमंडळावर सर्व जीवांना निरंतर भेटत राहो.

५ ते संत म्हणजे जंगम कल्पतरूंचें वन च होत. जिवंत चिंतामणींचे गांव च होत. अमृताचे बोलके सागर च होत.

६ ते संत म्हणजे निष्कलंक चंद्र च होत. तापहीन सूर्य च होत. असे ते संतजन सर्वदा सर्वांचे सुहृद् होवोत, जिवलग होवोत.

७ किंबहुना, हे तिन्ही लोक सर्व सुखांनीं संपन्न होऊन आदिपुरुषाचें, परमेश्वराचें, निरंतर भजन करीत असोत.

## १६० आरंभीं आवडी आदरें आलें नाम

१ प्रथम मी श्रद्धापूर्वक म्हणजे च प्रेमानें व आदरानें ईश्वराचें नाम-स्मरण करूं लागलों; किंबहुना सहज च तें माझ्या मुखांत आलें आणि त्यामुळें सर्व सिद्धि मिळाल्या. जगांत माझे सारे मनोरथ पुरे झाले.

२ हे रामा, हे कृष्णा, तूं माझी माय माउली आहेस. तूं वत्सल जननी आहेस. किंबहुना तूं माझ्या जिवाचा जिव्हाळा आहेस; जीवन-तंतु आहेस.

३ तुझ्या नामाच्या योगें, तुझ्या श्रद्धेच्या योगें, हे रुक्मिणी-रमणा *श्रीविठ्ठला,* माझा सारा संदेह दूर झाला आहे.

[ *या भजनांत ज्ञानदेव महाराज साधनेचे* आदि, मध्य, अंत एक *नाम च आहे, श्रद्धा* च आहे, असें सांगत आहेत.

तंत्रांत जसें बीज शक्ति कीलक असतें तसें इथें तें तिन्ही एक नाम च वर्णिलें आहे. आरंभीं बीज असतें. त्याचा नंतर अंकुर होतो आणि शेंवटी त्याला कणिस येतें. या तिन्ही अवस्था वेगवेगळ्या खऱ्या पण त्या साऱ्या एका बीजाच्या च आहेत. तसें नाम च साधनेला बीजरूप मध्यंतरीं शक्तिरूप आणि अंतीं फलरूप होय.

भिद्यते हृदय-ग्रंथिश् छिद्यन्ते सर्व संशयाः
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे

ही जी उपनिषदांनीं अंतिम अवस्था वर्णिली आहे ती इथें ज्ञानदेव एका नामानें मिळाल्याचें वर्णीत आहेत. ]

## १६१ एक नाम हरि द्वैत नाम दुरीं

१ एक हरि नाम घेतलें कीं मग दुसरें कशाचें नाम घ्यायला च नको. हरि म्हटलें कीं द्वैत हरलें च! द्वैताचें हरण करतो, म्हणून च तर तो हरि झाला! ही हरिलीला, ही अद्वैताची खुबी कोणी एखादा च जाणतो.

२ तो हरि साम्यस्वरूप आहे. तिथें मग 'यम म्हणे काय यमावें? दम म्हणे काय दमावें' असें होतें. यम-दमांचा सारा च श्रम तिथें शमतो. [पहा गीता ६.३]

३ सर्व (जलपूर्ण) घटांमध्यें जसा एक च सूर्य प्रतिबिंबित होतो तसा सर्व देहांमध्यें एक च आत्मा प्रतिबिंबित झाला आहे. प्रतिबिंबें अनेक दिसलीं तरी बिंब एक च असतें, त्याप्रमाणें देही म्हणजे जीव अनेक दिसले तरी आत्मा एक च आहे.

४ ज्ञानदेवाच्या चित्तांत (म्हणजे मनांत आणि बुद्धींत) हा हरिपाठ स्थिर झाला आहे. तत्परिणामीं तो म्हणतो—मी पुढील आणि मागील सर्व च जन्मांतून मुक्त झालों आहें.

[ ज्ञानामुळें पुढचा जन्म निर्मूल होतो आणि मागील जन्मांचा क्रम खुंटतो. ]

## १६२ कर्माचिया रेखा नुल्लंघती अशेखा

१ मनुष्य जीं बरीं-वाईट कर्मे करतो त्यांच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या बंधनापासून मनुष्य सर्स्वीं सुटूं शकत नाहीं. कर्मांची निर्जरा, तपश्चर्यादि, यज्ञादि, योगादि या स्थूल-सूक्ष्म केवळ कर्मांनीं होऊं शकत नाहीं, त्यासाठी विशेषेंकरून श्रद्धामय भगवद्भक्ति च केली पाहिजे.

२ भगवद्भक्तीशिवाय, सर्व भावानें भगवंताला शरण गेल्याशिवाय, कर्मबंधनांतून, पापांतून, मनुष्याची मुक्ति होत नाहीं.' ' सर्वधर्मान् परित्यज्य माम् एकम् शरणं व्रज । अहं त्वा सर्व-पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।। या गीता-वचनांत हें च प्रतिपादिलें आहे. तूं आपल्या गळचांत राम-कृष्ण अशा नामांची माला, कंठी घाल. जीवनाचा तो स्रोत जो राम त्याचा अखंड जप कर.

३ हें सारें विश्व भगवद्रूप आहे असा विचार करावा आणि म्हणून कुणाची हि हिंसा होऊं नये; कुणाला हि दुखवूं नये, सर्वांवर कृपा आणि करुणा च करावी, असा आचार ठेवावा. आणि वाणीनें रामनामाला बळकट धरून रहावें. म्हणजे मनांत भगवद्भाव, जनांत भगवद्सेवा, आणि वचनांत भगवत्नाम, भगवत्-कथा वसावी. असा तिहेरी हा भक्ति-मार्ग आहे.

४ जो सर्वांचा आहे आणि जो सर्वांच्या ठाईं आहे, जो विश्वात्मा च निजात्मा आहे, त्याचें तूं आकलन करून घे. त्याला तूं आपल्या ध्यानांत बांधून ठेव. आणि रसनेनें रसपूर्वक राम-नाम मुखरित कर.

५ अशा प्रकारें जर तूं भगवच्छरण झालास तर मग तुला मरण नाहीं, मग तूं त्या विठ्ठलाच्या समचरणांना, त्या परमसाम्याला पोंचलास.

६ ज्ञानदेव म्हणतो, निवृत्तिनाथांच्या कृपेनें, गुरुकृपेनें. हा मार्ग लाभला आणि विठ्ठलनामाच्या योगें तो पार पडला. आणि आतां मी पंढरींत हरि आणि हरिजन यांच्या मेळयांत सुख-विहार करीत आहें.

## १६३ गुरु लिंग जंगम तेणें दाविला आगम रे

१ गुरुदेव हा एक जंगम म्हणजे चालतें-फिरतें शिवलिंग होय. त्यानें मला पुढील आगम म्हणजे शैवी उपासना सांगितली आहे. आपलें मन, जें जगभर दौडादौड करीत असतें, एकाग्र करावें. त्यानें च खरें समाधान मिळतें

२ अगदीं जवळ हृदयांत च विश्वाचें जीवन-सूत्र अंतर्यामी परमेश्वर विराजमान असतां कां उगा च वणवण हिंडतो आहेस ! मी म्हणून कोणी आहें, मी मशक वा गज, चांडाळ वा द्विज असला कुठला च अभिमान धरूं नये. अभिमानमात्राचा च त्याग करावा. आणि सर्वत्र समबुद्धि राखावी, म्हणजे ब्रह्मज्ञान होतें.

३ अहंभाव विश्वव्यापक कर. मी च हें सारें विश्व झालों आहें; समोर भेटणारें प्रत्येक माझें च निजरूप आहे, अशी सर्वत्र समबुद्धि कर. त्यानें च तुला विश्रांति लाभेल. हे जंगम लिंगा, हे शिवमूर्ते, गुरुदेवा ! मी दुसरें कांहीं मागत नाहीं. फक्त एवढी च कृपा मजवर कर. तो अनहं-भाव तेवढा मला दे. त्यानें च मला अमृतपान मिळेल. बाकी सारे वर नश्वर आहेत, मृत्यु-ग्रस्त आहेत

४ ज्ञानदेव म्हणतो, गुरुरूप रुक्मिणी-कांतानें तें अमर जीवन मला दिलें आहे ज्यायोगें तहान-भूक हरते आणि आत्मभाव तेवढा उरतो.

## १६४ गोपाळा रे तुझें ध्यान लागो मना

१ हे गो-पाळा, हे विश्व-पते ! तुझें ध्यान, तुझा अखंड ध्यास, मनाला लागून राहो. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांतील सृष्टींचें प्राण-तत्त्व असणाऱ्या आणि या तिहींचे हि हरण करणाऱ्या हे, हरे ! तूं जो

नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त त्या तुला सोडून अनित्य अशा दुसऱ्या कशावर हि मी विसंबून राहत नाहीं. मला एक तुझा च भरोसा आहे.

२ आज सोन्याचा दिवस आहे आणि अमृतवृष्टीनिशीं तो उजाडला आहे. कारण, मुखानें नाम घ्यावें आणि त्या च वेळीं डोळयांनीं रूप पहावें असा योग आज साधला आहे. सर्वत्र परम साम्य अनुभवतें आहे.

३ मी देहानें आणि मनानें त्या तुझ्या परम साम्यरूप चरणीं स्थिरावलों आहें, विसावलों आहें. त्रिगुणात्मिका प्रकृतीच्या पर आणि तिचा वर जो परमात्मा त्याहून अन्य मी कांहीं च जाणत नाहीं.

## १६५ जाणोनियां नेणपण अंगीं बाणलें

१ आत्मतत्त्वाचें ज्ञान झाल्यामुळें नेणपण म्हणजे निरहंभाव अथवा अनहंभाव अंगीं बाणला आणि त्या अनहंभावामुळें जाणपण म्हणजे ज्ञातृत्व हि सहज च विसरलें.

२ अशा प्रकारें आत्मज्ञानाची गति संथ झाली. तिच्यांत नि:शब्दता आली आणि तें ज्ञेय ज्ञाता ज्ञान या त्रिपुटीहून भिन्न प्रबोध-तत्त्व. मला प्राप्त झालें.

३ जेव्हां गुरुमुखानें प्रबोध लाभतो तेव्हां च स्वप्नोत्थितवत् मायेचें भय, संकट, दूर होतें आणि मग उरतो तो केवळ सच्चिदानंद, आनंदी आनंद !

## १६६ तुझी सेवा करीन मनोभावें वो

१ हे विठ्ठल-देवते ! तुझी सेवा मी मनोभावानें करीन. षोडषोपचारांनीं, महाराजोपचारांनीं पूजक पूजा करतात; पण तिथें मनोयोग, जिव्हाळा, असतो च असें नाहीं. मी मात्र विश्वरूपाची सेवा अगदीं मनापासून करणार आहें. कारण माझें मन, हे गोविंदा, तुझ्या ठिकाणीं रंगून गेलें आहे. चांभार चामडें रंगवतो, बाभळी वगैरेच्या सालीचे रसांत बुडवून ठेवून पकवतो, तें आंतून बाहेरून रोमरोमांत रंगतें तसें माझें मन गोविंदाच्या योगें परिपूर्ण रंगून गेलें आहे.

२ हे विठ्ठल देवते, तुझ्यासाठीं मी नवस करीत आलों आहें; तूं माझी नवसाची देवता आहेस.

३ तुझ्यासाठीं मीं सर्वस्वाचा त्याग केला आहे. सारें, देह नि द्रव्य, तुला मीं केव्हां च वाहून टाकलें आहे. आणि आतां तर तूं माझें चित्त नि चैतन्य हि चोरून नेलें आहेस. मी तुला सर्वस्व अर्पण करतांना केव्हां माझें चित्त गेलें आणि केव्हां चैतन्य हरपलें कांहीं च कळलें नाहीं ! आतां 'मी' नाहीं नि 'माझें' नाहीं. सर्व तूं च तूं आहेस.

## १६७ तूं तों माझें मी तों तुझें

१ तूं माझें इष्ट आहेस, मी तुझें प्रेष्ठ आहें. जननीबालकवत्. असें आपलें दोहोंचें ऐकात्म्य झाल्यावर दुजेंपण उरलें च कुठें ?

२ वस्तुत: तूं तो मी आणि मी तो तूं आहेस. अज्ञानामुळें बिचारा जीव हें बिंब-प्रतिबिंबवत् आपलें अद्वैत जाणत नाहीं.

३ जें निर्‌गुण होतें तें आत्मशोधासाठीं सगुण साकार झालें, दुभंगलें. आणि अज्ञान दूर सारून परत समुद्रलवणवत् एकवटलें.

४ ज्ञानदेव म्हणतो, हे माझ्या जीवा परतून पहा. जीवाचें संजीवन कुठें आहे तें बघ. अरे तें बाहेर नाहीं, आपल्या च ठाईं आहे.

## १६८ धर्म जागो निवृत्तीचा

१ आतां सर्वत्र निवृत्तीचा धर्म जागो. केवळ एक हरिनाम गाजो. माझी इहपर कर्तव्य-भावना आणि पुरुषार्थ-प्रेरणा, दान-मानादिक सामाजिक प्रवृत्ति आणि इंद्रियांची विषयांविषयीं स्वार्थ-वृत्ति सारीं च खंडलीं आहेत. केवळ एक नामस्मरणाचा ध्यास आहे.

२ सद्‌गुरुरूप कल्पवृक्षाच्या छायेंत कल्पनेचें, खटपटीचें, काम च उरलें नाहीं. भक्तिरूप अमृताच्या निरंतर सेवनानें चिंता नाहींशी झालेली आहे. हरिप्रेमरूप वैकुंठींच्या आनंदांत मन मग्न झालें आहे. दोष-शोधन होऊन पाप फिटल्यामुळें ताप हि पळाला आहे.

३ वेदशास्त्रादिकांचें रहस्य उकलून आत्मारामाची खूण पटली आहे. तत्परिणामीं मोहजालरूप वासना, वासनांचीं अनेकविध आलंबनें, वासनांतून निर्माण होऊं शकणारे आगामी देह, आणि एकूण हृदयाचे सर्व-ग्रंथि एकदम च तुटले आहेत.

४ बुद्धि आणि बोध यांचा कितीक जन्मांचा वियोग आतां फिटला आहे. हाता-पायांत नवीन चैतन्य आलें आहे. डोळ्याच्या आंत डोळा उघडला आहे. किंबहुना मी च डोळा झालों आहें. त्यामुळें सर्व च समाधान आहे. देहाचें दिव्य परिवर्तन झालें आहे. जणूं अमृत-कला च त्यांत ओतली आहे. दाही दिशा पूर्वीसारख्या पोकळ राहिल्या नाहींत. घनदाट भरून गेल्या आहेत. सर्व च ब्रह्मरूप होऊन विज्ञान फळास आलें आहे.

५ निवृत्ति-गुरूंची ही कृपा आहे. त्यांनीं माझा आंधळेपणा दूर करून मला एक जीवन-व्यापी दृष्टि दिली. तिच्या आधारानें मी जगलों. आत्माराम-रूप रमणीय अंजन डोळ्यांत पडलें. मायेचा काळोख दूर झाला. निवृत्ति-नाथांनीं ज्ञानदेवाला ज्ञानगंगेंत समाधि दिली. आतां त्यांचा च धर्म जागो आणि हरिनाम गाजो !

## १६९. पाहें पां ध्वजेचें चिरगुट

१ झेंडा म्हणजे साधें फडकें च असतें, पण त्याचें रक्षण करण्यासाठीं राजाला कोण कष्ट पडतात ! त्यासाठीं त्याला चतुरंग सेना पदरीं बाळगावी लागते. तसा मी हि एक पतित जीव आहें; परंतु त्यावर तुझी मुद्रा पडली आहे. तुझा भक्त म्हणून तो मिरवतो आहे त्याचा सांभाळ करणें म्हणजे तूं आपली प्रतिष्ठा सांभाळणें आहे.

२ राजा एक आज्ञापत्र काढतो. आज्ञापत्र म्हणजे काय ? कागदावर लिहिलेलीं शाईचीं चार अक्षरें ! परंतु त्यांचें उल्लंघन होणार नाहीं, त्यांचा अनादर होणार नाहीं, याबाबत राजा दक्ष असतो. राजाचें आपलें सारें सामर्थ्य त्या चिटोऱ्यामागें असतें. त्याप्रमाणें हे प्रभो ! जरी मी हीन-दीन असलों, पतित असलों, तरी मी तुझा दास आहें. आणि तुझें नांव आहे, 'अनाथ-नाथ' 'पतितपावन,' 'भक्तजनप्रतिपालक.' तेव्हां तूं तें आपलें नांव राख, आपली अप्रतिष्ठा अकीर्ति होऊं देऊं नकोस.

## १७० मावळवीत विश्वाभासु

१ अद्भुत(बोध)सूर्य उगवला आहे, त्याला नमस्कार असो. सूर्याच्या उदयानें विश्व भासित प्रकाशित होतें, तर याच्या उदयानें विश्वरूप आभास मावळतो मिटतो आणि अद्वैत कमळ विकसित होतें.

२ अविद्यारात्रीवर तो क्रोधायमान होतो आणि ज्ञानाज्ञानरूप चांदण्यां-सकट तिला तो गिळून ज्ञान्यांना आत्मबोधाचा स्वच्छ निरभ्र दिवस करतो.

३ त्याच्या उदयानें दिवसाच्या जन्माच्या सुवेळीं जीवरूपी पक्ष्यांचे आत्मज्ञानाचे डोळे उघडतात आणि ते मग देहात्मभावाच्या घरट्यांतून बाहेर पडतात.

४ त्याच्या उदयानें लिंगदेहरूप कमळाच्या पोटांत खितपत पडलेल्या चिद्रूप भ्रमराची कैदेंतून सुटका होते.

५ भेदरूपी नदीच्या या आणि त्या थडीवर शब्दरूपी अंधारांत गुरफटून बुद्धि आणि बोध विरहानें वेडीं होऊन आरडत असतात.

६ त्या चक्रवाक-जोडप्याचा विरह फेडणारा आणि त्यांना ऐक्याचें मीलनाचें समरसतेचें समाधान देणारा चिद्रूप गगनांतील तो भुवनदीप आहे.

## १७१ योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी

१ योगी डोळे मिटून ज्याचा शोध घेतात आणि मोठ्या प्रयासानें ज्याला गांठतात, तो देव मीं उघड्या डोळ्यांनीं पाहतों आहें. कारण आमचा तो देव केवळ निर्गुण नाहीं, तर सगुण असून निर्गुण आहे. त्याचें हें अपरूप रूपवैभव पाहून तृप्ति ती कशी होत च नाहीं.

२ जो एकरूप च आहे तो दरिद्री कसला देव ? त्याला एकवेळ देव हि म्हटलें तरी तो देवांचा देव तर नव्हे च. जो विश्वरूप आहे, तो च खरा देवाधिदेव ! तो सर्वांतर्यामी मी नुसता पाहिला च नाहीं, तर पाहिला आणि पाहिला आहे. त्याचें मला नुसतें एकवार दर्शन झालें आहे असें नव्हे, तर त्याचें अनुदर्शन झालें आहे. त्यामुळें आतां मुळीं संदेह च उरला नाहीं. कारण जो तो तो च मी ही अनुभूति अनुभवतें आहें.

३ अनंत वेशांत आणि अनंत रूपांत त्याला मी पाहिलें आहे आणि तो च हा विटेवर उभा विठोबा रखुमादेवीवर आहे ही खूण मला मनोमन पटली आहे.

## १७२ रामकृष्ण नामें इयें दोन्ही साजिरीं

१ राम आणि कृष्ण हीं देवाचीं दोन नामें गोड आहेत. आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यांत त्यांचें स्मरण करीत चल.

२ स्वत: च तूं आपली या नामस्मरणाच्या योगें सुटका करून घे. संसाराचें बंधन तोडून मोकळा हो.

३ ज्ञानदेवाचें नामस्मरण हें च ध्यान आहे. रामकृष्ण-नामाची स्मरणी तो मनोमन फिरवीत असतो आणि हृदयांत श्रीमूर्तीचा जिव्हाळा जागत असतो.

[ नामस्मरण हा भक्ति-मार्गाचा बीजमंत्र आहे. ज्ञानमार्गाचें जसें विचार, ध्यानमार्गाचें जसें संयमन, कर्ममार्गाचें जसें फलनिरपेक्ष लोकसेवारूप यज्ञकर्म, तसें भक्तिमार्गाचें मुख्य साधन नामस्मरण आहे. ह्या नामस्मरणाला देवाचें कोणतें हि नाम चालण्यासारखें आहे. वेदांतील ओंकार हें निर्गुण ब्रह्माचें नाम आहे. पुराणांतील राम कृष्ण हीं नामें सगुण साकार ब्रह्माचीं आहेत. संतांच्या वचनांतील राम वा कृष्ण नाम हें केवळ सगुण हि नाहीं आणि केवळ निर्गुण हि नाहीं. तें दोहोंना सामावणारें आहे. अतिसगुण अतिनिर्गुण असें तें अनिर्वचनीय आहे. आणि भक्तिमार्गाचें तें मुख्य आलंबन आहे. त्यांत सगुणाचा निषेध नाहीं आणि निर्गुणाचा हि निषेध नाहीं. त्यांत निषेधाचा च निषेध आहे

ध्यानयोगामध्यें स्वावलंबन ऊर्फ आत्मप्रयत्न यावर जोर असतो, परंतु इथें हि भक्तिमार्गांत आपली आपण सोडवणूक करून घ्यावयाची आहे. पण इथला प्रयत्न, देवाला अनन्य भावानें शरण जाणें इतका च. नामस्मरणाची कास धरणें, हा त्याचा आरंभ. नौकेंत बसल्यानंतर आपणांला कांहीं खटपट करावी लागत नाहीं. नावाडी परतीराला आपल्याला सुखरूप पोंचवून देतो. नौकेंत बसणें एवढा च प्रयास आपल्याला करावा लागतो.

हातावर हात मारून पोहणाऱ्याप्रमाणें प्रवाह कापीत जावें लागत नाहीं. भक्तिमार्ग आणि इतर मार्ग यांत हा च फरक आहे. भक्तिमार्गांत तो निवडण्याचें ज्ञान, आवड आणि प्रयत्न म्हणजे च ज्ञान, ध्यान आणि कर्म गृहीत आहे. ईश्वराचा जिव्हाळा हें त्याचें अनन्य साधन आहे; अवांतर दुसऱ्या कशाची मातब्बरी नाहीं. ]

## १७३ सकळ नेणोनियां आन

१ मनुष्य जगामध्यें नाना प्रकारचीं ज्ञानें मिळवितो आणि अभिमान धरतो; परंतु ज्याच्या साहाय्यानें हीं ज्ञानें मिळवितो, त्याचें तेवढें ज्ञान तो करून घेत नाहीं.

२ हें तर झालें अध्यात्म-ज्ञानाविषयीं. परंतु भक्त तर त्या आत्म-ज्ञानाची हि जिज्ञासा राखत नाहीं. तो ती जिज्ञासा ईश्वराला अर्पण करून एक हरिपाठ मात्रकरतो. याचें च नांव ' सकळ नेणूनियां आन एक विठ्ठलचि जाण.'

३ जिज्ञासु तत्त्वज्ञानाच्या योगें परम-लाभ करून घेतो. योगी ध्यान धरून, "ध्यानावस्थित तद्गतेन मनसा" हृदयस्थ आत्मज्योति निहाळतो. भक्त त्या हि भानगडींत पडत नाहीं, तो आपल्या मनाचा निरोध करीत नाहीं. तें जाईल तिकडे जाऊं देतो आणि तिथें तिथें तो हरिदर्शन करतो. याचें च नांव 'पुढती पुढती मन एक विठ्ठलचि जाण.'

४ जसे कांहीं ज्ञानमार्गी, कांहीं योगमार्गी तसे कांहीं गुरुसंप्रदायी हि असतात. ते गुरुमंत्र घेतात. आपला पूर्ण विश्वास गुरूवर टाकतात. आणि अनन्यभावानें त्याला शरण जातात. लवकरांत लवकर परम-लाभ करून घेण्याचा हा सोप्यांत सोपा मार्ग आहे. परंतु याचें ज्ञान गुरु-शिष्यांबाहेर तिसऱ्याला नाहीं. तें परम रहस्य आहे. परंतु भक्ताच्या जवळ अशी कांहीं कान-गोष्ट नाहीं. त्याचा आपला उघडा मंत्र श्रीराम आहे. त्याला एकांत नको. त्याला तर भक्तांचा मेळावा पाहिजे. भक्तांच्या मेळाव्यांत हरिनामाचा जो कल्लोळ उठतो त्यानें सगळे धन्य होतात.

५ तिसरा कोणी एखादा शून्यवादी निघेल; आणि तो म्हणेल, मला तुमचें तें ब्रह्मज्ञान नको, आत्मध्यान नको. आणि नकों तें तुमचें गुरुगम्य गुपित. मला तर निर्वाण हवें आहे, तर त्याला हि तें निर्वाण विठ्ठलाच्या च पायी मिळेल. निर्वाणांत काय आहे ? स्नेहक्षय, मोहक्षय च ना ? हें हवें तें नकों या रागद्वेषात्मक द्वंद्वांतून, या द्वंद्वरूप संसार-तापांतून, मुक्ति म्हणजे च निर्वाण ! तें तर हरिनाम-सुधा-सिंचनानें च लाभतें. हरिनाम-सुधा-सिंचनानें च द्वंद्व-दाह शमतो. आणि त्यावर त्याला ब्रह्मसुख अनुभवतें. तुला तर नुसतें निर्वाण च हवें होतें परंतु हें तुला ब्रह्मनिर्वाण मिळेल या हरिनामानें, हरिभजनानें.

६ जगांत परमप्राप्तीचे खरोखर दोनच मार्ग आहेत. एक श्रद्धा आणि दुसरा विचार. श्रद्धेच्या मार्गाला भक्तिमार्ग म्हणतात. विचाराच्या मार्गाला ज्ञानमार्ग म्हणतात गीतेंत म्हटलें आहे ना – "नसे ज्ञान नसे श्रद्धा संशयी नासला पुरा । न हा लोक न तो लोक न पावे सुख संशयी ।।" संशयाचा छेद करणारे असे हे दोन च मार्ग आहेत आणि त्या दोहोंचे पर्यवसान दोहोंचा संगम होतो हरिचरणीं. म्हणून तुम्ही तत्त्वविचार करा कीं भाव धरा, शेंवटीं तुम्हांला पोंचायचें परमार्थाला च आहे.

७ फार काय सांगावें. तो जो परमार्थ, तो जो परमपुरुषार्थ, या सर्व विश्वाचा बाप विठ्ठल, त्याची आज्ञा आहे कीं एक मला विठ्ठलाला च जाण, ओळख, भेट; बाकी सारें सोड.

## १७४ सर्वादि सर्व-साक्षी तो

१. बाई प्रज्ञे, तो परमात्मा सर्वांचा आरंभ आहे, उगम आहे, बीज आहे. तसा च तो सर्वांचा साक्षी हि आहे; म्हणजे विश्वोत्पत्ति, स्थिति लयादि सर्व परिवर्तनांचा अपरिवर्तनशील असा द्रष्टा आहे तो. अशाप्रकारें ह्या साऱ्या विश्वाचा तो केवळ आदि आणि अंत च नाहीं तर दृश्यमान विश्वरूप मध्य हि तो च आहे. म्हणून त्याला विश्वंभर म्हणतात. खरोखर कारणरूपानें तो च हें सारें विश्व आहे.

२ या साऱ्या विश्वाचें तो केवळ अधिष्ठान म्हणून सद्रूप च नाहीं, तर त्याबरोबर च चिद्रूप आणि आनंदरूप हि आहे. तो सर्व ज्ञानांचें ज्ञान आहे. म्हणजे सर्व ज्ञानें त्याच्या च आधारें होतात. तसा च तो सर्व आनंदांचा हि आनंद आहे. अर्थात् सर्व आनंदांची उपलब्धि त्याच्या च मुळें होते, आणि त्यांत च परिसमाप्ति होते.

३ परंतु हा जो निर्गुण आणि निराकार तसा च सगुण म्हणजे सच्चिदानंद-पदवाच्य पण तरी हि निराकार च परमात्मा तो च हा विठ्ठल भक्तासाठीं साकार झाला आहे. विटेवर विराजमान आहे.

[ टिप्पणीः– श्रद्धामय वेदमंत्रांनीं गाईलेला, हेतुयुक्त उपनिषद्‌वचनांनीं विवेचिलेला निर्गुण सगुण परमात्मा जोंपर्यंत प्रत्यक्ष आमच्यांत येऊन देह धारण करून आपल्या जन्म-कर्म-गुणरूप कीर्तीनें आमच्या सर्वेंद्रियांचें अकर्षणस्थान बनत नाहीं तोंपर्यंत आम्हां सामान्य मानवांना संतोष होत नाहीं. ' अव्यक्ता हि गतिर् दुःखं देहवद्भिर् अवाप्यते " –या गीतावचनांत हा च अनुभव, हें च राजगुह्य सांगितले आहे. आणि तें च इथें ज्ञानदेवांनीं निरूपिलें आहे. वेदोपनिषदांनीं गाइलेला आणि विवेचिलेला जो परमात्मा तो च हा माझा रखुमादेवीवर होय हें त्यांनीं इथें निर्गुण सगुण साकार या क्रमानें प्रस्थापिलें आहे.]

## १७५ साधु-बोध जाला तो नुरोनियां ठेला

१ साधु-बोध म्हणजे साधूपासून मिळालेला बोध, त्याचप्रमाणें साधु म्हणजे सुंदर बोध. असा साधु-बोध मला झाला आणि होऊन हि बोधरूपानें तो शिल्लक उरला नाहीं, म्हणजे तो इतका सहज झाला कीं त्याचें भान हि उरलें नाहीं. म्हणजे च तो बोध, तो अनुभव, आपल्या च ठाईं मुरून गेला.

२ याला दृष्टांत कापराच्या वातीचा. कापराची वात उजळते आणि मागें आपला मागमूस न ठेवतां समाप्त होते, त्याप्रमाणें.

३ हें असें भाग्य साधूंचा अंकित होऊन राहिलेला जो हरि-भक्त, जो मोक्ष पदवीस पोंचला आहे, त्यास च प्राप्त होतें.

४ म्हणून ज्ञानदेवाला सज्जनांच्या संगतीची च गोडी वाटते. कारण तिच्या योगें च बाहेर, समाजांत आणि सृष्टींत त्याचप्रमाणें आंत आपल्या हृदयांत सर्वत्र एक हरिदर्शन च होतें, समदर्शन होतें.

## १७६ हरि आला रे हरि आला रे

ज्ञानदेवाला ईश्वराचा सगुण साक्षात्कार पहिल्या प्रथम झाला, त्या प्रसंगाचें वर्णन ज्ञानदेव करीत आहे :

१ सर्व संतांना बरोबर घेऊन ईश्वर मला भेट देण्यासाठीं आला आहे. संतांच्या संगतीमुळें च मला एवढा आनंद लाभूं शकला.

२ दिक्-कालाने निर्माण केलेले सारे भेद आतां मावळले.

३ सर्व भूतांमध्यें हरीशिवाय कांहीं उरलें नाहीं.

४ सर्व बुद्धि-शक्तीनें त्याला जाणावें, आणि सर्व वाक्-शक्तीनें त्याला वर्णावें, याशिवाय आतां दुसरें काम नाहीं.

## १७७ तूं ऐसा तैं होसी

१ जेव्हां तुझा हा मोह जाईल आणि तुझ्या मनांत वैराग्याचा संचार होईल तेव्हां च तूं योगयुक्त होशील. आणि तेव्हां च मग विशुद्ध आणि सखोल असें आत्मज्ञान तुझ्याठाईं उत्पन्न होईल. त्यायोगें आपोआप तुझें मन निरिच्छ, कामनारहित, बनेल.

* * *

२ विवेकाचा, नित्यानित्यपृथक्करणाचा, दुष्काळ दूरहोवो. अर्थात् कानाबरोबर मनाला हि वेदान्तामृताचें संजीवन मिळो आणि पाहिजे त्याला ब्रह्मविद्येची खाण सांपडो.

३ परतत्त्वाचा, त्या अंतरतर आत्मतत्त्वाचा, साक्षात्कार होवो. तो सुखाचा सोहळा उगवो, सूर्यवत् प्रकाशमान होवो आणि हें सारें विश्व त्या महाबोधाच्या सुकाळांत, पुरांत बुडून जावो

* * *

४ जसें दांडाचें पाणी माळी नेईल तिकडे जातें, तसें आपलें कर्म, आपलें हें जीवन, निरहंकार असावें.

## १७८ योगी पावन मनाचा

१ ज्या योग्याचें मन पवित्र झालें आहे, निर्विकार झालें आहे असा योगी क्षमाशील होतो. इतरेजनांचे अपराध पोटांत घालतो.

२ सारें जग रागानें पेटलें आहे, तरी संताला संताप शिवायला नको. त्यानें पाण्याप्रमाणें शामक व्हायला पाहिजे. आग विझवायला पाहिजे.

३ वाग्बाण बरसले आणि हृदयाला घरें पडलीं, तरी संतानें क्षुब्ध होऊन जातां कामा नये. त्यानें तो सदुपदेश मानावा.

४ सर्वत्र अद्वैत असतां कोणीं कोणावर आणि कशासाठीं रागवायचें ? हे विश्व म्हणजे ब्रह्म च होय, जसें पट म्हणजे सूत च होय. अशी एकमयता असल्यामुळें मुक्ताबाई म्हणते, खेद सोडा आणि ज्ञानेश्वर ताटी उघडा.

## १७९ अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागे

१ अठ्ठावीस युगें झालीं पांडुरंग चंद्रभागेच्या तीरीं उभा आहे. सारें जग क्षणक्षणाला पालटत आहे पण तो आपला कूटस्थ जसाचा तसा आहे.

२ तथापि तो प्रीतीचा भुकेला आहे. प्रेमळ संतांच्या संगतींत तो रंगून जातो. त्यांच्या समवेत नाना खेळ करतो.

३ जो मनोनिरोध करून वा देहत्याग करून हि सांपडणें कठिण. तो भक्तिप्रेमाच्या सुलभ साधनानें वश होतो. त्याला हृदयांत कोंडून ठेवा. जो योग्यांच्या ध्यानांत क्षणभर ठरत नाहीं, तो या नामदेवापाशीं आनंदानें गोष्टी बोलत बसतो.

## १८० अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध

१ वेद घोकले, शास्त्रें पढलीं आणि नेति-धौतीसारख्या नाना कला हि साधल्या, परंतु जोंपर्यंत भक्तिप्रेमाचा जिव्हाळा उत्पन्न झाला नाहीं, तोंपर्यंत तो श्रीहरि कसा द्रवणार ?

२ डोळ्यांनीं तूं अनंत मूर्ति पाहतोस, परंतु त्यांतील कोणती तरी तुझ्या चित्तांत ठसली आहे का ? स्वप्नांतल्याप्रमाणें त्या सर्व तुला भासरूप होत. एकीवर हि तुझा विश्वास बसत नाहीं.

३ जेव्हां डोळ्यांनीं पाहिलेलें प्रत्येक रूप, कानांनीं ऐकलेलें प्रत्येक नाम म्हणजे हा विठ्ठलच आहे अशी मनाची प्रतीति होईल, तेव्हांच तो विठ्ठल तुला भेटेल आणि तूं सदेह सच्चिदानंद होशील.

## १८१ आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा

नामदेव वडीलकीच्या नात्यानें सर्व संतसज्जनांना आशीर्वाद देतात. शुभकामना करतात :

१ माझे हे जे हरीचे दास आहेत, त्यांना उदंड औक्ष मिळो.

२ ही जी संतमंडळी आहे, तिला कधीं कल्पनेच्या भुताची बाधा न होवो.

३ हे जे माझे सुकुमार भाविक भक्तजन आहेत, त्यांना अहंकाराचा वारा न लागो.

४ ज्यांच्या मुखांत सदा-सकळमंगळ निधि हरिनाम आहे, त्याचें सदैव कल्याण असो.

## १८२ आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा

१ ऐकान्तिक नाम-विश्वास हा आम्हां वैष्णवांचा कुलधर्म आहे.

२ तो नाम-विश्वास असेल तर च हरिदास म्हणवून घेण्यांत अर्थ ! मूळ नामश्रद्धा. मग चित्तशुद्धि म्हणजे व्रतनिष्ठा.

३ त्यानंतर निष्काम अशी श्रवणकीर्तनादि वैधी भक्ति.

४ आणि शेवटीं वृत्तिशून्य केवळ प्रेमभक्ति असा आमचा जीवनप्रवाह आहे.

५ सगुण आणि निर्गुण दोन्हीकडे आम्हाला समान च प्रीति आहे. कारण उभयत्र मन चिद्रसांत समरसले असते.

६ नामदेव म्हणतो—हे देवा केशवा, अशी भक्तिसेवा मला जन्मोजन्मीं मिळो.

## १८३ आसनीं शयनीं भोजनीं गमनीं

१ मी बसों अथवा चालों, जेवों अथवा लोळों तुझे चरण सतत माझ्या डोळ्यांसमोर राहोत. अर्थात् शरीरानें शरीरधर्मानुसार कोणत्या हि क्रिया बाह्यत: होत असल्या तरी अंतर्मन सदैव तुझ्या चरणीं जडूं दे.

२ हे संसाराचें पाप-जाल तूं च छेदतोस. म्हणून निरंतर मला तुझें ध्यान लागून राहो.

३ हे गोपाळा, तूं अनाथांचा कैवारी आहेस, हे परेशा, तुझ्या भक्तांना सदैव संसारतमाचा अपहार करणाऱ्या तुझा च ध्यास लागलेला असतो.

४ नामदेव म्हणतो– देवा, अनन्यभावानें मी तुझें नाम गात राहीन. मग तूं कुठें जाशील ? आपोआप मला शोधीत येशील !

## १८४ काय गुणदोष माझे विचारिसी

१ माझे गुणदोष काय पाहतोस ? मी तर बोलून चालून अपराधांची राशि च आहें.

२ पायाच्या आंगठ्यापासून शेंडीपर्यंत संपूर्ण शरीरभर मी पापांनीं भरलों आहें.

३ स्वप्नांत देखील मला कधीं तुझी भक्ति-सेवा घडली नाहीं. मग विरक्ति मुळीं विचारायलाच नको !

४ तूं च माझा गुरु आहेस, हे स्वामी, मला तूंच तार. तूं सर्वांतर्यामी आहेस. त्या तुझें च गायन मी करतों.

५ नामदेव म्हणतो–पांडुरंगा शीण कष्ट नको वाटूं देऊं, आधीं माझें जन्ममरण चुकव, दूर कर.

## १८५ काळ देहासी आला खाऊं

१ मृत्यु देहाला खायला आला आहे, परंतु आम्हांला त्याचें काय ? आम्ही स्वानंदानें नाचणार गाणार !

२ कोणत्या वेळीं कोणता राग आळवायचा तें मला कांहीं ठाऊक नाहीं. देवा माझा आपला सदासर्वदा एकच राग चालतो– तुझ्या नामाचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 28950 दिं.

३ राग नाही तर ताल तरी मी जाणता म्हणशील तर तेंही नाही. टाळ मृदंग दक्षिणेकडे तर माझें गाणें उत्तरेकडे [illegible] असें नव्हे. तें तर एका रेषेंत होईल ! ताल दक्षिणेकडे तर गाणें पश्चिमेकडे असा माझा कांहीं ताळमेळ नाही.

४ नामदेव म्हणतो– देवा केशवा, मला तुझी ती मुक्ति नको, मला तुझी ही भक्तिरूप सेवा जन्मोजन्मीं दे. ती मला मुक्तीहून अधिक सुरस वाटते.

## १८६ घालीन लोटांगण वंदीन चरण

१ देवा, मी तुझ्या पुढें या शरीरानें लोटांगण घालीन. तुझ्या चरणांना या मस्तकानें वंदन करीन. या डोळ्यांनीं तुझें रूप पाहीन.

२ प्रेमभरानें तुला या बा त कवटाळीन. आनंदानें तुला सर्वस्व देऊन पूजीन, समर्पण करीन. शेवटीं नामदेव म्हणतो, देवा तुला मी आपल्या पंच-प्राणांच्या पंचारतीनें ओवाळीन.

## १८७ घे रे घे रे नाम्या दिलें माझें प्रेम

नामदेवानें देवापाशीं मागणें मागितलें तेव्हां देव त्याला म्हणतात–

१ नाम्या हें घे, तुला माझें प्रेम दिलें. आतां तूं प्रेमपूर्वक माझें नाम सर्वकाळ घोकीत रहा.

२ असें म्हणून देवानें माझ्या डोक्यावर आपला अभयहस्त ठेवला. कारण देव म्हणाले, तुझा अभिमान गेला आहे.

३ अशाप्रकारें देवानें मला भक्तिसुख दिलें. आणि त्या भक्तिसुखाच्या परमामृतानें मी तृप्त झालों.

४ नामदेव म्हणतो— देवा, मी आतां तुझ्या प्रेमभक्तीच्या लाभानें पतिताचा पावन झालों आहें. तुझ्यावांचून या जगांत माझें दुसरें कोणी नाहीं.

[ नामदेव पूर्व वयांत वाटमाऱ्याचा धंदा करी. त्यामुळें तो पतित झाला होता. पण त्यानें पश्चात्तापपूर्वक तो धंदा सोडून दिला आणि तो

अनन्यभावानें पंढरीनाथाला शरण गेला. त्याची विमल प्रेमभक्ति संपादन करून अखेर तो पावन झाला. ही प्रतीति जेव्हां त्याला आली त्यावेळीं त्यानें हा अभंग गाइला आहे.

अमृत म्हणजे मोक्ष, पण परमामृत म्हणजे भक्ति. भक्त मुक्तीची अपेक्षा न करतां आपली भक्ति च दृढ करतात. 'हरिना जन तो मुक्ति न मागे, मागे जनमोजनम अवतार रे । नित सेवा नित कीर्तन ओच्छव, निरखवा नंद कुमार रे ॥' —नरसी मेहता. ]

## १८८ जननिये जिवलगे ये वो पांडुरंगे

आई जन्म देते. मुलाला ती संसारांत घालते. त्यामुळें तिला ममता असली तरी ती आंधळी आहे. तिला जिवलग म्हणजे जिवाला केव्हांहि न सोडणारी, परम हितकर्ती, कसें म्हणतां येईल ? ईश्वर जीवाला जन्मास हि घालीत नाहीं, त्याला प्रपंचांत हि टाकीत नाही आणि केव्हां हि, मरणाच्या वेळीं हि, त्याला तो अंतर देत नाही. तोच जीवाचा जिवलग, परम सखा आहे. म्हणून नामदेवमहाराज म्हणतात :—

१ हे माझे कधीं हि अंतर न देणाऱ्या 'जिवलग' आई, पांडुरंगाई ! ये, धांवत ये. मी या संसारांत पार शिणून गेलों आहें. मला एकदां भेट, आपल्या हृदयाशीं कवटाळ. ( म्हणजे तुझ्या स्पर्शानें माझा हा संसाररूप सारा शीण जाईल. आणि आनंदी आनंद होईल. )

२ या संसार-दुःखांतून मला सोडव, मजवर कृपा कर. कृपा कर म्हणजे काय कर ? तर माझ्या हृदयांत तू येऊन बैस. तिथें निरंतर मला तुझें दर्शन दे.

३ तुझें दर्शन म्हणजे वासनेचें अदर्शन. परंतु आज वासनेनें माझ्या चित्ताचा कबजा घेतला आहे. तिच्या संगतीनें च चित्त शिणून गेलें आहे. त्याला सुखचैन कशी ती नाहीं च. त्याच्यावर सारखें विषयांचे आघात होत राहतात. 'हें नको, तें हवें' असें सारखें चाललें असतें.

४ त्यामुळें तुझी सेवा मनापासून होत नाहीं. जी होते ती वरकरणी औपचारिक. मनापासून होते संसारसेवा. कारण मन अष्टौप्रहर त्या संसार-चिंतेंत अटकत असतें.

५ मनांत संसार भरल्यावर वाणींत कुठून येणार देवाचें नांव? त्यामुळें तुझें नांव आवडीनें पोटांतून कधीं घेतलें नाहीं. ओठांतून भलें घेतलें असो. याचा परिणाम, म्हणजे पोटांतून तुझ्या प्रेमाचा जिव्हाळा नसल्याचा परिणाम, हा कीं आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक ह्या त्रिविध तापानें भाजून माझी कुरवंडी झाली आहे, लाही झाली आहे.

६ म्हणून नामदेव म्हणतो, हे वात्सल्य-मूर्ति करुणामूर्ति आई पांडुरंगाई! धाव. क्षणाचा विलंब लावूं नकोस. मी विषय-चिंतेच्या डोहांत बुडतों आहें पहा, मला काढ!

## १८९ जाणीव शाहणीव वाहियेलें ओझें

देवाचे चरण कां अंतरतात? कारण जीव आपण म्हणजे कोणी आहों असा अभिमान धरतो म्हणून. मी चेतन तो अचेतन, मी मानव तों पशु, मी ब्राह्मण तो अंत्यज, मी अंत्यज तो धेड भंगी, मी गौर स्थूल तो कृष्ण कृश, मी धनी तो दरिद्र, मी विद्वान् तो मूर्ख, मी पुण्यवान् तो पापी इत्यादि प्रकारचा आणि तद्विपरीत अभिमान जीव धारण करतो म्हणून. म्हणून नामदेवमहाराज म्हणतात :-

१ हे देवा, अभिमानरूप जाणीव व शहाणीव हें एक निव्वळ ओझें आहे. त्याच्यापाईं भारवाही होऊन मी कुथत आहें, कण्हत आहें आणि त्यामुळेंच तुझे ते परमानंदरूप चरण मीं अंतरलों आहें.

२ तेव्हां आतां मला या अभिमानांतून सोडव. मला या लौकिकांतून बाहेर काढ. मला या कशाचें च भान उरूं देऊं नकोस.

३ मला लौकिकापुरता पुरता बेभान, वेडापिसा करून ठेव. मला एक तुझ्या नामाचा छंद दे. नामाचा छंद म्हणजे काय? तर या देहीं च मला विदेही कर. या देहाचें नांव च नको. मग त्याची चिंता कुठली? आणि देहचिंता-जनित दुःखपरंपरा तरी कुठली?.

४ नामदेव म्हणतो, देवा, एक तुला मी जाणतों, बाकी सारें देह गेह, जीव जगत् ओस आहे. ती सारी भिकार कल्पना आहे. ती पुसून टाक.

## १९० जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल

१ जीव आत्मा आणि परमात्मा वस्तुत: एकच आहेत. परंतु उपाधि-भेदानें ने भिन्न होतात. जीव हा अशुद्ध आणि असिद्ध, आत्मा शुद्ध पण असिद्ध, परमात्मा शुद्ध तसाच सिद्ध आहे. आणि हीं तिन्ही रूपें एका विठ्ठलाचींच आहेत. एक रसच बाष्प जल आणि हिम हीं नामरूपें धारण करतो त्याप्रमाणें.

२ वरील पारमार्थिकत्रयीप्रमाणें सांसारिक-त्रयी जनक, जननी आणि अन्य आप्तेष्ट हि तो एक विठ्ठल च झाला आहे.

३ अशा प्रकारें काय इहलोकीं, काय परलोकीं, तारण एक तो विठ्ठल च आहे. तो च जीवाचा निरंतर साथी आणि संरक्षक आहे.

४ त्याचें नाम विठ्ठल आहे, रूप विठ्ठल आहे. तो पतितपावन विठ्ठल आहे. फार काय पतित नामा हि तो विठ्ठल च आहे.

## १९१ ज्याचिया रे मनें देखियलें तुज

१ ज्याच्या मनानें हे देवा. तुला पाहिलें आहे, त्याची लोकलज्जा गळून पडते. तो जें कांहीं चिंतितो, जें कांहीं बोलतो, जें कांहीं करतो त्यांत लोक काय म्हणतील हा विचार त्याला कधीं शिवत नाहीं तो आपल्या सहज सत्यनिष्ठेनें जीवन-विहार करीत असतो.

२ त्याला वर्णाश्रमधर्माचे विधिनिषेध, अमुक संध्यावंदनादि क्रिया, अमुक यज्ञयागादि कर्म, त्यांच्या करण्या न करण्यानें मिळणारें सुखदु:ख हें कांहींएक लागू पडत नाहीं. जो जें टाळावें तें स्वभावत: च टाळतो आणि जें करावें तें हि स्वभावत: च करतो, त्याला विधिनिषेधाचें प्रयोजन च उरत नाहीं आणि सुखदु:ख हें अनात्म वस्तु म्हणून त्याचा हि स्पर्श त्याला होत नाहीं.

३ जिथे देहस्फूर्ति म्हणजे देहधर्माचें स्फुरण आहे, तिथें च सुखदु:ख संभवतें. पण देहाचें भानच जिथें नाहीं, तिथें जाति कुल इत्यादि भेद-भान कुठलें? आणि सुख:दुख तरी कुठलें? 'नहि सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोः अपहति: अस्ति'. ज्याला शरीर आहे त्याला प्रिय आणि अप्रिय. म्हणजे सुख

आणि दुःख, टळत नाहीं; आणि आनंद तर सुख-दुःखातीत वस्तु. ती मग कुठून असणार? जिथें देह आहे तिथें त्याचें भान हि असेल, पण जिथें त्याची स्फूर्ति नाहीं, देहधर्मांची व्यथा नाहीं कथा नाहीं, तिथेंच आत्मैक्याचा आनंद म्हणजे च अखंड आनंद विराजमान असतो. आणि हे देवा, ज्यानें तुला ओळखलें त्याला च तो आनंद लाभतो.

४ नामदेव म्हणतो, असा जो विदेही, म्हणजे देहवान् असून देहस्फूर्ति-रहित पुरुष, त्याचें चरणरज होण्याचें भाग्य हे देवा, मला दे. परमस्पृहणीय अशी ती दशा आहे.

## १९२ टाळ दिंडी हातीं उभा महाद्वारीं

१ पंढरपुरास विठ्ठलाच्या महाद्वारांत नामा टाळ आणि एकतारी हातांत घेऊन कीर्तन करतो.

२ तो कीर्तन करतो म्हणजे काय करतो ? तो मनापासून हरीचे गुण गातो आणि स्वानंद भरित होऊन प्रेमानें ओसंडत असतो, उतू जात असतो.

३ तो लज्जारूप अभिमान सोडून देऊन कान वरून नाचतो उडतो. हें झालें बाह्यतः, पण अंतरांत काय असतें ? अंतरांत विठ्ठलाची मूर्ति त्याचें ध्यान लागलेलें असतें.

४ देवाचीं उत्तमोत्तम जन्म-कर्म-गुणवाचक नामें, तीं आदि-मध्य-अंतीं सुखरूप, आनंदमय असणारीं नामें, तो मोठ्या प्रेमानें घेतो.

५ नाम म्हणजे काय आहे ? नाम म्हणजे संतांची विश्रांति आहे. नाम म्हणजे ज्ञान्यांचें रहस्य ज्ञान आहे. तें मोक्षाचें बीज आहे आणि मोक्षाचें फळ फळणारें झाडहि तें च आहे.

६ तीं नामें सहस्रशः आहेत. त्यांपैकीं कांहीं घेऊन तो देवाला आळवितो. हे कृष्णा, विष्णू, हरी, मुकुंदा मुरारी, अच्युता, नरहरी, नारायणा !

७ हे गोवर्धन-धरा, गोपीचित्तचोरा, भक्त-सदया पांडुरंगा !

८ हे सकल-मंगल-दायका, पातक-नाशका, विश्वजीवना, परमानंदा हरे!

९ तूं हें समस्त विश्व आहेस. त्याचा आदि, मध्य आणि अन्त हि तूं च आहेस. संत-सज्जनांची आत्मसुखरूप संपत्ति तूं च आहेस.

१० तूं च माझा श्रोता आहेस; तूं ऐकावेंस म्हणून, तुला च उद्देशून मी बोलतों. तूंच माझा वक्ता आहेस. मी बोलतों तें मी नाहीं बोलत, तूं च बोलत असतोस. मी तर नुसतें शून्य साधन आहें. मुरलीसारखें तुझ्या हातांतलें. त्या मुरलींतून जें प्रेमाचें कारंजें उडतें त्याच्या धारा उडविणारा आणि झेलणारा तूं च आहेस. तूं च देवभक्तरूपानें प्रेमाचा खेळ खेळतो आहेस.

११ विष्णूचा दास नामदेव शेंवटीं देवा पुरुषोत्तमाला विनंती करतो ती इतकीच कीं हे देवा, या संसाररूप भ्रांतींतून मला सोडव.

## १९३ तुझें नित्य सुख घ्यावें येणें मनें

१ जगाचें अनित्य सुख (म्हणजे च दुःख) सोडून देऊन तुझें नित्यसुख या मनानें घ्यावें. तुझ्या च चरणाचें अनुसंधान धरून असावें.

२ हे विठ्ठला, तूं जर मला आपला दास म्हणून मानीत असशील, तर एवढी कृपा मजवर कर.

३ माझ्या कानांचा उपयोग तुझें नाम आवडीनें ऐकण्याच्या कामीं होवो. तसें करतांना माझा मनोमीन तुझ्या प्रेमडोहांत खोल बुडी मारून असावा.

४ माझ्या डोळ्यांचा उपयोग सर्वत्र तुझ्या मूर्ति पाहण्यांत व्हावा. म्हणजे हे सर्व प्राणी माझे जिवलग होऊन जावेत.

५ माझ्या मुखाचा उपयोग तुझें नाम गाण्यांत होवो. पण तसें करतांना मला कुठला हि विकल्प नसो. कुठला हि संशय नको. पूर्ण भावानें तें येवो. तसें च तें मुखानें उच्चारतांना हृदयांत त्याचा अर्थ जो तूं त्या तुझें रूप प्रत्यक्ष होवो.

६ या माझ्या शरीराचा उपयोग संतांच्या सेवेकडे होवो. असें हें भाग्य मला रोजच्यारोज लाभो.

७ या माझ्या जीवाला मानाविषयीं उदास आणि अपमानाविषयीं उल्हास वाटो. हें तेव्हांच होणार, जेव्हां एक तुझाच ध्यास नित्यनिरंतर लागून राहील. म्हणून तो तेवढा मला दे.

८ हे विठ्ठला देवा, असें हें सर्व घडेल तेव्हां च मी तुला शरण आलों आहें असें समजेन. जग हि तसें म्हणेल. नाहीं तर तें मला पतितच म्हणणार.

## १९४ तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा

या अभंगांत भक्ताचा अनन्यभाव अनेक दृष्टांतांनीं वर्णिला आहे. याला आधार 'अजातपक्षा इव मातरं खगा:' इत्यादि भागवती उक्ति आहे.

१ हे आई पांडुरंगे, तूं माझी माउली आहेस आणि मी तुझा तान्हुला आहें. तुझ्या प्रेमपान्ह्याचा सदैव तहानलेला असा तान्हुला आहें मी. मी सर्वतोपरी अक्षम. केवळ तुझ्याच कृपेवर जगणारा आहें. त्या मला तूं आपला प्रेमाचा पान्हा पाज. तूं च पाजशील तेव्हां च माझी तहान-भूक हरणार.

२ तूं माझी गाउली आहेस, मी तुझें वासरूं आहें. आपला पान्हा चोरूं नकोस. तूं तो चोरशील तर मी वासरूं कसें बरें जगूं ?

३ तूं माझी हरिणी आहेस; मी तुझें नवजात दूधपितें पाडस आहें. जें गवत हि कुरतडूं शकत नाहीं; तें वागुरा कसें तोडणार ? तेव्हां तूं च संसाराचें जाळें तोडून त्याला सोडवून घेऊन जा.

४ तूं पक्षिणी आहेस, मी तुझें अंडज, नुकतेंच अंड्यांतून बाहेर आलेलें पिलूं आहें. अद्याप ज्याला पंख हि फुटलेले नाहींत, त्या माझ्या मुखांत तूं च चारा आणून भरविला पाहिजे.

५ नामदेव म्हणतो, असे जे अनन्य भक्त, त्यांच्या त्या अव्यभिचारिणी भक्तीचा तूं वल्लभ आहेस, प्रियकर आहेस. आणि अशा च भक्तांचा तूं मागें पुढें उभा राहून सांभाळ करीत असतोस.

## १९५ दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां

१ हा मानव-देह कांहीं सर्वांनाच मिळत नाहीं. तो दुर्लभ आहे. तो तुम्हां आम्हांला सुदैवानें मिळाला आहे. तेव्हां त्याचा पुरा लाभ घेऊं या. तो लाभ हा च कीं या देहानें रामभक्ति साधायची. आपली चिंता सोडून सर्वांची चिंता वाहणें हीच ती रामभक्ति.

२ या रामभक्तीनें आपण-सगळेजण हातोहात हा संसार-सागर, दुसऱ्याची पर्वा न करतां आपलाच स्वार्थ पाहणें, तरून जाऊं. संसार-चिंता सरल्यावर मग काय आनंदच. त्या आनंदांत देवाला गाऊन आळवणें या शिवाय मग दुसरें काम च कोणतें ?

३ देवाला आळवायचें म्हणजे एकमेकांना हिताच्या गोष्टी सांगायच्या सर्वांच्या हितांतच आपलें हित कसें आहे, त्यासाठीं स्वामित्व विसरून सर्वस्वाचें समर्पण, या देहाचें हि समर्पण जनसेवेंत करणें कसें अगत्याचें आहे, इत्यादि गोष्टी सांगून या देहगेहाच्या अहंममतेंतून आणि तज्जनित मोहशोकांतून व तदुत्थ दुःखांतून सुटूं या.

४ हा विचार हेंच हरिनाम. त्याचें अनुसंधान केव्हां हि सुटूं द्यायचें नाहीं. पण ही साधना आपण सर्वांनीं मिळून करावयाची आहे. त्याबावत आपण एकमेकांना नित्य सावध करीत राहिलें पाहिजे. परस्परांना नित्य बोध करीत राहिलें पाहिजे.

५ ही रामनामाची दीक्षा आपण कायावाचामनें घेऊं या आणि इतरांनाहि तीच विश्वासपूर्वक ठामपणें देऊं या.

६ नामदेव म्हणतो, या विचारसृष्टीचा जो अधिपति त्या आदर्शाला, पंढरीनाथाला आपण शरण जाऊं या. तोच दीनजनांचा त्राता आहे. तो कुणाची च उपेक्षा करीत नाहीं. मग त्याला जो शरण आला त्याची उपेक्षा तो केव्हां हि करणार नाहीं हें का सांगायला पाहिजे ?

## १९६ देह जावो अथवा राहो

१ हा देह जावो अथवा राहो, पांडुरंगाचे ठाईं माझा भाव अढळ च राहील.

२ हे देवा तुझी शपथ, तुझे चरण मी केव्हां हि सोडणार नाहीं.

३ मुखांत तुझें मंगल नाम राहील आणि हृदयांत निरंतर तुझें प्रेम राहील.

४ हे देवा केशवा, हा माझा पण आहे आणि तो तूंच चालविण्यास समर्थ आहेस.

या अभंगांत नामदेव महाराजांनीं अनन्य निष्ठा कशाला म्हणावयाचें, त्याचें निरूपण केलें आहे. निष्ठा म्हणजे आदर्श हा देह-निरपेक्ष च पाहिजे. देहसापेक्ष कल्पिल्यास देहाबरोबर च तो क्षणजीवी ठरावयाचा. देहनिरपेक्षतेला प्रत्येक्ष देहाचें वावडें नाहीं. तो असला तर त्याची अडचण नाहीं, नसला तर गरज नाहीं. तो असेपर्यंत त्याच्या कडून म्हणजेच कायेनें नित्य-निरंतर चरण-सेवा म्हणजे निःस्वार्थ लोकसेवा होत राहील. वाणीनें त्याचें नाम म्हणजे त्याच्या स्वरूपाचें अनुध्यान आणि तदनुसार सेवाकार्याचें निरूपण होत राहील. आणि हें कायेनें सेवाकार्य व वाणीनें तत्त्वजप व नीतिनिरूपण अखंड व्हायचें तर त्यासाठीं हृदयांत श्रद्धेचा जिवंत झरा पाहिजे. अखूट श्रद्धा भक्ति प्रेम पाहिजे. अशा प्रकारें काया वाचा मनें हरिमय होण्याचा नुसता विचार हि उदात्त आहे, उच्चार हि पावन आहे. पण तेवढें बस नाहीं. तसा आचार करण्याचें व्रत च घ्यायला पाहिजे. हें व्रत असिधारा-व्रत आहे. तें का आपल्या बळानें पार पडायचें आहे? तें ईश्वर कृपा करील तर च पार पडायचें. म्हणून ईश्वर-कृपा हें च अन्तिम तारक तत्त्व होय. म्हणून ह्या सर्वांसाठीं शेवटीं त्याला च शरण जावयाचें.

पहिल्या ओवींत ईश्वरनिष्ठेची प्रतिज्ञा केली आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या ओवींत तिचा कायिक, वाचिक मानसिक कार्यक्रम आहे. आणि चौथ्या ओवींत तिचा आधार अनन्यता वर्णिली आहे. नामदेवमहाराजांचें संपूर्ण जीवनदर्शन या लहानांतलहान अभंगांत परिपूर्ण प्रगट झालें आहे.

## ९७ ध्यानीं ध्यातां मनीं हाचि देउनी बैसे

देह आणि देहानुबद्ध संसार याचें नांव लौकिक. हरिमयतेमुळें त्यापासून वेगळा झाला तो लौकिकाविरहित विदेही म्हणायचा. त्याचें च नांव जीवन्मुक्त. नामदेव महाराज आपली अशी हरिमयता या अभंगांत वर्णित आहेत.

१ माझी अशी स्थिति झाली आहे कीं मनानें कसलें हि दुसरें चिंतन होत नाहीं. मनाचा व्यापार सुरू झाला कीं त्याचा विषय एकमात्र परमात्मा च होऊन बसतो. सर्व कल्प, विकल्प आणि संकल्प, त्याच्याच विषयीं होतात. बरें वाणीनें कांहीं बोलायला जावें तरी वाणीचा विषय हि तोच

होतो. वाणीचा आश्रय अर्थ. तो त्याच्या वांचून दुसरा कोणता च असत नाहीं. शिवाय कांहीं हि उच्चारा, त्याचा अर्थ प्रथम हृदयांत येतो आणि मग च वाणींत उमटतो. 'आत्मा बुद्ध्या समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया' आत्मा बुद्धीनें पदार्थांकडे जाऊन मनाला बोलायची प्रेरणा देतो. ही वाणीची प्रक्रिया आहे. पण बुद्धींत म्हणजे अंतःकरणांत तो परमात्मा च भरलेला असल्यामुळें तें वाणीला दुसऱ्या कशाची प्रेरणा देणार ?

२ अशा प्रकारें बाहेर म्हणजे वाणींत आणि आंत म्हणजे अंतःकरणांत त्या रुक्मिणी-रमणानें, वाक्पति अर्थानें, मला वेधून टाकलें आहे.

३ त्या गो-पाळाच्या गुणगाथांवांचून इतर कोणतें हि भाग्य मला आवडत नाहीं.

मन आणि वाणी हरिमय झाल्यावर जगांतील इतर सारे विषय हि आवडत नाहींत म्हणजे भोग्य राहत नाहींत. ते हि हरिमय च होतात. जगांत मन, वाणी आणि द्रव्य हे च तीन पदार्थ आहेत. मलयगिरीवरील सर्वच वृक्ष, कंकोल, निंब, कुटज देखील चदन बनतात त्याप्रमाणें भक्तीनें मन निर्विकार, वाणी विमल, आणि शरीर सेवा-परायण व सर्व जग सेव्य म्हणजे मातृवत् अनुपभोग्य बनते.

४ मला ध्यानीं मनीं स्वप्नीं कृष्णमूर्तिच दिसते. जागृतींत विचार-पूर्वक निःस्वार्थ लोकसेवारूपभक्ति, निद्रेंत म्हणजे निवृत्तींत मनो-मन तत्त्वचिंतनरूप ज्ञाननिष्ठा आणि सुषुप्तींत म्हणजे प्रवृत्ति आणि निवृत्ति या दोहोंहून भिन्न अशा अप्रवृत्त आणि अनिवृत्त केवळ अवस्थेंत विगलित-वेद्यान्तररूप श्रद्धामय सहजभाव अशा त्रिविध रूपानें एक कृष्णमूर्ति च मला सदैव सर्वगत दिसते आहे.

५ नामदेव म्हणतो, अशाप्रकारें मी लौकिकाविरहित देहावेगळा जीवन्मुक्त होऊन राहिलों आहें.

## १९८ नामयाचें प्रेम केशव चि जाणे

१ नाम्याचें प्रेम केश्याला च ठाऊक. तें इतकें प्रबल आहे की केश्याला नाम्यापाशीं राहणें च भाग आहे. दोघांची जोडी आहे. एक असला तर दुसरा तिथें आहे म्हणून सांगायलाच नको.

२ नाम्याकेश्याची जोडी आहे हें हि म्हणणें गौण. ते दिसायला दोन, पण कोणता कोण हें नाहीं सांगतां यायचें. ते दोघे सखे आहेत. समान च ख्याति आहे त्यांची. नामा म्हणतात तो केशव आहे, केशव म्हणतात तो नामा आहे. एक च आहेत ते मग दोन कसे झाले ? प्रेमाचें सुख लुटण्यासाठीं. ते एकमेकाला प्रेम मागतात, देतात घेतात.

३ त्याला अनुसरून विष्णूचा दास, विष्णूला विकलेला नामा केशवाच्या द्वारीं उभा आहे आणि प्रेमाची भीक मागत आहे.

## १९९ निर्‌गुणींचें वैभव आलें भक्तीमुसे

१ तें जें निर्‌गुण निराकार ब्रह्म तें च भक्तीच्या मुशींत ओतलेलें विठ्ठलाच्या रूपानें सगुण साकार होऊन अवतरलें आहे. प्रत्यक्ष झालें आहे. राजानें भिकाऱ्याचा वेश घेतला तरी तो भिकारी होत नाहीं. तो राजा च असतो. तसा हा सगुण साकार वेश जरी त्या अचिंत्य वैभवाच्या तुलनेनें गरीबीचा असला तरी त्यांत तें च ऐश्वर्य नांदतें आहे हें विसरू नये.

२ हें लक्षांत घेतलें म्हणजे मग तें सुंदराहून सुंदर, प्रत्येक पाहण्याच्या वेळीं नव नवीन कलेनें शोभायमान दिसतें. तें हृदयांत धरिलें असतां तिन्ही ताप शांत होतात.

३ ते संध्येंतील २४ नामांहून वेगळें म्हणजे त्यात न मावणारें, पण सहस्र नामांहून हि आगळें म्हणजे विशेष, अर्थात् नित्य शुद्ध बुद्ध मुक्त-स्वभाव आहे.

४ त्याचें वर्णन करतांना वेदांना नेति नेति म्हणून मौन सेवन करावें लागतें. उपनिषदांना 'यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः' अशा कोड्याच्या भाषेंत बोलावें लागतें आणि पुराणांना नाना रूपकांच्या भाषेंत च त्याचें निरूपण करावें लागतें.

५ तें श्रद्धावश आहे. भक्ति-प्रिय आहे. पाण्यावर तेलाचा थेंब पसरतो त्याप्रमाणें श्रद्धेवर, आस्तिक्यावर तें विकसित होतें. जेवढी श्रद्धा तेवढें तें प्रतीत होतें. पाणी खालाणाकडे वाहतें तसें जिथें

नम्रता आहे, भक्ति आहे, तिथें तें धांव घेतें. पुंडलीक मुनीनें आपल्या अनन्य निष्ठेनें तें आम्हांला साध्य करून दिलें आहे.

६ तें ब्रह्म पंढरीस विठ्ठलवेषानें आम्हां अनाथांची अनिमेष नेत्रांनीं वाट पाहत उभें आहे.

## २०० पंढरीचें सुख जिहीं अनुभविलें

१ ज्यांनीं पंढरीचा सोहळा पाहिला, तेथील भक्तिरस ज्यांनीं चाखला ते विठ्ठलाचे पाईक झाले.

२ त्यांनीं मनांत पांडुरंग सांठवला आणि ते कायावाचामनें त्यांच्या चरणसेवेंत रंगून गेले.

३ त्यांनीं एक नाम जोडलें. आणि इतक्या उत्कटतेनें तें त्यांनीं जोडलें कीं त्याच्या बळावर सारीं साधनें त्यांना बिनगरजेचीं झालीं. नामाच्या बळानें च त्यांनीं संसाराचीं सारीं वंधनें अहंताममतादि तोडून टाकलीं.

४ त्या नामाच्या बळानें ते इतके बळी झाले कीं मुक्तीला च त्यांनीं मुक्ति दिली. ते भक्तींत च मस्त झाले. मुक्तीचा भाव इतका घसरला कीं तिला ते फुकट विचारीनासे झाले. बिचारी मुक्ति दीनवाणी वाळवंटांत रानावनांत हिंडूं लागली.

५ संतांनीं माझा अव्हेर केला आहे; तुम्ही तरी मला थारा द्या म्हणून ती योग्यांच्या घरीं मोठया मिन्नतवारीनें शिरूं लागली.

६ असे मुक्तीला न पुसणारे भक्तराज देवाला वंद्य झाले म्हणजे देवाचे देव होऊन बसले. हा सगळा पुंडलीकाचा प्रभाव होय. असा भक्ति-सम्राट् झाला तो. त्याच्या राज्यांत असा चमत्कार झाला.

७ नामा तो चमत्कार पाहून हर्षनिर्भर होत्साता देवाच्या महाद्वारीं नाचतो आहे आणि त्या देवाची आणि त्याच्या देवाची, पुंडलीकाची, कीर्ति चराचरांना गाऊन सांगत आहे.

## २०१ पतित-पावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा

नामदेव मूळचा शिवभक्त. पण तो वाटमाऱ्याचा धंदा करी. त्यांत त्याच्या हातून अनेक स्त्रिया विधवा झाल्या. त्यांतील एकीच्या प्रत्यक्ष भेटीनें व तिच्या करुण स्थितीच्या दर्शनानें त्याला दारुण पश्चात्ताप झाला आणि त्या भरांत त्यानें शिवलिंगावर आपल्या रक्ताच्या धारेनें अभिषेक आरंभिला. त्या स्थितींत त्याला शिवानें आदेश दिला कीं माझा भक्त असून असें घोर कर्म तूं केलें आहेस. तेव्हां तूं पतित झाला असून तुझा उद्धार आतां या क्षेत्रांत होणार नाहीं. तूं विष्णु-क्षेत्रांत जा, त्याची भक्ति कर. म्हणजे तुझा उद्धार होईल, तूं पावन होशील. अशी शिवाची आज्ञा झाल्यामुळें तो पंढरपुरास आला. परंतु त्याची दुष्कीर्ति तिथें त्याच्या आधीं च येऊन पोंचलेली होती. बडव्यांनीं त्याला देवळांत घ्यायचा इन्कार केला. तेव्हां त्या प्रसंगाला उद्देशून त्यानें पुढील भजन म्हटलें अशी आख्यायिका आहे.

१ तूं कसल्या हि पतिताला पावन करतोस अशी तुझी ख्याति ऐकून मी तुझ्या दाराशीं आलों. परंतु तूं मला पावन करून घेत नाहींस तेव्हां हा पहा मी परत फिरतों !

२ मी माघारा जातों च पण तूं हि आपला अभिमान सोडून दे आणि आपलें पतित-पावन हें बिरुद हि टाकून दे. तुला हें बिरुद, ही पदवी दिली च कोणीं ?

३ तूं आधीं सर्वस्व घेतोस तेव्हा कुठें भक्ति देतोस असा तर तूं उदार आहेस ! अशा कृपणाच्या दाराशीं धरणें देण्यांत काय हंशील ?

४ उष्टीं शितें हि भक्ताचीं तूं मटकावून टाकतोस. त्या तुला पतित-पावन एवढी मोठी पदवी कोणीं दिली ?

५ नामदेव म्हणतो, देवा तुझें मला कांहीं एक नको, तुझें मनापासून प्रेम तेवढें दे, तुझ्या पाया पडतों मी. [तुझें तें प्रेम च पावन आहे. तें च सर्व भाग्यांचें भाग्य आहे.]

## २०२ परदारा परधन परनिंदा परपीडन

१ पर-स्त्री, परद्रव्य, परनिंदा आणि परपीडा सोडून देऊन हरीचें भजन करावें. भूतमात्रीं जो हरि विहरतो आहे त्याचें भजन का कोणा मूर्तीचें गंधाक्षतपुष्पांनीं आणि स्तुति-स्तोत्रांनीं पूजन-अर्चन करून होईल ? त्यासाठीं तर काया-वाचा-मनें परद्रोह करण्याचें सोडून च दिलें पाहिजे. त्यानंतर च सर्वांतर्यामी हरीचें भजन होऊ शकेल.

२ भूतमात्राविषयीं कृपादृष्टि ठेवणें आणि सर्वदा संतांची संगति धरणें एवढ्या दोन गोष्टी जर केल्या तर या संसारांत, या जन्ममरण-परंपरेंत पुनरावर्तन होण्याचें भय नाहीं. सत्संगति नसली म्हणजे मनुष्याला सन्मार्ग लागत नाहीं. तो कुसंगतींतून बचावत नाहीं. त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे तो शरीर-परायण होऊन निर्दय बनतो. आत्मौपम्य म्हणजे च प्राणिमात्रांविषयीं दयाभाव, सहानुभूति, करुणा यांचा लोप होतो आणि मनुष्य बेदरकारपणें परद्रोहानें जगूं लागतो.

३ अद्वैतानुभव म्हणजे मुक्ति. जो परद्रोहमय जीवन जगतो त्याला ह्या अद्वैतानुभवाची गंधवार्ता हि कुठून मिळणार ? तो तर हा देह मी आणि त्या देहाचें भोग्य तें माझें असें मानून जगाचें वैर करीत असतो. त्याचा आपपर-भाव वाढत च असतो. हा च संसार.

४ सर्व शास्त्रांचें सार आणि वेदाचें परमरहस्य जर कांहीं असेल तर तें एक विठ्ठलाचें नाम होय. हें नाम च एक आमचा आधार आहे. तेंच तारक आहे. शास्त्रांत नाना साधनें सांगितलीं आहेत. वेदांत हि नाना उपाय सांगितले आहेत; परंतु त्या सर्वांचें तात्पर्य एक हरिनाम च आहे. सर्व साधना केल्या तरी खरी निर्विकारता, खरी अद्वैतानुभूति, खरी ब्रह्ममयता एका नामांत, अनन्यशरणतेंत आहे.

५ नामदेवमहाराज म्हणतात, दुसरीं नाना साधनें केलीं तरी तुम्हांला नाम घ्यावें च लागेल. म्हणून म्हणतों, बाबांनो एक हरिनाम घ्या. तुम्हांला दुसरें तिसरें कांहीं करण्याची गरज नाहीं; तसें मला साक्षात् पांडुरंगानें वचन दिलें आहे.

परद्रोह सोडून देणें आणि परोपकारमय जीवन जगणे ही पहिली पायरी आहे परमार्थाची. दुसरी पायरी म्हणजे संतांच्या संगतींत राहणें आणि आपलें अंतःकरण, आपली वृत्ति जीवमात्राच्या करुणेनें प्रेममय बनविणें. आणि तिसरी सर्वोच्च पायरी म्हणजे हरि-प्रेमामध्यें केवळ विलीन होऊन जाणें. हें च परम-साम्य होय. ही च अद्वैतानुभूति होय. याचें नांव नाम घेणें. त्या नामांत देहासकट सारें विश्व विरून जातें. आणि उरतें केवळ एक नाम, हरिनाम !

## २०३ बोलवरी बोलती, श्रुति वाखाणिती

१ ज्या योगें भगवत्-प्राप्ति होते ती गति म्हणजे मार्ग वेगळा च आहे. सामान्यतः लोक त्याच्या प्राप्तीसाठीं वेदाचीं अक्षरें घोकत असतात.

२ पण स्वप्नांतील द्रव्याच्या दर्शनानें कुणाचें दारिद्रय कधीं दूर झालें आहे? त्या वेदपाठाचा प्रत्यक्षाशीं कांहीं संबंध नाहीं त्यामुळें तो स्वप्नतुल्य च होय. इतकीं अक्षरें घोकण्याचें कारण नाहीं. एक हरि शब्द च बस आहे. तो च श्रद्धा हा भगवत-प्राप्तीचा मार्ग आहे. तें च वर्म आहे. बाकीची सर्व व्यर्थ आटाआट आहे.

३ दुसरे कित्येक शास्त्राध्ययन करीत बसतात. वेदान्त-न्यायादि शास्त्रें पढतात. पण तें हि सारें संराट आहे. मार्गाला सोडून च आहे जाणीवेच्या, अहंकाराच्या, आड मार्गाला लागून का कोणी मुक्कामाला पोंचला आहे ? मार्ग तर शरणता, दीनभाव च आहे.

४ ज्यांना हे देवा, तुझी प्राप्ति झाली, ज्यांनीं तुला ओळखलें, त्यांनीं तर मौन च धरलें आहे. ते ज्ञान मिरवत नाहींत. ते भक्तिभावानें तुला शरण आले आहेत. नम्रपणें तुझ्यावर श्रद्धा ठेवून तुझ्या कृपेनें तुला प्राप्त झाले आहेत.

## २०४ बोलूं ऐसे बोल, जेणें बोलें विठ्ठल डोले

१ ज्याच्या योगें भगवान् डोलूं लागेल असें सत्यपूत प्रेममय व सर्वांना हितकर असें च आम्ही बोलूं. नाहींतर बोलणार च नाही.

२ वाणी मात्र मिठ्ठास आणि मनांत व करणींत मात्र विखार, असें नाहीं चालणार. आमच्या प्रत्येक इंद्रियांतून, सबंध शरीरांतून प्रेम च, सर्व भूतांविषयीं केवल कृपा च, प्रगटेल. आणि वाणींतून केवल भगवन्-नाम.

३ आम्ही कीर्तनांत लाज धरणार नाहीं, तर निर्लज्ज होऊन खुशाल भगवन्-नाम गात नाचूं उडूं. आणि जगांत भक्तिज्ञानाचा प्रकाश करूं. नास्तिकतेचा अंधकार फेडूं.

४ परा वाणीच्या हि पर असलेल्या, नेतिनेतीच्या पलीकडे असलेल्या, त्या सच्चिदानंदाच्या परंधामांत आम्ही निरंतर वास करूं.

५ नामदेव म्हणतो, आतां आमच्या हातांत सर्व सत्ता आली आहे. आणि ती खेचर गुरूच्या कृपेनें मला लाभली आहे.

## २०५ युगें अठ्ठावीस विटेवरी उभा

१ चतुर्युगांच्या सात आवृत्ति होऊन गेल्या तरी विठ्ठल विटेवर स्थित च आहे. 'जगें येवोत जावोत तो अभंग जसा तसा' आहे. त्याच्या डाव्या अंगास रुक्मिणी माता विराजमान आहे. आणि त्याची अलौकिक प्रभा, दिव्य आध्यात्मिक तेज फांकलें आहे. हें पुंडलीक मुनीच्या भेटीला आलेलें सांवळें ब्रह्म आहे. त्याच्या चरणाचें तीर्थ च अशी भीमा वाहते आहे आणि जगाचा उद्धार करण्याचा तिचा कार्यक्रम अखंड चालला आहे.

२ अशा हे देवा पांडुरंगा, रुक्मिणीवल्लभा, राधिकारमणा, तुझा जयजयकार असो. हे सख्या, परमहितकर्त्या मला भेट दे.

३ तूं कमरेवर हात ठेवून उभा आहेस भक्तांची वाट पाहत. तुझ्या गळ्यांत तुलसी-मंजरीची माला आहे. तूं पीतांबर परिधान केला आहेस आणि कपाळावर कस्तूरीचा मळवट भरला आहेस. तुझ्या दर्शनाला देवदेवता नित्य येत आहेत. तुझ्या समोर तुझे सेवक किंकर गरुड आणि हनूमान हात जोडून सेवेस तत्पर उभे आहेत.

४ तुझ्या या पंढरीचा, सर्वलोकैकनाथाच्या नगरीचा महिमा काय वर्णावा! इथें तुला ओंवाळायला आणि तुझ्या प्रीत्यर्थ समर्पण करायला नित्य आरत्या येतात आणि चंद्रभागेच्या प्रवाहांत समर्पित होतात.

पताकांसह वैष्णवांच्या दिंड्या म्हणजे मेळे इथें सर्वत्र नाचत असतात. अशी ही तुझी नगरी आहे.

५ अशा या नगरीस आषाढी व कार्तिकी महाएकादशीस भक्तजन येतात. चंद्रभागेंत स्नान करतात. तुझें दर्शन घेतात. तुला ओवाळतात. नामदेव म्हणतो, देवा ! त्यांच्या केवळ दर्शनानें च लोकांना मुक्ति मिळते अर्थात् ते भक्त च् भगवान् मुकुंद बनतात.

## २०६ लपलासी तरी नाम कैसें नेसी

१ तू आहेस लपून बसलेला; तुझें रूप, तुझी मूर्ति, आमच्या डोळ्यांना दिसत नाहीं; परंतु आपलें नाम तुला थोडें च लपवून ठेवतां येतें. तें तुझें नाम च आम्ही रात्रंदिवस घोकूं, गाऊं.

२ आतां तुला आमच्यापासून पळून दूर जातां येणार नाहीं. कारण नामघोषाच्या कैदेंत तुला आम्हीं कैद केलें आहे. नामाचें हें रहस्य आम्हांस ठाऊक झालें आहे. आणि तें नाम आम्ही घोकत राहणार.

३ आम्हांला तर तुझें एक नांव च पाहिजे आहे. तें आमच्या हातीं आलें म्हणजे तुला मग आपोआप च दर्शन द्यावें लागणार ! तुला तें चुकत नाहीं.

४ आम्ही आपले भोळे भक्त. आम्हांला हें रहस्य नव्हतें गवसलें आजवर. पण या नामदेवाला तें आतां सांपडलें आहे. नाम हा च देव, हें तें रहस्य होय.

टीपः—'नाम हा च ज्याचा देव आहे, तो नामदेव' ह्या बहुव्रीहि समासाच्या आधारें आणि अर्थात् तशा निर्धारें वरील अभंगाची रचना झाली आहे. इथें भक्ति आणि विभक्ति (म्हणजे व्याकरण) यांचा मधुर संगम झाला आहे.

## २०७ वदनीं तुझें नाम अमृत-संजीवनी

१ हें सारें संसार-चक्र तुझ्या हातीं आहे. त्या तुझें नाम सहज च अमृत संजीवनी होय. तें माझ्या मुखांत असतांना मग मला भय कसलें ?

२ तुला शरण आलेल्या भक्ताला हे पंढरीनाथा, जन्ममरणाची कितीशी भीति? तें भय ज्ञान्यांना. आम्हां भक्तांना तर तुझ्या नामानें जन्ममरणासकट सारा संसारच वैकुंठ झाला आहे.

३ हृदयांत तुझें रूप बिंबल्यावर संसाराला तिथें वाव च कुठला? जें पहावें तें भगवद्रूप झाल्यावर संसार व परमार्थ हा भेद उरलाच कुठें?

४ नामदेव म्हणतो, तुझें नामस्मरण वारंवार करीत गेलें असतां कलिकाळ पायां पडतो. सर्व मनोमल गळून जातो. कलह मिटतात. वैर शमतें. सर्वत्र समदृष्टि होते.

## २०८ विठ्ठल माउली कृपेची साउली

देवानें आपल्या लाडक्याला बाळ-लेणीं लेववून संतांच्याकडे आणलें आहे. तिथें तो आपल्या बाळलीला करीत आहे असें आपलें च कौतुक नामदेव वर्णीत आहे :

१ माझी विठाई मोठी कनवाळू आहे. नुसती आठवण करतां च आपला प्रेमपान्हा देते, मला पाजते.

२ न सांगतां तिला माझी तहान-भूक कळते आणि ती सर्वत्र व्यापक असून हि, सर्व विश्वाची जननी असून हि, सदैव माझ्याजवळ च असते.

३ संसाराची तिरीप लागूं नये म्हणून तिनें मला शांतीचें अंगडें टोपडें घातलें आहे.

४ श्रवणी कीर्तन, कंठी नाम अशा प्रकारें भक्तीचीं नवविध लेणीं तिनें मला लेवविलीं आहेत.

५ नेत्रांत सुरेख कृष्णांजन घातलें आहे. त्यामुळें सर्व अंग कसें शांत झालें आहे, समाधान वाटत आहे.

६ या अशा आपल्या भक्तबाळाला वासनेची पापदृष्टि न लागो म्हणून तो चक्र-पाणि झाला आहे. हातांत चक्र परजून सदैव मागें पुढें सांभाळ करीत आहे.

७ अशाप्रकारें आपल्या नाम्या बाळाला देवानें शृंगारून संतांच्या जवळ दिलें आहे आणि तो महाद्वारांत अखंड क्रीडत आहे, खेळत आहे.

## २०९ संतचरण-रज सेवितां सहज

१ संताच्या पाशीं नम्रभावानें सेवक होऊन राहिलें असतां मन च निर्वासन होऊन जातें. वासनेचें बीज, मन, जळून गेल्यानंतर मग वासनांचे अंकुर फुटत नाहींत.

२ अशी मनोभूमिका निर्वासन, निस्तृण झाली म्हणजे मग रामनामाची गोडी उत्पन्न होते आणि अष्टसात्विक सुखाचें पीक वाढूं लागतें.

३ त्या निर्विषय सुखाच्या भरांत मी-तूं हा भेद-भ्रम मावळतो, आणि भक्त आशापाशमुक्त होतो. त्याची ओढाताण संपते, आणि त्याला विश्रांति म्हणजे आत्मिक सौख्य लाभतें. थोडक्यांत त्याला अंतरांत गीतेंत म्हटल्या-प्रमाणें प्रकाश स्थिरता, सौख्य लाभतें. आणि हें सारें संत-संगतीनें होतें.

४ ही तर योग्याची स्थिति झाली. पण संतसंगतीनें त्याची प्रगति याच्यापुढें हि होते. त्याच्या ठिकाणीं भक्तीचा प्रकर्ष प्रगटतो. भक्तिप्रेमानें त्याचा कंठ दाटून येतो, डोळ्यांतून स्वानंदाचे पाझर वाहतात. हृदयांत राम-रूप प्रकट होतें.

५ नामदेव महाराज म्हणतात, असें हें सत्-संगतीचें साधन सोपें आणि सुंदर आहे. परंतु तें ज्याच्या गांठीस पूर्वजन्मार्जित विपुल सुकृत असेल त्याला च फावतें.

## २१० संतांचें लक्षण ओळखावया खूण

१ संत कसें ओळखावयाचे! त्यांचें लक्षण काय? त्यांची ओळखण काय? पहिली खूण ही कीं ते देहाविषयीं उदासीन असतात. देहाचा विसरच पडला, असतो त्यांना.

२ दूसरी खूण ही कीं त्यांच्या हृदयांत भक्ति-प्रेमाचा जिव्हाळा असतो, जो कधींच सुकत नाहीं. आणि त्यांच्या मुखांना राम वा कृष्ण नामाचा चाळाच लागलेला असतो. त्यांच्या मुखांतून हरिनामाशिवाय, हरिकथेशिवाय दुसरें कांहीं निघत नाहीं.

३ तिसरी खूण ही कीं त्यांचें मन सदैव हे देवा! तुझ्या ध्यानांत मग्न असतें, आणि ते तुझ्या विश्वस्वरूपाचो हे सारे जग तूं च झाला आहेस असें ओळखून सेवाचाकरी करीत असतात.

४ अशा केवळ हरिमयतेनें जे परि-तृप्त झाले आहेत त्यांना हे स्वाम्या, तूं आपल्या जीवापासून, आपल्या अंतरांतून कधींहि वेगळे, दूर होऊं देऊं नकोस.

नामदेव महाराजांनीं या अभंगांत संतांचीं लक्षणें स्थूल, सूक्ष्म आणि सूक्ष्मतर अशा क्रमानें विशद केलीं आहेत. पहिलें लक्षण देहाची चाड नसणें. पण एवढेंच जर घेऊन बसलें तर वेडा, पिसा आणि संत एक होऊन बसायचा; म्हणून दुसरें लक्षण सांगितलें, जें स्थूल नाहीं आणि ज्याचें अनुकरण सोपें नाहीं. आणि ते म्हणजे अंतरापासून प्रेमाच्या जिव्हाळ्यानें सतत मुखानें नामस्मरण करणें. पण हें देखील सोपें नसलें तरी बाह्यतः अनुकरण करतां येण्यासारखें आहे. परंतु या पुढील जें लक्षण सांगितलें आहे, तें सूक्ष्मतर आहे. तें हें कीं मन निरतर ईश्वराच्या ध्यानांत भरलें असलें पाहिजे. चित्ताला जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्यें परमेश्वरावांचून दूसरा विषय, दूसरें ध्यान असतां कामा नये. पण या बरोबरच नामदेव महाराजांनीं अशा स्थितीची ओळखण म्हणून एक स्थूल वस्तुहि जोडून दिली आहे. असा अंतरांतून हरिमय झालेला संत बाहेरहि सारें विश्व हरिमय च पाहील; आणि त्या बाह्य विश्वाची एका हरिभावानें च सेवा-चाकरी करील.

अशा प्रकारें काया वाचा मन या तिन्हींच्या बाबतींत संत कसा असतो हें या लक्षणांत क्रमानें सांगितलें आहे. हीं लक्षणें ज्यांच्या अंगीं बाणलीं आहेत असे केवळ हरिमय होऊन गेलेले संत-पुरुष नामदेव महाराजांचे जीव कीं प्राण होते; तरी ते प्रेमातिशयानें पुन्हां आपल्यालाच तें सांगत आहेत. विश्वात्मैक्य अनुभवून सांगत आहेत. 'तुझ्या ध्यानीं ज्यांचें' म्हणतांना देव त्यांच्या समोरच आहे. म्हणून ईश्वराच्या ध्यानांत असें न म्हणतां तुझ्या ध्यानीं असें वचन निघालें आहे.

## २११ ये ग ये ग विठाबाई

जनाबाई नामदेवाच्या घरची दासी. पण ती महान् भगवद्-भक्त होती. कशी नसणार ? महाभागवताच्या घरची च ती. त्याच्या सेवेंत राहणारी. ती हि महाभागवत् बनल्यास काय नवल? वरागर मणि ज्या खाणींत असतों तिथच्या गारी हि हिरे बनतात असें म्हणतात. मला तसला कांहीं वैरागर ठाऊक नाहीं पण हा महाभागवतरूप वैरागर मात्र ठाऊक आहे. त्याच्या सांनिध्यानें मातीचें सोनें आणि गारीचे हिरे-माणकें मात्र झालेलीं दिसतात.

विद्वानांच्या कवनांत साहित्यिक बरव पुष्कळ दिसते, पण भक्तीचा तो जिव्हाळा व सरळ हृदयाला जाऊन भिडण्याचा गुण तितका दिसत नाहीं, जितका या जनाबाईच्या साध्या अनलंकृत भाषेंतल्या प्रेमळ उद्‌गारांत आहे. एकूण मराठी भाषाच साधी. त्यांत तिचें साहित्य हि तसेंचा मग संतांच्या वाणीचें तर विचारायलाच नको त्या संतांत हि ज्ञानदेव तुकारामासारखे साहित्यिक कुसर दाखविणारे दोन-चार संत सोडून दिले तर बाकीचे सारे अगदीं निर्‌गुण कवि आहेत. त्यांचा गुण एकच निर्‌मळ सरळ भाव. अशा त्या भक्त कवींत जनी आगळी आहे. तिचा पुढील अभंग सुप्रसिद्ध आहे.

१ हे माझे पंढरीचे आई विठाबाई ये. लवकर ये.

२ भीमा आणि (पंढरपुराला असलेला तिचा चंद्रकोरीसारखा वांकदार प्रवाह म्हणजेच) चंद्रभागा ही तुझ्या चरणींची गंगा च आहे.

३ त्या तुझ्या सर्व पार्षदांसमवेत तूं ये. माझ्या रंगणांत. कीर्तनाच्या रंगभूमीवर उपस्थित हो. आणि आनंदानें नाच. अर्थात् मी असें तन्मय कीर्तन करीन कीं तूं आपल्या पार्षदांसमवेत तिथें येऊन हर्षभरानें नाचूं लागशील.

४ नामदेवाची दासी जनी म्हणते, माझा रंग, माझी आवड दुसरी तिसरी कांहीं नाहीं. तुझें गुणगान ही च माझी आवड, हा च माझा रंग.

## २१२ ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा

महाराष्ट्र संत मंडळांत चोखोबांचें स्थान असामान्य आहे. कारण ते 'हरिजन' होते. ते नुसते नांवाचे वा जातीचे हरिजन नव्हते तर गुणानें आणि कर्मानें हरिजन होते. त्यांच्या वाणींत आणि विचारांत धार आहे. नांवाप्रमाणें च चोख आहे त्यांचें सर्व जीवन.

१ ऊस वांकडा असला तरी त्यांतील रस वांकडा नाहीं. आंतील रस पहा, वरचें अंग काय पाहतोस ?

२ कमान असेल वाकडी पण तिचा तीर सरळच आहे. (वंश पोकळ असेल, पण धनुर्बाणाचा गुण पोकळ नाहीं.) बांसाची जात पाहूं नकोस त्याचें कार्य पहा, गुण पहा.

३ ऊस, नदी, बांस दिसायला वांकडे वा विगुण दिसले तरी जसे ते हीन नाहींत कारण त्यांचीं रस पाणी आणि लक्ष्यवेधरूप कृति हीं सगुणच आहेत, त्याप्रमाणें चोखा नीच समजल्या जाणाऱ्या जातींत जन्मला असेल, पण त्याचा भाव त्याची श्रद्धाभक्ति ही नीच नाहीं. आणि ज्याच्याशीं तुम्हांला कर्तव्य आहे तें आंतरिक मोल तुम्ही पहा, वरच्या टरफलावरून पारख करूं नका. वरच्या रंगावरून पारख कराल तर फसाल. अंतःसाराला मुकाल.

## २१३ आतां कैसेनि पूजूं देवा

१ देवाची पूजा कशी करूं ? त्याची पूजा म्हणजे माझीच पूजा होते.

२ तुलसीचें पान तोडायला गेलों, तों तिच्या पानापानांत मधुसूदन वसला आहे. तें कसें तोडूं ?

३ अत्तर, गंध, धूप, दीप हा उपचार हि कसा करायचा ? तीं सर्व पूजाद्रव्यें माझीं च रूपें आहेत.

४ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, पूज्य आणि पूजक दोन नाहीतच, मग पूजा कशी करायची ? पूजेला द्वैत त्रैत पाहिजे. पूज्य, पूजक

आणि पूजासामग्री पाहिजे. पण जिथें तिन्ही एकरूप च झालीं तिथें पूजा कुणीं कुणाची आणि कशानें करायची?

## २१४ कनक कांता न ये चित्ता

१ परमार्थी कोण? तर जो एषणात्रयांतून मुक्त झाला तो. उपनिषदांत अशा परमार्थी पुरुषाचें वर्णन केलें आहे

"पुत्रैषणायाश्च, वित्तैषणायाश्च, लोकैषणायाश्च व्युत्थाय भैक्षचर्याम् चरन्ति"

परमार्थी पुरुष, गृह, द्रव्य आणि सद्गति यांचें अभिध्यान सोडून भिक्षा-वृत्तीनें राहतात. म्हणजे या अभंगांत नाथ महाराजांनीं लोकैषणेचा उल्लेख केलेला नाहीं. त्यांनीं परमार्थी पुरुषाची शास्त्रीय व्याख्या केलेली नाहीं, तथापि पूर्ण पुरुषाची गोष्ट करायची म्हणजे त्यांत लोकैषणेचा उल्लेख करावयास पाहिजे. लोक सद्गति म्हणजे मरणोत्तर उत्तम लोक, स्वर्ग लोक मिळावा यासाठीं इथें या जन्मांत काय काय करीत नाहींत! त्या आसक्तीपाईं ते द्रव्य आणि दारा यांचा त्याग करून नाना कष्ट करीत राहतात. असा धर्म करून ते पुण्य कमावतात. आणि पुण्याच्या बळानें स्वर्ग. आणि स्वर्ग म्हणजे काय? तर उत्तम भोगस्थान! म्हणजे शेवटीं ही हि भोगासक्तिच झाली. ही अर्थात् इहलोकीं लोक ज्या साठीं चोरी जारी करतात त्या लौकिक सुखस्पृहेहून चांगली. कारण त्यामुळें जगांतून अनर्थ निवारण होतें. परंतु जनांतून झालें तरी मनांतून कुठें झालें असतें. तो त्याच सुखाची स्वर्गांत अभिलाषा करतो! ती हि जेव्हां तो सोडून, पूर्ण विषय-वितृष्ण होऊन, आत्मतुष्ट होतो, तेव्हांच तो पूर्ण परमार्थी म्हणावयाचा.

२ एखादा मनुष्य मोठा बलवान् म्हणून प्रख्यात असावा आणि त्याला एक गवताची काडी उचलतां येऊं नये. यावरून काय समजावयाचें? त्याची ख्याति खोटी आहे हेंच. त्याप्रमाणें कोणी एक पंडित आहे. त्याला वेद, उपनिषदें, गीता सर्व मुखोद्गत आहे, परंतु त्याच्याठाईं वैराग्य नसेल तर त्याचें तें सारें ज्ञान बल नसून नुसता भार होय. बल माणसाला तारतें, ओझें माणसाला बुडवतें. म्हणून म्हटलें आहे, असंगता हेंच एक सत्य आहे आणि सार आहे. 'या विद्या सा विमुक्तये' या वचनांत हाच भाव आहे.

३ जशी वर परमार्थाची कसोटी सांगितली तशी आतां वाणीची कसोटी सांगतात. एखादा माणूस मोठा वक्ता असला, काव्यमय बोलत असला, लोकांना डोलवत असला, परंतु त्याच्या बोलण्यांत खरेपणा नसला तर त्याचें सारें वक्तृत्व ओंवळें होय, म्हणजे शिवण्याच्या हि लायकीचें नाहीं.

४ वरील दोन ओळींत अंत:करण आणि वाणी यांच्या कसोट्या सांगून आतां शेवटीं नाथ व्यवहाराची कसोटी सांगतात. ती कसोटी ही कीं 'जें जें भेटे भूत तें तें वाटे भगवंत' असें झालें पाहिजे. असें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत आपली साधना, आपलें भजन, हें खरें आणि पुरें नाहीं असें ओळखावें.

या अभंगांत नाथांनी आपली जीवनदृष्टि स्पष्ट केली आहे. अंत:करण निर्वासन झालें पाहिजे, वाणी सत्यमय बनली पाहिजे आणि कर्म पूजामय झालें पाहिजे. असें जेव्हां होईल, तेव्हांच जीवन कृतार्थ होईल. अवांतर पांडित्य सर्व व्यर्थ आहे.

## २१५ काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल

आपण सारे तसे वारकरी आहोंत. म्हणजे जन्ममरणाची वारी आपली सारखी चाल्लेलीच आहे. पण याला खरे वारकरी म्हणतां येणार नाहीं. तर खरे वारकरी म्हणजे काय ? पंढरपुरची वारी करणारे ? ते हि पुष्कळच आहेत. पण ते देखील खरे वारकरी नव्हेत. खरे वारकरी तर ते होत कीं जे ओळखतात कीं ही आपली काया ही च पंढरपुरी आहे. आणि तिच्या ठाईं वास करणारा जो आत्मा तोच विठ्ठल आहे. श्रद्धा, भक्तिमय जीवन म्हणजे भीमा नदी होय. दया, क्षमा, शांति हे त्या श्रद्धाभक्तिरूप नदीचें वाळवंट म्हणावयाचें. या वाळवंटाच्याठाईं वैष्णवांचा मेळा मिळत असतो. अशी ही पंढरी आपल्या सोबतच आहे. आणि आपण जाऊं तिथें जनांत अथवा वनांत म्हणजे सर्वत्रच ती आहे.

एकनाथ महाराज म्हणतात, अशी आहे माझी वारी.

## २१६ कृष्णा धाव रे लवकरी

१ हे कृष्णा महान् संकट आलें आहे. धांव, लवकर धांव ! तूं च आमचा वेळोवेळचा कैवारी आहेस. हें आलेलें संकट निवार.

२ तूं अजून कां नाहीं आलास ? कां निष्ठुर झाला आहेस आजच ? तुझ्यावांचून कसें होणार माझें ? इथें मी परदेशी आहें. इथें दुसरें कोणी माझें ओळखीचें वा आप्त-स्वकीय नाहीं. माझ्यासाठीं धावून येणारें नाहीं. तूं च सत्वर ये.

३ आतां जरा हि उशीर लावूं नकोस. तूं उशीर करशील तर मी पहा बुडालें च ! दया कर. क्षणाचा हि विलंब न लावतां दर्शन दे, भेट.

४ तोंडाला कोरड पडली आहे. आतां प्राण चालला आहे. हे अच्युता, मी तुझ्या कृपेसाठीं पदर पसरते आहें. मला हे रुक्मिणीकांता, हे भक्तवत्सला, पाव.

५ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, बहिणीची ही करुण वाणी, आर्त हांक, हा धांवा ऐकून तो बंधुराज द्वारकेचा राणा धावत आला द्रौपदीनें त्याच्या पायांवर लोळण घेतलें.

## २१७ जय देव जय-देव जय जनार्दना

एकनाथांच्या साधनेचा हा परमोच्च बिंदु आहे. यांत त्यांचें समग्र हृद्गत प्रकट झालें आहे. त्यांचा परमार्थ आणि भावार्थ इथें एकवटला आहे. गुरु-देव-भक्ति जनता-जनार्दन-भक्ति एकवटली आहे. असली आरती यापूर्वी कोणीं केली नसेल असा रचना-कौशल्याचा हि भाव अभिनव पद सूचित करीत आहे. यांत परितृप्ति ओसंडते आहे.

१ हे जनार्दना गुरुदेवा, तुझी ही अभेदभावानें केलेली परमार्थपूर्ण, रहस्यपूर्ण, अशी आरती आहे. तुझा जयजयकार असो.

२ या अभेदरूप आरतीच्या प्रकाशांत जन पहावेत तों ते जनार्दन च आहेत असें दिसून येतें. सर्व भिन्नता लोपते. सर्वत्र एकतत्त्व जनार्दन च विराजत आहे असें दिसून येतें.

प्रकाश वस्तुत: जगांत सर्व पदार्थांची भिन्नता च दाखवीत असतो. अंधाराचें अवगुंठन दूर करून त्यांचें वास्तविक स्वरूप, वेगवेगळेपण, दाखवीत असतो. परंतु हा अभेदरूप आरतीचा प्रकाश तसा लौकिक नाहीं. हा दिव्य प्रकाश आहे. या प्रकाशांत सारे भेद मावळतात. भेदरूप अंधार, वस्तूंचें यथार्थ स्वरूप लोपवून टाकणारा रात्रीचा काळोख, दूर करणारी ही आरती आहे.

३ जें अनेक आहे तें एकत्वानें परिपूर्ण आहे, सारें भिन्न अभेदानें अनुस्यूत आहे, असें या आरतीनें एकत्वाचें दर्शन होतें. भेदकारी बुद्धि च इथें कुंठित झाली, मग गुण आणि अवगुण हा भेद कुठून उरणार.

४ दिव्यावरून दिवा लावतात. त्याप्रमाणें परमात्म्याच्या ज्योतीवरून ही आत्म्याची ज्योति पेटविलेली आहे. आणि त्या प्रदीप्त तेजानें ही आरती सतेज झालेली आहे.

५ इथें सर्व तेजोमय आहे. इथें नाहीं प्रकाशक, नाहीं प्रकाश्य, नाहीं प्रकाशन. पाहणारा पहावयाचें आणि पाहणें ही त्रिपुटी देहभावाधीन आहे. तो देहभाव च जिथें लोपला तिथें त्रिपुटी कुठची ? इथें तर सर्व अभिन्न एकमय आहे.

६ या स्वरूपाला ना पाठ ना पोट. आंब्याच्या फोडीसारखी पाठीची बाजू आणि पोटाची गराची बाजू असा इथें फरक नाहीं. तें केवळ एकरस आहे. सर्वतोमुख आहे. त्याच्या सर्वबाजूंनीं डोळे आहेत. तो निरुपम आहे. त्याच्या सारखा तो च आहे. म्हणून तो सर्वांहून वरिष्ठ आहे.

७ त्यांत सत् असत्, स्थूल सूक्ष्म, बद्ध मुक्त हें सारें द्वैत पचून आत्मसात् झालें आहे.

८ तें सर्वत्र उघड भरलेलें आहे. पण मनाला मात्र तें आकलन होत नाहीं. मन बाजूला सारलें तर जें जें दिसतें तें सारें तें च आहे.

९ इथें अभावना म्हणजे नास्तिकता तर भावनेनें म्हणजे आस्तिकतेनें आधीं च गेलेली असते, पण जिला भावना म्हणायची ती हि इथें काम

करीत नाही. तिचें हि इथें नांव च नाहीं. अंधार च नाहीं, तर तो फेडणें हि नाहीं. 'न सत् तत् न असत्' असें तें रूप आहे.

अशी ही जनार्दनाच्या शिष्यानें एकनाथानें अभिनव आरती केली आहे.

## २१८ जेथें जेथें मन जाईल वासना

हे नारायणा ! जेथें जेथें हें माझें मन जाईल, वासना जडेल, तेथून तेथून त्याला तूं परावृत्त कर. एवढेंच तुझ्यापाशीं मागणें आहे.

सर्व चित्तवृत्ति आत्म्याच्या ठाईं विलीन होणें याचें च नांव निरोध. याचें च नांव योग. निरोध म्हणजे बाह्य विषय-प्रवृत्तीचा संयम आणि योग म्हणजे आत्म्याच्या ठाईं मनोनाशपूर्वक त्यांचा विलोप. निरोधांत आत्म्याची सत्ता प्रगट नाहीं, गृहीत म्हणतां येईल. योगांत ती गृहीत च नव्हे तर लक्षित आहे, अभिप्रेत आहे.

चित्त वृत्तीचा निरोध आणि आत्मसमर्पण ज्यायोगें होतें त्या साधना-पद्धतीला योग असें म्हटले आहे. कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग, ज्ञानयोग असें योग-चतुष्क गीतेंत प्रतिपादिलें आहे. त्या सर्व योगांचें उद्दिष्ट आणि पर्यवसान आत्मसमर्पणरूप, समाधिरूप निरोधांत च आहे.

अशा प्रकारें योगाचें उद्दिष्ट सांगून त्याच्या प्राप्तीचा आपला साधना-पंथ सांगतात– 'वारंवार द्यावा नामाचा आठव। कुबुद्धीचा ठाव पुसा सर्व ।।' हा भक्तिमार्ग आहे. अत्यंत प्रेमपूर्वक अखंड नामस्मरण हें त्याचें मुख्य साधन. अखंड नामजपानें चित्ताची प्रवृत्ति आत्म्यांत मिळत राहिली पाहिजे. जसा गंगौघ समुद्रांत मिळत राहतो. ईश्वराहून, परमात्म्याहून दुसरें स्मरण म्हणजे कुबुद्धि होय. तिचा पार ठाव पुसून टाकावयाचा आहे. बाह्य विषयांतून इंद्रियें खेंचून घेणें याला प्रत्याहार म्हणतात. आणि आत्म्याच्या ठाईं मनोवृत्ति सतत तैलधारेप्रमाणें अभिषेचणें याला म्हणतात ध्यान. अखंड नामस्मरणाच्या योगें हें ध्यान संपादावयाचें आहे.

परंतु ध्यानाच्या आड मी-तू चा भेद येत असतो. ही एक कल्पना च आहे. वास्तविक अखंड आत्मसत्तेंत भेदाला वाव च नाहीं. म्हणजे मी-तू

ची ही निव्वळ कल्पना आहे. ही कल्पना टाकावयाची आहे. सारा संसार या कल्पनेच्या जाळ्यांत अगदीं गुरफटून गेला आहे. हें जाळें तोडावयाचें तर वरवरून तोडून चालत नाहीं. मूळापासून तिचा कंद च उपटायला पाहिजे. तो कंद आहे वासना, भोगतृष्णा. आपण पहातो ना घरांत भाऊ-भाऊ एकत्र राहतात. सख्खेच भाऊ असतात ते. अगदीं एकजीव असतात. परंतु त्यांचीं लग्नें झालीं म्हणजे भेद फुटून निघतो. याचें कारण भोग-परिग्रहाशिवाय दुसरें काय ? एका माणसाचें दुसऱ्या माणसांशीं किंबहुना एका जीवाचें दुसऱ्या जीवाशीं जें द्वैत, विरोध आणि वैर निर्माण होतें तें अनात्म भोगलालसेमुळें च. ती लालसा नाहीशीं झाली म्हणजे भेद आपो-आप च खुंटतो आणि अद्वैतानुभूति होते.

म्हणून एकनाथ महाराज म्हणतात, एका परमात्म्याच्यावांचून दुसरा छंद नको. त्याचीच एक गोडी जडून राहो. "आसनीं, शयनीं, भोजनीं, गमनीं अखंड एक रामकृष्ण गोविंद आठवावा."

## २११ झाली संध्या संदेह माझा गेला

माझी संध्या झाली आहे. कारण पहा, माझा संदेह दूर झाला आहे. आणि आत्मरूप राम हृदयांत स्वच्छ प्रकाशला आहे.

संध्या सूर्योदयापूर्वी तारका असतांनापासून सूर्योदयापर्यंत करा-वयाची असते. पण हें बाह्य झालें. अभ्यंतरांत अज्ञानकृत संशयाचें निवारण होऊन स्वच्छ आत्मज्ञान होईपर्यंत संध्योपासना करावयाची आहे. स्वच्छ आत्मदर्शन होईपर्यंतचा जन्मजन्मांतराचा जीवनकाळ ही संध्या म्हणजे संधिकाळच म्हणावयाचा. मुमुक्षा उत्पन्न झाली म्हणजे रात्र संपली. तेथ-पासून मुक्तीपर्यंतचा सगळा अवधि म्हणजे संध्याच. संध्येंतील मुख्य मंत्र काय आहे ?

ॐ भूः भुवः स्व. । ॐ तत् सवितुर् वरेण्यम् ।
भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥

ही गायत्री. हिच्यांत या तेजाचें, आत्मतेजाचें ध्यान केलेलें आहे.

संध्या करायची म्हणजे स्नान करून शुचिर्भूत झाले पाहिजे त्यानंतर आसनावर बसायचें. मग भस्म लावायचें आणि त्यानंतर केशवाय नमः, नारायण नमः म्हणावयाचें.

उत्तम स्नान म्हणजे संगमांतील. संगमांत उत्तम संगम म्हणजे प्रयाग. इथें गुरुकृपा ही भागीरथी गंगा, शांति ही यमुना आणि क्षमा ही सरस्वती ह्यांच्या त्रिवेणी संगमांत स्नान करून घ्यायचें आहे.

इथें गुरुकृपेला अतिशय महत्त्व देण्यांत आलेलें आहे. तिला गंगा म्हटलें आहे. आणि हें महत्त्व अगदीं योग्य असेंच आहे. आपणांला औषध घ्यायचें झाल्यास आपण आयुर्वेद-पारंगत वैद्याकडे च जातो, एखाद्या वैदू-कडे नव्हे. त्याप्रमाणें परमार्थ-मार्गात सद्‌गुरुच खरा मार्गदर्शक होय. कारण तोच परमार्थास पोंचलेला असतो. निदान आमच्या पुष्कळच पुढें असतो. आणि म्हणून त्याची कृपा असणें म्हणजे त्याचें मार्गदर्शन मिळवणें ही पहिली गोष्ट होय. कित्येक लोक याला गुरुवाद म्हणतात. पण हा कांहीं वाद नव्हे; हें कांहीं तरी थोतांड नव्हे. स्थूल बाह्य विषयांत त्या त्या विषयांतील तज्ज्ञाची मदत आपण घेतों आणि हा तर अत्यंत रहस्यभूत, सूक्ष्म आणि सूक्ष्मतर असा परमार्थ-मार्ग आहे. तेव्हां त्या बाबतींत जर अधिगत-परमार्थ अशा अधिकारी सद्‌गुरुची मदत घेतली नाहीं तर तें कसें चालेल ? एवढ्यासाठीं गुरुकृपा हवी

या त्रिवेणींत स्नान करून स्वानुभवाची शुद्धि प्राप्त करावयाची आहे. स्नान करून आपण शरीर-शुद्धि साधतो. त्याप्रमाणें इथें अनात्म-भावांतून मुक्त व्हावयाचें आहे. त्याचेंच नांव स्वानुभव.

ही स्वानुभवरूप विमुक्ति प्राप्त करून घेण्यासाठीं संध्या करावयाची. मृगाजिन पसरून त्यावर कापडाची घडी घालून बसावयाचे असते, तसें इथें मूळ सद्‌बुद्धि म्हणजे श्रद्धा हवी. तिच्या अधिष्ठानावर पुढील सारी साधना उभी आहे. त्यानंतर गुरुकृपा. त्या गुरुकृपेच्या बळानेंच सन्मार्ग चोखाळावयाचा आहे. गुरुच्या म्हणजे अधिकारी पुरुषाच्या मार्गदर्शना-वांचून साधना निर्विघ्न पार पडणें अशक्यच. गुरूचें मार्गदर्शन लाभल्या नंतर प्रत्यक्ष आचरावयाचा कार्यक्रम शमदमादि संयमाचा होय. आसनावर

बसून भस्म धारण करावयाचें असतें. तें भस्मधारण म्हणजे हें वैराग्य झालें. त्यानंतर मग केशव, नारायण इत्यादि संध्या-विधि सुरू व्हावयाचा. तो कोणता ? तर जें जें म्हणून कर्म होईल तें तें ब्रह्मार्पण-बुद्धीनें करणें. मनुष्य नाना कामना धरून कामें करीत असतो. तसें कुठलें हि कर्म न करतां प्रत्येक कर्म हें पूजा-भावनेनें करणें याचें नांव ब्रह्मार्पण, केशवनारायणादि हरिनामोच्चार. हीच खरी संध्या.

संध्या म्हणजे सम्यग्-ध्यान. नाथांचें सम्यग-यान हें असें आहे. जें कर्म होईल तें हरिपूजा-भावनेनें व्हावें आणि सारें विश्व बाह्यविश्वरूप न दिसतां आत्मरूप दिसावें, हरिमय दिसावें असें जेव्हां होईल तेव्हांच संध्या झाली म्हणावयाची.

ही माझी संध्या ऐकून, नाथ महाराज म्हणतात, साधुजन मनोमन संतुष्ट होईल. कारण त्यांना यांत निजखुण, आत्मप्रतीतिच दिसून येईल. शास्त्रवचनाचा, आप्तपणाचा स्वानुभवाशीं पडताळा पडलेला दिसेल.

## २२० तें मन निष्ठुर कां केलें ?

हे प्रभो ! तूं दयेचा सागर आहेस. तुझें मन पूर्ण दयेनें भरलेलें आहे. पण माझ्याविषयीं तें निष्ठुर कां बरें झालें ? अद्याप आपल्या चरणीं तूं मला लीन करून कां नाहीं घेतलेंस ?

तूं किती दयाळू आहेस ! गजेंद्रानें धांवा करतांच तूं गरुडाला टाकून त्याच्या मदतीला धांवून गेलास. प्रह्लाद म्हणाला, परमेश्वर सर्वव्यापी आहे. तो जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं सर्वत्र भरून आहे. त्याच्या वांचून रिता ठाव नाहीं. हा त्याचा भावार्थ लक्षांत घेऊन तो खरा करण्यासाठीं तूं खांबांतून नरसिंह रूपानें प्रगट झालास. दुष्ट कौरवांच्या तावडींत सांपडलेल्या द्रौपदीचा करुण धांवा ऐकून तूं कळवळलास आणि अंबरावतार धारण करून तिची लाज राखलीस. असा तूं करुणेचा सागर आहेस. देवा मजविषयींच निष्ठुर नको होऊंस.

एकनाथ महाराज म्हणतात त्यानें मजवर दया केली आहे. आणि त्याच्या पूर्ण कृपेमुळें त्याच्या चरणीं मी निरंतर लीन झालों आहे.

## २२१ धन्य तोचि जगीं एक हरि-रंगीं नाचे

१ तो च भक्तराज या जगांमध्यें धन्य होय, जो हरिरंगांत रंगून निर्लज्ज होऊन नाचत असतो. आणि वाचेनें सदासर्वकाळ रामकृष्ण वासुदेव असें नामस्मरण करीत असतो.

२ तो हरिमय झालेला असल्यामुळें सुख काय आणि दुःख काय त्याला सारखेंच झालेलें असतें. सुख दुःख समान झालेलें असलें तरी तो प्राणिमात्राविषयीं अत्यंत कृपाळु असतो. तो ज्ञानाचा प्रज्वलित अग्नि असतो, तर भक्तिप्रेमाचा तो जलकल्लोळ असतो.

३ त्याच्या ठिकाणीं प्रखर ज्ञान आणि जिव्हाळ्याची भक्ति यांच्या-बरोबर नितांत विषय-वैराग्य असतें. त्याला हा आपला, हा परका असा दुजाभाव नसतो. तो सर्वदा आत्मसंतुष्ट असतो. कारण त्याचा निर्धार, त्याची बुद्धि हें 'विश्वचि माझें घर' अशी व्यापक असते.

४ तो ज्ञानी असतो, पण ज्ञानाच्या अहंकाराचें ओझें तो वाहत नाहीं. बालकवत् तो अत्यंत निरहंकार होऊन राहतो. आणि या जगांत एखाद्या वात्सराप्रमाणें केवल अनासक्त होऊन वागत असतो.

५ एकनाथ महाराज म्हणतात, तो केवळ हरिमय होऊन राहिलेला असतो. त्याच्या प्राणांत आणि मनांत हरिच भरलेला असतो. तो बसला असो वा पडला असो, त्याचें हरिचिंतन चाललेलें असतें आणि एरव्हीं सतत नामकीर्तन होत असतें

## २२२ नीर मंथूनि मंथन पैं केलें

१ रागद्वेष आहेत, हें नको तें हवें हा द्वंद्व-मोह जोंवर आहे, तोंवर सार असार, गोड कडू हा भेद राहणार. परंतु जिथें रागद्वेषाला थारा च नाहीं, जिथें ताक आणि लोणी असा भेद नाहीं, जिथें पाणी च घुसळलें जात

आहे, तिथें सारासार कांहीं राहत च नाहीं. तिथे सर्व च सार आणि सर्व च गोड.

२ रसनेची चाड म्हणजे सोस संपला म्हणजे मग जें काय मिळेल तें सारें च गोड. दूधहि गोड आणि ताकहि गोड.

३ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, ज्यानें मानस मंथून अतिमानस भूमिका गांठली त्याचा द्वंद्वमोह गेला आणि मग त्याला अवघेंच सार झालें.

## २२३ पक्षी अंगणीं उतरती

१ पक्षी आकाशांतून उडत येतात आणि अंगणांत दाणे टिपायला उतरतात. परंतु ते का तिथें चिकटून बसतात ? नाहीं.

२ त्याप्रमाणें माणसानें संसारांत अनासक्त रहावें. प्रारब्ध कर्म आहे तोंवर रहावें. उतावीळ करूं नये.

३ वाटसरू रात्रींचा वस्तीला येतो आणि सकाळ झाली कीं आपला रस्ता सुधारतो. त्या प्रमाणें संसारांत गुंतून राहूं नये. आपलें हें वास्तव्य नाहीं, हा परदेश आहे हें ओळखून अनासक्त रहावें, उदासीन रहावें. आणि

४ एकनाथ म्हणतो, आपलें शरण म्हणजे घर, मुक्काम, जनार्दन आहे. ( तिकडे प्रयाण करावें ) मग भय कसलें ?

## २२४ भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा

१ हे देवा, मला भक्तिप्रेमाच्या ओलाव्यावांचून असलेलें कोरडें ज्ञान नको देऊं. त्यांत नित्य नवा अभिमान उत्पन्न होतो.

२ मला तर तूं एक प्रेमसुख च दे. दुसरें कांहीं नको. खरोखर प्रेमाशिवाय समाधानच नाहीं.

३ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, प्रेम हें अति गोड आहे. त्याची गोडी बोलून सांगतां यायची नाहीं आणि ऐकून कळायची नाहीं. ज्यांनीं तें प्रेम अनुभवलें आहे, चाखलें आहे, त्यांनाच त्याची गोडी कळायची.

## २२५ भगवद्भावो सर्वांभूतीं

१ सर्व भूतें– आकाश, डोंगर, नदी, सागर, वृक्ष-वनस्पति, पशु-पक्षी नर-वानर-किन्नर, कीट-पतंग-पिपीलक इत्यादि समस्त चराचर सृष्टि भगवद्-रूप पाहणें, हेंच ज्ञान होय आणि हीच भक्ति. याचेंच नांव विवेक आणि याचेंच नांव वैराग्य.

२ सर्वत्र भगवद्दर्शन करणें सोडून विश्वाकडे बाह्यविषय-दृष्टीनें, पाहणें, भिन्नरूपानें पाहणें, भोग्यरूपानें पाहणें हेंच खरें अज्ञान होय. आणि त्यापासूनच, म्हणजे आत्मज्ञानाच्या अभावीं विषयध्यान केल्यापासूनच, या जीवाला दृढबंधन प्राप्त झालें आहे.

३ स्वरूपाचें स्मरण, आत्मानुसंधान, म्हणजेच परम प्राप्ति होय, परब्रह्म होय. आणि त्याचें विस्मरण, त्याचें अनुसंधान नसणें. अर्थात विषयाचें स्फुरण होणें, त्याचें चिंतन करणें हाच भव-भ्रम होय, प्रपंचरूप भ्रांति होय. आतां तुला देहांतील गुज, देहांत अनुभवाला येणारें रहस्य सांगतो, तें नीट लक्षांत घे.

४ मला इतकी गाढ झोप लागली होती कीं तींत मला कांहींएक आठवलें नाही, असें माणूस म्हणतो. हें जें विस्मरण आणि त्याचें भावरूप स्मरण ही दोन्ही ज्याच्यायोगें हेरलीं जातात तें तत्त्व म्हणजेच निजरूप होय. तें म्हणजेच आपण.

५ एकनाथ महाराज म्हणतात, हा जो सहज निजबोध, हें जें आयतें आत्मज्ञान, तें झालें असतां आंत बाहेर सगळा परमानंदच परमानंद ! तेथें मग दुसरें, परमानंदावांचून कांहींच नाहीं.

## २२६ मन रामीं रंगलें अवघें मन चि राम झालें

१ एखादी वस्तु रंगांत बुडवून रंगवली म्हणजे ती आंतून बाहेरून रंगून जाते. तसें माझें मन रामांत रंगून गेलें आहे. किंबहुना राम च होऊन गेलें आहे तें. आंतबाहेर त्याच्यांत रामरूप च कोंदाटलें आहे.

२ लांकूड पेटवलें म्हणजे तें जळून निखारा बनतें. लांकूड म्हणून नाहींसें होतें, अग्नि च बनून राहतें. तसें चित्त हें चेतून चेतन च बनून गेलें

आहे. चैतन्य च झालें आहे. त्यामुळें दृश्य विश्व मावळलें आहे. इतकें च नव्हे तर द्रष्टा हि द्रष्टेपणानें संपला आहे. अशाप्रकारें सर्वस्व च बुडालें !

३ आत्मरूप रामाचें ध्यान मला असें कांहीं लागलें आहे कीं सहज क्रिया, बुद्धया केलेलें कर्म आणि तत्परिणामरूप पुण्यापुण्य धर्म, सर्व त्याच्याच प्रकाशाचे किरण होऊन बसले आहेत. मला सत्य आणि मिथ्या, प्रकृति सर्व आणि तदतीत पुरुष तो एक राम च दिसत आहे.

४ भक्ति काय आणि ज्ञान काय, शांति काय आणि योग काय यांचा वेगळेपणानें कांहीं पत्ता च लागत नाहीं. सर्व रामप्रीतिरूप च मला दिसतात. अशी रामस्वरूपाची मला प्रीति जडली आहे. जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, आदी-अंतीं एक राम च भरून राहिला आहे. बीज हि तोच आहे आणि फळ हि तोच आहे.

## २२७ मनो-भाव जाणोनि माझा

१ माझें मनोगत जाणून देवानें सद्गुरूच्या रूपानें सगुण साकार रूप धारण केलें आणि माझ्या घरीं तो पाहुणा म्हणून आला.

२ प्रथम अहंकार चित्त बुद्धि आणि मन या चोहोंचें बनलेलें माझें अंतःकरण हें शुद्ध करून तें स्वामींना बसण्यासाठीं आसन घातलें.

३ तदनंतर अनन्य निष्ठेच्या, विमल भक्तीच्या जलानें त्यांचें पाद-प्रक्षालन केलें, आणि समूळ वासना उगाळून, झिजवून-झिजवून तिचें गंध लावलें.

४ मग अहंकाराचा धूप जाळला. सद्भावाचा दीप लावला आणि पंचप्राणांचा नैवेद्य दाखविला.

५ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, अशी मीं पूजा केली खरी, पण देव आणि भक्त दोन्ही एक च होऊन शेवटीं ती पूजा च संपुष्टांत आली. गुरुदेव च सर्वकांहीं होऊन राहिला—पूज्य पूजक पूजाद्रव्य आणि पूजन. त्यामुळें साराच खेळ आटोपला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक .................... दि: ....................

## २२८ विषयांचे अभिलाषें सकळ भेद भासे

१ विषयाच्या अभिलाषामुळें, हें सर्व दृश्य भोग्य आणि मी भोक्ता अशा बुद्धीमुळें, सारा भेद भासत असतो. अत्यल्प हि भोगवासना असली तर तिथें मुक्ति कशी राहणार ?

२ म्हणून तू विषयतृष्णा सोडून दे आणि मग साधना-मार्ग धर. विषय-वैराग्याची गोडी गुरूला पुसून घे. अनुभवी गुरुच ती तुला सांगतील.

३ जोंवर ही स्त्री आहे, हा पुरुष आहे असा भेद मन करीत राहतें तोंवर ब्रह्मज्ञान कुठलें ? जोंवर समदृष्टि आलेली नाही तोंवर ब्रह्मज्ञान नाहीं.

४ एक कण जरी डोळयांत गेलेला असला तरी तो सगळ्या शरीराला बेचैन करून सोडतो, तशी अणुमात्रहि विषयवासना चित्तांत असली तर ती जीवाला संतापदायक होते.

५ एकनाथ महाराज म्हणतात, त्यासाठीं आधीं आत्मज्ञान हवें. आत्मज्ञानाच्या बळानेंच मन निर्विषय होईल आणि तेव्हांच खरी अभेद-भक्ति लाभेल.

## २२९ वेद जयालागीं नित्य वाखाणिती

१ वेद ज्याचा निरंतर महिमा गातात तो हा साक्षात् वेदमूर्तिच पांडुरंग होय.

२ रविचंद्रादि तेजें ज्याच्या योगानें प्रकाशतात, तो हा साक्षात् तेजोमूर्तिच पांडुरंग होय.

३ पंचमहाभूतांची जो झाडणी करतो, या पांची महाभूतांना जो वठणीवर आणतो, ज्याच्या आज्ञेसरशीं जीं होतात आणि जातात तो हा साक्षात् ज्ञानमूर्ति पांडुरंग होय.

४ या तिन्ही लोकांचा जो मातापिता गुरु आणि स्वामी आहे तो हा सर्वांच्या अंतरांत राहून सर्वांचें नियमन करणारा साक्षात् अंतर्यामी पांडुरंग होय.

५ ही सगळी जडचेतन सृष्टि ज्याची प्रभा आहे तो हा साक्षात् चिद्रूप पांडुरंग होय.

६ परोपकारासाठीं जो जगात अवतीर्ण झाला आहे तो हा साक्षात् आनंदमूर्ति पांडुरंग होय.

७ आपल्या भक्तांना जो सायुज्य देतो तो हा साक्षात् निजदानी मायबाप पांडुरंग होय.

८ दासांची कर्तव्य-परिसीमा ही च कीं असा जो हा पांडुरंग त्याचें जन्मजन्मांतरीं दास्य करीत रहावें.

९ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, असें दास्य करतां करतां देह च देवरूप होऊन गेला. देह गेला आणि देव झाला.

## २३० सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं

एकनाथ महाराज कीर्तन-भजनांचें धोरण सांगत आहेत– १ देवाची सगुण चरित्रें म्हणजे अवतार-कथा परम पावन होत. त्या आदरपूर्वक, श्रद्धा-भक्तिपूर्वक कराव्या. आधीं संतसज्जन मंडळींना नमस्कार करून मग च कथाकीर्तनाला सुरुवात करावी

२ प्रथम भक्तमंडळीसमवेत अंतरंगानें म्हणजे अगदीं मनापासून जिव्हाळ्याच्या भक्तीनें, 'जय जय विठ्ठल जय हरि विठ्ठल' अशा प्रकारचें देवाचें नांव घ्यावें. आणि अशा नामकीर्तनांत देवासमोर रंगून तल्लीन होऊन जावें. त्या तल्लीनतेचे डोल येऊं लागावे.

३ अशा भजनमंडळींत सांसारिक गप्पागोष्टी, गांवगाड्याच्या गोष्टी, चालू नयेत. चिलीम फुंकणें, विड्या ओढणें आणि त्यासोबत असल्या गप्पा गोष्टी चालणें आजतागायत आपण पाहतों आहोंत. त्याचा निषेध करून नाथ महाराज खास सूचना देत आहेत–भक्ति आणि ज्ञान यांच्याहून इतर गोष्टी तेथें करूं नयेत. तेथें भजनमंडळींत कीर्तनप्रसंगीं देवादिकांच्या लीला, संतसज्जनांच्या कथा, गीताज्ञानेश्वरी यांचें विवेचन व्हावें. आणि त्याच बरोबर जो तत्त्वविचार आचरणांत उतरविण्यासाठीं वैराग्याची साधना

करावी, त्याच्या काय खुब्या आहेत–युक्त्या आहेत, त्या बाबतींत विचार-विनिमय, चर्चा परस्पर-बोध व्हावा.

४ कथा-कीर्तन करतांना त्या योगें वक्त्याच्या आणि श्रोत्यांच्या हृदयावर भगवंताची मूर्ति ठसावी, त्याचें रूप अंकित व्हावें, त्याचा साक्षात्कार व्हावा, अशी दृष्टि आणि प्रयत्न पाहिजे. संतांच्या घरची कीर्तनाची अशी मर्यादा आहे, शिस्त आहे.

५ मुखानें अखंड नामघोष चालला आहे. हृदयांत रामरूप प्रगट झालें आहे, इतकेंच नव्हे तर कीर्तन करतांना आपल्या सकट आंतबाहेर सारें हरिमय होऊन गेलें आहे, असें झालें पाहिजे. जो कोणी असें अखंड स्मरण आणि अद्वय-भजन करतो, त्यांत जो तल्लीन होऊन जातो, नाथ महाराज म्हणतात, तत्क्षणीं च तो मुक्त होतो.

## २३१ सहज सहज ऐशा करिताती गोष्टी

१ सहज भाव, सहज पूजा, सहज राहणी अशा सहजाच्या गोष्टी करणारे सहजपंथी पुष्कळ भेटतील, पण ज्याला साक्षात् सहजाची भेट झाली आहे असा विरळा च !

२ सहजाचा ज्याला छंद लागला त्याची विद्या व अविद्या, जाणीव व नेणीव, गेली. या उभयविध बंधांतून तो मुक्त होतो. तो अज्ञहि म्हणवीत नाहीं. प्राज्ञहि म्हणवीत नाहीं. दोन्ही प्रकारचा अहंकार तो बाळगीत नाहीं.

३ जाणीवेनें जाणपण आणि नेणीवेनें नेणपण अंगीं चिकटतें. पण दोहोंच्या त्यागानें सहजाचें दर्शन होतें. शाखाचंद्र न्याय आहे हा.

४ जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो, सहजरूप हें ना जाणीव आहे ना नेणीव. तें तर केवल चैतन्य आहे. जाणीव व नेणीव दोहोंच्या हि बुडाशीं असणारें पण दोहोंहून वेगळें. त्या सहज चैतन्याला मी कवटाळून बसलों आहें.

## २३२ साकर दिसे परी गोडी न दिसे

१ साखरेचे स्फटिक दिसतात पण तिची गोडी दिसत नाहीं. पण खरोखर त्या शर्करेहून गोडी का वेगळी आहे ?

२ त्याचप्रमाणें जनाहून जनार्दन वेगळा नाही. तो जगांत भरून आहे. त्याला पहायला अभिमान मात्र दूर सारला पाहिजे. तो दूर केला म्हणजे जनार्दन तुला भेटेल.

३ कापराच्या ठाईं सुवास घनावलेला असतो. पण तो का डोळयाला प्रगट दिसेल ? तो दिसला नाहीं तरी तो कापराहून वेगळा का आहे ? तो नि कापूर अभिन्न च आहेत.

४ सोन्याला पाठ आणि पोट असा कांहीं भेद नाहीं. इथून तिथून तें सारें सोनें च. तसे जनार्दनाचे शिष्य एकनाथ म्हणतात जन आणि जनार्दन हे दोन नाहींत, वस्तुतः एक च आहेत ते, असें ओळखा.

## २३३ हरीचिया दासा हरि दाही दिशा

१ हरीच्या दासाला दाही दिशांत एक हरि च भरला आहे. हरीचा दास भाविक आहे. त्यामुळें जें कांहीं दिसतें वा दिसत नाहीं तें सारें हरिरूप आहे त्याला एका अभावाला मात्र कुठें च भाव नाहीं, अस्तित्व नाहीं. कारण हरि दाही दिशांत कोंदला आहे. रिता ठाव च नाहीं कुठें !

२ एक हरिनाम घेतलें कीं त्याची सर्व चिंता गेली. ना संसाराची ना मोक्षाची. कारण जन्म म्हणजे च संसाराची चिंता आणि त्यांतून मुक्त होण्याची हि चिंता च. पण त्याला मुळीं परत जन्म च घ्यावा लागत नाहीं.

३ वासनेच्या कारणानें जन्म घ्यावा लागतो. पण त्याची ती वासना असते कुठें शिल्लक ? ती तर हरिरूप होऊन गेलेली असते. (अग्नीच्या संपर्कानें कोळशाचे निखारे झाल्यावर कोळसा उरला च कुठें ? परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें झाल्यानंतर लोखंड उरलें च कुठें ? ) हरीनें तिचें केव्हां च हरण केलेलें असतें.

४ असें हरिरूप सिद्ध झाल्यामुळें ज्ञातव्य कुंठित होतें आणि अज्ञात उरत च नाहीं. इंधन जाळायला अग्नि प्रकट होतो पण जाळून झाल्यावर तो परत अव्यक्त होतो, निजधामाला जातो. त्याप्रमाणें समग्र ज्ञानक्रिया मुरते, स्वलीन होते.

५ अमरनाथला सहज अभिषेक होतो तो च शिवरूप घेतो. त्याचीच हिममय पिंडी बनते. त्याप्रमाणें जेव्हां मनोवृत्तींची संतत धार स्वरूपाकार

होते तेव्हां ती समाधि होय. पण ही ध्यान-समाधि झाली. ही एक क्रिया आहे. क्रिया म्हटली कीं ती किती हि दीर्घ चालवली तरी कुठें तरी संपणार च. शिवाय तिच्यांत श्रम हि होणार च. या दोहोंतून मुक्त अशी जी समाधि ती च खरी समाधि म्हणतां येईल. कारण तींत व्युत्थान नाहीं, श्रम नाहीं. तीच अखंड राहील. अशी समाधि म्हणजे नाम-समाधि होय. तुम्ही वृत्तींचा समूह करा कीं व्यूह करा, या समाधीला ढका लागत नाही. वृत्तींचा समूह म्हणजे एकवटणें याला ध्यान वा निरोध म्हणावयाचें आणि वृत्तींचा व्यूह म्हणजे पसारा वा विस्तार करणें याला व्युत्थान वा संसार म्हणावयाचें. पण या दोन्ही अवस्थांत. ध्यानांत आणि मनांत, हरिरूप अभंग जसेंचें तसें, अविकृत असतें. तें च ध्या, गा, व्हा. त्यासाठीं जनार्दनाचा शिष्य एकनाथ म्हणतो– हरि बोला. 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' म्हणून गीतेनें याचें च गौरव गाइलें आहे, सर्वातिशायी माहात्म्य वर्णिलें आहे.

## २३४ आरती ज्ञानराजा

१ ज्ञानदेव जो महातेज केवलस्वरूप त्याची मी आरती करतों. सर्व साधु आणि संत त्याची च सेवा करीत असतात. माझा हि जीव त्यानें च वेधून घेतला आहे.

२ जगांतून ज्ञान लोपलें, कोणाला हित कळेना, म्हणून साक्षात् पांडुरंगानें च अवतार घेतला. त्याचें च नांव ज्ञानदेव ठेवण्यांत आलें आहे.

३ त्यानें वेदांचें गुपित ( म्हणजे वेदान्त ) ज्ञानदेवीच्या रूपानें मराठीत सर्वांना खुलें करून दिलें आहे. हा सारा विश्वाकार ब्रह्म च आहे, अलंकार म्हणजे घडवलेलें सोनें च आहे, असें त्यानें दाखवून दिलें आहे. आणि म्हणून जनार्दनाचा शिष्य रामा हा त्याच्या चरणावर मस्तक ठेवतो आहे.

## २३५ अवघ्या वाटा झाल्या क्षीण

१ या कलियुगांत ईश्वरप्राप्तीचे सारे मार्ग बुजून गेले आहेत. त्यांचें साधन कांहीं होत नाहीं. काय करायचें काय संवरायचें कांहीं नीट कळत नाहीं. कळत च नाहीं मग वळणार कुठून ?

२ पण भक्तिमार्ग मात्र सर्व-सुलभ आहे. इथें पापाला थारा नाहीं. सरळ पुण्याची वाट आहे ही. या एकाच्याच आश्रयानें जन्ममरणाच्या खेपा खुंटतात.

३ या मार्गानें या रे म्हणून मौनी विठोबा खुणावीत आहे. गीतेंत त्यानें आपल्या श्रीमुखानें सांगून ठेवलें आहे की 'न मे भक्तः प्रणश्यति'– 'जाण निश्चित तूं माझा भक्त नाश न पावतो.'

परी जे सगळीं कर्में मज अर्पूनि मत्पर ।
अनन्यभक्तियोगानें भजती चिंतुनी मज ।।
माझ्यांत रोविती चित्त त्यांस शीघ्र चि मी स्वयें ।
संसारसागरांतून काढितों मृत्युमारूनी ।।

४ अशा प्रकारें ज्यांनीं भाव ठेवला त्या श्रद्धाळु जनांना देवानें तारलें च आहे. तुकाराम म्हणतो, परंतु जे अभाविक झाले त्या अश्रद्ध कुतर्की लोकांच्या कपाळीं विनाश च ठेवला आहे. संशयात्मा विनश्यति– संशयी नासला पुरा, म्हणून गीतेंत म्हटलें च आहे देवानें.

## २३६ अवीट हें क्षीर हरि-कथा माउली

१ हरिकथा ही आम्हां वैष्णवांची माउली आहे. तिचा रस अमृत आहे. वैष्णव मंडळी त्याचे पान निरंतर करीतच राहतात. त्यांची तृप्ति ती कशी होतच नाहीं.

२ हा हरिकथा-रस अद्भुत आहे. या ब्रह्मानंदाच्या परमामृतापुढें तें स्वर्गीतील अमृत काय काढलें ? तें तर लाजेनें स्वर्गांत च दडून बसलें आहे. त्याला समोर येण्याची हिंमतच नाहीं.

३ या हरिकथेच्या रंगांत पतित आणि महापातकी लोक देखील पंक्तिपावन होतात. इतकेंच नव्हे तर देवासारखे चतुर्भुज होतात, हरिरूप होतात

४ जेथें वैष्णवांचा मेळा असतो तिथें सर्व सुखें, तिथल्यातिथें उपस्थित होतात. कारण तिथें हरिकथा दुथडी भरून वाहत असते.

५ निर्गुण निराकार परमेश्वरानें चतुर्भुज देवाचें अथवा त्या समोरील द्विभुज भक्ताचें जें हें सगुण साकार सोंग घेतलें आहे तें कशासाठीं ? ते ह्याच कथा-कीर्तनाच्या, अवीट गायनाच्या गोडीसाठीं.

६ तुकाराम महाराज म्हणतात, या हरिकीर्तनाचा महिमा काय वर्णावा ? यज्ञ, याग, जप, तप इत्यादि साधनांनीं जो मोठ्या मुष्किलीनें वश होतो तो देव इथें या कीर्तनांत सहज मिळून जातो. कारण भगवंतांनीं आपल्या परमभक्त नारदाला सांगून च ठेवलें आहे–

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥
"एक वेळ वैकुंठींहि नसें । अथवा भानुबिंबींहि न वसें ॥
पैं योगियांचीं मानसें । उमरडोनि जाय ॥
तो मी हारपला गिंवसावा । तयापाशीं पांडवा ।
जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥

## २३७ आणिक दुसरें मज नाहीं आतां

१ आतां मला दुसरें तिसरें कांहीं नाहीं हें या चित्तापासून ठरून गेले आहे.

२ एक पांडुरंग च मला आतां ध्यानीं-मनीं-स्वप्नीं विषय झाला आहे. जागृतींतील व्यवहाराचा हि विषय तो एक पांडुरंगच. व्यवहार करणारा; ज्याच्याशीं व्यवहार होतो तो, आणि ज्या गोष्टीचा व्यवहार होतो ती–सारें एक पांडुरंगच झाला आहे मला.

३ या पांडुरंगमय व्यवहाराचें माझ्या इंद्रियांना वळणच पडून गेलें आहे. त्याविषयीं चित्ताला खबरदारी घेण्याची गरजच राहिलेली नाहीं. इतकें तें स्वाभाविक होऊन गेलें आहे. दुसरा भाव च मुळीं कांहीं उठत नाहीं.

४ कारण, तुकाराम म्हणतो, त्या विटेवर तटस्थ उभ्या असलेल्या पांडुरंगाच्या ध्यानाची म्हणजे रूपाची ओळख या नेत्रांना झालेली आहे. तो कांहीं अनुमानाचा विषय राहिलेला नाही.

## २३८ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा

१ मी आपलें मरण आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. तो सोहळा मोठा अद्‌भुतच झाला.

२ आपलें मरण पाहणें म्हणजे काय ? हा जो देहाकार आहे, अमुक नांवाचा आहे, अमुक वर्णाचा आणि जातीचा आहे, अमक्याचा अमुक आणि अमक्याचा तमुक आहे, धनी वा निर्धन आहे, अज्ञ वा विज्ञ आहे. इत्यादि, इत्यादि अस्मिता अभिमान जो प्राणिमात्राला नखशिखान्त व्यापून असतो पार सोडून देणें. असा अभिमान सोडून दिल्यामुळें सर्वात्मकता आली. आणि त्यामुळें सारें विश्व आनंदानें भरून गेलें. मी सर्वमय झालों.

३ अहंकारामुळें मी एकदेशी होतों. इतर सर्वांचा भेद करून मी म्हणून एक कोपरा धरला होता. पण त्या संकुचित क्षुद्र अहंकाराचा त्याग केल्यामुळें सर्वात्मकतेचा हा सुकाळ झाला आहे आतां

४ आतां जन्म नाहीं आणि मरण नाहीं. त्यांचें सुतक, त्यांचें अशौच फिटलें. मी परिशुद्ध झालों. मी आणि माझें या संकोचापासून, अशौचांतून सुटलों. आतां मी नाहीं आणि माझें नाहीं. तूं नि तुझें म्हणायला दुसरें कांहीं शिल्लक च नाही. तूं नि तुझें नाहीं, त्याबरोबर मी नि माझें हि संपलें. सगळें अद्वितीय एकमय झालें.

५ अहंकाराचा ठाव पुसला त्यामुळें मी बेघरबार नाहीं झालों. सर्वात्मक नारायणानें हें सारें विश्व मला रहायला दिलें. भाव ठेवून त्या नारायणाच्या चरणीं मी विसावलों आहे.

६ तुकाराम महाराज म्हणतात, ही कांहीं निव्वळ कल्पना नव्हे. असें मी प्रत्यक्ष अनुभवतों आहें. आणि केवळ अनुभवतच नाहीं तर लोकांना त्याची प्रतीति आणून देत आहें. हें आपलें सर्वात्मकपण मीं जगाला पटवलें आहे आणि स्वतः अंगीं मुरवलें आहे.

## २३९ आहा आहारे भाई

तुकारामकृत हें नमक आहे, अथवा धन्याष्टक आहे म्हणा. तुकारामाला जे लोक आदरणीय वाटतात त्यांना यांत त्यानें नमन केलेलें आहे आणि त्यांच्याविषयी धन्यता प्रगट केलेली आहे.

१ हे लोक खरोखर धन्य धन्य होत.

२ जे आपल्या देहभावाविषयीं उदासीन झाले, आपल्या देहाची जे आठवण च विसरून गेले, त्या अवधूतांना नमस्कार असो. तसेच जे देवाला भक्तीनें आळवितात, त्या नामरत भक्तांना हि नमस्कार असो.

३ जे देवाच्या यात्रेला जातात त्यांना नमस्कार. आणि जे त्या देवयान मार्गानें निघालेल्यांना त्यांच्याविषयीं परमादर बाळगून त्यांना निरोप द्यायला येतात त्या श्रद्धाळु जनांना हि नमस्कार.

४ जे संतांच्या उपदेशावर विश्वास ठेवतात आणि अर्थात् तदनुसार आपलें जीवन शुद्ध करण्याचा प्रयत्न करतात त्या सज्जनांना नमस्कार. त्याचप्रमाणें जे गुरुदास्य करतात, सद्गुरूच्या कार्यास आपल्यास वाहून घेतात त्या आचार्यवान् गुरुभाग्यवंतांना हि नमस्कार.

५ जे पुंडलीकाप्रमाणें मातापित्यांचें पालन करतात त्या मातृपितृदेव तपस्वी जनांना नमस्कार. जे हरिश्चंद्र-रामचंद्रांप्रमाणें सत्यवादी आहेत, त्या सत्यवादासाठीं अपार कष्ट सहन करायला ज्यांना उल्लास वाटतो, त्या सत्यवादी धर्मात्म्यांना नमस्कार.

६ जे दुसऱ्याचें सुखदुःख ओळखतात, त्या आत्मौपम्यशाली सहृदय जनांना नमस्कार. जे दुसऱ्याची तहानभूक ओळखतात आणि त्यांना, केवळ मानवांनाच नव्हे तर पशुपक्षांना हि, अन्नोदक देतात त्या संतर्पणकारी जनांना हि नमस्कार.

७ जे परोपकार-परायण आहेत त्या पुण्यशील सद्गृहस्थांना नमस्कार. तसे च जे आत्मदमन करण्यांत दंग आहेत त्या योग्यांना हि नमस्कार.

८ तुकाराम म्हणतो, शेंवटीं जे अनन्य भक्त आहेत, त्या हरिदासांना माझा नमस्कार. कारण तिथें माझी सर्व इच्छा पूर्ण झाली आहे. (कारण ते हरिदास सगुण साकार चालतेबोलते हरि च होत.)

## २४० एक वेळ करीं या दुःखावेगळें

१ दुरिताचें, पापाचें, जाळे बाजूला सारून मला या संसार-दुःखांतून एक वेळ सोडव.

२ रात्रंदिवस मी तुझ्या पायांचें चिंतन करीन. हा माझा हे पांडुरंगा, नवस आहे.

३ पुष्कळ जन्म मला हा भोग भोगावयास लावलेंस. आतां हे पांडुरंगा मला यांतून सोडव.

४ तुकाराम म्हणतो–हे देवा, हें शिर मी तुझ्यावरून ओवाळून टाकतों आहें आणि हें शरीर तुझ्या पायीं वाहतों आहें.

## २४१ ऐसे ऐसियानें भेटती ते साधु

तुकारामाचा हा अभंग एकनाथांच्या 'कैसे कैसियानें भेटती ते साधु' या प्रश्नरूप अभंगाच्या उत्तरांत लिहिलेला आहे.

१ ज्यांच्या दर्शनानें हा भव-बंध तुटतो, जे नित्य परमानंद-मग्न असतात, जे साक्षात् मोक्षसिद्धिरूप च होत अणि जे तीर्थांना हि वंद्य म्हणजे तीर्थांचे तीर्थरूप होत त्या साधूंची भेट अशा अशा प्रकारें म्हणजे पुढीलप्रमाणें होते.

२ सर्वप्रथम भाव, म्हणजे ईश्वरश्रद्धा, पाहिजे. तो च मूळ आहे सर्व कल्याणांचें. तो च परम हितकर्ता आहे. त्याचा अर्थ सर्वत्र सर्वदा समबुद्धि धरावी. तिनेंच नास्तिकतेचा ठाव पुसतो. सर्वत्र समबुद्धि म्हटली म्हणजे सर्वभूतहितेरति आली. तिथें शत्रु मित्र पुत्र आणि बंधुबांधव हे सर्व सम होतात. सर्वांविषयीं मैत्री आणि करुणाच बाळगावी, कुणाचाहि द्वेष नसावा.

३ आधीं मन व बुद्धि म्हणजे अंतःकरण शुद्ध कर आणि त्याच बरोबर वाणी आणि शरीर यांची हि शुद्धि कर. त्याचा उपाय म्हणजे जें जें भेटेल तें तें भगवद्रूप आहे असें पाहून त्याला नमस्कार कर. ह्यासाठीं आधीं खोटें मोठेपण सोडून देऊन सर्वभावानें म्हणजे कायावाचामनें लघुत्व घे; सर्वांची दासवत् सेवा कर. मीतूंपण म्हणजे मानापमान, प्रतिष्ठा आणि तन्मूलक सारा भेदव्यवहार सोडून विनम्रपणें सर्वांचें दास्य कर.

४ ज्याच्या चित्ताला अर्थ म्हणजे धनतृष्णा आणि काम म्हणजे मैथुन-भोगतृष्णा यांचा स्पर्श नाहीं, मानापमानाची भावना नाहीं, ज्याला मोह

माया म्हणजे आपपरभाव व तज्जनित रागद्वेष नाहीं, जो समाधानी म्हणजे स्वसंतुष्ट आत्मकाम आहे, जो बालकाप्रमाणें केवळ अज्ञ म्हणजे नेणता नाहीं तर सर्व कांहीं जाणून त्यांत अलिप्त राहणारा असा, जणूं त्याला त्या सांसारिक गोष्टींचा पत्ताच नाहीं असा 'जाणूनि नेणता' म्हणजे उदासीन आहे, अशाला च साधु लोक अवचित म्हणजे अकल्पित भेट देत असतात.

५ मनांत दृढ श्रद्धा पाहिजे. कांहीं नवें आरंभायला नको वा कांहीं टाकायला नको, आपली असंगता तेवढी ओळखायला पाहिजे. कशाचा हि आणि यत्किंचित्हि अभिमान धरणें म्हणजेच जाणीव होय. तुकाराम म्हणतो, ती ज्याची गळाली तो सर्वात्मभावास पोंचला. त्यालाच साधूंचें नित्यनिरंतर दर्शन होते. अर्थात् तो स्वतःच साधु बनतो

## २४२ ऐसें भाग्य कई लाहता होईन

१ असें भाग्य मला केव्हां बरें प्राप्त होईल कीं जेव्हां हे सर्व लोक मला ब्रह्मरूपच दिसूं लागतील ? कोणी उच्च नाहीं कोणी तुच्छ नाहीं, सारे समान आत्मरूप दिसूं लागतील !

२ त्या साम्यभावाच्या सुखाला मग कांहीं अंतपार राहणार नाहीं. माझ्या हृदयांत तेव्हां मग आनंदाचे सागर हेलावूं लागतील, उचंबळूं लागतील.

३ तेव्हां माझ्या अंगीं मूर्तिमंत शांति क्षमा दया वास करूं लागतील आणि कामादि विकारांचें उच्चाटण होईल.

४ तेव्हां मग माझ्या ठाईं विवेकासह प्रखर वैराग्य प्रगटेल. धगधगीत अग्नीजवळ वनांतील हिंस्र श्वापदें फिरकत नाहींत. त्याप्रमाणें माझ्या त्या वैराग्यापाशीं विकारांचें नांवहि उरणार नाहीं. असें प्रखर वैराग्य तें असेल.

५ तेव्हां माझ्या ठाईं भावशुद्ध अशी उत्तम भक्ति केवळ नवविधच नव्हे तर नवनवविध प्रगटेल. ही भावशुद्ध भक्तिच खरोखर सर्व अलंकारांचा मुकुटमणि होय.

६ तुकाराम म्हणतो, अशी ही माझी अभिलाषा आहे. ती हे देवा, तुझ्याशिवाय दुसरा कोण बरें पुरवणार ? तूंच ती पुरविली पाहिजे

## २४३ कामक्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं

१ आम्हीं विष्णूच्या दासांनीं आपले कामक्रोध, आपल्या आवडी-निवडी, देवाला वाहून टाकल्या आहेत. देवाच्या चरणावांचून दुसऱ्या कशाची आम्हांला या जगात आवड उरली नाहीं.

ज्याला जगांतील वस्तूविषयीं आवडी नावडी असतात, रागद्वेष असतात, तो कसला भक्त ? भक्त हा भक्तीच्या योगें या सर्व अशुभांतून, मनोमलांतून मुक्तच होतो.

न लाभो नच मात्सर्यं न क्रोधो ना शुभामतिः
भवन्ति कृतपुण्यानां भक्तानां पुरुषोत्तमे ॥

जो भक्तिमान् झाला तो सहज च नीतिमान् असतो.

२ एकदां भक्तीचा निश्चय केल्यानंतर, जगाकडे पाठ करून देवासमोर झाल्यानंतर, मागें वळून कोण पाहतो ? जेथें देहभान च नाहीं तेथें देहामागोमाग येणाऱ्या प्रपंचाला कोण पुसतो ?

३ ज्याचा ईश्वरचरणीं लय लागला आहे, देहभाव हारपला आहे तो भगवद्भक्त ऋद्धि आणि सिद्धि यांच्या सुखाला लाथाडत असतो. नितांत तुच्छ लेखीत असतो. मग तो अति तुच्छ सांसारिक सुखाला काय मानणार ?

४ तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही भक्त भागवत आहोंत. आम्ही विठोबाचे दास आहोंत. आम्हांला सारें ब्रह्मांड अळणी झालें आहे. त्याची स्पृहा आम्हांला यत्किंचित् उरली नाहीं. तें आम्हीं केव्हां च पोटांत [illegible] टाकलें आहे !

## २४४ काय मी उद्धार पावेन

हे तुकारामाचे तळमळीचे बोल आहेत. साधना करीत असतांना केव्हां केव्हां साधक संशयाच्या भोंवऱ्यांत सांपडतो आणि त्याला दारुण चिंता उत्पन्न होते. आश्वासनाची त्याला नितांत आवश्यकता असते; अशाच प्रसंगींचे हे बोल आहेत.

१ माझा उद्धार होईल का ? माझ्यावर देव कृपा करील का ? तुम्ही संतजन आहां. तुम्ही माझें समाधान करा. माझा धीर सुटतो आहे !

२ हें प्रारब्धकर्मरूप ऋण कधीं खंडणार आहे का ? हें पापपुण्य कधीं सरणार आहे का ? मुक्तीचें तें रहस्य मला कसें गवसणार ? त्याची च मला चिंता लागून राहिली आहे.

३ माझी बुद्धि शेंवटपर्यंत स्थिर राहील कीं मधें च दगा देईल ही ? मधें च कांहीं अरिष्ट तर नाहीं ना येणार या निष्ठेंत ? आरंभिलेला हा उपक्रम जाईल ना शेंवटाला ? तो शेंवट कधीं येणार कांहीं कळत नाहीं !

४ तो शेंवट हा च कीं देवाच्या पायाला मीं मिठी घातली आहे, तो मला उठवून कुरवाळतो आहे, मला भरतें दाटून आलें आहे—असा शेंवट गांठण्याइतकें पुण्य होणार आहे का पदरीं माझ्या ?

५ ते देवाच्या भेटीचे सुखसोहळे पाहून माझे हे डोळे कधीं निवणार आहेत का ? संचितांत काय आहे कळत नाहीं ! हे वासनेचे डोहळे फलद्रूप होतील का ?

६ अशी ही चिंता सदा-सर्वकाळ मी करीत असतों. रात्रंदिवस मला ही च तळमळ. तुकाराम म्हणतो, फळ मिळेल च असें निश्चयानें सांगण्याइतकें आपलें बळ कुठें आहे ?

## २४५ काय सांगों आतां संतांचे उपकार

१ या संतांचे उपकार काय सांगूं ! ते मला निरंतर जागवीत असतात, निरंतर सावधान करीत असतात. या त्यांच्या उपकाराबद्दल मी त्यांना काय देऊं आणि त्यांच्या ऋणांतून मुक्त होऊं ? त्यांच्या चरणांवर मी हा जीव जरी वाहून टाकला तरी तो अपुरा च आहे.

२ त्यांचें सहज बोलणें हें देखील हितकर उपदेशरूप असतें. तरी ते आम्हांला प्रयत्नपूर्वक शिकवीत असतात. तुकाराम महाराज म्हणतात, संतांचें वात्सल्य काय वर्णन करावें ? गाईच्या मनांत जसें आपल्या वांसराचें ध्यान असतें तसे हे संत मजविषयीं कृपावंत होऊन मला सांभाळीत असतात.

[ या अभंगांत तुकाराम महाराजांनीं संतांची परम कारुणिकता वर्णिली आहे. संतांच्या हृदयांत जगाविषयीं सहज करुणा भरलेली असते. ते जगाविषयीं उपेक्षा वृत्ति राखत नाहींत, तर एकुलत्या एक पुत्राविषयीं माता जो वात्सल्यभाव, जो जिव्हाळा राखते तोच संत जगाविषयीं राखततात आणि म्हणून ते 'करूनि सायास शिकविती.' जगाला सन्मार्ग लावण्यासाठीं, जगाला सुख व्हावें, त्याचें भलें व्हावें म्हणून ते निरंतर खपत असतात. त्यासाठीं आजन्म ते प्रचंड उद्योग करीत असतात.

मुख्य म्हणजे ते जनतेला सतत कर्तव्याची जागृति देत राहतात. अशा ज्ञान-दया-सिंधु संतांच्या ऋणांतून कसें मुक्त होणार ? त्यांना आपलें सर्वस्व, आपला जीव वाहिला तरी तें थोडें च होय. भगवान् बुद्ध, शंकराचार्य ज्ञानदेव, नामदेवादि संत आणि आधुनिक काळांत रामकृष्ण परमहंस महात्मा गांधी, गाडगे महाराज हे सारे अशा च कोटीचे पुरुष होते. ]

## २४६ गोविंद गोविंद, मना लागलिया छंद

१ गोविंद गोविंद असा एक च ध्यास एक च छंद जर मनाला लागून राहिला तर त्या छंदानें काया पालट होतो. काया च कैवल्य होऊन जाते काया मर्त्य न राहतां अमर होते, देवरूप होते. देवांत आणि त्याच्यांत कांहीं फरक उरत नाहीं.

२ त्या नामाच्या छंदानें मन आनंदतें आणि लोचनांतून प्रेमाचे पाझर वाहूं लागतात. तुकाराम म्हणतो, ज्याप्रमाणें भिंगोटीच्या ध्यासानें अळी भिंगोटी च बनून जाते, त्याप्रमाणें भक्त देव होऊन जातो. तो वेगळा राहत च नाहीं. ध्यासाचा वा छंदाचा हा परिणाम होय.

## २४७ चौक भरियेला आसनीं

तुकाराम महाराज एकदां आजारी पडले होते. तेव्हां त्यांनीं आपणांला बरें करण्यासाठीं आपल्या कुलदेवतेचा धांवा केला. पुढील अभंगांत तुकोबांनीं आपली कुलदेवता जी विठाई तिचा गोंधळ मांडला आहे. हा गोंधळ अर्थात च आध्यात्मिक आहे.

१ चौक भरला आहे म्हणजे धान्य पसरून त्याची चौकोनी बैठक तयार केली आहे. आणि त्या आसनावर येऊन बसायला कुलस्वामिनी जी वैकुंठांत राहणारी विठाई देवी तिला आवाहन केलें आहे, तूं लवकर धांवून यें म्हणून.

२ हे विठाई सांवळे, तुझे डोळे सुंदर आहेत. तुझें श्रीमुख सुंदर आहे. तें मला केव्हां बरें दिसेल ! तूं या उत्सवाला ये.

३ रजोगुण आणि तमोगुण यांची धूपारती लावली आहे. पंचप्राणांची पंचारती केली आहे. तेव्हां सगळें बाजूला सारून येथें एकदम धांवून ये कशी !

४ आशा, मनीषा, तृष्णा या (कोंबडयां) च्यासह मनाचा मेंढा तुला बळि दिला आहे. तो संबंधचा संबंध च तुला बळि दिला आहे. अशा प्रकारें भक्तिभावाचा नैवेद्य ताटांत ठेवला आहे आणि तुला आवाहन केलें आहे.

५ अशा प्रकारें तुझ्या स्वागताची सगळी तयारी झाली आहे. डंका सारखा गाजतो आहे. आतां तूं येऊन माझ्या अंगांत संचार कर. आणि आपला बलिदानाचा पुरस्कार घेऊन या तुक्याला आरोग्य दे.

## २४८ जाणोनि नेणते करीं माझें मन

१ हे देवा तुझ्या प्रेमाची खूण, तुझें नाम, देऊन माझ्या मनाला या जगांत सर्व कांहीं कळत असून जणूं कळत नाहीं असें अलिप्त बनव.

२ असें तें तुझ्या नामाच्या प्रेमानें सिद्ध झालें म्हणजे मग मी व्यवहारांत जळांत जसें कमलपत्र तसा अलिप्तपणें वागूं शकेन.

३ समाधिस्थ योग्याला जसें जगाचें भान नसतें तशी कोणीं माझी निंदास्तुति केली तर ती मी ऐकून न ऐकल्यासारखी करीन. तिचा मजवर कांहीं च परिणाम मी होऊं देणार नाहीं.

४ जागें झाल्यावर स्वप्नांतल्या देखाव्याचें जसें सुखदु:ख आपल्याला वाटत नाहीं, त्याप्रमाणें या प्रपंचाला मी पाहत असून मी जणूं तो पाहत च नाहीं असें वागेन. अर्थात् त्याच्या सुखदु:खाचा स्पर्श मी आपल्याला होऊं देणार नहीं.

५ अशी ही सिद्धि मिळविल्यावांचून जें कांहीं करणें तें सारें मला नुसता शीण वाटतो आहे.

## २४९ जीवाचें जीवन अमृताची तनु

हा अभंग तुकाराम महाराजांनीं त्यांच्या बुडविलेल्या वह्या इंद्रायणीच्या डोहांतून देवाच्या कृपेनें कोरडया मिळाल्यानंतर अत्यंत कृतज्ञ भावानें गाईलेला आहे.

१ तो परमेश्वर जीवाचें जीवन आहे. जीवनाचें जीवित्व आहे. तो मूर्तिमंत अमृत आहे. तो नारायण, सकळ नरसमुदायाचें परायण, या ब्रह्मांडाचें भूषण आहे. तो आहे म्हणून या ब्रह्मांडाला कांहीं कळा आहे.

२ तो सुखाचा सांगात आहे. सुखामध्यें कोणी साथी नसला तर तें सुख माणसाला सुखवीत नाहीं. तें बोचूं लागतें, तें ओहोटतें, तें फिकें होतें. तेंच जर कोणी त्यांत सहभागी असेल, तर तें दुणावतें, गोडावतें. भगवान् हा अशाप्रकारें सुखाचा मूलाधार आहे. त्याच्यावांचून सुख सुखरूप होत नाहीं. तो अंतकाचा हि अंत आहे. यम हा सर्वांचें संयमन करतो. काळ सर्वांना जिरवतो. पण यमाला आणि काळाला जिरवणारा हा परमेश्वर आहे. हा नारायण निजजनांचा निवांत म्हणजे एकांत होय. अगदीं अंतरंग रहस्य होय.

३ गोडीला चव देणारा, हर्षाला उल्लास देणारा आणि प्रीतीला जिव्हाळा देणारा असा तो नारायण आहे.

४ भावभक्तीचा तो प्राण आहे. किंबहुना सर्व पदार्थांचा अर्थ तो आहे. हें सारें विश्व त्याचा च अवतार आहे. त्याचें च रूप आहे. हीं सर्वरूपें हीं सारीं नांवें आणि त्या सर्वांची मूळ वस्तु, त्या सर्वांचा निजभाव पंढरीनाथ च आहे.

५ तुकाराम महाराज म्हणतात, तो जो सर्व सारांचें सार परमेश्वर, परमात्मा, परब्रह्म त्यानें माझ्या ह्या वह्या तारून माझा अंगीकार केला आहे, मला पदरांत घेतलें आहे, असें मी समजतों.

## २५० जेणें हा जीव दिला दान

१ ज्यानें हा जीव दान दिला आहे, ज्यानें जन्मास घातलें आहे, हें जीवन दिलें आहे, त्याचें मी चिंतन करतों. तो नारायण या साऱ्या सृष्टीचें च जीवन आहे. त्याचे मी गुण गातों.

परमेश्वराचें अनुमान या विश्वाचा निर्माता म्हणून, जीवनाचा स्वामी म्हणून च प्रथमतः होतें आणि म्हणून च ब्रह्मसूत्रांत ब्रह्म कोणतें तर ज्याच्यापासून या विश्वाची उत्पत्ति, स्थिति, लय तें होतात तें, असा सिद्धांत मांडला आहे.

निर्गुण निराकाराचें ब्रह्मसूत्र-पदांच्या आधारें अनुमानात्मक चिंतन करावयाचें. सृष्टीचा उत्पत्ति-स्थिति-लय-कर्ता इत्यादि महिमा आठवून सगुण परमेश्वराचे गुण गावयाचे, परंतु हृदयांत त्याचें ध्यान कसें करावयाचें ? त्यासाठीं कांहीं मूर्ति हवी. ती अवताररूप कल्पिली. पुंडलीकासाठीं भीमेच्या कांठीं जो विटेवर उभा झाला, तो च आम्हां भागवतधर्मीयांची ध्येयमूर्ति. तिचें तुकोबा ध्यान वर्णितात :

२ जो या भीमा नदीच्या तीरीं कमरेवर हात ठेवून आणि पाय जोडून उभा आहे त्याचें मी हृदयांत ध्यान करतों. ज्यानें असुरांचा निःपात केला आहे आणि भक्तजनांचा वेळोवेळीं प्रतिपाळ केला आहे, अशा तऱ्हेची नाना लाघवें, नाना लीला जो करतो आहे, त्याच्या चरणांवर मी हें आपलें मस्तक टेकतों.

३ जो गोपाळांच्या मंडळीत गळ्यांत रानफुलांच्या माळा घालून नाना खेळ खेळला आणि ज्यानें बळीला निर्बल करून पाताळांत स्थापिलें आणि त्याचा आपण जो द्वारपाल झाला, तो च माझा स्वामी होय.

४ जो लावण्याचा पुतळा च आहे, ज्याच्या अंगीं सर्वकला एकवटल्या आहेत, ज्याच्या गळ्यांत वैजयंती माळा आहे, त्याला मी वेळोवेळां दंडवत करतों.

५ ज्याचें नाम सर्व पापें नाहींशीं करतें आणि लक्ष्मी ज्याची दासी आहे आणि जो तेजाचा राशि च आहे, तो हा समोर उभा असलेला निर्मळ

उज्ज्वल, सुंदर विठ्ठल, त्याला सर्व भावानें, काया वाचा मनें, तुकाराम महाराज म्हणतात, मी शरण आहें.

## २५१ तुझे थोर थोर, भक्त करिती विचार

१ तुझे थोर थोर भक्त जे ज्ञानी पुरुष, ते तत्त्वमसि इत्यादि महावाक्यार्थानुचिन्तनरूप विचार करतात.

२ दुसरे कित्येक थोर भक्त योगी आणि मुनि, जपतपादि साधनें आचरतात. परंतु मी असा दुबळा आहें कीं मला या गोष्टींचा नुसता मनांत विचार हि करवत नाहीं. त्यांचें आचरण दूर !

३ मग मला करण्यालायक काय राहतें? माझ्या सारख्या दीनानें तुझी कृपा-याचना करावी एवढें च!

४ तुकाराम म्हणतो, देवा, माझा हा भार आतां सर्वस्वीं तुझ्यावर आहे. तूं च कांहीं तरी मनावर घे.

## २५२ तूं माउलीहून मायाळ

तुकारामाचे अभंग बुडविण्यांत आले, तेव्हां तुकारामानें देवापाशीं धरणें दिलें. देवानें कृपा केली, अभंगाच्या वह्या कोरड्या वर आल्या. तेव्हां कृतज्ञतेनें आणि देवाला कष्ट दिले म्हणून क्षमायाचना करीत तुकाराम महाराज म्हणतात :

१ देवा तूं माउलीहून मायाळ, चंद्राहून शीतळ, आणि पाण्याहून हि पातळ म्हणजे, म्हणजे मृदु आणि सद्रव असा प्रेमाचा नुसता कल्लोळ आहेस.

२ खरोखर तूं निरुपम आहेस. तुला दुसरी कशाची उपमा देऊं? म्हणून तुझ्या त्या निरुपम नामावरून मी आपल्याला ओवाळून टाकीत आहें.

३ तुझें च केलेलें अमृत. तें तुझ्याइतकें गोड कुठून असणार? तूं त्या हि पेक्षां गोड आहेस. परम अमृत आहेस. तूं च पंचमहाभुतांचा पिता, सर्वसत्ताधारी आहेस.

४ तुझें महिमान यथार्थपणें वर्णन करतां च येत नाहीं. म्हणून नम्रपणें शांत होऊन मी तुझ्या चरणीं हा माथा ठेवीत आहें. तुकाराम म्हणतो, देवा, तुला संकट घातलें हा माझा अपराध क्षमा कर.

## २५३ धीर तो कारण, साह्य होतो नारायण

१ धीर मूळ आहे. तो केव्हां हि सोडूं नये. देव साह्यकर्ता आहे. तो आपल्या दासांना शीण होऊं देत नाहीं आणि चिंता हि वाहूं देत नाहीं.

२ अनन्य भक्तानें तर इतकें च करायचें आहे. त्यानें निश्चित मनानें देवाचें कीर्तन करावें, त्याचे गुण गावे. देवाचें सुदर्शन परभारें च कळिकाळाचें म्हणजे हरएक संकटाचें पारिपत्य करतें.

३ बाळाला जर कांहीं कमजास्त झालें, तर आई त्याच्यासाठीं जिवाचें रान करते. ही सामान्य माणसाची रीत! मग तो तर जगज्जननी आहे. त्याच्या कृपेची आणि करुणेची गोष्ट काय बोलावी!

४ हें कांहीं मी उसने बोल सांगत नाहीं. हें प्रत्यक्ष माझ्या अनुभवाला आलें आहे. जातीनें अनुभवून मी हें सांगत आहें. परंतु, तुकाराम म्हणतो, असा अनुभव यायचा तर तुमचा भाव खरा पाहिजे. सोंग कामाला यायचें नाहीं.

## २५४ नको सांडूं अन्न नको सेवूं वन

उपदेश मागायला आलेल्या ब्राह्मणाला तुकाराम महाराज म्हणतात:

१ उपासतापास करण्याची आणि घर सोडून वनाची वाट धरण्याची गरज नाहीं. इथें घरीं यथाप्राप्त भोगत असतांना एक देवाचें च चिंतन ठेव. एवढें च पुरें.

२ पहा, बाळ आईच्या खांद्यावर असतें. त्या भरंवशावर त्याला कशाची भीति नसते. त्या प्रमाणें अनन्य भाव पाहिजे, इतर सर्व भावना साफ सोडून द्याव्या.

३ भोगांत गुंतूं नको, त्यागांत पडूं नको, त्याग भोग सारें देवाला वाहून टाक.

४ तुकाराम म्हणतो, मला वारंवार विचारूं नको. याहून वेगळा आणखी कांहीं उपदेश करायचा उरला नाहीं.

## २५५ नर नारी बाळें अवघा नारायण

१ हे देवा, स्त्री पुरुष मुलें, जें भेटेल तें, भगवंत च आहे असें वाटेल असें माझें मन कर. मला सर्वत्र एक अभेद-दृष्टि दे, भगवद्दृष्टि दे.

२ म्हणजे काय कर ? तर कुणा हि विषयीं मला कोणत्या विकाराचें दर्शन होतां कामा नये असें कर. काम-क्रोध, रागद्वेष, निंदा-झगडा यांचा लोप होऊं दे, सर्वत्र एक गोविंद च दिसूं दे. सर्वांशीं गुण्यागोविंदानें रहायला शिकव,

३ सर्वत्र सर्वदा प्रेमभाव च ठेवायचा तर ज्यामुळें वितुष्ट येतें त्या विषयासक्तीला, लोभाला, तिलांजलि दिली पाहिजे. म्हणून मला निर्विषय कर, निःस्पृह कर, वैराग्यशील कर. सर्वदा सर्व भावानें म्हणजे काया वाचा मनें एक तुझा च छंद दे, तुझी च आवड दे.

४ असे हे माझे मनोरथ आहेत. तूं सहाय होशील तर च माझे हे मनोरथ सिद्धीस जातील. म्हणून तुकाराम म्हणतो, देवा मजवर कृपा कर आणि माझें एवढें कोड पुरव.

## २५६ नाम आठवितां सद्गदित कंठीं

१ देवा, तुझें नाम घेतां च कंठ दाटून येईल आणि पोटांत प्रेमाचा उमाळा येईल असें कर.

२ अंगावर रोमांच येतील, नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागतील, थोडक्यांत अष्टांगीं अष्ट सात्त्विक भाव प्रगट होतील असें कर. अर्थात् तुझें खरें प्रेम मला दे.

३ हें सबंध शरीर– हे हातपाय, हे कानडोळे, हें मुख-मस्तक सर्व तुझ्या या कीर्तनांत झिजूं दे, वेंचूं दे. सर्वकाळ रात्रंदिवस तुझ्या नाम-संकीर्तनांत जावो.

४ तुकाराम म्हणतो, मला कल्पांतीं हि हें च दे, दुसरें कांहीं करूं नको. कारण संतांच्या चरणाशीं च, या नामसंकीर्तनांत च खरी विश्रांति आहे, बाकी सारे कष्ट आणि श्रम च होत.

## २५७ पावलें पावलें तुझें आम्हां सर्व

१ हे देवा, तुझें आम्हांला सर्व कांहीं मिळून चुकलें. तुझ्यापासून दुसऱ्या कशाची आशा नाहीं. मात्र एकविध भाव तेवढा दे. दुसऱ्याची आशा दावूं नको.

२ पहावें तिथें तूं च आहेस, तुझीं च चरणकमलें विराजमान आहेत, सारें विश्व त्यांनीं च कोंदलें आहे, असें दिसूं दे.

३ नाना मतवादी आपापलीं परस्पर-विरुद्ध मतें आग्रहानें प्रतिपादितात. त्यांच्याशीं आम्हांला कांहीं काम नाहीं. त्यांच्याशीं आम्हांला वाद नको देऊं, तुझें एक नाम च दे.

४ कारण, तुकाराम म्हणतो, सूक्ष्माहून सूक्ष्म आणि व्यापकाहून व्यापक एक तूं च आहेस. तूं अणूहून सूक्ष्म, त्याचा अंतर्यामी आहेस आणि आकाशाहून मोठा, आकाशाला हि अवकाश देणारा आहेस. त्यामुळे एक तुझें च नाम पुरें आम्हांला.

## २५८ पिकलिया सेंद कडूपण गेलें

१ सेंद म्हणजे शेतांतलें बारकें वाळूक, आधीं कच्चेपणीं कडू असतें. पण तें च पिकलें म्हणजे त्याचा कडूपणा जातो. तसें आम्हांला देवानें केलें आहे.

२ आमचा कच्चेपणा व कडूपणा म्हणजे आमचे विकार, काम क्रोध लोभ, जागच्या जागीं च निमाले आहेत, विलय पावले आहेत. त्यामुळें सृष्टीचें दुःखरूप पालटून ती आम्हांला आतां आनंदमय झाली आहे.

३ देहाचा आठव गेला आणि त्याबरोबर नाठव म्हणजे दुःखाचा विसर पडला हें हि विसरलें. भाव गेला म्हणजे जग शून्य झालें आणि अभाव गेला म्हणजे त्या शून्याचें हि शून्य झालें. मग उरला एक पूर्ण परमात्मा.

४ तुकाराम म्हणतो, भाग्य भाग्य म्हणतात तें हें होय. ही विगलित-वेद्यान्तर आत्मन्येव आत्मतुष्टि च भाग्य होय. आणि मानव-जन्माचें साफल्य तें हें च होय.

## २५९ पुढें गेले त्यांचा शोधीत मारग

१ आपल्या पूर्वी जे भगवद्भक्त होऊन गेले आहेत, हरीच्या मार्गाचे पथिक होऊन गेले आहेत अथवा जे आजहि आपल्यापेक्षां पुढें गेलेले असे भगवद्भक्त आहेत, त्यांचा मार्ग शोधीत आपण जाऊं या. त्यांचीं पदचिह्नें पहात आपण त्यांच्या मार्गाचें अनुसरण करूं या.

२ त्यांची चरणधुळी डोक्यावर घेऊं या आणि त्यांचें उच्छिष्ट सेवन करूं या. आणि त्यायोगें पूर्व कर्माची होळी करून टाकूं या. अशा प्रकारें जुनें सारें कर्म चुकवून आतां नवी च कमाई करूं या.

३ आम्हां अनाथांचें म्हणजे ज्यांना ज्ञानाचें, ध्यानाचें आणि यज्ञयागादि कर्मयोगाचें बळ नाहीं अशा जीवांचें विठ्ठलनाम हें च भांडवल होय. आणि तें अमूप आहे, अपरंपार आहे. तें च आतां जोडूं.

४ गोविंदाच्या नामसंकीर्तनरूप व्यापारानें, या चिंतनाच्या व्यवसायानें सगळे लाभ होतात. भुक्ति-मुक्ति सारे लाभ होतात.

५ मुख्य म्हणजे जन्ममरणाच्या खेपा बंद होतील, संसाराच्या घाण्यांतून सुटका होईल. आणि सिद्धांच्या मार्गानें मुक्काम गांठणें, अगदीं सोपें होऊन जाईल.

६ तुकाराम महाराज म्हणतात, भक्तजनहो, हरिजनहो, चला आपण जीवपणाला गाडून टाकूं या. त्याच्यावर चिरा ठेवूं या, धोंडा ठेवूं या. आणि आपल्या त्या माहेराला, आत्मरूपाला, ब्रह्मपदाला जाऊं या.

## २६० बोलणें चि नाहीं

एका देवावांचून दुसरी कांहीं गोष्ट च करावयाची नाहीं असा मीं कायमचा निश्चय करून टाकला आहे. देवावांचून बोलायचें नाहीं म्हणजे काय ? देवावांचून बोलायचें नाहीं म्हणजे रागद्वेषाच्या गोष्टी करावयाच्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ क्रमांक दि: ....................

नाहीं. रागद्वेष सारे देवाला वाहून टाकले आहेत. मी आतां या डोळ्यांची तृप्ति होईपर्यंत देवाचे ते समचरण च पाहत राहणार. देवाचे समचरण म्हणजे साम्ययोग, सर्वत्र समदृष्टि. 'शत्रु मित्र उदासीन मध्यस्थ परका सखा। असो साधु असो पापी' या सर्वांना सम पाहणें, हरिरूप पाहणें, आत्मरूप पाहणें.

तुकाराम महाराज म्हणतात, मनानें हा च एक दृढसंकल्प करावयाचा आहे.

## २६१ भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास

१ जे आपल्या देहाविषयीं अनासक्त आणि देहानुबद्ध स्त्रीपुत्रादि स्वजनांविषयीं व भोगसंपत्तीविषयीं विरक्त आहेत, ते भक्त म्हणून ओळखावे.

२ लोकांचा विषय, म्हणजे ज्यांत त्यांचें मन वाणी आणि शरीर गुतलेलें असतें अशी गोष्ट, म्हणजे स्वजन आणि संपत्ति; परंतु ह्या गोष्टी ज्यांना मुळीं आवडत नाहींत, तर एक देव च ज्यांच्या चित्ताचा, वाणीचा व शरीराचा विषय होऊन बसला आहे; ते च भक्त होत.

३ असे जे भक्त असतात त्यांच्यावर किती हि संकटें आलीं तरी ते डगमगत नाहीत. कारण देव आपला सांभाळ करील, असा दृढ विश्वास त्यांच्या ठाईं असतो.

४ तुकाराम म्हणतो, असें जें भक्तीचें सत्कार्य तिथें कोणाला भय घालूं नये, तर त्यांत त्याला प्रोत्साहन द्यावें आणि मदत च करावी. असे जे करीत नाहींत, उलट भक्तिमार्गानें जाशील तर तूं बुडशील म्हणून भय घालतात, ते नरकाला जातील, म्हणजे आपलें परम अकल्याण करून घेतील, यांत संशय नाहीं.

## २६२ भावें गावें गीत, शुद्ध करोनियां चित्त

१ तुला देव हवा आहे ना! तर मग आपलें चित्त शुद्ध करून, म्हणजे मनांत कुठली हि कामना न धरतां, विश्वासपूर्वक हरीचें भजन करीत चल. ईश्वरप्राप्तीचा हा सुलभ मार्ग होय.

२ या मुख्य मार्गाचे आणखी कांहीं नियम आहेत. त्यांतला पहिला हा कीं दुसऱ्यांच्या गुणदोषांची चर्चा मनांत आणावयाची नाहीं. मग तोंडानें उच्चारणें कोठून ! एवढें च नव्हे, दुसरे अशी असच्चर्चा करीत असतील तर ती ऐकत बसायचें नाहीं.

३ दुसरा नियम हा कीं आपला तोरा ताठा सोडून देऊन संतांचे पाय धरायचे, संतांच्या पायाशीं राहिल्यानें अनायासें च वृथा चर्चेतून मनुष्य बचावतो आणि हरिनाम, हरिकथा, तत्त्वविचार यांचें सच्छ्रवण होतें.

४ तिसरा नियम म्हणजे ज्याच्या योगें आपल्याला म्हणजे वक्त्याला आणि समोरच्याला म्हणजे श्रोत्याला समाधान लाभेल असें वचन अर्थात् राग-द्वेष-मय सांसारिक वचन नव्हे तर पारमार्थिक वचन बोलणें. आणि तें उदारपणें बोलणें, त्यांत कद्रूपणा न करणें.

५ यानतर तुकाराम महाराज म्हणतात, शेंवटची पण तितकी च महत्त्वाची किंबहुना त्याहून हि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें शरीर कष्टवून थोडाफार तरी परोपकार, दुसऱ्याच्या हिताचा, सुखाचा प्रयास करणें.

असा हा भक्ति, नीति आणि परोपकृति यांचा मार्ग तुम्ही आचराल तर देव दूर नाही.

## २६३ भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना

१ दिसणारे हे सर्व स्त्रीपुरुष हीं सर्व देवाचीं रूपें आहेत अशा धारणेनें मी त्यांना भेटतों. स्त्री पुरुष अशी भावना मुदलीं च माझी नाही.

२ ही गोष्ट कांहीं बोलायची नाहीं. पांडुरंग अंतर्यामी आहे, तो सर्व जाणतो. म्हणून ही सफाई देण्याची हि वस्तुतः कांहीं गरज नाहीं.

३ हरिकथा ही अज्ञ जनांचें तारण होय. आणि म्हणून म्हणजे दयेस्तव भजनकीर्तनाचा आणि सेवाकार्याचा हा पसारा मीं मांडला आहे.

४ तुकाराम म्हणतो, मला उपवास पडत होते म्हणून पोट भरण्यासाठीं कांहीं हें कथाकीर्तनाचें आणि सेवाकार्याचें सोंग संपादिलेलें नाहीं मी.

## २६४ माझिये जातीचे मज भेटो कोणी

१ आवडीची हौस पुरविण्यासाठीं, माझ्या अंतरांतील उत्कट इच्छा पूर्ण करण्यासाठीं, कोणीतरी माझ्या जातीचे मला भेटले पाहिजे. २ ज्याला अंतरापासून हरि आवडतो अशा हरिभक्ताची गोष्ट मी करीत आहें. अशाच्या विषयीं मला उत्कंठा लागून राहिली आहे. ३ त्याच्यासाठीं माझा हा जीव व्याकुळ झाला आहे. तो कोठें दिसतो त्याची वाट पहाण्यासाठीं हे माझे डोळे भिरभिरत आहेत. ४ अशा त्या वैष्णवाला जेव्हां मी प्रेमालिंगन देईन, जेव्हां त्याचे आणि माझे मिळून चार हात होतील, तेव्हांपासून माझा हा जन्म सुफल झाला असें मी मानेन. ५ तुकाराम महाराज म्हणतात, अशा वैष्णवाची ज्या दिवशीं भेट होईल तो च सुदिन होय; तो च उत्सव होय. त्या वेळीं मग आम्ही या गोपाळाला पोटभर गाऊं.

भजनांत समरस न होणारे सांसारिक लोक, विरोधक, निंदक आणि छलक यांच्या उपद्रवाला कंटाळून तुकाराम महाराजांनीं काढलेले हे उद्गार आहेत. साधनेंत कांहीं काळ असा येतो कीं जेव्हां विरोध सहन होत नाहीं आणि सहानुभूतीची, समान-धर्म्या सोबत्यांची साथ, साधकाला तीव्रतेनें आवश्यक वाटूं लागते. तशा अवस्थेंतील हा अभंग आहे.

## २६५ माझे मनोरथ पावले जई सिद्धी

१ माझे मनोरथ हरिदर्शनाचे अर्थात् सर्वत्र समदर्शनाचे जेव्हां सिद्धीस पावले, तेव्हां च माझी बुद्धि आत्म-देवा, तुझ्या पाईं स्थिरावली.

२ संशयच्छेद झाल्यामुळें जीवाचें समाधान झालें आणि आत्मस्मृति लाभली. नष्टो मोहः स्मृतिर् लब्धा !

३ मोहरूप पापासवें च सदैव जाळणारा त्रिविध तापरूप शोक हि जळून शांत झाला. त्यामुळें मन आतां प्रसन्न झालें आहे. ही प्रसन्नता हें च प्रेम, ही च भक्ति. त्या भक्तिप्रेमानें मन परमानंद अनुभवतें आहे.

४ वाणी हरिनाममय झाली आहे. हा च महा लाभ होय. आणि देवाची भेट तर अशी झाली आहे कीं तो अंगोअंगीं वसला आहे ! देह स्वरूप च होऊन गेला आहे.

५ जीवनचा स्रोत म्हणजे मूळ झरा हृदयांत सांपडला आहे आणि कलिका-पुष्पवत् विश्व हें विश्वरूपानें नाहीसें होऊन विश्वंभराकार झालें आहे. अथवा तमःप्रकाशवत् विश्वाकार मावळून विश्वंभर सूर्य प्रकटला आहे.

६ तुकाराम म्हणतो, माझें हें साधनेचें माप आतां शिगोशिग भरत आलें आहे. किंबहुना साधनारूप गंगेचा पूर भरभरून वाहून चालला आहे.

## २६६ म्हणसी होऊनि निश्चिंत

१ बाबा रे सांसारिक जबाबदाऱ्या साऱ्या हातावेगळ्या करून आणि मग अगदीं निश्चिंत होऊन एकांतांत बसून भजन करूं–असें जें तूं म्हणतोस तें फोल आहे. २ या संसाराच्या चक्रांत तूं सांपडला आहेस. एकांतून दुसरी आणि दुसरींतून तिसरी अशी कामनांची मालिका च लागते आणि तिच्यांतून मुद्दाम जबरदस्तीनें तिला विराम दिल्याखेरीज माणसाची सुटका होत नाहीं. तेव्हां संसाराच्या सर्व चिंता आपण पार पाडूं आणि निश्चिंत होऊन मग भजन करूं हा तुझा विचार महाभ्रम होय, महामोह होय. एका आशेकडून दुसऱ्या आशेच्या कचाटयांत सांपडत तुझ्या अगदीं नाकीं नव येईल. ३ आणि या विषय-प्रसंगामुळें शेवटीं पुरता नाडशील व परत संसार-प्रवाहांत पडशील. वासना, तींतून जन्म, त्यांत कामनाकर्म, त्यांतून परत वासना असा हा संसार तुला कायमचा दुःखाच्या दावणीला बांधून टाकील. ४ तेव्हां हें सर्व शरीर केवळ मायिक वस्तु आहे, जादूची बाहुली आहे, असें समज. त्यांत कसलें हि सुख, शांति नाहीं .५ या मायिक शरीराच्या सुखासाठीं मनुष्य धडपडत असतो, आणि त्या धडपडींत च आयुष्याचें चार दिवस केव्हां च संपून जातात. आणि मनुष्य भजनाचें साधन हें मानवी आयुष्य व्यर्थ घालवून पुरता नागवला जातो. ६ तेव्हां आतां च सावध हो. ही घडी, हा क्षण कोटय-वधि रुपये दिले तरी परत मिळायचा नाहीं हें ओळखून भजनांत लाव. भजन म्हणजे देह-चिंतेंतून मुक्त होऊन देव-चिंतन करणें. तुकाराम महाराज म्हणतात–बाबा रे या च क्षणीं सावध हो आणि स्वहिताचा उपाय कर; नाहीं-तर पुढें तुला हाय हाय करीत बसायची पाळी येईल!

## २६७ याती मति हीन रूपें लीन दीन

१ माझी ज्ञाति कुणबी, मति हि म्हणाल तर अडाणी अशिक्षित, आणि रूप हि बावळें; एवढें च नव्हे तर इतर हि अवगुण माझ्या ठिकाणीं आहेत.

२ त्यामुळें मला कसला च अभिमान नाहीं. मी असा अभिमानशून्य व भक्ति-नम्र आहें असें पाहून देवानें माझा अंगीकार केला. मला वर्णाचा, विद्येचा, रूपाचा, गुणाचा अभिमान असता, तर नसता केला माझा अंगीकार देवानें. असा विचार करून,

३ मी जें काय करतों आहें अर्थात् भजन तें स्व-हित च करतों आहें, आडवाटेला कांहीं लागलेलों नाहीं, याची मला मनोमन साक्ष पटली आहे.

४ त्यामुळें जीवाला अपार सुख आणि आनंद झाला आहे. परमानंदानें च माझा भार घेतला आहे ! आतां मला चिंता कसली ?

५ तुकाराम म्हणतो, देवानें माझा भार घेतला, कारण दीनबंधु असें त्याचें ब्रीद च आहे. त्या आपल्या नामाचा त्याला अभिमान आहे. आणि म्हणून तो शरणागत-वत्सल बळें म्हणजे आपणहून शरणागताचें रक्षण करीत असतो.

## २६८ येई गा तूं मायबापा

१ हे माझ्या मायबापा, हे पंढरीच्या राया, विठ्ठला, अगा देवा, ये. तुझ्यावांचून मला अतिशय शीण होत आहे. माझें मन विपण्ण झालें आहे. आणि बघ, ही माझी काया देखील अगदीं खंगून गेली आहे.

२ माझी याति म्हणजे ज्ञाती हीन आहे. मी एक कुणबी वाणी आहें. माझी मति हीन आहे. मी कांहीं पढलों नाहीं, शिकलों नाहीं. माझें कर्म हीन आहे. संसाराची. देहगेहाची, चाकरी करीत आहें. असा सर्वतोपरी हीन-दीन आणि पतित मी आपल्या या साऱ्या हीन-दीन-पतिततेची सर्व लज्जा सोडून देऊन तुला देवा, शरण आलों आहें.

३ (कारण) तुझें नांव दीनानाथ दीन-बंधु आहे ना ? पतित-पावन म्हणून तुझा डंका गाजतो आहे ना ?

४ विटेवर सरळ उभा आहे आणि कमरेवर हात आहेत–तुझें हें ध्यान आम्हांला निरंतर लागलें आहे.

## २६९ वंदीन मी भूतें

१ आतां मी निरपवाद सर्व च भूतांना म्हणजे वस्तूंना व जीवांना नमन करीत जाईन.

२ हे देवा नारायणा ! सर्व रूपांत एक तुम्ही च वसलां आहां असें पाहीन, सर्वत्र एक तुमची च भावना मी करीन. आणि ती निरंतर करीन.

३ 'न इह नाना अस्ति किंचन' 'ब्रह्म एव इदं सर्वम्' इथें दुसरें कांहीं नाहीं, एक च एक ब्रह्म सर्वत्र आहे, असें वेदांनीं म्हणजे साक्षात् प्रमाणानें च सांगितलें आहे.

४ असें ओळखल्यावर मग द्वैताचा संबंध च संपला.

## २७० विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी

१ विठ्ठल हा च सर्वांचें मूळ भांडवल आहे. म्हणून विठ्ठलाचा निरंतर उच्चार करा. टाळ दिंडी घेऊन करा, अथवा नुसता च करा. पण बोला सदा विठ्ठल विठ्ठल !

२ भजनांत येणारे नाना छंद आणि वीणा-टाळ-मृदंग सर्व रागताल एक विठ्ठल च आहे.

३ कोणी जन्मला तरी विठ्ठलाचें भजन आणि मेला तरी विठ्ठलाचें च भजन. सुखांत हि विठ्ठल आणि दुःखांत हि विठ्ठल. तुकाराम महाराज म्हणतात, एका विठ्ठलावांचून दुसरें कांहीं च माझ्या वांट्याला येत नाहीं. अखंड त्याचा च ध्यास लागला आहे. "शीतोष्ण सुखःदुखेषु तथा मानापमानयोः परं आत्मा समाहितः" अशी झाली आहे माझी अवस्था.

## २७१ विषयीं विसर पडिला निःशेष

१ ब्रह्मरस म्हणजे आत्मसुख आपल्या च ठाईं उपलब्ध झाल्यामुळें बाह्य विषयांचा स्मृतिलेश हि शिल्लक राहिला नाहीं.

२ त्यामुळें माझी वाणी अनावर झाली आहे आणि तिनें हरिनामाचा च छंद घेतला आहे.

३ लाभाच्या ओढीनें व आवडीनें मन पुढेंपुढें उड्या मारीत असतें. धन-लोभी माणूस जसा किती हि धन मिळालें तरी तृप्त होत नाहीं आणि आणखी आणखी हांव धरतो, तसें माझें झालें आहे.

४ तुकाराम म्हणतो, गंगा सागराला मिळायला अधीरपणें धावत असते आणि शेंवटीं सागरांत ती उडी घेते, गंगा-सागर-मीलन होतें. तेव्हां जशा गंगेच्या सर्व ऊर्मि समुद्रमय होतात, तसें माझें झालें आहे. गंगेचे सर्व ओघ आणि ऊर्मि समुद्रसंगमांत परिणत होतात पण समाप्त होत नाहींत, त्याप्रमाणें माझी सर्व साधना, तिचे वाह-प्रवाह आणि तरंगोत्तरंग ब्रह्मरूप साध्याच्या सागरांत तदाकार होऊन परिणत झाले आहेत, तरी चालू च आहे.

## २७२ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म

१ सर्व जग विष्णुमय आहे असें पाहणें, हा च वैष्णवांचा धर्म आहे. त्यांत हा उंच हा निच, हा अस्पृश्य, असा भेद करणें हा च अमंगळ भ्रम होय, अधर्म होय.

२ तुम्ही भगवंताचे भक्त हें माझें म्हणणें नीट ऐका. जें करायचें तें हित च करायचें आणि तें सत्य म्हणजे खरेपणानें करायचें. त्यांत दंभ नको.

३ कोणाहि जीवाचा मत्सर म्हणजे द्वेष व द्रोह चुकून सुद्धां होतां कामा नये. हें सर्वेश्वर-पूजनाचें मर्म सोय. तुच्छातितुच्छ अशा हि जीवाचा जर द्रोह झाला तर तें सर्वात्मक ईश्वराचें भजन उघडच खंडित झालें.

४ तुकाराम म्हणतो–हे सर्व जीव म्हणजे एका देहाच्या अवयवां-सारखे आहेत. त्यांपैकीं एकाला हि दुःख दिल्यास ते त्या देहान्तर्यामी जीवाला, परमात्म्याला च दिलें असें होतें.

## २७३ हेंचि थोर भक्ति आवडती देवा

१ देवाला आवडणारी थोर भक्ति ती ही, कीं माणसानें संसाराची माया, प्रपंचाची ममता संकल्पावी म्हणजे सोडून द्यावी.

२ ममता सोडून द्यावयाची म्हणजे सांसारिक सुखोपभोगाचा आग्रह सोडून द्यावयाचा आणि ईश्वराच्या कृपेनें जें काय अल्प-स्वल्प मिळेल त्यावरच संतोष करावयाचा.

३ असें हरिशरण होऊन जर राहिलों नाहीं आणि 'अमुक गमावलें रे आणि तमुक पाहिजे आहे रे' अशी सांसारिक चिंता करीत बसलों, तर दुःखावांचून दुसरें काय पदरीं पडणार ! संचितांत असतें तेंच मिळायचें असतें. खटपटीनें कांहींच व्हायचें नसतें.

म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, आपणांला या संसाराचें ओझें आपल्या डोक्यावर घेऊन शिणायची गरज नाहीं. आपण तें सारें देवावर सोंपवून मुक्त व्हावें हेंच बरें.

## २७४ हें चि दान दे गा देवा

१ हे देवा, तुझा विसर कधीं हि न पडो; हेंच दान मला दे.

२ मी तुझें सदैव गुणगान करीत राहीन. माझी मिळकत हीच आहे.

३ मला सदैव संतांची संगति दे. मग मला तुझी ती मुक्ति नको नि भुक्ति म्हणजे धनसंपदा आणि तिनें मिळणारे भोग हि नकोत.

४ तुकाराम म्हणतो— आम्हांला गर्भवासाचें भय नाहीं. आम्हीं परत जन्मलों तर तुझें गुणगान करायची संधि आम्हांला मिळेल. आम्हांला भक्ति च पुरे, मुक्तीची आम्हाला चिंता नाहीं.

## २७५ क्षरला सागर गंगा-ओघीं मिळे

१ सागर च मेघ बनतो, वर्षतो आणि गंगारूपानें परत आपल्याला मिळतो. असा हा आपलाच आपल्याशीं खेळ चालतो.

२ मधल्या मेघ, वृष्टि, ओघ इत्यादि सर्व उपाधि ह्या अशा लटक्या आहेत. जिवाशिवांमध्यें तो च प्रकार आहे.

३ घट आणि मठ दोहोंतील आकाश नांवालाच घटाकाश व मठाकाश म्हणून वेगळें असतें. वतुस्त: तें केवळ आकाशच असतें. तें भिन्न हि होत नाहीं आणि म्हणून एकीकृत हि होत नाहीं. तें जिथल्या तिथेंच सुव्यवस्थित असतें.

४ तुकाराम म्हणतो, भूमीत अवतरलेल्या बीजानें परत फळरूपाने बीज उद्धृत केलें म्हणजे काम झालें. मधलें पत्रपुष्पादि सर्व येतें नि जातें, तें आपलें उगाच आहे. ह्याचें च नांव 'ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या.'

## २७६ सांगड बांधा रे भक्तीची

१ भक्ति हें या संसारांत तारक तत्त्व आहे. नारायण-नामानें अजामिळाचा उद्धार झाल्याची पुराण-प्रसिद्धि आहे. म्हणन नारायण-नामाची खास शिफारस केली. बाकी देवाचें कोणतें हि नाम तारकच आहे.

२ त्या नामाच्या सांगडीच्या आधारें माणसानें हा चोहोंबाजूस पसरलेला अफाट संसार-सागर तरून जावा.

३ या संसार-सागरांत शद्व, स्पर्श, रूप, रस, गंध या पंच विषयांच्या लाटावर लाटा उसळत आहेत.

४ पुत्र-कलत्रादिकांचे भोवरे आहेत.

५ अशा या दुस्तर संसार सागरांतून तरून जाण्यासाठीं भक्ति हीच एक सर्वजन-सुलभ अशी सोय आहे. असें नरहरि बोधला बोधिला आहे, गुरूने उपदेशिला आहे; आणि तदनुसार तो हरिनामीं रंगून गेला आहे.

## २७७ अनुदिन अनुतापें तापलों रामराया

समर्थ रामदासांच्या कवितेंत सर्वांत अधिक हृद्य कविता जर कोणती असेल तर ती करुणाष्टकें ही होय. करुणाष्टकांत आर्तता आहे. आणि नारदाच्या मतें आर्त जिज्ञासु अर्थार्थी आणि ज्ञानी या चतुर्विध भक्तांत पूर्वपूर्व उत्तरोत्तरापेक्षां श्रेष्ठ होय. अर्थात् आर्त भक्ति ही सर्वोत्तम भक्ति होय. विरहातुरता वा वियोगासहिष्णुता हें तिचें स्वरूप होय. आणि तें च ह्या करुणाष्टकांत प्रगट झालेलें आहे.

१ हे रामा, मी पश्चात्तापानें सारखा जळत आहें. पश्चात्तापाचें कारण जी मोह-माया ती दूर कर. माझें मन अति च चपळ आहे. तें मला आवरतां आवरत नाहीं. सारखें त्या मोह-मायेंत गुरफटतें. तरी तूं धाव आणि हा ससार-शीण दूर कर.

२ हे रामा, माझा सगळा जन्म भजनावांचून व्यर्थ गेला आहे. जन्मभर मी स्त्री-पुत्रांच्या व धनाच्या च चिंतेंत राहिलों. पण ती सारी चिंता स्वार्थाची अतएव व्यर्थ झाली. आतां हे रामा माझी मति तूं आपल्याकडे खेंचून घे आणि जेणेंकरून इतर सर्व कांहीं सोडून मी एक तुझी च कांस धरीन असें कर.

३ पंचेंद्रियांचे जे विषय त्यांच्या उपभोगानें कधीं सुखशांति लाभावयाची नाहीं. तुझ्यावांचून सारें हे रामा, ओखटें आहे, दुःखपर्यवसायी आहे. म्हणून तें दुरित दूर हरण करून मला आपल्या स्वरूपांत लीन करून घ्यावें.

४ तुझें तें स्वरूप च माझें सर्वस्व आहे, तें च तन मन धन आहे. तुझ्यावांचून सगळा संसार मला ओझें वाटतो. माझी बुद्धि प्रचलित म्हणजे च्युत होऊं देऊं नको. ती तुझ्या भजनांत सुस्थिर कर. तुझी च एक मला ओढ लागली आहे.

५ तथापि मन अतिशय चंचल आहे. त्याला आवरतां येत नाही. स्वजनाची आसक्ति दूर्निवार आहे. ती तोडून टाकतां येत नाहीं. त्यामुळें मनांतील निश्चय वारंवार डळमळतो. आणि म्हणून च ही तुझी करुणा मी भाकतों आहें.

६ कोटि कोटि जन्मांपासून माझें हृदय संसारचिंतेनें जळत आहे. त्यावर तुझ्या करुणेचा पूर च येऊं दे. तर च ती माझी आग शमेल. षड्रिपु हे च माझे गोत आहे. त्यांचा माझा संबंध तोडून टाक. (स्त्रीपुत्रांचा नव्हे.)

७ माझी ही करुणा म्हणजे करुणास्पद स्थिति दुसरा कोण बरें जाणणार? वेदना सहन करीत मी तुझी वाट पाहत आलों आहें. आतां हे पंचानना धांव आणि ह्या वासनारूपी कोल्ह्यांच्या तावडींतून मला सोडव.

८ पुत्रकलत्रादि हे स्वजन आणि ही धन-दौलत यांच्यापासून खरोखर कोणता संतोष आहे? नुसती चिंता आणि दगदग च आहे खरोखर ती. रामाशिवाय माझें मन आतां कुठें हि रमत नाहीं. ज्यांना जिवलग मानतों ते शेंवटीं आपल्याला स्मशानांत सोडून निघून जातात. जीवनभर जें धन

कमावलें असतें तें सर्व बळकावतात आणि आसक्ति लावून शेवटीं परत जन्मास कारण होतात.

९ सर्व लोक सांसारिक आहेत. वैभव असलें कीं सर्व आपलेपणा दाखवितात. वैभव संपलें कीं कोणी ओळख हि दाखवीत नाहीं, मग जिवलगपणा कुठला ? मृत्यु येऊन ठेपतो तेव्हां स्मशानांत सोडून सर्व चालते होतात. अंतकाळीं एक राम च सोडवतो. तो च खरोखर एकमात्र निरंतर साथ करून सुख देतो. बाकी सारे दगा देऊन दुःख च देतात.

## २७८ आम्ही काय कुणाचें खातों रे

१ आम्ही कुणाचें खातों ? आपल्या श्रमाचें अथवा दुसऱ्या कोणाचें ? नाहीं. आम्ही तर देवाचें च दिलेलें खातों. तो विश्वंभर आहे.

२ किल्ल्याच्या तटांत, घुमटांत पिंपळ आणि वड यांचीं झाडें फुटतात आणि वाढतात. त्यांच्या मुळाला पाणी कोण घालतो ? काय मोटा लावतां तुम्ही तिथें ?

३ गड बांधण्याचें काम चालू होतें. हजारों मजूर काम करीत होते. रामदास स्वामींना घेऊन शिवाजी महाराज तिथें आले. इतक्या लोकांचा मी पोशिंदा आहें असा अभिमान शिवाजी महाराजांच्या मनांत स्फुरलेला पाहून रामदास स्वामींनीं एका पाथरवटाला जवळचा च एक खडक फोडायला सांगितलें. तों त्यांतून एक बेडकी टुणदिशीं उडी मारून बाहेर निघाली. शिवाजी महाराज आणि सर्व लोक यांनीं ती प्रत्यक्ष पाहिली. तिथें नदी नसतां तिला पाणी कोण पुरवीत होता ?

४ आईच्या स्तनांत वस्तुतः आहे काय ? रक्तमांस. मग तिथें दूध कोण निर्माण करतो आणि मुलाचें पोषण करतो ?

५ रामदासस्वामी म्हणतात, आकाश पाहिलें तर कोरडें खणखणीत दिसतें, परंतु कुठून तरी मेघ येऊन सर्वत्र जीवनाची वृष्टि होते. आणि इकडे शेतें पिकतात आणि विश्वाचें भरण पोषण होतें. कोण करतें हें सारें ? तूं मानव ? नाहीं. हें सारें त्या देवाचें कर्तृत्व आहे. तो च माझा तुझा आणि विश्वाचा पोषक आहे.

## २७९ उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी

या करुणाष्टकांत देवापाशीं मागणें मागितलें आहे. म्हणजे आपला आदर्श काय आहे, आपण कसें होऊं इच्छितों तें आपलें मनोगत वर्णिलें आहे.

१ ज्यामुळें माणसाच्या हातून परद्रोह घडतो त्या स्वार्थाविषयीं, देह-गेहाविषयीं, मी उदासीन व्हावें आणि सर्व जीवांची अत्यंत आदरानें व प्रेमानें मीं सेवा करावी. शरीरपरायणतेमुळें च मनुष्य परद्रोह करतो म्हणून ती शरीरपरायणता कमी कमी करीत जाऊन मीं केवळ आत्मपरायण व्हावें, सर्वभूतमय बनावें. केवळ परोपकारमय दयामय बनावें. तुझे सत्य, निष्कपटता, ऋजुता, दया, प्रेम, करुणा, समता, उदारता इत्यादि गुण गातां गातां मला तुझी आत्मारामाची प्रीति लागो, आसक्ति जडो. हें च हे प्रभो आतां तुझ्या पाशीं मागावयाचें. दुसरें मला कांहीं नको.

२ तुझ्या मनोहर मूर्तीचें ध्यान आणि सत्यवचन, सुशीलता, गुरुभक्ति सेवक-भ्रातृ-प्रीति, ऋषिरक्षण, मित्र-शरणागत-पालन, प्रजावात्सल्य, भक्त-कारुण्य इत्यादि तुझ्या गुणांचें गान करीत मी सदा आपल्या मनाशीं रमावें. तुझ्या गुणांची स्मरणी मनोमन आवडीनें अखंड जपत असावें. डोळ्यानें रामांजन ल्यावें व चित्तानें गुणगान गावें. अशा या तुझ्या भक्तिमार्गानें जातांना मला अपार गोडी वाटावी, अनावर प्रेम चढत जावें.

३ तुझी भक्ति करावी हीच माझी वासना आहे. ती तूं कृपा करशील तर पूर्ण होणार. अर्थात् तुझें नामस्मरण करतां च तूं हृदयांत आविर्भूत झालें पाहिजे. दर्शन दिलें पाहिजे. एवढें च माझें मागणें आहे.

४ असा तुझा योग म्हणजे तुझी भेट, तुझें दर्शन मला निरंतर व्हावें. तूं जी आज्ञा करशील ती पार पाडीत असतांना हा माझा देह पडावा. अर्थात् हृदयांत तुझें प्रत्यक्ष दर्शन मला व्हावें. तूं मजशीं बोलावें. मला आदेश द्यावा आणि तो आदेश घेऊन त्या आदेशानुसार मी कामास लागावें अशा प्रकारें तुझ्या सेवेंत हें संपूर्ण जीवन जावें. या देहांतून मुक्त होईपर्यंत अशी निरंतर रामसेवा घडावी. त्या सेवेपाईं च हा देह कामास यावा. याबाबत हे गुणवंता दयाळो, हे अनंता सर्वसमर्था, चूक होऊं नये. आणि तूं दयाळु आणि त्याच

बरोबर समर्थ हि असल्यामुळें तशी भूल होणार नाहीं असा मला पूर्ण भरवसा आहे. हे रघुनाया, एवढेंच माझें मागणें आहे तुझ्या पायापाशीं.

५ लोक एक तर संसाररसिक होतात आणि कामिनी-कांचनाच्या जाळ्यांत अडकतात. आणि तत्परिणामीं जन्ममरणरूप संसारचक्रांत सांपडतात अथवा क्वचित् कोणी निर्‌गुणोपासक म्हणवून घेऊन केवळ शुष्क तत्त्वज्ञान बोलतात आणि भक्ति शून्य सत्क्रियाहीन अहंमन्य वनतात. देवा, मला या दोन्ही आडवाटांना लावूं नको. मला विषयासक्त हि करूं नको आणि शुष्क वेदांती हि बनवूं नको. मला सगुणोपासक वनव. मला विरक्त आणि भक्त बनव. मला विषयाची नावड आणि तुझी आवड दे. एवढें च माझें मागणें आहे.

६ संसाराच्या प्रखर किरणांनीं मी तप्त झालों आहें. हे प्रभो रामचन्द्रा, तुझ्या प्रेमभक्तीची शीतल छाया मजवर कर. तूं कृपेचा सागर आहेस. माझी सर्व चिंता, भक्तीचा निर्वाह कशी होईल ही चिंता, तूं दूर कर आणि षड्‌विकारांच्या संकटांतून मला सोडव. तूं च त्यांच्या पाशांतून सोडवण्यास समर्थ आहेस. म्हणून तुझ्या च पाशीं ही एवढी प्रार्थना आहे.

७ मनांतून माझ्या भोगकामना काढून टाक. माझें चित्त निष्काम कर. मनाचा स्वभाव कल्पनाशील, नाना सांडी मांडी करण्याचा आहे. त्याला त्या कर्म—क्लेशांतून सोडव. हा देह म्हणजे मी आणि ह्या देहाचे संबंधी म्हणजे माझे ही खोटी समजूत, ही माझी भ्रांति दूर कर. हें सारें दृश्य ब्रह्ममय आहे, इथें दुसरें कोणी नाहीं आणि कांहीं नाहीं असें ज्ञान देऊन माझें द्वैतरूप संशयाचें जाळें तोडून टाक आणि मला ह्या आगंतुक संसार-व्यथेंतून मुक्त कर. मला तुझें तें अनामय पद दे हे रघुराया, माझें एवढेंच मागणें आहे आतां यापुढें दुसरें कांहीं एक मला मागावयाचें नाहीं. हें माझें अखेरचें मागणें आहे.

## २८० कल्याण करीं देवराया

रामदास स्वामींचें हें भजन मोठें अद्‌भुत आहे. या भजनांत लोकांची दशा पाहून ती कशी सुधारेल, त्यांचें कल्याण कसें होईल या विषयीं चिंता आणि तळमळ व्यक्त झाली आहे.

१ हे देवराया, आमचें कल्याण कर. म्हणजे आमचें कल्याण कशांत आहे, त्याचा बोध आम्हांला दे. तें आम्हांला समजावून सांग. सुख वैयक्तिक असूं शकेल. हित हें सार्वजनिक च असतें. आणि म्हणून जनतेचें हित कशांत आहे, त्याची तळमळ रामदास स्वामींनीं देवापुढें मांडली आहे.

२ माझी सारखी तळमळ होत आहे. लोकांचें अज्ञान, तज्जन्य त्यांचे दोष, तदुत्थ त्यांचे क्लेश पाहून सारखी तळमळ होत आहे. या जनतेला देवा, तूंच हातीं धरून नीट चालव. हे अपराधी जीव, तुला विसरून चुकतच गेले. तेव्हां तूंच त्यांचा आता सांभाळ कर. जन्माच्या संकटाबरोबर नाना तऱ्हेचीं संकटावर संकटें आलीं. आतां मरणाबरोबर त्यांत कांहीं बाकी राहिलेलें दिसत नाहीं.

३ कोठें जावें, काय करावें कांहीं समजत नाहीं. सर्वनाश ओढवला आहे असें दिसतें. रामदास स्वामी म्हणतात, आम्ही जीव आपल्याच कर्माचीं फळें भोगतों आहोंत. यांत तुझ्याकडे मुळींसुद्धां बोल नाहीं. खरोखर तुझ्या दयेला तुलानाच नाहीं. कारण तूं सर्वस्वीं परम-मंगलाची किल्ली आमच्या हातीं दिली आहे. कर्म सिद्धांताचा निरपवाद न्याय तूं दिला आहेस.

## २८१ देव जवळीं अंतरीं

१ देवाच्या भेटीसाठीं मनुष्य घरदार सोडून जातो. परंतु देव जवळ म्हणजे अगदीं जवळ, आपल्या अंतरांत, हृदयांत विराजमान आहे. असें असलें तरी त्याची भेट जन्मभर होत नाहीं.

२ कारण काय ? कारण विश्वाची दृष्टि, सर्वांची दृष्टि, चुकली आहे. ती देवाची मूर्ति त्रैलोक्यांत संचली म्हणजे कोंदलेली आहे. सर्व विश्व हें च देवाची मूर्ति आहे. बीजाचा वृक्ष झाल्यानंतर बीज जर शोधूं गेलों तर तें दिसेल काय ? ब्रह्म-बीजाचा हा विश्व-वृक्ष झालेला आहे, म्हणून तें ब्रह्म या विश्वाच्या पानोपानीं आणि कणोकणीं संचलेलें आहे.

३ ही ओळख सद्भाग्यानें, संतजनांची, तत्त्वज्ञांची भेट झाल्यामुळें पटली. त्यामुळें देवाचें दर्शन झालें

४ अशाप्रकारें रामदास स्वामी म्हणतात, मला देवाचा योग म्हणजे देवाची भेट झाली. अर्थात या देहांत च तो देव, आत्माराम, प्रगट झाला. 'आत्मैवेदं सर्वम्' याची अनुभूति आली. सर्वमयता अनुभवली.

## २८२ धांव रे रामराया

१ हे रामराया, धावून ये आणि मला सोडव. माझा अंत पाहूं नकोस. प्राणान्त होण्याची पाळी आली आहे. तुला करुणा कशी येत नाहीं ?

२ तूं धांवून आलास म्हणजे तुझें पोटभर दर्शन घेईन. तुझ्या चरणांची धूळ मी आपल्या केसांनीं झाडीन. तुझी वाट पाहून पाहून माझे डोळे अगदीं शिणून गेले आहेत. तूं आतां येणार तरी केव्हां ?

३ अभिमानामुळें, अहंकारामुळें माझ्या अंगीं ताठा भरला आहे. मला आपल्या बलाचा गर्व झाला आहे. आणि त्या च बरोबर विषयांच्या चिखलांत लोळतांना लाज वाटेनाशी झाली आहे. अशा घाणींत लोळतों आहें तरी त्याची किळस वाटत नाहीं. असा अगदीं उद्धट कोडगा आणि निपट निलाजरा बनलों आहें मी.

४ अशा महा-भवरोगानें मरणोन्मुख झालेल्या मला तत्काळ सोडवण्यासाठीं धनवंतरी रामरायानें वेगवान् मारुतीच्या खांद्यावर बसून अति शीघ्र यावें. आपल्या कृपेचें औषध द्यावें. आणि आपला अभय हस्त माझ्या मस्तकावर ठेवावा.

५ या संसारांत तुझा दास, हा रामदास भयंकर वेदनांनीं तळमळतो आहे. हे जानकीनाथा, तूं त्याची गंमत का पहातोस ? तूं दयाळू आहेस. दीनांचा बंधु आहेस. निज-जनांची मायमाऊली आणि या साऱ्या विश्वाचा पालक आहेस. या सगळ्यां नात्यांनीं हे देवा ! धांव आणि या संसार-समुद्रांतून मला काढ.

## २८३ नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं

हे श्लोक (आणि मागील २७७, २७९ हि) करुणाष्टकांतील आहेत. करुणाष्टकें म्हणजे करुणावचनें. आपले दोष पाहणें, त्यांबद्दल पश्चात्ताप

वाहणें आणि ते दूर कर म्हणून देवाला बाहणें असें या करुणावचनांचें स्वरूप आहे

१ हे प्रभो तूं सर्व-समर्थ आहेस. या दासाचें दैन्य तूंच दूर करूं शकतोस. मी तुझा दास, राम-दास म्हणवतों ना ? तेव्हां माझा भार सर्व तुझ्यावर च आहे. आणि मी कसा आहें ? ना भक्तीचा जिव्हाळा. ना ज्ञानाची जाणीव, ना ध्यानाची चिकाटी माझ्या ठाईं आहे. ना रामाची ओढ, ना विश्रांति. असा केवळ दीन म्हणजे असमर्थ, दुबळा आणि जड जीव आहें मी. परंतु माझा गुण, माझें बळ हें च कीं मी तुझा दास आहें.

२ हे रघुनाथा, जन्मोजन्मीं जडलेला अहंभाव, मी असत् नाहीं सत् आहें, मी जड नाहीं चेतन आहें, मी पशु नाहीं मनुष्य आहें, मी उत्तम वर्णाचा जातीचा कुळाचा आहें, मी गुणी आहें, स्थूल आहें इत्यादि इत्यादि प्रकारचा अहंभाव, मीपणा हें दैन्य तूं माझें तासून टाक. लोकांत मला तुझा दास, 'राम-दास' म्हणून म्हणतात खरें, परंतु त्यास मी खरोखर मुळीं सुद्धां पात्र नाहीं. ती रामभक्ति कुठें आहे माझ्यांत ? मी तर आपल्या अहंभावानें विभक्ति च करीत आहें ! अहंभावाची विभक्ति गेल्याशिवाय तुझी भक्ति म्हणजे तुझें परम साम्य मला कुठून लाभणार ?

३ मुलाला आपल्या बरेवाईटपणाचें ज्ञान भान कांहीं नसतें, मग त्याची लाज कुठली ? परंतु तें सारें आईबापांना असतें. तसा मी तुझा म्हणवितों तेव्हां माझ्या दैन्याची लाज तुलाच आहे. तूंच माझा अभिमान आणि लाज हि बाळगली पाहिजे. तूं माझा आत्माराम सर्व-समर्थ स्वामी पाठीराखा आहेस, मग माझें हें क्रोधादि विकारांचें दैन्य, भिकारपण कसें ? माझें शीघ्रकोपीपण पिटाळून लाव !

[ पुढील भजनाच्या शेंवटीं दिलेली टिप्पणी पहा ]

## २८४ मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे

### सर्वोत्तमाचा दास : रामदास

सर्वोत्तम म्हणजे पुरुषोत्तम. सर्वगुणसंपन्न केवळ निर्दोष परमेश्वर. त्याचा दास म्हणजे त्या परम आदर्शाला वरलेला अनन्य साधक. तो कसा असतो त्याचें चित्र रामदास स्वामी रेखाटत आहेत :

१ तो साधक मनांत सदैव आपल्या साध्याचें ध्यान करीत असतो आणि जनांत तें साध्य प्रत्यक्ष करण्यासाठीं प्रयत्नशील असतो. तो निरंतर जागरूक राहून आपलें साध्यावरील लक्ष चळूं देत नाहीं किंवा प्रयत्न शिथिल होऊं देत नाही. तो सत्य, अहिंसा इत्यादि यमांचा आणि स्वाध्याय तप इत्यादि नियमांचा क्रम म्हणजे अभ्यास हें शरीर आहे तोंवर रसपूर्वक आणि उत्साहानें अखंड चालूच ठेवतो. या त्याच्या उपासनेंत केव्हां हि अंतर पडत नाहीं.

२ तो भगवत्परायण केवळ भगवत्कार्यात च आपला देह चंदना-प्रमाणें झिजवीत असतो. अर्थात् देहगेहाची वृथा चिंता सोडून निष्काम लोकसेवा करीत राहतो. त्याच बरोबर वाणीनें तो निरंतर भगवंताचीं नामें जपत असतो. अर्थात् सांसारिक, प्रापंचिक भाकड गोष्टी वर्ज्य करून तो केवळ पारमार्थिक साधनेच्या व कार्याच्या चर्चा करीत असतो. तो हें सर्व आपलें सहजप्राप्त कर्तव्य म्हणजे स्वधर्म न सोडतां करतो; अर्थात् देह कुटुंब आणि समाज यांच्याविषयींची आपली जबाबदारी न टाळतां करतो. तो आपला देह, कुटुंब आणि समाज या तिहींविषयीचें प्रत्येक कर्तव्य अनासक्त तटस्थ वृत्तीनें पार पाडतो. इंद्रियांच्या आवडीनावडींना, राग-द्वेषांना, वश होऊन नियत कर्तव्यास म्हणजे च स्वधर्मास मनुष्य चुकतो. परंतु सर्वोत्तम रामाचा दास त्यांना वश न होतां आपली निःसंग कार्यदृष्टि ढळूं देत नाहीं. याचें च नांव स्वधर्मानें चालणें.

[ रामायणांत हें च स्वधर्माचरण चित्रित केलें आहे.

> अकर्तव्यं न कर्तव्यं प्राणैः कण्ठगतैरपि ।
> कर्तव्यमेव कर्तव्यं प्राणैः कण्ठगतैरपि ॥

हें गीताशास्त्र आहे; म्हणजे गीतेचा हा आदेश आहे. आणि हा च रमणीय आदर्श रामायणांतील प्रत्येक प्रसंगानें आलेखिला असून अथपासून इति-पर्यंत तो च भरून राहिला आहे. यामुळें च रामायण आमचें राष्ट्रीय काव्य होऊन बसलें आहे. तो आमचा आदर्शग्रंथ झाला आहे, धर्मग्रंथ झाला आहे.

गीतेंत अर्जुनानें विचारलें आहे–

स्थिरावला समाधींत स्थितप्रज्ञ कसा असे।
कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा ॥

परंतु ह्याचें उत्तर आपल्याला रामायणाच्या रूपानें च मिळतें. रामायणांत च तें स्थितप्रज्ञाचें संपूर्ण चित्र आपल्याला पहायला मिळतें. गीतेंत तर १८ श्लोकांत त्या आदर्शाचें केवळ तात्त्विक म्हणजे निर्गुण रूप आलें आहे त्याचें सगुण साकार दर्शन तर आपल्याला रामायणांत च होतें अर्जुनाच्या प्रश्नाच्या उत्तरादाखल च जणूं रामायणाची रचना वाल्मीकीनें केली आहे. गीता आमचा धर्मग्रंथ म्हणजे सिद्धांतग्रंथ असून रामायण आमचें धर्मकाव्य म्हणजे आदर्श व्यवहारग्रंथ होय. आणि म्हणून च आमच्यांत गीता व रामायण यांचा जितका प्रसार आहे, तितका दुसऱ्या कोणत्या हि ग्रंथाचा नाहीं.

यान्ति न्याय प्रवृत्तस्य तिर्यञ्चोऽपि सहायताम्।
अपन्थानं तु गच्छन्तं सोदरोऽपि विमुञ्चति ॥

जो धर्मानें चालतो त्याला पशु-पक्षी हि सहाय होतात आणि जो अधर्मानें वागतो त्याला त्याचा सख्खा भाऊ हि सोडून जातो हा रामायणाचा बोध आहे. रामाला वानरांनीं व गिधाडांनीं मदत केली तर रावणाला त्याचा भाऊ बिभीषण हि सोडून गेला. म्हणून धर्म केव्हां हि सोडूं नये आणि अधर्मानें वागूं नये. हा च धडा गीता-रामायण देतात. सर्वोत्तमाचा दास त्याप्रमाणें 'स्वधर्मे चि चाले.' ]

३ तो जसें बोलतो तसें वागतो. त्याचा जसा विचार तसा उच्चार आणि जसा उच्चार तसा आचार असतो. याचें च नांव सत्यनिष्ठा होय. तो सर्वत्र समदर्शी असतो. सर्वत्र एक परमात्मा च नांदतो आहे असें पाहून तो केवळ विनम्र आणि अहिंसापरायण होऊन राहतो. तो सगुण साकार दैवताची उपासना करीत असला तरी देव हा निर्गुण आहे तो अज आणि अव्यय आहे, याविषयीं तो निर्भ्रांत असतो. देव अवतार घेत नाहीं, तो दशरथ-कौसल्येच्या पोटीं जन्मास येत नाहीं. सीतेचा पति होत नाहीं आणि रावणास मारीत नाहीं किंवा स्वतः हि शेंवटीं मरत नाहीं, परलोकास वा निजधामास

जात नाहीं. तो तर 'आला न गेला स्थिर हा पुराण' असा आहे हें तो स्वच्छ जाणत असतो.

४ तो सर्व विकारांचें मूळ जो कामविकार त्यांतून मुक्त असतो. केवळ बाह्यत: नव्हे तर अंतरांतून मुक्त असतो. अर्थात् तो आंतून अनासक्त व वरून विरक्त असतो. असा तो पूर्ण ब्रह्मचारी असतो. पण तो तापस झाला म्हणून तामस असत नाहीं, जसें सामान्यत: पहायला मिळतें. तो मनांतून शांत झालेला असतो, त्याच्या ठिकाणीं अणुमात्र हि क्रोधरूपी तमोगुण असत नाहीं. सारांश, तो कामरूप रजोगुणांतून व क्रोधरूप तमोगुणांतून मुक्त असतो.

५ षड्विकारांपैकीं बाकीचे चार विकार हि त्यांत नसतात. त्याच्या ठिकाणीं लोभ म्हणजे स्वार्थबुद्धि, आप्पलपोटेपणा असत नाहीं. तो मोहाच्या जाळ्यांत, प्रपंचांत फसत नाहीं. मोह ही कामाची च परिणत अवस्था होय. तो मदांध हि होत नाहीं. मद ही क्रोधाची परिणत अवस्था होय. तो कुणाचा मत्सर हि करीत नाहीं. मत्सर ही लोभाची परिणत अवस्था होय.

मूळ विकार काम. त्यांतून तीन प्रकार विकृतीचे निर्माण होतात– १ कामवासना, २ क्रोधोर्मि, ३ लोभजडता. रसरूप मूल द्रव्याचे जसे तीन प्रकार होतात ना–पाणी, लाटा आणि बर्फ त्याप्रमाणें काम क्रोध लोभ. गीतेंत या त्रिकाचा च उल्लेख आला आहे तो ते मूलरूप होत म्हणून च होय. मोह मद मत्सर या दुसऱ्या त्रिकाचा आलेला नाहीं. कारण हें त्रिक त्या पहिल्या त्रिकाची परिणति मात्र होय. कैरी आणि आंबा जसे एकच त्याप्रमाणें पहिलें त्रिक आणि दुसरें त्रिक एक च होय. कैरी वस्तु आहे, आंबा तिचीच परिणत अवस्था आहे. त्यामुळें गीतेनें मूळ वस्तूचा मात्र उल्लेख केलेला आहे. इतरत्र त्याचा च विस्तार केलेला आहे

हे षड्विकार म्हणजे मनाच्या अशुभ वृत्ति होत. त्यांतून साधक मुक्त असतो. मनाच्या दोषाबरोबर वाणीच्या हि दोषांतून तो मुक्त होतो. तो सद्-वाणी च बोलतो. सद्वाणी म्हणजे सत्यमय व सुखमय वाणी. निष्कपट व न दुखविणारी वाणी. वस्तु आणि रीति या दोहोंचा निर्देश यांत आहे. वाणीनें व्यक्त करावयाचें तें सत्यच पाहिजे आणि तें सत्य मधुररीतीनें च व्यक्त

झालें पाहिजे. ही जी विकारमुक्ति आणि वाक्शुद्धि इथें वर्णिली आहे तीच तुकारामानें 'अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ' म्हणून गाइलीं आहे. तो साधक तसा अंतरीं निर्मळ व वाचेचा रसाळ असतो.

६ मनाच्या विकारांप्रमाणें वाणीचे हि मुख्य विकार वा दोष तीन आहेत : १ असत्य भाषण, २ व्यर्थ भाषण म्हणजे वायफळ बोलणें आणि ३ निंदास्तुति. असत्य भाषण म्हणजे अयथार्थ बोलणें हें दोन प्रकारचें आहे. १ सत्यापलाप म्हणजे जसें आहे तसें नाहीं म्हणून सांगणें वा भासवणें अर्थात् वस्तुस्थिति लपवणें आणि २ विपरीत कथन म्हणजे जसें आहे त्याच्याहून वेगळें वा विरुद्ध सांगणें, अर्थात् वस्तुस्थितीचा विपर्यास करणें. वाणीचा दुसरा दोष म्हणजे व्यर्थ भाषण. अनवश्यक बोलणें. वाणी ही माणसाची शक्ति आहे. ती अशी व्यर्थ उधळतां कामा नये. पण याचें भान मानवाला अद्याप झालेलें नाहीं. मनुष्यमात्राचा हा सामान्य दोष आहे. म्हणून वेदांत ऋषीनें म्हटलें आहे: 'मा नो निद्रा ईशत मोत जल्पी:' आमच्यावर निद्रेचा वा वायफळ गप्पा-गोष्टींचा अंमल न चालो. सामान्य जनतेच्या आयुष्याचा क्षय या दोन गोष्टींत निद्रेंत म्हणजे आलस्यांत नाहींतर वायफळ गप्पा-गोष्टींत होत असतो हें त्या वैदिक ऋषीनें बरोबर निरीक्षून घेतलें आहे. तेव्हां-पासून आजतागायत तसें च चाललें आहे. बोलणें हा प्राणशक्तीचा क्षय आहे, तो टाळला पाहिजे. कंजूष माणूस जसा पैसा अपरिहार्य झालें तर च खर्च करतो तसा शब्द वेंचला पाहिजे. साधक हा म्हणन वाचंयम असतो. तो मौन सेवन करून राहतो. तो मनांत तत्त्वचिंतन करीत असतो. आवश्यक झाल्याशिवाय तो बोलत च नाहीं. बोलावें च लागल्यास तो परिमित बोलतो. कमी नाहीं, जास्त नाहीं. वाणीचा तिसरा दोष म्हणजे निंदास्तुति. निंदा म्हणजे परनिंदा आणि स्तुति म्हणजे आत्मस्तुति. याला च विवाद आणि दंभवाद असें समर्थांनीं परिभापिलें आहे. या दोषामुळें साधकाची अंतर्मुखता नाहींशी होते, तो भटकतो, फसतो; त्याला बाह्याचा, अनात्म्याचा लेप लागतो.

वाणीचे हे तिन्ही दोष वर्ज्य करून साधक आत्मानुसंधानास जपत असतो. तो आत्मसंवाद करीत असतो. [तत्त्वचिंतानुवाद, उगमाचा सुखसंवाद

याचें संक्षिप्त उदाहरण म्हणजे मनाचे श्लोक होत. दासबोध हें त्याचें च सविस्तर उदाहरण होय. ]

७ साधक अधिकतर मौन सेवून आत्मचिंतन च करीत असतो. परंतु जेव्हां तो बोलतो तेव्हां तो अतिशय प्रेमानें, आर्जवानें बोलतो. त्याचें गमक म्हणजे त्याचें बोलणें सर्वांना सुखवितें, प्रिय होतें. तो जें बोलतो तें नुसतें च प्रिय नसतें तर तें सत्य आणि विवेकाचें म्हणजे हिताचें असतें. तो कधीं हि व्यर्थ बोलत नाहीं. म्हणजे जें सत्य हित आणि प्रिय नाहीं तें तो कधीं हि बोलत नाहीं. अर्थात् त्याचें बोलणें कधी हि फुकट जात नाहीं. याचें च नांव अमोघ वाणी. असा तो वाक्‌तपानें वाक्‌सिद्ध होतो.

८ तो तारुण्यांत च अरण्याचा रस्ता धरतो, म्हणजे गृहत्याग करून वैराग्याचा अभ्यास करतो. वासनांच्या घेऱ्यांत तो सांपडत नाहीं. त्याचा परमार्थाचा निश्चय, केव्हां हि ढळत नाहीं. अर्थात् त्याची मुमुक्षुता, मोक्षाची इच्छा केव्हां हि ढिली पडत नाहीं. ती सदैव मरणपर्यंत उत्कट च असते. [यांत रामदासांनीं आपलें चरित्र च वर्णिलें आहे. ते घरून बोहल्या-वरून पळाले आणि पंचवटीला जाऊन त्यांनीं पुरश्चरण केलें. आणि आमरण आपला हा परमार्थाचा ध्यास सोडला नाहीं.]

९ त्याच्या मनांत सांसारिक आशा म्हणजे च दुराशा नसते. दुराशा म्हणजे दुःखपर्यवसायी आशा. त्याच्या मनांत सदैव भगवत्प्रेमाची पिपासा असते, कधीं हि तृप्त न होणारी तहान असते. तो इतकी उत्कट भक्ति करतो कीं देव च त्याचा ऋणी, कर्जदार, बनतो. अर्थात् तो केवळ सेवामय बनून राहतो.

[इथें 'जयास वाटे शीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा । विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ सांडोनि राम आनंदघन । ज्याचे मनीं विषय-चिंतन । त्यासि कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ जयासि वाटे सौख्य व्हावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळ हि त्यागावें । दुःखमूळ जे ॥' इत्यादि ओव्या डोळयांसमोर येतात. रामदासांच्या चरित्राचें आणि त्यांच्या दासबोधाचें हें सर्वार्थसारभूत वचन आहे. ]

१० तो विशेषत: दीनांविषयीं कळवळा बाळगणारा असतो. तो मनानें मवाळ म्हणजे (मातृवत्) अत्यंत मृदु असतो आणि सर्व च जीवांचा हितैषी आणि सेवक असतो. तो आपल्या दासांचा प्रतिपाळ करतो हें काय सांगायला पाहिजे ? अशाप्रकारें ज्याचें हृदय पूर्ण प्रेमानें, दयेनें, भरलें आहे त्याच्या ठाईं क्रोध कुठला आणि संताप कुठला ? सर्वोत्तमाचा दास, राम-दास, हा असा असतो.

[या श्लोकांत रामदासांनीं आपल्या समोर आदर्श धरला आहे आणि त्या आदर्शांत आपलें दर्शन घेतलें आहे. प्रत्यवेक्षण केलें आहे. ' तया अंतरीं क्रोध संताप कैंचा ?' म्हणून आपण अद्याप या अवस्थेला पोंचलों नाहीं असा संकेत करून ती अवस्था गांठायचा निश्चय हि सूचित केला आहे. रामदासांनीं काम जय केला होता परंतु क्रोध जय करावया त्यांचा बाकी होता. ती त्यांची अंतरंग साधना चालू होती असें त्यांच्या अनेक उद्‌गारांवरून दिसून येतें. त्यांनीं आपल्या आदर्शाला 'दासपाळू' म्हटलें आहे. परंतु ते स्वत: आपल्या शिष्यांना कडक रीतीनें वागवीत, प्रसंगीं काठीनें बडवीत हि. आणि हें आपलें वर्तन कांहीं शोभणारें नाहीं असा पश्चात्ताप आणि आदर्शाला पोंचण्याचा त्यांचा निश्चय, दोन्ही यांत उमटले आहेत. रामदासांचा आदर्श आणि त्यांची साधना या दोहोंचा बोध या श्लोकांवरून होतो.]

## २८५ शिरीं आहे रामराज

एकदा रामदासस्वामी फार आजारी पडले होते. आणि त्यांना औषधो-पचार घेण्याबद्दल शिष्य मंडळींनीं फार आग्रह चालविला होता. पण ते रामनामाशिवाय दुसरा कोणताच उपचार करूं इच्छीत नव्हते. त्यांची रामनामनिष्ठा पुढील अभगांत प्रगट झाली आहे.

१ आपल्या डोक्यावर रामरायाचें छत्र असल्यावर आपल्याला दुसऱ्या औषधाला शरण जाण्याची गरज काय ?

२ बरें, त्या औषधाला शरण गेलों तर त्याच्यांत स्वतंत्र शक्ति आहे काय ? नाहीं. रामाच्या शक्तीनें च तें रोग निवारण करूं शकतें. म्हणून त्या रामालाच शरण जाणें बरें. औषध कशाला ? रामाला सोडून केलेला कोणताहि

प्रयत्न, कोणता हि औषधोपचार केवळ व्यर्थ च नव्हे, तर दुःखाला च कारण होणारा आहे. तुम्ही म्हणाल केवळ रामनामानें रोग-निवारण झाल्याचें एखादें उदाहरण तर सांगा. हें घ्या उदाहरण—शंकराचें च आहे. शंकरानें हलाहल विष प्राशन केलें, विश्वाच्या कल्याणासाठीं. त्या विषबाधेचा उपचार त्यानें केवळ रामनाम हा च केला. त्यामुळें च त्याची विषाची आग शमली. असा ज्याच्या नामाचा प्रभाव आहे तो च तो राम आमचा रक्षणकर्ता आहे. त्यामुळें त्याच्या या दासाला कसली च चिंता नाहीं. ना रोगाची ना त्याच्या उपचाराची. ना जिण्याची ना मरणाची. तो अकुतोभय आहे.

## २८६ श्रीहरिचे चरण-कंज

१ श्रीहरीचें, परमानंद-स्वरूप परमात्म्याचें, चरण-कमल अंतरामध्यें आठवीत असावें.

२ ते सर्व वेदांचें प्रतिपाद्य आहे खरें, पण म्हणून तें अत्यंत दुर्लभ आहे अशी कल्पना करूं नका. तें तर सुलभाहून सुलभ आहे. इतकें कीं तें आपल्या अंतरांत च आहे. प्रेमपूर्वक त्याचा ध्यास घेतला असतां गणिका-गजेंद्रा-सारख्यांना हि तो भक्तिवश भगवान् भेटतो. इतका तो सुलभ आहे. असा तो भक्तिसुलभ असतां द्रव्यसाध्य यज्ञयागाचा आणि कष्टसाध्य योगादिकांच्या अवघड वाटेस जा कशाला ?

३ ज्या माणसाला परतीर गांठावयाचें आहे त्यानें परतीराला पोंचवणारी आपली नाव आपण च बुडवून टाकली तर त्याला अति मूढ नाहीं तर काय म्हणावयाचें ? त्याप्रमाणें हा जन्ममरणरूप संसारसागर तरून जाण्याला उपयोगी पडणारा हा मानव-देह, ज्यानें अभक्तीच्या योगें, विषयासक्तीच्या योगें वायां घालवला आणि केवळ भोगपरायण अशा कुत्र्याच्या आणि डुकराच्या योनींत जन्म घेण्याचें साधन केलें, त्याला काय म्हणावयाचें ? असें कां वरें करावें ?

४ हे मानवा, तुला हा रामाचा दास विनवीत आहे. अजून तुझें आयुष्य सरलें नाहीं तोंवर विचार कर. आणि आचाराला लाग. हरि-चरण-

चिंतन करीत जा. विषय-चिंतन करून, तें विषय-विष पिऊन, का फुकट मरतोस ? हरिस्मरणामृत घेऊन अमर हो !

या भजनांत रामदास स्वामींनीं पुढील दोन ओव्यांचा अर्थ गाइला आहे.

'जयास वाटे सौख्य व्हावें । तेणें रघुनाथ-भजनीं लागावें ।
स्वजन सकळ हि त्यागावे । दुःख-मूळ जे ॥
जयासि वाटे शीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥

## २८७ सखिये वो आहेति उदंड वेडे

१ हे माझ्या सखे चेतने जीवकले ! अविद्येनें भ्रांत असे वेडे सांसारिक पहावें तिकडे उदंड दिसतात, परंतु आत्मज्ञानानें ज्यांची देहात्मबुद्धिरूप भ्रांति व तज्जन्य-भेदाधिष्ठित आपपरभाव नाहींसा झाला आहे असे समदर्शी सर्वभूतहितेरत सत्पुरुष विरळा. अशांचें दर्शन संगति सहवास लाभणें परम भाग्य होय.

२ ते लोकांचीं मर्मभेदी दुरुक्तें सहन करतात, रागावत नाहींत. हिताच्या कळवळ्यानें आपणहून, लोकांनीं न पुसतां विचारतां, ते हिताच्या गोष्टी सांगत असतात. ते सर्व जीवांना समान लेखतात. कोणाला उच्च कोणाला नीच, मानीत नाहींत. सर्वांशीं समान सदय व्यवहार करतात.

३ चराचराहून अलग पाडणारा कुठला हि अभिमान त्यांना आवडत नाहीं. त्यांना दीनांचा अपार कळवळा असतो. त्यामुळें त्यांची धांव सदैव त्यांच्याकडे च असते. दीनांच्या उकिरड्यासारख्या असलेल्या वंस्त्या, भंग्यांच्या महारामांगांच्या झोंपड्या, त्यांचे महाल होतात. तिथें च ते राहतात रमतात.

४ अशांच्या भेटीची, रामाचे अंकित रामदासस्वामी म्हणतात, मी रात्रंदिवस आस धरून वाट पाहतों आहें. हे रामराया, अशा समदर्शी कृपाळु सत्पुरुषांचा जिव्हाळा, त्यांची मनापासून आवड, मला दे.

## २८८ ओंव्या : जयास वाटे शीण व्हावा

१ ज्याला दुःख-कष्ट हवे असतील त्यानें अनात्म विषयांचें चिंतन करीत जावें. ते बाह्य असल्यामुळें मिळवावे लागणार आणि न मिळाले म्हणजे दुःखदायी झाल्याशिवाय रहायचे नाहींत. अर्थात् तृष्णा म्हणजे अनात्म वस्तूचा सोस हें सर्व दुःखाचें, अनर्थाचें, मूळ आहे.

२ जो आनंदघन रामाला सोडून विषय-चिंतन करीत राहतो, जो आपली पूर्णकामता विसरून 'आत्मन्येव आत्मना तुष्ट' न राहतां बाह्य विषयांचें ध्यान करीत असतो, त्या सदैव तृषित बुभुक्षित दीन जीवाला सुखसमाधान कुठून मिळणार ?

* * *

३ संध्येंत जो 'केशव नारायण माधव' इत्यादि चोवीस नामांनीं नमिला जातो, पूजापाठांत जो 'विश्वं विष्णुर् वषट्कारो' इत्यादि सहस्र नामांनीं स्तविला जातो अणि व्यवहारांत जो अनंत नामांनीं व्यवहरिला जातो, परंतु वस्तुतः ज्याला कोणतें हि एक नाम किंवा तीं सर्व मिळून हि त्यांच्या एकदेशीयत्वामुळें वा अयथार्थत्वामुळें लागू पडत नाहींत यास्तव जो वेदांनीं नेति नेति म्हणून प्रतिपादिला आहे, अर्थात् जो अनामी आहे नामरहित आहे, अनिर्देश्य आहे, तथापि जो प्रत्येकाच्या हृदयांत निरंतर स्फुरत असतो, तो अंतर्यामी आपण विवेकानें, अतद्व्यावृत्तीनें, ओळखून घ्यावा.

## २८९ भक्ती आकळिला दयाघन

१ भक्तांनीं आपल्या भक्तीनें परम कृपाळु प्रभूला वश करून घेतलें आहे, पहा !

२ अर्जुनाचा तो सारथि झाला. बळिराजाचा द्वारपाळ बनला

३ आणि प्रह्लादाचें वचन खरें करण्यासाठीं खांबांतून प्रगट होऊन हिरण्यकशिपु ठार करता झाला.

४ गिरिधर म्हणतो, त्या प्रभूचें लाघव काय सांगावें ? त्याची भक्त-वत्सलता काय वर्णावी ? अहो तो रुक्मिणीनें घातलेल्या तुळसीच्या पाना-भारोभार झाला !

या भजनांत कवीनें भक्तीचा इतर सर्व-साधनातिरिक्त महिमा वर्णिला आहे. गीतेंत अकराव्या अध्यायाच्या शेंवटीं विश्वरूप दाखवून भगवान् अर्जुनाला म्हणतात--

हें पाहिलेंस तूं माझें अति दुर्लभ दर्शन।
आशा चि राखुनी ज्याची झुरती नित्य देव हि॥
यज्ञ दान तपें केलीं वेदाभ्यास हि साधिला।
तरी दर्शन हें माझें न लाभे लाभलें तुज॥
लाभे अनन्य भक्तीनें माझें हें ज्ञान-दर्शन।
दर्शनें होय माझ्यांत प्रवेश मग तत्त्वतां॥

यांत भगवंतानें आपल्या श्रीमुखानें अनन्य भक्तीच्या बाजूनें इतर सर्व साधनांच्या विरुद्ध दोहोंची तुलना करून निकाल दिला आहे. ह्या निर्णयाला अनुसरून च हिंदुस्थानांत आ-सेतु-हिमाचल भक्तिसंप्रदायाचा मध्ययुगांत विकास आणि विस्तार झाला आहे. भक्तिमार्गाचा प्रमुख ग्रंथ गीता च आहे. भागवतानें त्याचें उपबृंहण केलें आहे. आणि तो भक्तिमार्गाचा आकर ग्रंथ झाला आहे. गीता भागवत आणि नारदादि-भक्तिसूत्रें ही त्याची प्रस्थान-त्रयी होय.

## २९० भाव धरा रे

१ हे स्वहित-तत्पर जीवांनो, मानवांनो! भाव धरा. आस्तिक बना. आणि देवाला आपलेंसें करा.

२ या श्रद्धेसाठीं कोणी कांहीं हि म्हणो. ईश्वराविषयीं दृढ भक्ति धरावी. कोणी निंदा करो, स्तुति करो; दोहींचा त्याग करावा. आणि मी तूं चा विवाद सोडून सर्वत्र समदृष्टि करावी.

३ सर्व सकाम साधना सोडून द्यावी. आणि निष्काम होऊन आत्मोपासना करावी. कुतर्कवृत्ति सोडून द्यावी. पहा, जरा आलेली आहे, मृत्यु समीप आहे.

४ नरदेह दुर्लभ आहे. तो मिळाल्यावर त्याचा दुरुपयोग करून जर तो गमावला, तर या कल्पांत पुन्हां तो मिळण्याची गोष्ट नको. असा विचार करून सद्गुरूला शरण जावें.

५ शिवदिन म्हणतात, आमचे गुरु श्रीकेसरीनाथ यांच्या चरणीं सारी सृष्टि विलीन झाली आहे, असें मी पाहतों. 'गुरु: साक्षात् परब्रह्म' हा माझा निश्चय झालेला आहे. आणि मला माहीत आहे कीं तो भक्त-सखा आहे. भक्तांचा पाठीराखा आहे

या भजनांत आस्तिक्य, निष्ठा, सकामता-वर्जन आणि गुरूपासन अशी साधना सुचविली आहे. गुरूपासन ही गुरुकिल्ली होय.

## २९१ अजि म्यां ब्रह्म पाहिलें

१ आज या पंढरपुरांत मला ब्रह्माचें दर्शन झालें. ज्याला समस्त सुरगण स्तवत आहे अशा परब्रह्माचें दर्शन मला झालें. एखाद्या नटासारखें तें परब्रह्म कमरेवर दोन्ही हात ठेवून आणि पाय जोडून विटेवर उभें आहे. त्या नाना-लीला-नाटकी प्रभूनें, परम कृपालु भक्त-वत्सलानें, भक्तासाठीं पहा कशा गोष्टी केल्या :

२ त्यानें चोखामेळ्याबरोबर ढोरें ओढलीं, त्याचा त्याला कधीं शीण आला नाहीं. आणि जनाबाईबरोबर दळतांना तर तो मजेंत गाणीं गात असे.

३ एकनाथाची भक्ति पाहून तो धांवून आला. आणि त्या श्रीखंड्यानें मोठ्या आवडीनें त्याच्या घरीं जन्मभर कावडीनें पाणी वाहिलें.

४ त्यानें सांवता माळ्याची भाजी विकली. कबीराचे शेले विणले. आणि चिखल तुडवितांना नामस्मरणांत तल्लीन झालेल्या गोरोबांचें बाळ चिखलांत तुडविलें जाण्यापासून बचावलें.

५ त्यानें दामाजीसाठीं पैसे पटविले. कान्होपात्रेचा उद्धार केला. अमृतराय म्हणतात पहा, कशी ही विठो माऊली आहे! तिनें भक्तांचीं सारीं संकटें निवारिलीं आहेत.

## २९२ अशाश्वत संग्रह कोण करी

१ अशाश्वत म्हणजे नाशवंत वस्तूंचा संग्रह कोण करतो ? मला तर नित्य हवें आहे. अनित्याच्या पाठीस मी लागत नाहीं.

२ घर, सोपे माडचा करण्यांत गोडी नाहीं. निवाऱ्याला झोंपडी असली कीं पुरें !

३ ऊंची ऊंची वस्त्रें-प्रावरणें हवींत कशाला ? चिंध्यांची आणि फडक्यांची गोधडी, शीत निवारण्याचें काम चांगलें करते.

४ रससेवनासाठीं, जिभेचे चोचले पुरविण्यासाठीं, कोण आटाआटी चालली आहे जगाची ! खरें म्हणजे रोजच्यारोज जें काय हरि देईल तें भिक्षान्न, तो तुकडा हातांत घेऊन खाल्ला तरी पोट भरतें.

५ अमृतराय म्हणतात, सारें जग राहूं कोठें, लेऊं काय, खाऊं काय, याच्या च चिंतेंत रात्रंदिवस मरत असतें. परंतु मला तर भिकेचे डोहळे सुचताहेत. पिंडपोषणाच्या चिंतेंत व्यर्थ आयुष्य न दवडतां आत्मचिंतनानें त्याचें सार्थक करण्याची माझी मनीषा आहे.

## २९३ भक्तांचिया काजासाठीं

१ भक्तांच्या कामासाठीं आणि साधूंच्या प्रेमासाठीं कुठली हि सेवा करायला मला कांहीं वाटत नाहीं. त्याची लाज मला नाहीं.

२ पहा, दुर्योधनाकडे गेलों होतों पण त्याच्या राजवाड्यांत न उतरतां मी उतरलों विदुराकडे, आणि त्याची कण्या-पेज आनंदानें ग्रहण केली.

३ अर्जुनाचा सारथि बनलों. त्याचे घोडे सांभाळले. त्याचा सेवक बनून सदा त्याचे मागें पुढें राहिलों आणि धर्मराजाच्या घरीं उष्टावळी काढून अंगणांत कंबर बांधून सडे घातले.

४ गोकुळांत गांवढळ गवळ्यांच्या पोरांबरोबर मजेंत त्यांचें ताक भुरकलों. आणि शबरीचीं उष्टीं बोरें मोठ्या आवडीनें खाल्लीं.

या भजनांत कवीनें देवाचें भक्तवात्सल्य वर्णिलें आहे. आईला जसें मुलाचें कुठलें हि काम, ढुंगण धुवायचें हि, करायला कमीपणा वाटत नाहीं. उलट त्यांत तिला आंतरिक सुख च होत असतें, तसें देवाला भक्ताबाबत.

## २९४ संतपदाची जोड

१ हे देवा, मी तुझ्याजवळ दुसरें कांहीं मागत नाहीं. मला संतांची संगति, त्यांची सेवा दे.

२ संताच्या सेवेनें क्षणिक आणि दुःखपर्यवसायी अशा इंद्रिय-सुखाचा, देहसुखाचा लाभ नाहीं होत, तर चिरंतन आणि अवीट अशा आत्मसुखाचा सुंदर अंकुर हृदयभूमींत उगवतो. म्हणून मला संताची चरण-सेवा दे.

३ संताच्या सेवेनें उगवलेला आत्मसुखाचा अंकुर तुझ्या कृपेनें कल्पवृक्ष होतो आणि तो आमचे सर्व मनोरथ पुरवितो, हृदयाचें संतर्पण करतो.

४ अमृतराय म्हणतात, देवा अशा प्रकारें संतांच्या सेवेचा अवसर देऊन तूं आपल्या भक्तांचा शेंवट गोड करीत असतोस. त्यांना स्वानंद-साम्राज्याचा चक्रवर्ती करीत असतोस. म्हणून तुझ्या पायापाशीं मागणी ही कीं मला संतांची चरण-सेवा दे.

## २९५ स्मरतां नित्य हरि

१ नित्य-निरंतर सच्चिदानंद श्रीहरीचें स्मरण-चिंतन असल्यावर माया म्हणजे रागद्वेषादि मनोविकार काय करणार? परमात्म्याची भक्ति करणाऱ्यावर कामक्रोधादि विकारांची, असन्मतीची, मायेची मात्रा चालत नाहीं.

२ अद्वय वचनाच्या म्हणजे अद्वैताच्या, वेदांताच्या श्रवणानें आणि मननानें काळ दूर पळतो, अर्थात् मृत्यूचें भय दूर होतें. मनुष्य अकुतोभय, मृत्युंजय होतो. हें च भयहरण हरीचें स्मरण होय.

३ जेव्हां मनुष्य असें अनुसंधान ठेवतो, तेव्हां तो श्रीहरि कृपा करून मस्तकावर हात ठेवून अभयाचें वरदान देतो.

४ अमृतराय म्हणतात, तच्चिंतनानें तद्रूप झालेला, त्याच्या कृपेनें तन्मय झालेला तो च मी उद्धवगुरूच्या चरणीं अमृतपान करीत आहें. परमामृत चाखीत आहें.

## २९६ हरिभजनावीण काळ

१ हरिभजनावांचून क्षणभर हि राहूं नकोस, आयुष्य व्यर्थ दवडू नकोस. हरिभजन म्हणजे का नुसतें शब्दोच्चारण आहे ? नाहीं. हरिभजन म्हणजे अंतर्बाह्य हरि-मय होणें. चित्त वाणी आणि शरीर या तिहींना हरीच्या रंगांत रंगवणें. प्रथम चित्त तें ज्ञानानें चेतविलें पाहिजे. ज्ञानाच्या अभावीं जीवा-शिवाची भेट होत नाहीं. म्हणून मनुष्य संसार-भ्रांतींत पडतो. दोरीला साप म्हणून भय-भीत होतो. तेव्हां या भ्रांतींतून आणि भयांतून निर्मुक्त होण्यासाठीं चित्तांत ज्ञानाचा दिवा सतत तेवता राखला पाहिजे.

२ चित्तानंतर वाणी. वाणींतून त्या अंत:प्रकाशाचें विवेकाचें प्रकाशन झालें पाहिजे. वाणींतून प्राय: आपण आपले मनोविकार, रागद्वेष च प्रगट करीत असतों. विवेक अथवा ज्ञान हें मनोनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष स्वतंत्र असतें. तें च वाणींतून प्रगट झालें पाहिजे. उगाच मनोविकाराचा चिखल चिवडीत आणि उडवीत बसूं नये.

३ वाणीनंतर शरीर. शरीराने काय करायचें ? मनुष्य प्राय: आपल्या घरादारांत, बायकापोरांत आसक्त होऊन कुटुंबसेवा करीत जगतो. परंतु हें हरिभजन नव्हे. हरिभजनासाठीं हरिजनांची, हरिभक्तांची सेवा केली पाहिजे. कुटुंबासक्ति सोडून हरिजनांची सेवा देहाकडून घडूं लागली म्हणजे त्यांच्या संगतीनें हरिभनाचा मार्ग कळूं लागतो. एकांतांत स्वत:शीं चिंतन होऊन त्याचें रहस्य हृदयंगम होतें. आणि अशाप्रकारें उत्तरोत्तर प्रगति होऊन स्वानुभव लाभून जीवन कृतार्थ होतें. असा स्वानुभव न लाभतां च हरिभजनांत नसतें डोलणें व्यर्थ होय.

४ सोहिरोबा म्हणतात, जिथें ज्ञानज्योति प्रगट झाली तिथें दिवस-रात्र मग नाहीं. जगांतील सामान्य सूर्य प्रचंड प्रकाश देतो, परंतु तो दिवसा च प्रकाशतो. तसा ज्ञानसूर्य नाहीं. तो प्रगटला म्हणजे निरंतर प्रकाश आणि प्रकाश च. त्याचा प्रकाश लाभल्याखेरीज तूं आपली पापणी हालवूं नकोस. अर्थात् त्या ज्योतीचें निर्निमेष अखंड ध्यान धर.

## २९७ केका : तुझें यश चि तारितें

१ तुझें यशोगान च जीवाला तारतें यांत शंका नाहीं. परंतु तें एकटें तारीत नाहीं. तरवारच शत्रूचें मुंडकें उडवते. परंतु ती एकटी नाहीं उडवत. तिला पेलणारा समर्थ हात हवा, तर च ती शत्रु-हनन करूं शकते. कोणी भागवत म्हणजे भगवंताचा परम भक्त भेटल्या शिवाय आणि सज्जनांची संगति लाभल्याशिवाय, विषयी जीव तुझ्या यशोगानांत रंगून जाऊं शकत नाहीं. आणि जोंवर जीव भक्तिरसांत भिजत नाहीं मुरब्ब्याप्रमाणें आंतून बाहेरून भक्तिरसानें ओतप्रोत होत नाहीं तोंवर तारण नाहीं.

२ म्हणून सदैव सत्संगति संतांचा सहवास लाभो, त्या योगें साधु-संतांची वाणी येतां जातां सदैव कानीं पडत राहो. त्या श्रवणानें बुद्धीचा कलंक म्हणजे अविद्या झडत राहो. तत्परिणामीं विषयासक्ति जाऊन पूर्ण वैराग्यलाभ होवो. वैराग्यानें हृदय-शुद्धि झाल्याशिवाय, हृदय निर्वासन झाल्याशिवाय, हृदय रितें झाल्याशिवाय त्यांत भक्तिसुधा भरतां येत नाहीं. म्हणून मोरोपंत म्हणतात कीं संतांच्या चरणकमलांचा आग्रहानें आश्रय घ्या. तेथून दूर लोटलें तरी त्यांना सोडूं नका. हट्टानें घट्ट धरून रहा. त्यांचा वियोग असह्य होऊन मन रडलें पाहिजे. असें होईल, तेव्हां च भक्ति लाभेल. भगवद्यशोगायनांत मन लागेल, रमेल, रंगेल.

३ हा भगवद्भजनाचा निश्चय कधीं ढळूं नये. कुसंगति हा त्यांत मोठा अंतराय आहे, विघ्न आहे; तें कटाक्षानें टाळीत रहावें. आणि भजनांत मन लावावें; तें चळूं देऊं नये. सदाचार अवश्य पाळावा; केव्हां हि नीति सोडूं नये. आत्मतत्त्व हृदयानें आकळावें आणि त्यायोगें देहबुद्धिरूप दुरभिमान गळून जावा. पुन्हां वासनेचा मळ या मनाला लागूं नये. धगधगीत आत्म-ज्ञानाच्या अग्नींत सारें दुरितचक्र वासना-जन्म-कर्म पार भस्म होऊन जावो.

## २९८ ऐक बा रामराया

१ हे रामराया, मी तुझ्या चरणांना वंदन करतों, माझीं एवढी प्रार्थना ऐक. द्वंदमोहानें सर्व विश्वाला ग्रासून टाकणारी, झपाटणारी आपली मोहिनी

माया तूं आवरून घ. मला तींतून मुक्त कर. मला तुझी वास्तविक ओळख होऊं दे.

२ मी अज्ञान आहें, गुण-हीन आहें, असहाय आहें. सदाचार-पतित आहें. परंतु हे देवा, तूं क्षमाशील आहेस. आणि सच्छील अशा आपल्या भक्तांचा अंकित आहेस.

३ म्हणून माझें मागणें हें कीं मला निरंतर अशा साधुसंतांची संगति दे. त्यांच्या संगतीमुळें विषय-प्रसंगांतून, सुखोपभोगाच्या गोडीच्या कुचक्रांतून सुटून मला जिव्हाळ्याची भक्ति लाभेल, माझ्या अंगीं दृढ वैराग्ययुक्त सात्त्विकता बाणेल असें कर.

४ तुझे निर्मल गुण नित्य गावे, श्रद्धा-विश्वासपूर्वक गावे, असें वाटतें; पण हें ओढाळ मन मला आटोपत नाहीं. काय करूं देवा !

५ संसाराचा काम-धंधा करीत असतांना मुखास तुझ्या नामाचा छंद असो. मोरोपंत म्हणतात, हे दयाघना रामा ! या भक्त मयूराचा एवढा अभिलाष, एवढा मनोरथ पूर्ण करावा.

## २९९ रसने न राघवाच्या

१ हे रसने, तूं रसिक म्हणवतेस. परंतु रसाचें निधान जें रामाचें यश त्याची गोडी तूं चाखलेली नाहींस ! किती गोड आहे ते ! त्याची गोडी घे. त्याची आवड धर:

२ लोकांची निंदास्तुति करण्यांत, स्त्रियांच्या आणि सोन्यानाण्याच्या गोष्टी करण्यांत त्याचप्रमाणें आपल्या मानापमानाच्या मनांतील खोट्या म्हणजे काल्पनिक, मानीव व्यथा उगाळीत बसण्यांत तुला फार रस येतो; परंतु त्यांत काय लाभ आहे ? अपार हानि च आहे त्यांत. तें सोड. रामाचें सुयश गा.

३ तें रामाचें सुयश सज्जन मंडळीला सदैव सुखवीत असतें. तें त्यांना ऐकायला इतकें गोड वाटतें कीं त्यापुढें अमृत फिकें !

४ मोरोपंत विनंती करतो कीं हे मैत्रिणी जिह्वे, रसिके, रामाचें सुयशच तूं भक्तिभावानें गात चल, जेणेंकरून तो प्रभु मजवर कृपा करून

मला दर्शन देईल. या संसार-पाशांतून, वासनांच्या यातनांतून मनाला मुक्त करणारें रामाच्या सुयशावांचून दुसरें नाहीं.

## ३०० भज भज भव-जलधिमांजि

१ हे मानवा, या संसार-सागरामध्यें शिवाचें भजन कर. प्रयत्नपूर्वक भजन कर. ती शिवभक्ति च तुला पार करील.

२ क्षणभर आपलें मन निर्मल करून त्याचें चरणकमल दृढ धरशील, त्याला अनन्य भावानें शरण जाशील, तर च तुझें सगळें पाप दूर होईल. बाबा रे! शिवोपासना करायची तर आधीं या आशिव संसाराला तिलांजलि दिली पाहिजे.

३ विषयोपभोगांना वमनवत् टाकून दे; अर्थात् त्यांच्याविषयीं स्वप्नांत देखील लाळ सुटूं देऊं नको, नव्हे त्यांच्याविषयीं अत्यंत घृणा वाटूं दे. कामक्रोधादि षड्रिपूंचें दमन कर. अशाप्रकारें बाह्यभोग-वर्जन करून आणि अंतर निर्वासन करून आपलें मन सुमन कर. मनाचे दोष काढून टाकून त्याला गुणयुक्त कर, भक्ति-सुगंधि कर. आणि तें आपलें सुमन, नम्र मन, शिवाला अर्पण कर. आपल्या सु-मनानें शिवाची पूजा कर. नुसत्या बाह्य फुलांनीं नव्हे.

४ घोर संसार-स्वप्नांतून जागा हो. तूं हें काय करीत आहेस ? जागा हो. भगवान् शंकरच आई-बाप, गुरु सगळे कांहीं आहेत. तेच परम कल्याणकर्ते आहेत. राम कवि म्हणतो, त्या शिवाचें ध्यान करून मी हृदयांत निवालों आहें. शांत शांत झालों आहें.

## ३०१ श्रीरंगा दे मजला सत्संगा

१ हे देवा, मी तुला शरण आलों आहें. माझें तुझ्याजवळ पहिलें मागणें हें कीं सत्संग दे. त्यांतून मला तुझ्या गुणकीर्तनाची गोडी लागेल. संपत्तीची हांव दूर होईल. रागद्वेषाचें पटल दूर सरेल आणि चिन्मय दृष्टि येईल. त्या दृष्टीमुळें मला अभेदभक्ति लाभेल. आणि ती भक्ति च मला तुझें सायुज्य देईल.

विठ्ठलपंत म्हणतात, देवा अशाप्रकारें सत्संगति देऊन माझा उद्धार कर, माझें अखेरचें मागणें हें च कीं मला आपल्या चरणीं ठेव.

## ३०२ ऊठ गोपाळजी

१ हे गोपाळा, हे बाळकृष्णा, ऊठ ! गाईकडे जा आणि त्या घेऊन त्यांना चारावयाला वनांत ने. तुझे सवंगडी तुझी वाट पहात आहेत.

२ रात्र संपली आहे. अरुणोदयामुळें चंद्र निस्तेज झाला आहे. योगिजन समाधिस्थ होऊन अंतरांत तुझें ध्यान धरीत आहेत.

३ उदयाचलावर तेज:पुंज बालरवि आला आहे. आतांपर्यंत अरुणाची प्रभा पसरलेली होती. आतां ती पसरलेली प्रभा पुंजाळत आहे, गोळा होत आहे, रविबिंबरूपानें क्षितिजावर उगवत आहे. आणि इकडे पृथ्वीवर सूर्य-कमळें जलाशयांत फुललीं आहेत.

४ हे माधवा, लक्ष्मीपते, ऊठ वांसरें तुला हांक देत आहेत. हे यादवा, हे यदुकुल-तिलका, ऊठ ऊशीर झाला आहे.

५ हे पुरुषोत्तमा, लक्ष्मी तुझ्या उठण्याची वाट पहात आहे. सर्व च जण तुझ्या दर्शनासाठीं उत्सुक जमले आहेत. त्यांना आपलें श्रीमुख दाखव. मुख-चंद्रानें त्या भक्तचकोरांना तृप्त कर.

६ सोन्याच्या तबकांत हिऱ्यामाणकांचे दिवे घेऊन सुंदरी तुला ओवाळीत आहेत. निर्वासन हृदयांत श्रद्धा-विश्वास आणि भक्तिभाव तेवता ठेवून प्रेमळ भक्त तुला सर्वत्र निरखीत आहेत. तुझें सर्वत्र दर्शन घेत आहेत.

७ हे हरी, हे मनमोहना, तुझे आम्ही जन्मोजन्मीं दास होऊं असें भक्तगण गर्जत आहेत. ऊठ. कृष्ण-केशव कवि तुझ्या चरणकमलांना स्पर्श करीत आहे. तुझ्या पायां लागत आहे. हे श्रीहरी, अगा मायबापा, ऊठ.

## ३०३ आरंभीं देवाचें नाम

१ कोणतें हि काम करायचें झालें कीं आधीं देवाचें नांव घेऊं या. तो कृपारूप आहे, करुणामूर्ति आहे.

२ देवाची आम्ही स्तुति करतों. तो या विश्वाचा नाथ आहे. तो कृपारूप आहे, करुणामूर्ति आहे. तो अंतिम दिनाचा स्वामी आहे.

३ हे प्रभो, आम्ही तुझी च भक्ति करतों आणि तुझी च याचना करतों.

४ आम्हांला सरळ मार्ग दाखव. ज्यांच्यावर तुझी कृपा होते त्यांचा; ज्यांच्यावर तुझा कोप होतो त्यांचा नव्हे, अथवा जे भ्रांत आहेत त्यांचा हि नव्हे.

* * * *

५ देव एक आहे. तो केवलस्वरूप आहे. तो कुणाचा पिता नाहीं. तो कुणाचा पुत्र नाहीं. त्याच्या सारखा हि कोणी नाही असा श्रद्धेचा उच्चार कर.

**टिप्पणी:** इस्लामची ही सार्वभौम प्रार्थना आहे. पूज्य विनोबाकृत अनुवाद आहे.

१ आम्ही म्हणतों– 'सर्वारम्भास् तण्डुलप्रस्थमूला:' परंतु पैगंबर सांगतो– सर्वारंभ ईश्वरनाममूलक करा. जीवनाचा आधार अन्न नाहीं, श्रद्धा आहे.

परमेश्वर करुणामूर्ति आहे. तेव्हां त्याच्या नांवाने जो आरंभ करू तो करुणामूलकच असावा. आमचा प्रत्येक आचार, उच्चार आणि विचार इतकेंच नव्हे तर आमचे स्वप्न-मनोरथ देखील करुणाप्रेरित असावे, कृपामय असावे.

२ आम्ही कुठल्या भू-पतीची आणि इहलोकींचा न्याय करणाराची स्तुति करीत नाहीं. आम्ही तर विश्व-पति आणि अंतिम स्वर्गीय न्याय करणारा जो परमेश्वर त्याची च स्तुति करतो.

३ आम्ही केवळ एका परमेश्वराची भक्ति करतो, तदितर देवदेवतांची नव्हे. आम्हांला मागायचें तें त्याच्याचपाशीं मागतों आणि तें त्याच्याहून वेगळें कांहीं नाहीं.

४ अधर्म आणि विधर्म या दोहोंना टाळून स्वधर्माचा सरळ मार्ग गेला आहे. ती च परमेश्वरभक्ति. अधर्म म्हणजे स्वैराचार. यावर परमेश्वरा चा कोप होतो आणि विधर्म म्हणजे सकामता वा सकाम भजन. ही भ्रांति

होय. तेव्हां अनाचार व स्वैराचार या पापमार्गाचा त्याग करून व सकामतेनें अन्यदेवताभजन करणें म्हणजे भक्तिव्यभिचार वा कामनापूजन करणें ही आडवाट हि वर्ज्य करून निष्काम स्वधर्माचरणरूप परमेश्वर-भक्तीचा, अव्यभिचारिणी भक्तीचा सरळ मार्ग हा ईश्वरी अनुग्रहाचा मार्ग होय.

सर्व धर्मांनीं हें च प्रतिपादिलें आहे. " सोडणें सर्वथा पाप जोडणें पुण्य-संपदा । शोधणें आपुलें चित्त बुद्धांचें सांगणें असें ॥" ह्यांत हा च अनाचार म्हणजे विहित कर्मांचें अकरण, स्वैराचार म्हणजे निषिद्ध कर्मांचें आचरण आणि व्यभिचार म्हणजे परमेश्वराला सोडून इतर देवतांचें भजन अर्थात् कामनापूजन या तिहींहून वेगळा असा निष्काम स्वधर्माचरणरूप परमेश्वरभक्तीचा सरळ मार्ग सांगितला आहे. आणि तो सर्व ज्ञान्यांनीं सांगितलेला आहे असें हि सांगितलें आहे. आणि तें खरें आहे हें गीता धर्मपद व कुराण यांच्या वरील तात्पर्यावरून दिसून येतें.

५ हें इस्लामच्या श्रद्धेचें ख्यापन आहे. वरील फातेहाहून हा वेगळा भाग आहे. फातेहांत धर्मविचार आला आहे. हा वेदान्तविचार आहे. तत्त्व-विचार आहे.

१ एकमेवाद्वितीयं ब्रह्म ।

२ केवलानुभवानन्दस्वरूपः परमेश्वरः ।

३ न सत् तत् न असद् उच्यते।

४ न तस्य प्रतिमा अस्ति ।

हेंच चतुर्विध प्रतिपादन त्यांत आलें आहे.

## ३०४ अहिंसा ही नव्हे वस्तु जी केवळ

१ अहिंसा ही ' ही पहा ' म्हणून दाखवितां येईल वा दिसेल अशी स्थूल वस्तु नाहीं.

२ न मारणें ही अहिंसेची पराकोटी नव्हे. शारीरिक स्थूल अहिंसेचें तें पहिलें पाऊल होय.

३ मनांत कसला हि दुर्भाव उठणें ही सुद्धां हिंसा च होय आणि मिथ्या भाषण करणें ही देखील हिंसा च.

४ उतावळेपणा अविचार हें हि हिंसेचें च रूप होय. आणि द्वेषानें प्रवृत्त होणें ही तर स्पष्ट च हिंसा होय.

५ दुसऱ्याला जें हवें आहे त्याची मालकी राखणें ही देखील सूक्ष्मपणें हिंसा च होय.

६ अहिंसा ही ह्या सर्वप्रकारांहून वेगळी आणि सर्वसमर्थ अशी आहे, असें संत-महात्म्यांनीं म्हटलें आहे.

## ३०५ दधीचि प्रह्लाद शिबि हरिश्चंद्र

१ असुरांच्या पारिपत्यासाठीं देवांना आपली हाडें देणारे दधीचि ऋषि, हरिनामासाठीं त्रिभुवनपति पित्याशीं सत्याग्रह करणारा बाळ प्रह्लाद, श्येनरूपधारी इंद्राला आपलें मांस तोडून देणारा शिबि राजा, दिलेलें दानाचें वचन पूर्ण करण्यासाठीं आपल्यासकट सगळ्या कुटुंबाचा होम करणारा राजा हरिश्चंद्र, पित्याचें वचन खरें करण्यासाठीं चौदा वर्षें वनवास पत्करणारे प्रभु रामचंद्र आणि पित्यासाठीं आईला दिलेलें आजीवन ब्रह्मचर्य पाळण्याचें वचन पाळणारे भीष्म.

२ त्याचप्रमाणें करबलाच्या रणांगणांत सत्याच्या आग्रहासाठीं प्राण देणारे हसन व हुसेन हे मुसलमान वीर, अनलहकच्या सिद्धान्तासाठीं सुळावर चढणारे सूफी सन्त मन्सूर, निर्भय सत्य-प्रचारासाठीं विषाचा प्याला पिणारे ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस आणि देवाचें राज्य पृथ्वीवर आणण्यासाठीं झटणारा व त्यासाठीं क्रुसावर खिळला असतां हि अविचल ईश्वरनिष्ठा बाळगणारा अहिंसा-परायण क्षमाशील येशू ख्रिस्त इत्यादि निष्ठावंत संत आपल्या देशांत व जगांत होऊन गेले.

३ त्यांचे हे सत्याचे मूर्तिमंत व प्रकाशमान दृष्टांत लहान-थोर सर्वांनीं च सत्यानुसरण करीत असतांना चिंतीत जावें.

४ हे सत्याचें अनुसंधान सतत बाळगलें पाहिजे. जागेपणीं आपल्या सर्व क्रिया चालत असतांना, खेळांत आणि विनोदांत देखील सत्याचें अनुसंधान सुटतां कामा नये.

५ आणि अशाप्रकारें जागेपणीं सत्याचें च अनुसंधान ठेवून काम करीत दिवस संपवावा आणि झोपतांना हि त्याचें च चिंतन करीत झोपीं जावें. निर्विकार आणि निःस्वप्न झोप म्हणजे सत्याचें च अनुसंधान होय.

६ संतांना ज्याप्रमाणें सत्य हें सर्व चिंता हरण करणारा चिंतामणि होऊन बसलें तसें तें आम्हांला व्हावें. अर्थात् रत्नाप्रमाणें आम्हांला तें लाख मोलाचें व्हावें आणि कोणत्या हि गोष्टीसाठीं आम्ही तें विकूं नये. त्याला कधीं अंतर देऊं नये.

## ३०६ देवादि तूं तूं चि पुराण आत्मा

१ हे देवा, तू पुराण पुरुष आहेस. विश्वाधिष्ठात्या देवांचा तू आदि-देव आहेस आणि ह्या विश्वाचें पर्यवसान हि तूं च आहेस. तू च ज्ञानाचा कर्ता आणि कर्म आहेस, ज्ञाता आणि ज्ञेय आहेस. साधनेची सर्व गति जिथें जाऊन कुंठित होतें तें परंधाम वैकुंठ तू आहेस. हें विश्व म्हणजे तुझीच अनंत रूपें विस्तारलेलीं.

२ एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति । अग्नि यमं मातरिश्वान आहुः ॥ एक (परम तत्त्व) असून त्यालाच ज्ञानी पुरुष अग्नि यम वायु इत्यादि बहुविध नांवांनीं आळवीत असतात. या वेद-वचनाचा अनुवाद करून म्हटलें आहे :

तूं अग्नि आहेस, तूं वायु आहेस, तूंच यम वरुण चंद्र इत्यादि सारे देव आहेस. तूं ह्या सर्व प्रजांचा बाप आहेस. नव्हे त्यांच्या बांचा हि बा आहेस. तुला सहस्रशः नमस्कार असोत. आणि पुन्हांहि खूप खूप नमस्कारावर नमस्कार असोत.

३ समोर तूं च आहेस, त्या तुला समोर नमस्कार. तूंच पाठीमागें हि आहेस, त्या तुला पाठीमागें नमस्कार. खालीं वर, आंत बाहेर, चोहींकडे तूंच तूं आहेस त्या तुला सर्वांला सर्वत्र नमस्कार. तुझी शक्ति अनंत आहे, तुझें सामर्थ्य अपार आहे. तूं सर्वांलाच गुंडाळून ठेवतोस म्हणून तूं सर्वच आहेस.

४ तूं ह्या चराचर विश्वाचा बाप आहेस. तूंच ह्याची परम पूजनीय गुरुमाउली आहेस. तुझ्यासारखा हि कोणी नाहीं, मग तुझ्या बरोबरीचा

आणि तुझ्याहून वरचढ दुसरा कोण असणार ? तिन्ही लोकांत तुझ्या सामर्थ्याला दुसरी सर नाहीं.

५ म्हणून मी तुला लोटांगण घालतों, सर्वांगानें शरण येतों, परिपूर्ण आत्मनिवेदन करतों. हे प्रभो, मजवर प्रसन्न हो. तूं अर्हत्तम आहेस, परम स्तुत्य आहेस. मज लेकराचें तूं बाप, मज सख्याचें तूं सखा, मज प्रियेचें तूं प्रिय बालिश चाळे, बरोबरीचें वागणें वा सलगी आणि अति सलगी पोटांत घाल, मला क्षमा कर.

## ३०७ देह असे यंत्र मी तों यंत्री आत्मा

१ देह हें एक यत्र आहे, मी आत्मा त्याचा यंत्रज्ञ चालक आहे असा आत्म-प्रत्यय साधकानें बाळगावा.

२ देह म्हणजे मी असा (पशुवत्) देहाभिमान धरून आत्मघात करूं नये, तर देह वेगळा, मी त्याचा स्वामी आत्मा वेगळा, असा विवेक करून आत्म्यांत च आत्मबुद्धि स्थापावी.

३ यंत्रापासून काम घ्यायचें तर त्याला तेल-वंगण हें दिलें च पाहिज.

४ परंतु वंगण देतांना आपण तें घाण म्हणून द्यायचें च नाही असें करीत नाहीं, किंवा छान म्हणून घडाभर ओतीत नाहीं. तर कामापुरतें द्यायचें तेवढें च देतों. देहाला द्यायच्या आहाराविषयीं अशी च निःसंग म्हणजे अनासक्त दृष्टि हवी. देहापासून घ्यायच्या कामाला गरजेचें तेवढें त्याला तटस्थबुद्धीनें द्यावें.

५ अस्वाद व्रत साधायची गुरुकिल्ली हें विज्ञान म्हणजे विवेक ज्ञान च होय. त्याला च आपण, विनोबा म्हणतात, शरण गेलें पाहिजे.

## ३०८ नित्य पुरवूनि वासनेचा छंद

१ वासनेचे छंद, म्हणजे स्वादवृत्तीच्या मागण्या, रोजच्या रोज पुरवीत राहून जिभेचा गुलाम मनुष्य आपण जिभेचे स्वामी आहों, जें शरीर-धारणेला

आवश्यक तें व तेवढें च शरीराला द्यावें इत्यादि विवेक गमावून बसतो आणि त्यामुळें नाना क्लेश, आधि व्याधि उपाधि, भोगीत राहतो.

२ त्यासाठीं त्याला औषधोपचारापाईं पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागतो आणि इकडे त्याचें आयुष्य हि घटत जातें आणि मग तो कायमचा वैद्यपराधीन होऊन बसतो.

३ मनुष्याला या जीवनांत जें काय साध्य करून घ्यायचें त्याचीं साधनें च म्हणजे हीं शरीर-इंद्रियें. तीं त्यानें खरें म्हणजे मालकाप्रमाणें वापरायचीं.

४ परंतु उलट तो च त्यांच्या ताब्यांत जातो आणि देहाचा गुलाम व इंद्रियांचा लाचार होऊन बसतो. पांगळ्याला जशी आपल्या पायांवर सत्ता नाहीं, तशी ह्याची आपल्या देहावर इंद्रियावर कांहीं सत्ता चालत नाहीं. तो पंगु होऊन, पराधीन होऊन, बसतो.

५ ही दीनता, पराधीनता, दूर करायची तर विनोबा म्हणतात, अस्वाद व्रताचा मोठ्या आवडीनें अभ्यास केला पाहिजे.

## ३०९ ब्रह्मचर्य हें पाळावें काया वाचा मनें

१ ब्रह्मचर्य हें पाळायचें तें कायावाचामनें पाळलें पाहिजे. चित्ताचा पूर्ण सहकार असल्याशिवाय बाकीचे सारे उपाय निष्फळ च व्हायचे.

२ मनांत जर आवडीनें विकारांचें पोषण होत राहील तर बाह्यत: नुसतें शरीर अंकुशांत म्हणजे संयमाच्या कसरतींत राखून काय उपयोग ?

३ वरकरणीं संयमाची कसरत, पण मनांत मात्र विकारांचें पोषण अशा वागण्याला अनुभवाचें शास्त्र मिथ्याचार म्हणतें. मिथ्याचार म्हणजे वायफळ मेहनत.

४ मन मोकाट सोडून देहाला तेवढे दावांत ठेवणें फुकट आहे. कारण, विनोबा म्हणतात, शेवटीं 'जिकडे मन तिकडे तन'!

## ३१० सादर सहन प्रखर शोधन

१ आदरपूर्वक, उदारतापूर्वक समोरच्या माणसाचें वागणें सहन करावें. त्याचबरोबर आपलें स्वत:चें मात्र प्रखर शोधन करावें, आपले दोष

निर्दयतापूर्वक पहावे आणि ते काढून टाकावे. हें असें कुठवर करायचें असें मनांत आणूं नये. तर हाच क्रम मरेपर्यंत अविरत चालू ठेवावा. याचें च नांव धैर्यसंरक्षण.

२ समोरच्या माणसाच्या दोषांविषयीं सदैव उदार क्षमावृति राखणें आणि आपल्या दोषांविषयीं सदैव कठोर असहिष्णुता बाळगणें आणि परिणामाची चिंता च न करतां हें असें आमरण निरंतर आचरीत राहणें-- असा हा प्रेमाचा, अहिंसेचा, मार्ग आहे. हा नंदादीप आपण सतत तेवत ठेवूं या. याच्या योगें सगळे च पुनीत होतात. सर्वांचें च मंगल होतें.

३ वैरी वैर विसरून साह्य करूं लागतो. चोर चोरी सोडून रक्षक बंधु होतो. कपटी कपट सोडून सरळ वागूं लागतो.

४ या मार्गानें जातांना पावला-पावलाला ईश्वराचें भान, म्हणजे देहनिरपेक्ष अंतिम आदर्शाचें स्मरण, होत राहतें आणि सत्याचें म्हणजे धर्माचें, स्वकर्तव्याचें स्पष्ट आणि स्पष्टतर ज्ञान होत जातें.

५ हा अहिंसेचा, प्रेमाचा पंथ, विनोबा म्हणतात, वरून वरून क्लेशाचा म्हणजे कष्टप्रद भासतो खरा, परंतु तो वस्तुतः सुखाचा म्हणजे परमानंद-दायक आहे.

## ३११ जं गमे जगतगुरु देव जगदीशनें

१ जगच्चालक परमेश्वराला जें मान्य असतें त्यावरच आपण संतोष मानला पाहिजे. कुठल्याहि गोष्टीबदल आपलें खेद करणें फुकट आहे. आपली संकल्पिलेली गोष्ट कांहीं चालत नाहीं. तिच्यायोगें नुसता उद्वेग मात्र होतो.

२ मी करणार हें म्हणणें निव्वळ अज्ञान आहे. जसें, गाडी ओढत असतात बैल, पण गाडीखालीं, गाडीबरोबर चालणाऱ्या कुत्र्याला वाटत असतें आपणच ओढतो आहों गाडी. त्याप्रमाणें ही सारी सृष्टि, हें सारें विश्व-ब्रह्मांड चाललेलें आहे. कोणी योगी, कोणी योगीश्वर, हें परम सत्य जाणतो.

३ माणसाचें जर चाललें असतें तर या जगांत कोणी दुःखी राहिला नसता. शत्रूला ठार करून त्यानें आपले मित्र च मित्र राखले असते. कोणी

राव आणि कोणी रंक दिसला नसता; आणि घराघरावर छत्र लागलें असतें. अर्थात् सारेच छत्रपति बनले असते.

४ ज्याप्रमाणें ऋतु वेगवेगळ्या वृक्षवल्लींना वेगवेगळें पत्र, पुष्प, फळ देतो त्याप्रमाणें ज्याच्या भाग्यांत ज्या काळीं जें लिहिलें असेल तें त्याला त्यावेळीं आपोआप मिळतें. माणसाचें वेडें मन उगीच चिंता करीत असतें.

५ सांसारिक सुख मिथ्या समज. कृष्णाव्यतिरिक्त दुसरें सारें नश्वर आहे. म्हणून दोन्ही हात जोडून नरसैंया म्हणतो, जन्मोजन्मीं मी हरीचीच याचना करतों.

## ३१२ ज्यांलगी आतमा-तत्त्व चीन्यो नहि

१ जोंपर्यंत आत्मतत्त्वाची ओळख करून घेतली नाहीं, तोंपर्यंत सर्व साधना विफळ होय. अकाली ची वृष्टि जशी व्यर्थ जाते तसा तुझा हा मनुष्य देह असाच वायां गेला !

२ तूं स्नान, पूजा, सेवा केली म्हणून काय झालें ? घरीं राहून दान-धर्म केला, म्हणून तरी काय झालें ? जटा धारण केल्या, भस्म चर्चिलें, म्हणून काय झालें ? आणि केश हि लुंचन करून टाकले म्हणून तरी काय झालें ?

३ तूं तप तपलास आणि तीर्थयात्रा केलीस म्हणून काय झालें ? आणि हातांत स्मरणी घेऊन नामस्मरण केलें म्हणून काय झालें ? गंधाचा टीळा लावला आणि तुळशीच्या माळा गळयांत घातल्या म्हणून काय झालें ? आणि गंगाजलाचें पान केलें म्हणून तरी काय झालें ?

४ तूं मोठा वेदपाठी झालास आणि वैय्याकरण बनलास म्हणून काय झालें ? आणि रागरागिणींचें ज्ञान करून घेतलेंस आणि रंग व अभिनय यांचा ज्ञाता झालास म्हणून तरी काय झालें ? तूं षट्दर्शनें पढलास आणि ब्राह्मणादि वर्णांचा अभिमान धरलास म्हणून तरी काय झालें ?

५ अरे ! ही सगळी पोट भरायची लटपट आहे, कारण तूं आत्मा-रामाची, परब्रह्माची ओळख करून घेतलेली नाहींस. नरसैंया म्हणतो, तत्त्व-दर्शनाशिवाय हें नरदेहरूप चिंतामणि-रत्न तूं गमावत आहेस, दवडत आहेस !

## ३१३ भूतळ भक्ति पदारथ मोटुं

१ या भूतळीं भक्ति हा एक अद्‌भुत पदार्थ आहे. तो ब्रह्म-लोकांत देखील मिळत नाहीं. पुण्य करून तुम्हीं स्वर्ग गांठला तरी शेवटीं तुम्हांला चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यांत पडावें लागतें.

२ म्हणून हरीचे भक्त असतात ते मुक्ति मागत नाहींत, तर या भूतलावर जन्मामागून जन्म मागतात. भगवंताची नित्य सेवा, नित्य कीर्तन आणि उत्सव करायला मिळावा आणि भगवंताचें दर्शन घेतां यावें म्हणून ते जन्मोजन्मीं अवतारच मागत असतात.!

३ या पृथ्वीतलावर भरतखंडांत ज्याला जन्म लाभला आणि जो हरिभक्त झाला त्याच्या मातापितरांची धन्य धन्य होय. त्यानें खरोखर आपला जन्म, आपला देह, सफल केला !

४ तें वृंदावन धन्य होय; आणि ती तेथील भगवंताची लीला धन्य होय. ती ज्यांनीं पाहिली. अनुभवली ते व्रजवासी हि धन्य होत. अष्ट महासिद्धि त्यांच्या अंगणांत हात जोडून सेवेस खडचा असत. आणि मुक्ति तर त्यांच्या घरची दासी होती.

५ या भक्ति-रसाचा स्वाद एक शंकर जाणतो आणि दुसरा जाणतो योगिराज शुक. थोडाफार व्रजांतील गोपी हि जाणतात. नरसैया हें स्वतः भोगून, अनुभवून म्हणत आहे.

## ३१४ वैष्णव जन तो तेणे कहिये !

१ वैष्णव जन म्हणजे विष्णुदास, हा असा असतो. तो परदुःख जाणतो. तो परदुःख दूर करतो, पण मीं मोठा परोपकार केला असा त्याचा अभिमान त्याच्या मनाला शिवत नाहीं.

२ तो जगांत सर्वांना, सज्जनांना आणि दुर्जनांना हि, नमस्कार करतो. तो कुणाची निंदा करीत नाहीं. तो आपली वाणी, कासोटा आणि मन दृढ ठेवतो. अर्थात् तो कायिक, वाचिक, मानसिक संयम पाळतो. अशा परम संयमी पुरुषाची जन्मदात्री धन्य धन्य होय.

३ तो मातीचें ढेकूळ, दगड आणि सोन्याची लगड यांना समान च पाहतो. म्हणून त्याची तृष्णा गळालेली असते. त्याला पर-स्त्री मातेप्रमाणें (स्वप्नांतहि अगम्य) असते. त्याच्या तोंडून असत्य कधीं निघत नाहीं. परधनाचा त्याला विटाळ होतो.

४ मोह-ममता त्याला शिवत नाहीं. असें दृढवैराग्य त्याच्या मनांत सतत जागतें असतें. तो रामनामांत तल्लीन झालेला असतो. असा परम भागवत खरोखर सकलतीर्थरूप होय.

५ निर्लोभ असल्यामुळें तो निष्कपट असतो. त्याच्या ठायीं काम-क्रोधांना जरा हि थारा मिळत नाहीं. नरसैंया म्हणतो, अशा परम वैष्णवाचे दर्शनानें एकाहत्तर कुळांचा उद्धार होतो.

## ३१५ समरने श्रीहरी मेल ममता परी

१ मोह ममता बाजूला सारून जरा हरीचें स्मरण तर कर ! आपलें स्वरूप काय याचा जरा विचार तर कर; अरे तूं कोण आणि कोणास चिकटून बसला आहेस ? आपण कोण ? हें न समजतां च माझें माझें करतो आहेस !

२ देह तुझा नव्हे. तूं विचार करून पहा ! तू देह राखण्याचा किती हि यत्न केलास तरी तो राहणार नाहीं; तो अवश्य जाईल. देह-संबंध सोड, देहाविषयींची अहंता ममता बाजूला सार, म्हणजे काय आश्चर्य होतें तें पहा ! स्त्री पुत्र इत्यादि सारा परिवार, बाबा रे ! तुला फसवीत आहे, नागवीत आहे.

३ तूं रात्रंदिवस धनाचा ध्यास घेतला आहेस. अरे तो च तर मोठा अडथळा आहे तुला. त्यामुळें अगदीं जवळ च असलेल्या प्रभला तूं ओळखलें नाहींस. चांगली हातची संधि गमावलीस; केवढी ठोकर खाल्लीस !

४ गाढ निद्रेनें तुला पूर्ण घेरून टाकलें आहे; मोहांत नुसता घोरतो आहेस ! संतांची हांक ऐकून जागा होशील कीं नाहीं ! नरसैंया म्हणतो, तूं जागा झाला नाहींस तर तें अत्यंत लाजिरवाणें आहे; कारण जा झाल्यानें तुझी जन्मोजन्मींची तृष्णा भगभग, शांत होणार आहे.

## ३१६ जूनुं थयुं रे देवळ जूनुं थयुं

१ बाबा रे ! हें शरीररूपी देऊळ जुनाट झालें आहे. आणि त्यांतील निवासी हा आत्महंस, हा आत्माराम तर अगदीं नवतर आहे.

२ हे हंसा ! हा कायेचा पंजर ढांसळू पाहत आहे, डगमगत आहे. त्यांतील दांत पडले आहेत आणि त्यांचीं खिडारें तेवढीं राहिलीं आहेत.

३ तुझी नि माझी हे हंसा मैत्री जमली, पण हंस उडून गेला आणि पिंजरा रिकामा पडला !

४ मीराबाई गिरधर प्रभूचे गुण गाते. हे प्रभो, प्रेमाचा प्याला तुला पाजून ती स्वतः पीत आहे.

## ३१७ नहि रे विसारुं हरि

१ हरीला विसरूं नये, अंतरांतून हरीला विसरूं नये.

२ पाण्याला, यमुनेच्या पाण्याला, डोक्यावर घागर घेऊन गेलें

३ तर मार्गांत येतांना आणि जातांना दिव्य वस्तु आढळली—सांपडली.

४ येतांना आणि जातांना वृंदेच्या वनांत तुमच्या चरणांचें दर्शन झालें.

५ मीराबाई प्रभु गिरिधराचे गुण गाते. तिनें त्या विठ्ठलाला वरलें आहे.

## ३१८ बोल मा बोल मा बोल मा रे

१ अरे, राधाकृष्णावांचून दुसरें कांहीं बोलूं नको रे, नको रे, नको रे नको.

२ साखर आणि ऊस यांचा रस सोडून देऊन कडूनिंब नको चघळत वसूं !

३ चंद्र आणि सूर्य यांचें तेज सोडून देऊन काजव्याच्या नादीं नको लागूं !

४ हिरा, माणिक इत्यादि जड-जवाहीर सोडून देऊन कथिलाला भुलूं नकोस ! कथील आणि रत्न एकाच तोलाचें मानूं नकोस !

५ मीराबाई म्हणते, मीं आपल्या देहाच्या भारोभार भक्तिरसरसिक प्रभु गिरिधर तोलून घेतला आहे.

## ३१९ मुखडानी माया लागी रे

१ हे प्रियतमा मोहना ! हे सर्व जीवांना मोहून टाकणाऱ्या प्रभो ! तुझ्या मुखाची मोहिनी, तुझ्या मुखाची परम आसक्ति, मला जडली आहे.

२ तुझें मुख मीं पाहिलें, आणि सारें जग मला खारें झालें, नकोसें झालें. माझें मन त्यांतून पूर्ण विरक्त झालें, अलिप्त झालें.

३ संसारी जीवाचें सुख म्हणजे मृगजळाचा पूर. त्याची निःसारता ओळखून बाहेर च पडावें, फिरावें. निःसंग होऊन जावें.

४ मीराबाई म्हणते, हे प्रभो ! मी तुझ्यावरून आपल्याला ओंवाळून टाकतें. मला एक तुझी च आशा आहे. सारें जग सोडल्यामुळें मी भणंग भिकारी नाहीं झालें. मी तर आतां तुला वरल्यामुळें, सौभाग्यवती झालें आहें, महाभाग्यवान् झालें आहें.

## ३२० हरिनो मारग छे शूरानो

१ हरीचा मार्ग. भक्तिमार्ग, हा शूराचा मार्ग आहे. तेथें भ्याडाचें काम नाहीं. आधीं मस्तक ठेवावें आणि मग नाम घ्यावें, असा हा भक्तिमार्ग आहे.

२ जो स्त्री, पुत्र, धन, दौलत इतकें च नव्हे तर आपलें शीर देखील अर्पण करतो, तो च याचा रस पिऊं शकतो. समुद्रांत मोती काढायला बुडणारा मरजीवा (मरणावर जगणारा) च आहे तो !

३ मनांतली संशयवृत्ति सोडून देऊन जो निश्चयपूर्वक मरणाला कवटाळतो, त्यानें च शस्त्राच्या मुठींस हात घालावा. जे तीरावर उभे राहून तमाशा पाहतात, त्यांना कवडी मिळत नाहीं !

४ प्रेमपंथ ही अग्नीची ज्वाला आहे. ती पाहून च सामान्य माणूस मागें पळतो. जो आंत शिरला आहे, जो जळतो आहे, तो महासुख मानतो; परंतु बाहेरून पाहणाराला मात्र चटके बसतात. धग असह्य होते.

५ मस्तकाच्या बदल्यांत किमती वस्तु मिळविणें ही गमतीची गोष्ट नव्हे, फुकाफुकीची गोष्ट नव्हे. मनाचा मळ टाकून देऊन तो मरजीवा (मरून जगणारा) महापद पावला आहे.

६ रामप्रहरामधें रमणारा मस्त-राम पुरा प्रेमी च याचा पारखी होय. तो च, प्रीतम म्हणतो, जगदीश्वराची लीला रात्रंदिवस पाहत असतो.

## ३२१ त्याग न टके वैराग बिना

१ कोटि उपाय करा, परंतु वैराग्याशिवाय त्याग हा टिकूं शकत नाहीं. अंतरांत खोल इच्छा राहते. ती कशी वरें काढून टाकतां येईल ?

२ वैराग्याचा वेश घेतला, स्वदेश दूर राहून गेला ! वरून वेश तर छान वनला, पण आंत मोह पुरेपूर भरला आहे !

३ जोंपर्यंत काम, क्रोध, मोह, लोभ इत्यादींचें मूळ उपटून टाकलें जात नाहीं, तोंपर्यंत अनुकूल प्रसंग लाभतां च ते अंकुरतात आणि पल्लवतात आणि जोगाचा भोग होऊन बसतो.

४ उष्ण ऋतूंत भूमींत वरून बीज दिसत नाहीं, पण पावसाळ्यांत मेघवृष्टि होतांच सर्वत्र हिरवळ दिसूं लागते. त्याप्रमाणें मन विषयाधीन होतें, विषयाकार होतें.

५ चुंवकाला पाहून लोखंड चलित होतें, त्याप्रमाणें विषयाच्या सांनिध्यानें मन आणि इद्रियें चलित होतात. विपय नसला म्हणजे मन स्वस्थ दिसतें पण विपय मिळतां च ते भोगवश होतें.

६ बाह्यतः त्याग करायचा आणि आंतून मनानें भोग करायचा, अशानें कार्यभाग होत नसतो. वर्णाश्रमापासून च्युत झालेला शेंवटीं अनर्थास च प्राप्त व्हावयाचा.

७ असा योगापासून म्हणजे संन्यासापासून म्हणजे वर्णाश्रम धर्मापासून आणि भोगापासून भ्रष्ट झालेला पुरुष नासलेल्या दुधासारखा होय. असल्या दुधांतून दही, लोणी, तूप मिळणें दूर राहिलें, पण तें स्वतःच बिघडून बसलें, नासून गेलें !

८ घटकेंत योगी आणि घटकेंत गृहस्थ आणि घटकेंत वनस्थ होणाऱ्या माणसाचें वैराग्य, निष्कुळानंद म्हणतो, विचार हीन होय, विवेकहीन होय.

## ३२२ रे शिरसाटे नटवरने वरीये

१ प्रभूला आपलें शिर अर्पण करून वरायचें असतें. शिराच्या, जीवनाच्या वदल्यांतच तो मिळतो. आणि एकदां पाऊल पुढें टाकलें तें परत मागें घ्यायचें नाहीं.

२ अंतर्दृष्टि करून पाहिलें तर जगांत फारसें शहाणपण दिसून आलें नाहीं. म्हणून हरीच्या चरणीं हें मस्तक अर्पण केलें.

३ आतां समजून घेतल्याखेरीज बाहेर पडतां कामा नये. हरिचरणीं बुडी देऊन ठाव काढला पाहिजे. रणांत जाऊन भागूबाईपणा दाखवतां कामा नये. रणांत मुखावर वीरश्रीचें पाणी राखून देह ठेवला पाहिजे.

४ प्रथम वहाद्दर म्हणून रणांत जायचें आणि मग रणांतून पळ काढायचा ! असें कळाहीन तोंड घेऊन जगणें तें काय होय ?

५ पहिल्यांदा च मनाला तीनतीनदां बजावून सांगावें आणि ईर्षेनें युद्धावर जाऊं नये. आणि एकदां युद्धावर गेल्यानंतर मग कटून मरावें.

६ रंगून हरीचें नांव घ्यावें. हांक मारली असतां मग मागें हटतां कामा नये. ब्रह्मानंद म्हणतो, तिथें मरून च सुटायचें.

## ३२३ मारी नाड तमारे हाथे

१ हे प्रभो ! माझी नाडी तुझ्या हातीं आहे. आतां माझा तूं च सांभाळ कर. मला आपला समजून आपल्या पायाशीं राख.

२ पथ्य नि अपथ्य मला कांहीं च समजत नाहीं; त्यामुळें रोगव्यथा सारखी वाढत असते. मला काय होत असेल बरें ! प्रभो, पहा तर खरें !

३ तूं अनादि सद्वैद्य आहेस. कोणताहि औषधोपचार करण्यांत तूं सिद्धहस्त आहेस. दिवस मोजके उरले आहेत. आतां उशीर लावूं नकोस. वेळेवर ये.

४ हे विश्वेश्वरा ! अजून माझी आठवण तुला कशी नाहीं ? हमखास उपाय हातीं असतांना हार कां खायची ? हे प्रभो ! माझा महामोह, माझी घोर मच्छीं, दूर कर.

५ हे प्रभो ! माझें काय होणार ! सर्वनाश झाल्यानंतर का तूं सैन्य घेऊन येणार ! तुझी च लाज जाईल; विचार कर.

## ३२४ सदगुरु शरनविना अज्ञानतिमिर टळशे नहिं रे

१ सदगुरुला शरण गेल्याखेरीज अज्ञानाचा अंधकार दूर होणार नाहीं. जन्म आणि मरण देणारें तें अज्ञानरूप बीज जळून जाणार नाहीं.

२ प्रेमामृताचें पान केल्याखेरीज, भक्ति रसायन घेतल्याखेरीज, खऱ्या-खोटयाचा विवेक आल्याखेरीज, हृदयांतील अहंकाररूप गांठ फुटायची नाहीं.

३ शास्त्रपुराणे नित्य ऐकिलीं; इंद्रियें, मन आणि शरीर दक्षतेनें संयमांत ठेवलीं; तरी विचारावांचून सुखाचा मार्ग सांपडणार नाहीं.

४ माझें तुझें करण्यांत भेदबुद्धींत सार नाहीं. भलें वाईट काय आहे तें ओळख. आणि गडी माणसें, पुत्रकलत्र यांच्यात च आयुष्य घालवूं नको.

५ केशव म्हणतो, हरीची सेवा करीत करीत परमानंद प्राप्त कसा करून घ्यावा हें दाखवून देणारे सत्पुरुष शोध केल्याखेरीज अर्थात् तशी लायकी मिळविल्याखेरीज मिळायचे नाहींत.

## ३२५ रामबाण वाग्यां होय ते जाणे

१ ज्याला रामबाण लागला, तो च त्याची महत्ता जाणतो.

२ ध्रुवाला लागला, प्रह्लादाला लागला, आणि जो लागला तो पक्का हृदयांत च घुसून बसला ! शुकदेवाला तर गर्भस्थ असतांना च लागला अशी शास्त्रांची साक्ष आहे.

३ मोरध्वज राजाचें मन आकर्षून घेण्यासाठीं तो प्रेमळ भगवान् काशीला जेथें तो राजा, पुत्र आणि पत्नी यांच्या हातीं आरा देऊन आपल्याला करवतून घेत होता तेथें हजर झाला.

४ मीराबाईवर राणा खड्ग घेऊन धावला, तेव्हां तिचें रक्षण देवानें केलें. राण्यानें तिला विषाचा प्याला दिला; तर त्याप्रसंगीं देवानें तो अमृताचा करून टाकला.

५ नरसी मेहत्याची त्यानें हुंडी स्वीकारली आणि मध्यस्थाचें काम केलें. अशाप्रकारें भक्तवत्सलानें किती-किती भक्तांना उद्धरलें. धना भगत त्यांचें स्मरण करतो.

## ३२६ निश्चे करो रामनुं नाम

१ एक रामनामाचा निश्चय करा. त्यासाठीं अंगाला राख फासून जोग घेण्याची गरज नाहीं. अथवा भगवे कपडे घालण्याची हि गरज नाहीं. अथवा सगळी भिक्षा एका भांडयांत कालवून हि खाण्याची गरज नाहीं.

२ हवें तर तुम्हीं कपडे भगवे करा, हवें तर सफेद राखा. हा बाह्य आचार झाला. त्याला किंमत नाहीं. पण महत्त्वाचें जें आहे तें हें कीं समोरच्या जीवाला दुखवूं नका. त्याला सुख कसें होईल हें पहा.

३ एका पारडयांत शंभर संसारी आणि दुसऱ्या पारडयांत एक जोगी अशी तुलना केली जाते. पण कोणत्या जोग्याला राम मिळाला आहे ? असा एक तर दाखवा !

४ नरसी मेहता, मीराबाई, प्रह्लाद, सेना न्हावी, धना, पीपा, रैदास, कूबा, गोराकुंभार, वोडाना रजपूत, गंगाबाई इत्यादि सारे जन जोगी थोडे च होते ? ते हरिचरणीं लीन होऊन घरीं च राहिले. त्यामुळें देवाला च त्यांचेकडे, त्यांच्या घरीं, यावें लागलें.

५ रंका-बंका, सजन कसाई हे रात्रंदिवस भजन करीत आणि त्यांना देवानें दर्शन दिलें असें आपण ऐकतों. पण कोठल्या जोग्याला राम मिळाला आहे ? एक तर सांगा असा !

६ जोंपर्यंत आपण आपल्याला ओळखत नाहीं, आत्मज्ञान करून घेत नाहीं, तोंपर्यंत तो आत्माराम अंगाला राख फासून, उलटें टांगून घेऊन अथवा बायको सोडून जंगलाचा रस्ता धरून का मिळत असतो ? मुळीं च नाहीं !

७ जो जंगलांत मंगल म्हणजे दुःखांत सुख आणि मंगलांत जंगल म्हणजे सुखांत दुःख करूं जाणतो, ज्याला कडू तें गोड आणि गोड तें कडू होतें, त्याला च राम वश होतो.

८ ज्याप्रमाणें दुधांत तूप अथवा तिळांत तेल सर्वत्र व्यापून असतें त्याप्रमाणें या सार्‍या विश्वांत विश्वात्मा भरून आहे. नरभा म्हणतो, अशी ही त्याची लीला आहे.

## ३२७ हरिने भजतां हजो कोईनी लाज

१ जो कृष्ण-देवाच्या प्रेमांत रंगला आहे अशा कोण्या भक्ताची लाज गेली असें कधीं ऐकिवांत नाहीं. वेदांची, शास्त्रांची पुराणांची अशी साक्ष आहे.

२ पहा, त्या भक्त-वत्सल प्रभूनें प्रह्लादाचें रक्षण केलें आणि हिरण्यकशिपूला ठार केलें. बिभीषणाला राज्य दिलें आणि रावणाचा संहार केला.

३ त्या भक्त-वत्सलानें नरसी मेहत्याला हातोहात हार आणून दिला. ध्रुवाला अढळपद दिलें आणि आपला करून ठेवलें.

४ त्या भक्त-वत्सलानें मीराबाईला दिलेलें जालीम विष पिऊन टाकलें. त्यानें द्रौपदीला वस्त्रें पुरविलीं. त्यानें पांडवांच्या घरीं उष्टीं काढलीं.

५ असा हरिभजनाचा प्रताप आहे, लाभ आहे. म्हणून प्रेमदास हात जोडून म्हणतो, बापांनों, आतां तरी भजन करीत जाल ना! तो भक्त-वत्सल अशाप्रकारें भक्तांचीं दुःखें दूर करीत असतो!

## ३२८ दिलमां दीवो करो रे दीवो करो

१ बावा रे! हृदयाच्या गाभार्‍यांत दिवा लाव. आणि कामक्रोधादि विकारांचा अंधकार दूर कर.

२ प्रेमाची पणती घे. त्याच्यांत दयेचे दिवेल घाल. आणि त्यांत स्मृतीची वात ठेव. आणि तिला ब्रह्माग्नीनें दे पेटवून.

३ खर्‍या अंतःकरणाचा जेव्हां दिवा होईल, तेव्हां अंधार फिटेल. आणि मग ब्रह्मलोकाची ओळख पटेल.

४ अशा तर्‍हेचा निर्भय दिवा, अंधकाराला गिळण्यास समर्थ असा प्रकाश, त्याला डोळ्यांनीं पाहून तर घ्या!

५ दास रणछोड म्हणतो, मीं घरांत शोध केला. तेव्हां मला किल्ली सांपडली. ती घेऊन मीं कुलूप उघडलें, तों काय भूमंडळांत उजेड च उजेड झाला.

## ३२९ अपूर्व अवसर एवो क्यारे आवशे

१ अशी ही अपूर्व संधि केव्हां बरें येईल? केव्हां बरें मी अंतर्बाह्य, निर्ग्रंथ, सर्व-बंधन-निर्मुक्त, होईन ? सर्व संबंधांचें बंधन साफ काटून टाकून केव्हां बरें मी महापुरुषाच्या मार्गानें विहार करीन ?

२ सर्व भावांविषयीं, कल्पनाविषयीं उदासीन वृत्ति झाली आहे. देह उरला तो देखील केवळ संयमासाठीं च मानला. त्याहून वेगळी दुसरी कांहीं कल्पना करीत नाहीं. देह देखील कुठल्या हि मोहाला थोडा हि वश होत नाहीं.

३ दर्शन-मोह पार करून अशाप्रकारें बोध झाला आहे. आणि देहाहून सर्वस्वीं भिन्न अशा केवल चैतन्याचें ज्ञान झालें आहे. आणि त्यामुळें चारित्र्य-मोह पार गळून गेला आहे. अशा शुद्ध रूपाचें ध्यान चाललें आहे. असा अपूर्व योग केव्हां बरें येईल ?

४ असें हें मीं परमपदप्राप्तीचें ध्यान केलें आहे; हातांत नाहीं अडका आणि बाजारांत चालली धडका असा च प्रकार आहे. दरिद्राचा मनोरथ आहे हा ! तथापि राजचंद्र म्हणतो, मनाला एवढी खात्री आहे, की प्रभूच्या आज्ञेनें तें च स्वरूप मी होईन.

## ३३० बहु पुण्यकेरा पुंजथी

१ गांठीं पुष्कळ पुण्य झालें तेव्हां कोठें हा पवित्र मानवदेह मनुष्याला मिळाला आहे. आणि तरी हि अरे ! संसार चक्राचा एक फेरा देखील चुकला नाहीं ! सुख धरायला जातां तें पुढेंच पळतें, हें जरा लक्षांत घ्या ! क्षणाक्षणाला भय देणाऱ्या अशा ह्या जन्ममरणरूप ससारांत आसक्त होऊन रहावें काय ?

२ सत्ता आणि मत्ता वाढल्यानें वाढले काय, तें तर सांगा ? कुटुंब-परिवार वाढला म्हणून वाढ झाली असें समजूं नका. संसार वाढणें म्हणजे

नरदेह गमावणें, वायां घालवणें आहे. याचा थोडा तरी विचार तुम्हांला नको का ?

३ निर्दोष सुख, निर्दोष आनंद खुशाल हवा तिथून घेत जा, परंतु जेणेंकरून हा दिव्य शक्तिमान् पुरुष बंधनांतून सुटेल असें करा ! अनात्मकांत हा आसक्त होऊं नये, हा अडकून पडूं नये, याबद्दल मला कळवळा वाटतो. जें मागाहून दुःखास कारण होतें तें सुख नव्हे, हा सिद्धांत अनात्मकाच्या, अवस्तूच्या त्यागासाठीं उपयोगीं पडतो.

४ मी कोण आहें ? मी कोठून आलों ! माझें खरें स्वरूप काय ? कशांत मी आसक्त होत आहें ? हें धरूं कीं सोडूं ? या संबंधींचा विचार जर शांतपणें विवेकपूर्वक आपण केला, तर सर्व आत्मिक ज्ञानाचें सिद्धांत आपण अनुभविले असें होईल.

५ तें प्राप्त करून घेण्यासाठीं कोणाचें वचन सत्य मानावें ? तें परमपद ज्यानें अनुभविलें त्या निर्मल पुरुषाचें वचन ऐका ! 'अरे आत्म्याचा उद्धार करा, आत्म्याचा उद्धार करा, त्याला ओळखायला विलंब करू नका. सर्वांना समदृष्टीनें पहा'. हें वचन आपल्या हृदयांत कोरून ठेवा.

## ३३१ प्रेमळ ज्योति तारो दाखवो

हे प्रभो ! तुझा प्रेमप्रकाश मला दाखव आणि माझा जीवनमार्ग प्रकाशित कर.

१ मी आपल्या घरापासून दूर पडलों आहें आणि मला चोहोंबाजूंनीं घोर अंधारानें वेढलें आहे. या भयंकर काळोख्या रात्रीं मला मार्ग सुचत नाहीं. आपल्या या बालकाचा सांभाळ कर; आणि मला आपला मार्ग दाखव.

२ माझे पाय डगमगत आहेत, मला तूं भक्कम ठेव. मला दूरवरचें भलें न दिसो. दूरवरचें पहाण्याचा मला लोभ नाहीं. मला एक पाऊल बस आहे, एक कदम पुरें आहे.

३ आजवर मी गर्वांत राहिलों आणि तुझी मदत मागितली नाहीं. अजाण बालकानें स्वतःच मार्ग शोधून त्यावर चालण्याचा हट्ट धरला. आणि आतां तें तुझा आधार मागत आहे.

४ भडक ज्वाला पाहून मी आकृष्ट झालों. वास्तविक मला भय वाटायला पाहिजे होतें. पण मीं त्याचाच गर्व धरला. वर्षे लोटलीं आणि ज्या कांहीं चुका माझ्या हातून घडल्या त्यांचेंहि स्मरण मला राहिलें नाहीं; पण आजपासून माझा नवीन अध्याय सुरू होत आहे.

५ हे प्रभो! तुझ्या प्रभावानेंच आजवर माझा निभाव लागला. आज मला तुझ्या प्रेमाची ओढ लागली आहे. मला खात्री आहे कीं ती स्थिर पावलानें चालवून तुझी प्रेमळ ज्योति दाखवीत मला घरीं नेऊन पोंचवील.

६ ती मला दलदल आणि कडे, नद्या आणि नाले पार उतरवून आपल्या घराच्या दाराशीं सुखरूप आणून पोंचवील.

७ रात्रीचा अंत होईल आणि सकाळ उजाडेल आणि मग प्रेमळ प्रभु सस्मित वदनानें मला दर्शन देईल; आणि त्याच्या भोंवतीं दिव्य गण प्रसन्न मुद्रेनें उभे असतील. असें तें तुझें दर्शन एक क्षणभर माझ्या डोळ्याआड झालें होतें तें हृदयांत सदासर्वदा विराजमान असणारें मला मिळेल.

## ३३२ मंगल मंदिर खोलो दयामय

हे दयामया ! तुझ्या मंगल मंदिरासमोर मी येऊन उभा आहें. दार उघड आणि मला आंत घे.

१ जीवनरूप जंगल पार करून तुझ्या मंगल मंदिराच्या दाराशीं हा अबोध बालक येऊन उभा आहे. अंधकार पळाला आणि प्रकाश फांकला. बालकाला आपल्या छातीशीं लाव.

२ तुझें मधुरतम नाम मीं निरंतर गाइलें आहे. अशा या बालकाशीं प्रेमानें बोल. दिव्यतेचा तहानेला हा बालक तुझ्याकडे आला आहे. त्याला प्रेमामृत पाज.

## ३३३ एक ज दे चिनगारी महानल

हे प्रचंड अग्निदेवा ! तुझी एकच ठिणगी मला दे.

१ लोखंड आणि गार यांची चकमक करतां करतां सगळें आयुष्य गेलें. परंतु ठिणगी कांहीं पडली नाहीं आणि माझी सगळी मेहनत फुकट गेली.

२ चंद्र पेटला, सूर्य पेटला. सगळी आकाशाची माडी हि झगमग झाली, पण एकटी माझी शेगडी मात्र पेटली नाहीं. किती पंचायतीची गोष्ट आहे !

३ थंडींत माझी कुडी थरथरत आहे. माझा सगळा धीर खलास झाला आहे. हे वैश्वानरा ! मी अधिक मागत नाहीं. बस, मला एक ठिणगी दे !

## ३३४ अंतर मम विकसित करो

१ हे अंतर्यामी प्रभो ! माझें अंतर विकसित कर, तें आंतून फुलव. तें निर्मल कर, उज्वल कर, सुंदर कर. तें धू, उजळ आणि रंगव.

२ तें जागृत कर, कार्याला उद्यत कर आणि परिणामाविषयीं निर्भय कर. तें मंगल कर, तें निरलस कर, तें संशयमुक्त कर; सत् चित् आनदमय कर.

३ हें प्रभो ! माझें मन सर्वांशीं मिसळूं दे ! देहाचे हे बंध, ही अहंता-ममता, दूर कर. सर्व कामांमध्यें तुझा शांत छंद व्यापून राहूं दे. तुझ्या तालावर माझा सर्व कर्मांचा नाच चालूं दे.

४ सर्वत्र उड्या मारणारें हें माझें चित्त तुझ्या चरणकमलाच्या ठायीं निःचेष्ट, निष्कंप राहूं दे. आणि आनंदीआनंदानें प्रसन्न आणि प्रसन्नतर होऊं दे.

## ३३५ आजि प्रणमि तोमारे चलिब्रो नाथ संसार-काजे

१ हे प्रभो ! तुला प्रणाम करून मी आज आपल्या संसार-धंद्याला; लागतो आहें. तूं माझ्या हृदयांत राहून माझ्या डोळ्यावर नजर ठेव.

२ तूं हृदयनाथ जीवाच्या आंत वस्ती करून आहेस, हें मनाला जणू पक्कें ठाऊक आहे. त्यामुळें जणूं पराकाष्ठेच्या लज्जेनें पापाची चिता जळून मरून जाते.

३ सबंध दिवसभर, सर्व गोंगाटांत तें तुझें अनादि संगीत मी ऐकतों आहें. जणू सर्वांच्या मध्यें तुझी उपस्थिति विराजमान आहे.

४ क्षणोक्षणीं दृष्टींत, वाणींत, सर्व कर्मांत, सर्व विचारांत, संपूर्ण हृदय-वीणेंतच मंगल वाजत आहे.

## ३३६ कत अजानारे जानाइले तुमि

१ किती अनोळखी लोकांची तूं ओळख करून दिलीस ! आणि किती किती घरांत बिऱ्हाड दिलेंस ! जे दूरचे होते ते घनिष्ट मित्र केलेस आणि परक्यांना आप्त केलेंस. जुनें घर सोडून जातांना पुढें काय होईल कोण जाणे ? असा विचार करून मनुष्य चिंतेंत मरतो; परंतु तो हें विसरून जातो कीं नव्यामध्यें जुनाटच तूं बसलेला आहेस.

२ जीवनांत, मरणांत, साऱ्या त्रिभुवनांत, जेथें कोठें आणि जेव्हां केव्हां तूं मला घेऊन जाशील, तिथें तिथें जन्मोजन्मींचा ओळखीचा असा तूंच ओळखूं येणार !

३ तुला ओळखल्यानंतर मग कोणी परका उरत नाहीं; कुठें मनाई नाहीं कीं कसलें भय नाहीं. सर्वांच्या ठाईं तूं एकच जागतो आहेस, असेंच जणूं सर्वदा दिसून येतें.

## ३३७ जगत् जुडे उदार सुरे

१ या साऱ्या विश्वांत उदार सुरांत आनंदाचें गायन चाललें आहे. तें केव्हां बरें माझ्या हृदयामध्यें गंभीर सुरांत निनादित होईल ?

२ वारा, पाणी, आकाश प्रकाश या सर्वांशीं केव्हां बरें मी प्रेमसंवाद करूं लागेन ? हृदयाच्या सभेंत केव्हां बरें तऱ्हेतऱ्हेचा साज-शृंगार करून तारका येऊन बसतील ?

३ कुठेंहि दृष्टि टाकली असतां केव्हां बरें प्राण संतुष्ट होतील ? जाईन तिथून सर्वांना केव्हां बरें मी संतुष्ट करून जाईन ?

४ तूं आहेस ही गोष्ट केव्हां बरें माझ्या जीवनांत सहज होऊन जाईल ? केव्हां बरें तुझें नांव सर्व कर्मांत आपणहून उठत राहील !

## ३३८ जगते जा किछु सुंदर देखि

या जगात जें कांहीं सुंदर दिसतें आहे, त्यांत तें जें सुंदर आहे, तें तूं च आहेस. हे सुंदरा ! तूं ह्या बाह्य सृष्टींत भरून आहेस. तूं माझें अंतर भरून रहा.

२ तुझें हें निळें आकाश सुंदर आहे. फूल सुंदर आहे. दक्षिणेचा वारा सुंदर आहे. धूळ, गवत, पाणी, डोंगर, जंगल या सर्वांमधून तूं च सुंदर नटला आहेस.

३ या सुंदर पृथ्वीच्या पाठीवर येऊन जर तुला मीं ओळखलें नाहीं, तर तुझा हा सारा खटाटोप व्यर्थ होय; आणि माझें हें जीवन हि व्यर्थ !

हे सुंदरा ! तूं माझ्या अंतरांत जाग. माझें अंतर प्रेमानें रंगव. सुंदर ज्ञानानें आणि सुंदर ध्यानानें मला चिरसुंदर होऊं दे !

## ३३९ जेथाय थाके सबार अधम

१ जिथं सर्वांहून खालीं, दीनाहून दीन असतो तिथें तुझें चरण विराजमान असतात; सर्वांच्या शेंवटीं, सर्वांच्या खालीं, सर्वतोपरी अगतिक जन जिथें असतात त्यांच्यामध्यें तुझें वास्तव्य असतें.

२ जेव्हां तुला मी प्रणाम करतों तेव्हां तो मध्यें कुठें तरी अडकून पडतो. तो तुझ्यापर्यंत येऊन पोंचत नाही. कारण अपमानाच्या तळाशीं तुझे चरण पोंचलेले असतात आणि तिथें कांही तो माझा नमस्कार जात नाहीं. सर्वांच्या शेंवटीं, सर्वांच्या खालीं, सर्वतोपरी अगतिक जन जिथें असतात त्यांच्यामध्यें तुझें वास्तव्य असतें.

३ जिथें तूं अलंकार-रहित असा दीन-दरिद्रवेषानें विहरत असतोस त्याचा सुगावा अहंकाराला लागू शकत नाही. सर्वांच्या शेंवटीं, सर्वांच्या खालीं सर्वतोपरी अगतिक जन जिथें असतात त्याच्यामधें तुझें वास्तव्य असतें.

४ ज्यांना कोणी सोबतीसाथी नाही अशांच्या घरीं त्यांचा सगीसोबती होऊन तूं राहतोस. तिथें माझें हृदय पोंचत नाहीं. सर्वांच्या शेंवटीं, सर्वांच्या खालीं. सर्वतोपरी अगतिक जन जिथें असतात त्यांच्यामध्यें तुझें वास्तव्य असतें.

## ३४० तुमि बंधु तुमि नाथ

१ हे प्रभो ! तूं माझा बंधु आहेस, तूं माझा स्वामी आहेस. रात्रं-दिवस निरंतर तूं च आहेस माझा !

२ तूं सुख, तूं शांति, तूं माझें अमृताचें सरोवर आहेस.

३ तूं आनंदलोक स्वर्ग आहेस. तूं संजीवन देऊन आमचा शोक दूर कर.

४ तुझे चरण ताप हरण करणारे आणि दीनजनांना शरण म्हणजे आश्रय असणारे असे आहेत.

## ३४१ पादप्रान्ते राखो सेवके

१ हे शांतीच्या सदना ! हे साधनेच्या अर्था ! देवदेवा, या सेवकाला आपल्या चरणाच्या छायेंत राख.

२ तूं सर्व लोकांचे परम शरण, आश्रय-स्थान आहेस. तूं सर्व अज्ञान-मलांचें हरण करणारा आहेस. तूं शोक-शमन आहेस. तुझे चरण स्नेहमय आहेत; किंबहुना तूं सत्यरूप आहेस, प्रेमरूप आहेस. देव मनुष्य तुझ्या चरणीं लागतात. तूं विश्वाचा अधीश्वर आहेस.

३ हृदयानंद हा पूर्णचंद्र होय आणि तूं अपार असा प्रेमाचा सागर आहेस. मी तहानेला त्याचा एक अमृतबिंदु च मागतों आहें. हे करुणालया ! हे भक्तवत्सला ! आपल्या प्रेममय नेत्रांनीं या दासाकडे पहा.

४ माझ्या चित्तकमलाचा संकोच गेला. तें आपल्या सर्व दलांनीं पूर्ण विकसित झालें, हे हृदय देवा !

५ आकाश पावन प्रकाशानें भरीत, सर्व लोक आपल्या मधुर दृष्टीनें अवलोकीत, सुधागंधी सुखद पवन प्रचारित आणि माझें हें हृदय-भवन संगीत-रवानें निनादवीत माझ्या शून्य जीवनांत ये. लवकर ये. आणि सर्व आशा, सर्व पिपासा आपल्या अमृताच्या पुरानें परीतृप्त कर.

६ ज्ञान दे. प्रेम दे. या शुष्क चित्तांत स्नेहाची वृष्टि कर. माझें हे हृदय आणि हा देह धन्य होऊं दे. हें सारें घर पवित्र होऊं दे. हे शांतीच्या

सदना ! हे साधनेच्या परमार्था ! हे देवा ! या सेवकाला आपल्या पायाशीं राख.

## ३४२ बल दाओ मोरे

१ प्रभो ! मला बळ दे. माझ्या प्राणांत शक्ति दे. संपूर्ण हृदय लुटवून तुला प्रणाम करण्याचें बळ दे, शक्ति दे.

२ सरळ अशा सन्मार्गानें चालायला, सर्व अपकार क्षमायला, सर्व गर्व दमायला, आणि कुमति झिजवायला मला बळ दे.

३ हृदयांत तुला ओळखायला, जीवनांत तुला पूजायला आणि तुझ्या ठाईं चित्ताची चिर वस्ती शोधायला मला बळ दे.

४ तुझें कार्य शिरावर वहायला, संसाराचा ताप सहायला, संसाराच्या कोलाहालांत रहायला, आणि एकांतांत, निःशब्दांत, तुझी भक्ति करायला मला बळ दे.

५ तुझ्या या विश्वरूपांत तुझें प्रेमस्वरूप मिळवायला आणि ग्रह-तारका-रवि-शशीमध्यें तुझी आरती पहायला मला बळ दे.

६ मन आणि वाणी यांच्या अतीत असलेल्या तुझ्या ज्योतींत बुडायला आणि सुख-दुःख हानि-लाभ यांच्यांत तुझी वाणी ऐकायला मला बळ दे.

## ३४३ बहे निरंतर अनंत आनंद धारा

१ अविरत आणि अखंड अशी आनंदाची धारा वाहते आहे. या अपरंपार आकाशांत अनादि असा अनाहत ध्वनि वाजतो आहे आणि असंख्य रवि, चंद्र आणि तारे यांच्या ज्योति जागत आहेत.

२ या अखंड अद्वितीय विश्वब्रम्हांड-राज्यांत तो च एक परम राजांचा हि अधिराज विराजतो आहे. आणि त्या विश्वचरणाच्या चरणीं विस्मित अनिमेष, अवाक् असे कोटयवधि भक्तगण 'तद्गतेन मनसा' नमन करीत आहेत.

## ३४४ रहि रहि आनंद-तरंग जागे

१ राहून राहून आनंदाचे तरंग उठत आहेत.

२ हे प्रभो ! राहून राहून तुझ्या स्पर्शाची माधुरी माझ्या हृदयामध्यें गुदगुल्या करीत आहे.

३ राहून राहून तुझ्या पावलांची चाहूल माझ्या मार्गांत पुढें पुढें मला ऐकूं येत आहे.

४ राहून राहून माझें हें मनाचें आकाश तुझ्या कृपा-प्रसादाच्या सूर्योदयानें रंगत आणि उजळत आहे

## ३४५ Take my life,

माझ्या जीवनाचा स्वीकार कर तें तुला अर्पण केलेलें आहे. प्रभो, तें तुझ्याजवळ राहूं दे.

माझे हात धर. तुझ्या कृपेच्या प्रेरणेनें त्यांची हालचाल होऊं दे.

माझे क्षण आणि दिवस सर्व तुला वाहिलेले आहेत. त्यांचा प्रवाह तुझ्या अखंड संकीर्तनांत वाहूं दे.

माझ्या पायांना आधार दे. त्यांची द्रुत आणि सुंदर लयबद्ध गति तुझ्याप्रीत्यर्थ होऊं दे.

माझा आवाज तुला वाहिलेला आहे. त्यानें तुझें, माझ्या प्रभूचें च, भजन मला नित्य गाऊं दे.

माझ्या ओठींचा स्वीकार कर. तुझ्या संदेशांनीं ते भरून जाऊं देत.

माझें सोनें, चांदी हें सर्वकांहीं तुला अर्पण केलें आहे. त्यांतला एक कण देखील मी माझ्याकरितां ठेवणार. नाहीं

माझ्या बुद्धीचें दान स्वीकार. तिच्या सर्व शक्तीचा तुला वाटेल तसा उपयोग कर.

माझ्या सर्व इच्छाशक्तीचा स्वीकार कर. ती तुझ्याशीं एकरूप करून टाक. ती माझी अशी उरलेली नाहीं.

माझ्या हृदयाचा स्वीकार कर. तें तुझें च आहे. तुझें तें राजसिंहासन बनूं दे.

माझ्या प्रेमाचा स्वीकार कर. त्याचें सर्व भांडार हे प्रभो, तुझ्या चरणाशीं रितें केलें आहे.

मला स्वत:ला च आपलासा करून घे. सदैव तुझ्याकरितां, केवळ तुझ्या च करितां माझें जीवन आहे.

## ३४६ Lead, kindly Light,

हे ज्योतिर्मया, तुझ्या कृपेचा प्रकाश टाकून वाट दाखव. चौफेर पसरलेल्या अंधारांत मला वाट दाखवीत पुढें ने. रात्रीचा घनदाट अंधार पसरला आहे. मी घरापासून दूर आहें. मला वाट दाखव.

माझ्या पायांचें तूं च नियमन कर. दूरचें दिसावें अशी माझी मागणी नाहीं. पुढलें एक पाऊल दिसलें तरी मला पुरें.

असा मी तुझ्याकडे पूर्वीं कधीं च आलों नाहीं, तूं मार्गदर्शन करावेंस म्हणून कधीं करुणा भाकली नाहीं. माझा मी च मार्ग निवडीन. तो मला दिसेल अशा अभिमानांत मी मस्त होतों. — पण आतां तूं च मला मार्ग दाखव.

दिवसाचा झगझगाट आणि डामडौल मला पूर्वी प्रिय वाटे. मनांतून भीति वाटे. पण तिला न जुमानतां माझ्या मनावर अभिमानाचा केवढा पगडा होता ! — पण जाऊं दे, माझ्या भूतकाळाकडे लक्ष देऊं नकोस.

तुझ्या च शक्तीचा आशीर्वाद इतके दिवस माझ्या पाठीशीं आहे. तो च मला पुढें वाट दाखवील. माळरानांतून व दलदलींतून कड्याकपाऱ्यांतून व नदीनाल्यांतून रात्र संपेपर्यंत तो च मला मार्ग दाखवील. आणि मग प्रात:काळीं देवदूतांचीं हंसरीं मुखें——जीं माझीं दीर्घकालापासून आवडतीं होतीं पण मध्यें च मला अंतरलीं होतीं——त्यांचें मला दर्शन घडेल.

## ३४७ When the mists have rolled

सुंदर डोंगरावरून प्रकाशांत चमकणारीं धुकीं विरून जाऊं लागलीं आहेत. आनन्दमय सूर्यप्रकाश नदी-निर्झरांवर पडला आहे. अशा वेळीं, तुषारांच्या इन्द्रधनुष्यांत, आम्हांला आमच्या पित्यानें दिलेल्या आश्वासनाची आठवण होते. धुकीं वितळून गेल्यावर आमची आम्हांला अधिक ओळख पटेल.

त्या प्रकाशमान आणि आनंदमय दिवसाच्या सुप्रभातीं, आम्ही जसे आहोंत तशी आम्हांस आमची ओळख पटेल. आतां इत:पर एकट्यानें चालायला नको. एकदां धुकीं वितळून नाहीशीं झालीं कीं आमची एकमेकांला अधिक चांगली ओळख पटेल.

आमच्यापुढील मार्गावरून आम्ही बहुश: थकलेल्या भारावलेल्या हृदयांनीं पावलें टाकीत जात असतों. भोंवतीं पसरलेल्या काळ्या छायांमध्यें आम्ही आपापल्या क्षेत्रांत नेहमीं च कष्टमय जीवन कंठीत असतों. आणि आमचीं क्षेत्रें एकमेकांपासून कितीतरी दूर. परंतु धुकें वितळून गेल्यावर त्या सुप्रभातीं आम्ही जेव्हां एकत्र जमूं, त्यावेळीं आमच्या उद्धारकर्त्याच्या "या, माझ्या लाडक्या बाळांनो या" अशी हांक कानीं पडेल आणि आमचे सर्व कष्टसायास भरून पावतील.

मग आम्ही मोठ्या समाधानानें व आनंदानें एकत्र येऊन त्या सिंहासनाभोंवतीं जमूं. ज्यांचें आमच्यावर प्रेम आहे त्यांच्या समोरासमोर प्रत्यक्ष दर्शनानें आम्ही जसे आहोंत तशी आमची आम्हांस ओळख पटेल.

आणि सर्व भीषण छाया नाहींशी होऊन, धुकीं पार वितळून जातील. अशा वेळीं, त्या अनन्त दिवशीं आमचीं पापमुक्तीचीं अनन्दगीतें सारखीं निनादत राहतील.

## ३४८ Nearer, my God, to Thee

प्रभो, मी तुझ्या संनिध, अगदीं निकट संनिध येणार. जरी त्याकरितां सुळावर चढावें लागलें, तरी सुळावर चढून देखील तुझें नामसंकीर्तन करीत मी तुझ्या संनिध–अगदीं तुझ्या निकट येणार !

ग्रंथालय, ठा
अनुक्रम वि:
नों: दि:

सूर्य अस्ताला गेला आहे, एखाद्या भणंगाप्रमाणें मी हिंडतो आहें, अंधारानें मला अगदीं घेरून टाकलें आहे, अगदीं थकून मी दगडाला टेकून निजलों आहें. अशा हि स्थितींत जीं स्वप्नें पडतील त्यांतून हि हे प्रभो, मी तुझ्या संनिध, अगदीं तुझ्या निकट येईन.

जें कांहीं तूं मला देशील, जसा मला तूं ठेवशील, तें सगळें मी तुझी दया च मानीन. वाटेनें जात असतांना त्या वाटेवर मला स्वर्गाच्या पाय-ऱ्याच दिसूं लागतील. आणि देवदूत खुणावून मला वाट दाखवितील. असा मी तुझ्या संनिध, तुझ्या अगदीं निकट येईन.

माझ्या जागेपणींचे सर्व विचार तुझ्या स्तुतिस्तोत्रानें उजळून निघतील. माझ्या पाषाणतुल्य दुःखांतून मी मन्दिर उभारीत माझ्या दुःखांच्या वाटेनें मी तुझ्या संनिध, अगदीं तुझ्या निकट येईन.

आणि आनंदाच्या पंखावर आरूढ होऊन अंतरिक्ष कापीत कापीत जरी मी वर वर उड्डाण करूं लागलों, –त्या भरारींत सूर्य, चन्द्र, तारे यांचा हि मला विसर पडेल – तरी शेंवटीं, हे प्रभो मी तुझ्या संनिध, अगदीं तुझ्या निकट येऊन पोहोंचेन.

## ३४९ Rock of ages, cleft for me,

युगानुयुगें उभ्या असणाऱ्या डोंगराप्रमाणें अभंग असा तूं माझ्या-करितां दुभंगलेला आहेस. त्या तुझ्या पोटांत मला ठाव दे. तुझ्या छिन्न-विच्छिन्न केलेल्या शरीरांतून जें पाणी आणि रक्त वाहिलें, त्यानें माझ्या पापाचें द्विवार क्षालन कर. पापाच्या पकडींतून, दोषांतून मला मुक्त कर.

तुझ्या कायद्याप्रमाणें जें तुला हवें आहे, तें मीं किती हि काबाडकष्ट केले तरी पुरें होऊं शकणार नाहीं. किती हि अविश्रांतपणें मी काम करीत राहिलों, माझ्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह जरी अखंड वाहत राहिला तरी माझ्या पापाचें क्षालन होणार नाहीं. त्याकरितां तूं च, केवळ तूं च माझा उद्धार केला पाहिजेस.

रिकाम्या हातानें मी तुझ्याजवळ आलों आहें. केवळ तुझा सूळ हा माझा एकमेव आधार आहे. उघडा-नागडा असा मी तुझ्याकडे वस्त्राकरितां

आलों आहें. अनाथ असा मी तुझी कृपा भाकीत आहें. घाणेरडा असा मी निर्झराकडे धांवत आलों आहें हे उद्धारकर्त्या प्रभो, माझें क्षालन कर. नाहीं तर माझा सर्व नाश होईल.

हें नश्वर जीवन जगत असतां शेंवटीं माझे डोळे कायमचे मिटल्यावर, त्यानंतर अज्ञात प्रदेशांतून भ्रमण करीत असतांना, आणि अखेरीस तुझ्या न्यायासनासमोर उभा असतांना, या सर्व अवस्थांतून तूं च माझा आधार. युगानुयुगें उभ्या असलेल्या डोंगराप्रमाणें अभंग असा तूं माझ्याकरितां दुभंगला आहेस. त्या तुझ्या पोटांत मला ठाव दे

## ३५० When I Survey the wondrous Cross

ज्या सुळावर त्या महान् मानवश्रेष्ठानें बलिदान केलें, तो दिव्य सूळ जेव्हां माझ्या मनश्चक्षूसमोर आणतों, तेव्हां माझी मोठ्यांतली मोठी दौलत-हि त्यासमोर मला कस्पटासमान वाटते आणि माझ्या अहंकाराची मला घृणा येते !

प्रभो, कशाबद्दलचा हि अभिमान माझ्या मनाला न शिवो ! फक्त मला अभिमान एका च गोष्टीचा – त्या ख्रिस्ताच्या सुळाचा तेवढा राहूं दे. या जगांतील मला भुरळ पाडणाऱ्या सर्व मोहक गोष्टी त्याच्या नामावरून मी ओंवाळून टाकतों.

पहा तें त्याच्या डोक्यांतून, हातांतून, पायांतून भळभळां वाहणारें दुःख आणि प्रेम ! त्यांचे ओघळ एकमेकांत मिसळून वहात आहेत. असा दुःखाचा आणि प्रेमाचा संगम घडून आलेला कधीं पाहिला होता का ? कांट्याचा बनविलेला इतका सुंदर दैदिप्यमान मुकुट कधींकाळीं दिसला होता का ?

सृष्टीचें सर्व राज्य माझ्या ताब्यांत आलें आणि तें सर्व जरी त्या ख्रिस्ताच्या प्रेमावरून ओवाळून टाकलें तरी कमी च पडेल ! इतकें अद्भुत, इतकें दिव्य प्रेम ! माझा जीव, माझें सर्व जीवन, माझें सर्व च सर्वस्व त्याला अर्पण केलें तरी तें अपुरें च होईल !

ज्यानें आपण स्वतः भयंकर दुःख आणि असह्य यातना भोगून पापी माणसांना परमेश्वराची कृपा मिळवून दिली, सर्व मानवजातीबद्दल जो जामीन राहिला त्या ख्रिस्ताचा सदैव जयजयकार असो !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 28150 वि:
क्रमांक नों: दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 8309
शाखा

## लेखकाचीं अन्य प्रकाशनें

| | रु. न. पै. |
|---|---|
| धम्मपद | १.०० |
| हिमालयाची हांक | २.०० |
| पै. महंमदाचीं वचनें | ०.७५ |
| येशूची शिकवण | १.०० |
| रामरक्षा सार्थ आणि टीका | ०.५० |
| ,, मूळ | ०.१२ |
| आश्रम-संगीत | १.५० |

e309

REFBK-0009301